# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**सत्र–३ Major - IV**

# आधुनिक भारताचा इतिहास (१८५७–१९२०)

**(History of Modern India (1857-1920)**

**सत्र–४ Major - VI**

# आधुनिक भारताचा इतिहास (१९२०–१९५०)

**(History of Modern India (1920-1950)**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ पासून

**बी.ए. भाग–२ इतिहास**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
बी. ए. भाग - २ इतिहास करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ३००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN - 978-93-49570-48-1

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### अभ्यासमंडळ : इतिहास

**अध्यक्ष – प्रा. डॉ. चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा

- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगौडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षिरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा

- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली

- **डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅण्ड
  सायन्स, अशोक चौक, सोलापूर

- **डॉ. तेजस मदन घारगे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी अ‍ॅण्ड म्युझियम, संत
  गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई

- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फ्लॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळा पार्क, कोल्हापूर

- **डॉ. निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस्,
  कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर

- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे
  मार्ग, सांगली

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०२५-२६ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारीत अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने बी. ए. भाग २ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी **'आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०)'** या विषयाचे सत्र-३ तसेच **'आधुनिक भारताचा इतिहास (१९२०-१९५०)'** हे सत्र-४ साठीचे स्वयं अध्ययनाचे हे पुस्तक सन २०२५-२६ या वर्षात तयार केलेले आहे. सदर लेखनासाठी लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदवी व पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी आणि तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंअध्ययन प्रश्न आणि त्यांची उत्तरे दिली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, शब्दार्थ व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

**'आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०)'** आणि **'आधुनिक भारताचा इतिहास (१९२०-१९५०)'** या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये **'१९५७ चा उठाव, सामाजिक व धार्मिक चळवळी, राष्ट्रवादाचा उदय, टिळकयुग आणि गांधी युग, शेतकरी आणि डाव्या चळवळी, सशस्त्र क्रांतिकारी चळवळ, जातीयवाद आणि फाळणी'** इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र अंतर्गत स्वयं अध्ययन साहित्य निर्मितीसाठी मा. कुलगुरू, प्र. कुलगुरू, कुलसचिव यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक, उपकुलसचिव यांचे सहकार्य लाभले. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी तसेच पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या सर्वांच्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार!

■ संपादक ■

**डॉ. सुरेश चव्हाण**
आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
सरस्वतीनगर, गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**प्रा. (डॉ.) चंद्रवदन नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
ता. कागल, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**'आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०)'**
**'आधुनिक भारताचा इतिहास (१९२०-१९५०)'**
**बी. ए. भाग -२, इतिहास सत्र - ३ व ४**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखकांचे नाव | घटक क्रमांक | |
|---|---|---|
| | सत्र ३ | सत्र ४ |
| **डॉ. अजिकुमार जाधव,**<br>आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, नागठाणे, ता. जि. सातारा | १ | - |
| **डॉ. आरती नाडगौडा,**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर, व्हाया निपाणी, ता. कागल, जि. कोल्हापूर | २ | - |
| **डॉ. संदिप जाधव,**<br>विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | ३ | - |
| **डॉ. (डॉ.) सुरेश शिखरे,**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर. | ४ | - |
| **डॉ. शर्मिला साबळे,**<br>राजर्षी शाहू आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, रुकडी,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | - | १ |
| **डॉ. तानाजी हवालदार,**<br>विश्वासराव नाईक आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज ॲन्ड<br>बाबा नाईक सायन्स कॉलेज, शिराळा, ता. शिराळा, जि. सांगली | - | २ |
| **डॉ. सुरेश चव्हाण,**<br>आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, सरस्वतीनगर,<br>गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | - | ३ |
| **डॉ. उर्मिला क्षीरसागर**<br>श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय,<br>खानबाग, एस. टी. स्टॅण्ड रोड, सांगली. | - | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. सुरेश चव्हाण**
आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
सरस्वतीनगर, गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**प्रा. (डॉ.) चंद्रवदन नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
ता. कागल, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सत्र–३ : आधुनिक भारताचा इतिहास (१८५७–१९२०)** | |
| १. | १९५७ चा उठाव | १ |
| २. | सामाजिक व धार्मिक चळवळी | २५ |
| ३. | राष्ट्रवादाचा उदय | ४८ |
| ४. | टिळक युग | ७९ |
| | **सत्र–४ : आधुनिक भारताचा इतिहास (१९२०–१९५०)** | |
| १. | गांधी युग | १०८ |
| २. | शेतकरी आणि डाव्या चळवळी | १४२ |
| ३. | सशस्त्र क्रांतिकारी चळवळ | १६६ |
| ४. | फाळणी व स्वातंत्र्य | १८७ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना :**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (र्डीवू ढेश्र) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२५-२६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक १

# १९५७ चा उठाव

## (The Uprising of 1857)

---

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ १८५७ च्या उठावाची कारणे
- १.२.२ स्वरूप आणि परिणाम
- १.२.३ १८५८ चा राणीचा जाहीरनामा

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्टे :

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला खालील बाबी लक्षात येतील.

१. १८५७ च्या उठावाची कारणे आणि वाटचालीची विस्तृत माहिती मिळेल.

२. १८५७ चा उठावाचे स्वरूप अभ्यासता येईल.

३. १८५७ चा उठावाच्या परिणामांचा अभ्यास करता येईल.

४. १८५८ च्या राणीच्या जाहिरनाम्याचे अध्ययन करता येईल.

## १.१ प्रास्ताविक :

१९ व्या शतकात भारत हा खऱ्या अर्थाने ब्रिटिशांच्या वर्चस्वाखाली गेला. परंतु ब्रिटिशांनी पारतंत्र्याचे पाश आवळण्याची यंत्रणा खूप आधीपासून सुरू केली होती. इ. स. १७०७ साली औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघल साम्राज्याचा ऱ्हास होऊन अनेक प्रादेशिक सत्ता उदयाला आल्या. या प्रादेशिक सत्ता मधील राजकीय अस्थिरता पाहून ब्रिटिशांनी या सत्ताधीशांना एक एकटे पाडून पराभव केला. या काळात मराठा सत्तेचा दरारा संपूर्ण भारतभर असल्याने सुरुवातीला मराठा सत्तेशी नमते धोरण स्वीकारले. पुढे मराठा सत्तेमध्ये ही हस्तक्षेप करून सन १८१८ मध्ये पेशव्यांना पराभूत केले. अठराव्या शतकात अनेक प्रादेशिक सत्ताधीश सत्ता आणि संपत्ती साठी आपापसात संघर्ष करत होते. सामाजिक मागासलेपण, वर्ण, जातिभेद, अंधश्रद्धा, आर्थिक घसरण आणि साचेबंद जीवन अशा बंदिस्त चौकटीमध्ये भारतीय समाज अडकला होता. तत्कालीन सत्ताधीश याला खतपाणी घालण्याचे काम करत होते. या सर्व पार्श्वभूमीवर प्रगत आणि प्रबळ अशा ब्रिटिशांच्या धोरणापुढे तेथील प्रादेशिक सत्ताधीशांचा टिकाव लागला नाही. ब्रिटिशांनी तराजू आणि तलवार या नीतीने भारताच्या राजकारणात चंचुप्रवेश केला आणि हळूहळू एक-एक प्रदेश जिंकून ब्रिटीशांनी साम्राज्यविस्तार केला. ब्रिटिश लोक भारतात व्यापार करण्यासाठी आले. परंतु संधी मिळताच तराजू, तलवार आणि तख्त या रीतीने या देशाचे सत्ता देश बनले. ब्रिटिश राजवट मजबूत रीतीने उभी राहावी म्हणून प्लासीची लढाई, बक्सारची लढाई, रॉबर्ट क्लाइव्ह ची दुहेरी शासन पद्धती, लॉर्ड वेलस्लीची तैनाती फौज योजना, लॉर्ड डलहौसीचे विलीनीकरण धोरण इत्यादी धोरणाच्या माध्यमातून देशातील अनेक छोट्या-मोठ्या ऐत्तदेशीय सत्ताधीशांना ब्रिटिश साम्राज्यात विलीन करून घेतले. सन १८५६ पर्यंत ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने संपूर्ण भारतावर वर्चस्व प्रस्थापित केले. हे करत असताना संस्थानिक, वतनदार, जहागीरदार, आदिवासी आणि सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनात हस्तक्षेप करून त्यांच्यावर अन्याय आणि अत्याचार केला. तसेच ब्रिटिशांचे व्यापारी धोरण, जमीन महसूलविषयक धोरण, वंशश्रेष्ठत्व, ख्रिश्चन धर्म प्रसाराला अप्रत्यक्ष दिलेला पाठिंबा, ब्रिटिश लष्करातील भारतीय सैनिकांना दिली जाणारी अपमानास्पद वागणूक, इत्यादी घटनांमुळे कंपनी सरकार प्रती प्रचंड असंतोष वाढत गेला. यातूनच भारतातील विविध वर्ग आणि समूहातील लोकांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध १८५७ चा उठाव केला.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ १८५७ च्या उठावाची कारणे (Causes of the 1857 Uprising) :

ब्रिटिशांनी सुरू केलेल्या नव्या प्रशासन व्यवस्थेमुळे ब्रिटिश सरकारला विरोध झाला. हा विरोध जनजाती

व व्यक्तीगत पातळीवर छोट्या-मोठ्या उठावाच्या स्वरूपात झाला. साम्राज्यवादी धोरण व द्रव्यशोषक नीतीचा परिणाम येथील राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक घटकांवर झाला. यामुळे १८५७ च्या उठावाची कारणमिमांसा ही राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक कारणांमध्ये विभागणी होते. या कारणांचा आढावा पुढीलप्रमाणे -

**अ) राजकीय कारणे :**

**१. तैनाती फौज धोरण :**

लॉर्ड वेलस्लीने तैनाती फौज धोरणांची अंमलबजावणी हिंदुस्थानात केली. लष्करीदृष्ट्या कमकुवत संस्थानिकांना स्वसंरक्षणासाठी लष्करी मदत देऊ केली. या मोबदल्यात इंग्रज संस्थानिकाकडून ठराविक रक्कम घेत असत. परंतु बऱ्याच संस्थानिकांना या रक्कमा देणेही कठीण झाले. तसेच त्यांच्या कारभारात ब्रिटिश लष्कर हस्तक्षेप करू लागले. पुढे लॉर्ड डलहौसीने तैनाती मौजेची आर्थिक बाकी आहे. या सबबीखाली निजामाचा वऱ्हाड प्रांत, अवध संस्थान खालसा केले. यामुळे संस्थानिकाचे सार्वभौमत्व संपुष्टात येऊन ते नाममात्र संस्थानिक राहिले.

**२. डलहौसीचे संस्थाने खालसा धोरण :**

लॉर्ड वेलस्लीच्या तैनाती फौजेनंतर लॉर्ड डलहौसीने संस्थाने ब्रिटिश साम्राज्यात विलीन करण्याचा टप्पा गाठला, यासाठी त्रिसूत्रीचा वापर केला यापैकी एक दत्तक वारसास मंजुरी न देणे, संस्थानातील अयोग्य प्रशासनावर कारवाई करून अशी संस्थाने ताब्यात घेणे आणि कंपनी सरकारचा अंतिम अधिकार या तत्वाखाली संस्थानाचे विलिनीकरण करणे. अशाप्रकारे सातारा, उदयपूर, जयपूर, संबलपूर, नागपूर, झांशी, आयोध्या, नागपूर आणि झाशी इत्यादी संस्थाने खालसा करून ब्रिटिश साम्राज्यात समाविष्ठ केली. डलहौसीच्या या साम्राज्यवादी धोरणाने संस्थानिक व जनतेत असंतोष निर्माण झाला.

**३. पदव्या व तनखे बंद :**

लॉर्ड डलहौसीने संस्थाने खालसा धोरणाबरोबरच संस्थानिकांना दिलेल्या पदव्या व तनखे बंद केले. सन १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाल्यानंतर मराठ्यांचा शेवटचा पेशवा दुसरा बाजीराव यास वार्षिक ८ लाख रुपयाचा तनाखा कंपनी सरकारने दिला होता, तो डलहौसीने रद्द केला. दिल्लीचा मुघल सम्राट बहादूर शहाने आपला वारसदार म्हणून जवान बख्त याचे नाव जाहीर केले. परंतु लॉर्ड डलहौसीने जवान बख्तच्या नावाला मंजुरी न देता मिर्झामरूखला वारस म्हणून जाहीर केले. पुढे बहादूरशहाची बादशहा ही पदवी रद्द केली. थोडक्यात डलहौसीच्या या धोरणामुळे राजेरजवाडे कंपनी राजवटीविषयी संतप्त झाले व याचे रूपांतर पुढे १८५७ च्या उठावात झाले.

**ब) प्रशासकीय कारणे :**

**१. वर्णभेदाचे धोरण :**

ब्रिटिशांनी भारतात सत्ता स्थापन केल्यानंतर वर्णभेदाला प्रारंभ केला. भारतीय लोक रानटी आणि असंस्कृत आहेत, त्यांना सुसंस्कृत करण्याची जबाबदारी आम्ही पार पाडत आहोत अशी ब्रिटिशांची धारणा

होती. यामुळे इंग्रज शासनकर्त्यांनी काळा-गोरा वर्णभेद करण्याबरोबर वांशिक भेदभाव सुरू केला. इंग्रज स्वतःला श्रेष्ठ मानत होते. हिंदुस्थानातील हिंदी लोक हे राज्यकारभार करण्यास अपात्र आहेत. अशी भावना इंग्रजांची झाली होती. प्रशासकीय सेवेमध्ये काम करणाऱ्या भारतीय लोकांना कनिष्ठ दर्जाच्या व कमी पगाराच्या नोकऱ्या दिल्या व इंग्लंडहून आलेल्या गोऱ्या लोकांसाठी मोठ्या पदाच्या व पगाराच्या नोकऱ्या दिल्या. यामुळेही भारतीय लोकांमध्ये असंतोष धुमसत राहिला.

**२. इनाम कमिशन :**

ब्रिटिशपूर्व काळात एतद्देशीय राजे, पराक्रमी सरदार, सैनिक, विद्वान, विविध मठ, मंदिरे, मशिदी, दर्गे इत्यादींना जमीन इनाम स्वरूपात देत असत, ही जमीन सारामुक्त असे. परंतु भारतात ब्रिटिशांनी आपली राजवट प्रस्थापित केल्यावर लॉर्ड बेंटिगच्या काळात इनाम कमिशन नेमले. या इनाम कमिशनने ज्यांना इनाम जमिनी मिळाल्या आहेत, त्याची कागदपत्रे सरकारकडे सादर करावीत असे आदेश दिले. जर अशी कागदपत्रे सादर केली नाहीत तर इनाम जमिनी जप्त केल्या जातील असा आदेश काढला. मशिदी, दर्गे, देवस्थाने, मठ या इनाम जमिनी मिळाल्या होत्या, त्याची कागदपत्रेही काहीजवळ नव्हती. त्यामुळे अशा जमिनी इनाम कमिशनच्या माध्यमातून जप्त केल्या. यामुळे लोकांच्या धार्मिक भावनेला ठेच पोचली.

**३. न्याय व्यवस्थेतील दोष :**

कंपनी सरकारने मकायद्यासमोर सर्व समानम अशी न्यायव्यवस्था निर्माण केली. परंतु युरोपियन व्यक्तीवर जर गुन्हा सिद्ध झाला तर पक्षपाती धोरण स्विकारले जात असे. भारतीय व्यक्तीला मात्र कठोर शिक्षा दिली जाई. भारतीय न्यायाधिश युरोपियन गुन्हेगारांना शिक्षा देऊ शकत नव्हते. ब्रिटिशपूर्व कालखंडात खेड्यातच न्यायदानाची व्यवस्था असे. त्यामुळे खेड्यातील व्यक्तीला तेथेच न्याय मिळत होता. परंतु ब्रिटिशांच्या नव्या प्रशासन पध्दतीनुसार न्याय मिळविण्यासाठी लोकांना तालुका, जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागत असे. ही न्यायप्रणाली खर्चिक होती. त्यामुळे सर्वसामान्य माणसाला अनंत अडचणींना सामोरे जावे लागत असे.

**क) सामाजिक कारणे :**

**१. भारतीय चालीरिती, रूढी व परंपरामध्ये हस्तक्षेप :**

कंपनी सरकारने हिंदुस्थानात प्रथम सत्ता संपादन व नंतर साम्राज्यविस्तार केल्यानंतर येथील लोकांच्या सामाजिक प्रथा, रूढी व परंपरामध्ये हस्तक्षेप करण्यास सुरूवात केली. लॉर्ड बेटींग, लॉर्ड डलहौसी यासारख्या गव्हर्नर जनरलनी हिंदी समाजात सुधारणा घडविण्याच्या उद्देशाने सतीबंदी, बालविवाह प्रतिबंधक, विधवा पुनर्विवाह संमती कायदा यासारखे कायदे केले. या कायद्यामागची राज्यकर्त्यांची भूमिका योग्य असली तरी या कायद्यामुळे पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या चालीरिती, रूढी, परंपरा मोडून पडत आहेत अशी सर्वसामान्य लोकांची भावना झाली. अशा धोरणामुळे समाजाची चौकट नष्ट होत असून आपल्या धर्म व संस्कृतीवर खूप मोठे संकट आलेले आहे. अशी समाजाचा धारणा झाली. याचाच परिणाम ब्रिटिशांविरुध्द सर्वसामान्य जनतेचा असंतोष उफाळून आला.

**२. नवी शिक्षण व्यवस्था :**

कंपनी सरकारने भारतात आपली सत्ता स्थिर झाल्यानंतर आधुनिक शिक्षण पध्दतीला प्रारंभ केला. ख्रिश्चन धर्मप्रसारकांनीही येथील समाजात शिक्षण प्रसाराचे कार्य होती घेतले, परंतु यामागे त्यांच्या उद्देश धर्मप्रसार हा होता. या नव्या शिक्षण पध्दतीमुळे हिंदुस्थानातील पारंपारिक शिक्षण पध्दती मागे पडली व इंग्रजी शिक्षण घेतलेले नवसुशिक्षित लोक एकीकडे ब्रिटिशांचे कारकून म्हणून तर दुसरीकडे समाजाचे प्रबोधन करू लागले. या बदलामुळे येथील समाज व्यवस्था कोलमडण्याच्या परिस्थितीत आहे व ही परिस्थिती कंपनी सरकारच्या धोरणामुळे निर्माण झाली आहे, असा सर्वसामान्य जनतेचा समज झाला. यामुळे ब्रिटिश राजवटीबद्दल लोकांच्या मनामध्ये असंतोष साचू लागला.

**ड) आर्थिक कारणे :**

**१. हिंदुस्थानची आर्थिक लूट :**

ब्रिटिशांनी भारतात प्लासीच्या युध्दानंतर (१७५७) व्यापार आणि आर्थिक धोरण हा प्रमुख उद्देश समोर ठेवला. भारतातील राज्यकर्त्यांमध्ये असलेल्या अराजकतेचा फायदा घेऊन आर्थिक लूट सुरू केली. येथील राजे, संस्थानिक, जमीनदार, व्यापारी व सर्वसामान्य जनता यांच्याकडून लुटलेली संपत्ती ब्रिटिश अधिकारी वर्गाने इंग्लंडला नेली. सन १७७५ ते १७८० या पाच वर्षाच्या कालावधीत एकट्या बंगालमधून सुमारे ३ कोटी ८४ लाख पौंड संपत्ती इंग्लंडला पाठविली गेली. याशिवाय कंपनी सरकारच्या (इंग्रज) नोकरांना खाजगी व्यापार करण्याची मुभा देण्यात आल्याने त्यांनी येथील शेतकरी व सर्वसामान्य जनतेचे शोषण करून प्रचंड नमा कमविला. हेच इंग्रज नोकर व अधिकारी इंग्लंडमध्ये गेल्यानंतर भारतात मिळविलेल्या संपत्तीच्या बळावर एखाद्या उमरावाप्रमाणे जीवन जगत असत. इंग्रजाच्या अशा शोषक नीतीमुळे भारतात प्रचंड दारिद्र्य निर्माण झाले. यासंदर्भात दादाभाई नौरोजी म्हणतात की, महमंद गझनीने भारतावर १७ स्वाऱ्या करून जेवढी संपत्ती नेली नाही, त्याच्या कित्येक पटीने अधिक संपत्ती ब्रिटिश लोकांनी इंग्लंडला नेली.

**२. व्यापार व उद्योगधंद्यांचे पतन व वाढती बेकारी :**

ब्रिटिशपूर्वकाळात भारतीय खेडी स्वयंपूर्ण होती, परंतु इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीने युरोपातील उद्योगधंद्यांना लागणारा कच्च्या मालाची गरज भासू लागली. ब्रिटिशांनी भारतातून अल्प किंमतीत कच्चा माल युरोपीयन उद्योगधंद्यांना पुरविला. यासाठी भारतीय व्यापार व उद्योगधंदे सक्तीचे बंद पाडण्याचे धोरण स्विकारले. युरोपातून येणाऱ्या पक्का मालाची बरोबरी भारतीय उद्योगधंदे करू शकले नाहीत, याचा परिणाम भारतीय व्यापार व उद्योगधंद्याचे पतन (ऱ्हास) घडून आले. ग्रामीण उद्योगधंदे बंद पडल्यामुळे लाखो लोक बेकार झाले. उदरनिर्वाहाचे साधनच ब्रिटिशांच्या धोरणामुळे नष्ट झाल्यामुळे बहुसंख्य लोकांच्या वाट्याला दारिद्र्य आले. त्यातच भर म्हणून लॉर्ड डलहौसीने संस्थाने खालसा केल्यामुळे हजारो सैनिकांच्या नोकऱ्या गेल्या, त्यांना उपजीविकेचा प्रश्न भेडसावू लागला. एकंदरीत व्यापार, उद्योगधंद्याचा ऱ्हास व वाढती बेकारीमुळे लोकांच्या मनात निर्माण झालेल्या असंतोषाचे रूपांतर १८५७ च्या उठावात झाले.

**३. अन्यायकारी सारा आकारणी :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे हे इंग्रजांच्या लक्षात आल्याने त्यांनी शेतीविषयक महसूल धोरण आखले

जे भारतीय शेती व शेतकऱ्यांना मारक ठरले. लॉर्ड कॉर्नवॉलिसची कायमधारा पद्धती व नंतर आलेल्या महालवारी व रयवारी पध्दतीने सामान्य शेतकरी वर्ग कोलमडून पडला. भरमसाठ महसूल (सारा) आकारणी शेतकरी कर्जबाजारी झाला. सावकारांच्या जाळ्यात अडकला. जमीन महसूल वेळेत न मिळाल्यास जमिनीचे लिलाव काढण्याचा प्रघात ब्रिटिशांनी सुरू केला. या माध्यमातून अमर्याद संपत्तीची लूट करण्यात आली.

**ई) धार्मिक कारणे :**

**१. धर्मावर संकट :**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतात आपली सत्ता निर्माण केल्यानंतर प्रारंभी ख्रिश्चन मिशनऱ्यांना प्रवेश नाकारला. परंतु सत्ता मजबूत होत गेली तशी आपले धोरण बदलले. इ. स. १८१३ च्या कायद्याने भारतात ख्रिश्चन धर्मप्रसार करण्याची मुभा देण्यात आली. धर्मप्रसारासाठी भारतात आलेल्या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी येथील अशिक्षित लोकांना सेवाभाव व आर्थिक मदत करून धर्मांतर करण्यास प्रवृत्त केले तर सुशिक्षितांना ख्रिश्चन धर्मातील उदात्त तत्त्वे व मानवतावादाची शिकवण देऊन धर्मप्रसाराचे कार्य केले. हिंदू-मुस्लिम धर्मावर टीका केली. भारतीय लोकांच्या चालीरिती, परंपरावर हल्ले चढविले. पोर्तुगीजाप्रमाणे जुलूम जबरदस्ती करून इंग्रजांनी धर्मप्रसार केला नसला तरी अप्रत्यक्षपणे मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराला पाठिंबा दिला. इंग्रज व मिशनऱ्यांच्या धर्मप्रसार म्हणजे आपल्या धर्मावर आलेले मोठे संकट आहे अशी येथील लोकांची भावना निर्माण झाली.

**२. सुधारणावादी धोरणाची प्रतिक्रिया :**

इंग्रज व ख्रिश्चन मिशनरी दोघेही भारतीय लोकांना एकाच दृष्टिकोनातून पाहत होते. तो म्हणजे या रानटी लोकांना 'सुसंस्कृत' बनविण्यासाठी आम्ही येथे आलेलो आहोत. यामुळे सार्वजनिक ठिकाणी ब्राम्हण वर्गापासून शूद्रापर्यंत सर्वांना एकसारखी वागणूक दिली जाऊ लागली. ब्रिटिशांच्या अशा धोरणामुळे भारतीयांची धर्म व जात नष्ट होईल, असा प्रचार सनातनी लोकांनी सुरू केला. इंग्रजांनी सती बंदी कायदा, विधवा पुनर्विवहा कायदा, बालविवाह बंदी कायदा, धर्मांतरानंतर प्राप्त होणारा मालमत्तेवरील हक्क आणि एत्तदेशीय सैनिकांना सक्तीचे समुद्र पर्यटन करणारा कायदा हे सर्व कायदे केले, हे कायदे जरी सुधारणावादी असले तरी आपल्या धर्म व संस्कृतीत सरकारचा हा हस्तक्षेप आहे असे लोकांना वाटले.

**फ) लष्करी कारणे :**

**१. सैन्यसंख्या व पगारातील तफावत :**

भारतात सन १८५६ मध्ये २ लाख ३३ हजार हिंदी शिपाई तर ४५ हजार गोरी फौज होती. गोऱ्या फौजेच्या पाचपट हिंदी शिपाई होते. देशातील महत्त्वाची लष्करी केंद्रे, दारूगोळा, शस्त्रास्त्रे ही हिंदी शिपायांच्या ताब्यात होती. गोऱ्या सैनिकांचे भारतात प्रमाण वाढावे म्हणून लॉर्ड डलहौसीने वारंवार ब्रिटिश संसदेकडे मागणी केली. परंतु याकडे दुर्लक्ष करण्यात आले. शिपायांनी याच संधीचा फायदा उठविला तर दुसरीकडे हिंदी आणि युरोपियन सैनिकांच्या पगारात प्रचंड तम ावत होती. हिंदी सैनिकाला कोणत्याही स्वरूपाची व बढती मिळत नसे. याउलट युरोपियन सैनिकाने लष्करात प्रवेश करताच त्यास भराभर बढती मिळत असे. यामुळे हिंदी सैनिकांना काम करूनही उदरनिर्वाह भागविणे कठीण होऊन बसे.

**२. हिंदी शिपायांवरील निर्बंध :**

इ. स. १८२४ मध्ये ब्राम्ही युद्धासाठी बराकपूर छावणीतील ४७ व्या रेजिमेंटमधील शिपायांना ब्रम्हदेशात जाण्याचे आदेश दिले. परंतु समुद्र पर्यटनास बंदी असून आम्ही ब्रम्हदेशाला जाणार नाही असे सांगितल्याने अनेक सैनिकांना नोकरीवरून काढून टाकण्यात आले. सन १८४९ साली पंजाब ब्रिटिश साम्राज्यात विलीन झाले. अनेक पंजाबी शीख व मुसलमानांना ब्रिटिशांनी लष्करात नोकऱ्या दिल्या, त्यावेळी शीख सैनिकांच्या दाढीला व डोक्याचे केस काढण्याचे आदेश देणार नाही असा ब्रिटिशांनी शब्द दिला होता. परंतु तो नंतर पाळला नाही. परिणामी शीखांनी नोकरीचा त्याग केला. हिंदी सैनिकांने गंध लावू नये, शेंडी राखू नये, विशिष्ट प्रकारे दाढी राखावी अशी बंधने लादण्यात आली. अशा सर्व निर्बंधामुळे हिंदी सैनिकात असंतोषाचे वातावरण पसरले.

**३. हिंदी सैनिकांमधील वाढलेला आत्मविश्वास :**

कंपनी सरकारने हिंदी सैनिकांच्या बळावर ब्रम्हदेशापासून काबूलपर्यंतचा प्रदेश जिंकला. भारतातील बहुसंख्य संस्थानिक व राज्यावर मिळविलेले विजय हे हिंदी (ऐत्तदेशीय) सैनिकांच्या पराक्रमामुळे मिळाले होते, अशी भावना हिंदी सैनिकांमध्ये पसरली होती. आपण इंग्रजांइतके शूर व पराक्रमी आहोत असा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये निर्माण झाला. आपण जर इंग्रजांना युद्धावेळी सहकार्य केले नाही, तर ते विजय मिळवू शकत नाहीत असा आत्मविश्वास दुणावला. यामुळे हिंदी सैनिकांनी ब्रिटिशांच्या अन्यायाविरोधात बंडाचे हत्यार उपसले.

**ग) तात्कालिक कारण :**

इंग्रजांनी भारतीय लष्करामध्ये जानेवारी १८५७ मध्ये मब्राऊन बेसम (लोखंडी बंदुका) बंदुकाऐवजी सैनिकांना लांब पल्ल्याच्या एन्फिल्ड बंदुका दिल्या. त्यात वापरली जाणारी काडतुसे ही गाई व डुकराच्या चरबीपासून बनविलेली असत. या काडतुसांना वंगणयुक्त आवरण असल्यामुळे ते दातांनी तोडावे लागत होते. या आवरणाला गाई व डुकराची चरबी लावलेली असते अशी बातमी लष्करामध्ये सर्वत्र पसरली. गाई हिंदूना पवित्र तर डुक्कर मुसलमानांना अपवित्र असल्याने गाई व डुकराची चरबी दोन्ही धर्मासाठी निषिध्द मानली जात असे. काडतूस प्रकरणाची ही बातमी प्रथम कलकत्त्याच्या मौजेत पसरली व त्याचा सर्वत्र प्रसार झाला. हिंदू-मुस्लिम सैनिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या व सैनिकांनी बंडाचे निशाण उभारले.

**१८५७ च्या उठावाची वाटचाल :**

**१) लष्करी उठाव व मंगल पांडचे हौतात्म्य :**

संपूर्ण देशभर चरबीयुक्त काडतुसांची बातमी पसरली. फेब्रुवारी १८५७ मध्ये बेहरामपूर येथील १९ देशी पलटणीने प्रथमच काडतुसांना स्पर्श करण्यास नकार दिला. इंग्रजांनी त्वरीत या पलटणीतील सैनिकांना लष्करातून काढून टाकले. परंतु ही बातमी बरांकपूरच्या लष्करी छावणीतही पोहचली आणि २९ मार्च १८५७ रोजी बराकपूरच्या छावणीतील सैनिकांनी काडतुसे वापरण्यास नकार दिला. या छावणीतील ३४ वी एन. आय. रेजिमेंटमधील मंगल पांडे या सैनिकाने इंग्रजांच्या विरोधात परेड ग्राऊंडवर घोषणा दिल्या. त्यावेळी इंग्रज अधिकारी सार्जंट मेजर ह्यूसन यांने सैनिकांना कैद करण्याचे आदेश दिले. मंगल पांडे याने मेजर ह्यूसनवर गोळ्या

झाडल्या व त्यास ठार केले. इंग्रज अधिकाऱ्यांनी मंगल पांडे यास कैद करून त्याच्यावर लष्करी न्यायालयात खटला भरला. खटल्याच्या निकालानंतर मंगल पांडेला दोषी ठरवून ८ एप्रिल १८५७ रोजी फाशी दिली.

**२) मीरत येथे उठाव :**

मंगल पांडेच्या फाशीची बातमी सर्वत्र पसरताच ठिकठिकाणी उठावांची मालिकाच सुरू होऊन उठाव देशभर पसरला. दिल्लीपासून ५८ किलोमीटर अंतरावर असलेल्या मीरत येथेही उठावास सुरूवात झाली. २४ एप्रिल १८५७ रोजी मीरतमधील मनेटिव्ह कॅव्हलरीम या सैनिकी तुकडीतील ९० सैनिकांनी चरबीयुक्त काडतुसे वापरण्यास नकार दिला. यामुळे ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांनी यातील ८५ सैनिकांना ९ मे १८५७ रोजी बडतर्फ करून १० वर्षांची शिक्षा ठोठावली. दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० मे १८५७ रोजी मीरत येथील तुरुंगाची भिंत फोडून कैदेत अडकलेल्या ८५ सहकाऱ्यांची सुटका केली. 'मारो फिरंगी को' अशा घोषणा देत बंडाचा झेंडा उभारला. चर्चमध्ये प्रार्थनेसाठी निघालेल्या ब्रिटिशांना हिंदी सैनिकांनी ठार केले. युरोपीयन अधिकाऱ्यांच्या घरावर हल्ले केले. युरोपियन स्त्रिया, मुले यांनाही सोडले नाही. खजिना लुटला, कचेऱ्या जाळल्या. उठावकर्त्यांनी चलो दिल्ली ची घोषणा देऊन मीरत येथील सैनिक दिल्लीकडे गेले.

**३) दिल्ली ताब्यात :**

मीरत येथील उठावकर्तेसैनिक दिल्लीत पोहचल्यावर दिल्लीतील सैनिकही उठाववाल्यांना मिळाले. ११ मे १८५७ रोजी दिल्लीत पोहचलेल्या बंडखोर सैनिकांना रोखण्यासाठी इंग्रज अधिकारी लेफ्टनंट विलोबी याने प्रतिकार केला. परंतु त्यास यश आले नाही. उठावकर्त्यांनी इंग्रज व युरोपियन लोकांना ठार करण्याचे सत्र आरंभिले. दिल्लीतील सर्वसामान्य जनतेनेही उठावकर्त्यांना मदत केली. उठाववाल्यांनी बऱ्याच इंग्रज सैनिकांची कत्तल केली आणि दिल्ली ताब्यात घेतली. बंडखोर सैनिकांनी आपला मोर्चा लाल किल्ल्याकडे वळवून ९० वर्षीय वृध्द मुघल सम्राट दुसरा बहादूरशहा जफर यांस हिंदुस्थानचा बादशहा म्हणून घोषित केले आणि या उठावाचे नेतृत्व बादशहाकडे देण्यात आले.

**४) उठावाचा प्रसार :**

दिल्लीत घडलेल्या खळबळजनक घटनेमुळे आणि उठावकर्त्यांना मिळालेल्या यशामुळे ब्रिटिशांच्या अनेक लष्करी छावण्यामध्ये देशी सैनिकांनी उठाव केले. १३ मे रोजी मि रोजपूर, २० मे रोजी अलीगढ, ३० मे रोजी लखनौ व मथुरा, ४ जून रोजी वाराणसी व कानपूर, ६ जून रोजी झाशी व अलाबाद येथे सैनिकांनी उठाव केले. याशिवाय इटावा, रूरकी, बरेली, शहाजानपूर, आझमगढ, सीतापूर, मुरादगढ, बनारस, फत्तेगढ, अंबाला, बुंदेलखंड इत्यादी ठिकाणी उठाव झाले. मध्य भारत, बिहारचा मोठा प्रदेश व पूर्व पंजाबच्या प्रदेशातील सर्वसामान्य जनतेने ब्रिटिश सत्ता झुगारून देऊन उठाव केला. बंगाल प्रांतातील ढाक्का, चित्तगाँव, भागलपूर, मदारीगंज येथील सैनिकांनी उठाव केले. राज्यस्थानमध्ये उठावाचा फारसा प्रचार झाला नाही. दक्षिण भारतामधील महाराष्ट्रात सातारा, कोल्हापूर, खानदेश, अहमदनगर, औरंगाबाद, नागपूर अशा अनेक ठिकाणी उठावाच्या हालचाली झाल्या. याशिवाय वेल्लोर, अर्काट, कर्नुल, त्रिचनापल्ली, कडप्पा, बेळगाव, धारवाड, हैद्राबाद येथेही ब्रिटिशाविरुध्द असंतोष निर्माण होऊन काही ठिकाणी उठाव झाला.

**५) झाशीच्या राणी लक्ष्मीबाईचा संघर्ष :**

लॉर्ड डलहौसीने 'दत्तक वारस ना मंजूर' या तत्त्वाखाली सन १८५३ साली झाशीचे राज्य ब्रिटिश साम्राज्यात विलीन केले. गंगाधररावाची पत्नी राणी लक्ष्मीबाईंनी आपला दत्तक पुत्र दामोदर यास गादीवर बसवून राज्य करण्याचा प्रयत्न केला. त्यास लॉर्ड डलहौसी ने मंजुरी दिली नाही. राणी लक्ष्मीबाईनी राज्य वाचवण्यासाठी जॉन लॉग यास वकीलपत्र देऊन लॉर्ड डलहौसीसमोर झाशी राज्याची बाजू मांडण्यास सांगितले. परंतु डलहौसीने ऐकून घेतले नाही. म्हणून व्योमेशचंद्र बॅनर्जी यांना इंग्लंडला ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालक मंडळ समोर बाजू मांडण्यास पाठविले. तेथेही कंपनीच्या संचालक मंडळाने लॉर्ड डलहौसीच्या निर्णयालाच पाठिंबा दिल्याने राणी लक्ष्मीबाई, झाशीची जनता व सैनिक यांच्यात कमालीचा असंतोष पसरला. मीरत, कानपूर, दिल्ली येथील उठावाच्या बातम्या झाशी येथे येताच तेथील सैनिकांनी ६ जून १८५७ रोजी उठाव करून इंग्रजांना ठार केले आणि दिल्लीच्या दिशेने प्रयाण केले. झाशीतील सैनिकांच्या उठावाशी आपला काही संबंध नाही असे सुरुवातीला राणी लक्ष्मीबाईंनी इंग्रज सरकारला भासविण्याचा प्रयत्न केला. परंतु ब्रिटिश सरकारने इंग्रजांच्या कत्तलीचे आरोप राणीवर ठेवून चौकशी सुरू केली. त्यामुळे झाशीच्या राणीने ब्रिटिशांच्या विरोधी बंडांचे निशान उभारले. राणीने जून १८५७ ला झाशीचा किल्ला ताब्यात घेतला. त्यावेळी लक्ष्मीबाई जवळ १४००० सैन्य आणि २० तोफा होत्या. या सामर्थ्यांशी झाशी लढविण्याचा प्रयत्न केला. परंतु इंग्रज अधिकारी सर ह्यू रोज यांच्या नेतृत्वाखाली फौजेने मार्च १८५८ मध्ये झाशीच्या किल्ल्याला वेढा दिला. राणीने किल्ला लढवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु इंग्रजी फौजेच्या सामर्थ्यापुढे टिकाऊ लागला नाही. यावेळी राणीने केलेल्या मागणीनुसार तात्या टोपे यांनी झाशी वाचवण्यासाठी सैन्यही पाठविले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. शेवटी राणी लक्ष्मीबाईंनी किल्ला सोडण्याचा निर्णय घेतला. आपला दत्तकपुत्र दामोदर यास पाठीशी बांधून ५ एप्रिल १८५८ रोजी राणीने झाशीचा किल्ला सोडून तात्या टोपेंना जाऊन मिळण्यासाठी काल्पीच्या दिशेने प्रवास सुरू केला. राणीच्या पश्चात ब्रिटिशांनी झाशीमध्ये प्रचंड लुटालुट आणि कत्तली केल्या. झाशी ताब्यात घेऊन इंग्रज सैन्याने राणीचा पाठलाग सुरू केला. राणी लक्ष्मीबाई आणि तात्या टोपे यांनी काल्पी या ठिकाणी उठावासंबंधित पुढील वाटाघाटी केल्या. तोपर्यंत सर ह्यू रोजने आपला मोर्चा काल्पीच्या दिशेने वळविला. तात्या टोपेनी विरोध करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांचा पराभव झाला. तोपर्यंत राणीने ग्वाल्हेरच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. ग्वाल्हेरच्या किल्ल्याच्या आश्रयाने राणीने इंग्रज अधिकारी रोज याच्याशी कडवी झुंज दिली. परंतु इंग्रजांच्या तोफांसमोर सैनिकांचा टिकाव लागला नाही. खुद्द राणी लक्ष्मीबाई यामध्ये जबर जखमी झाल्या. अशाही परिस्थितीत इंग्रज सैन्याशी लक्ष्मीबाईनी लढा दिला. परंतु इंग्रजांनी ग्वाल्हेरचा किल्ला ताब्यात घेतला. लष्करी गणवेशातील राणीला लढता लढता किल्ल्याच्या भिंतीजवळ वीरगती प्राप्त झाली. यानंतर इंग्रजांनी आपला मोर्चा तात्या टोपे यांच्याकडे वळविला. परंतु तात्यांच्या मानसिंह नावाच्या एका सहकार्याने विश्वासघाताने तात्यांना पकडून इंग्रजांच्या हवाली केले. इंग्रजानी खटला चालवून तात्या टोपे यांना १८ एप्रिल १८५९ रोजी फाशी दिले.

**६) उठावात सहभागी लोक आणि उठावकर्त्यांकडून विविध मार्गाचा अवलंब :**

१८५७ च्या उठावात जहागीरदार, वतनदार, जमीनदार, काही संस्थानिक व त्यांचे आश्रित, सर्वसामान्य लोक, हिंदी शिपाई व आदिवासी इत्यादी लोक सामील झाले. ब्रिटिश अधिकाऱ्यांची हत्या, सरकारी कचेऱ्याची

नासधूस व लुटालूट करणे, कैदेतील हिंदी शिपायांना सोडविणे, तारायंत्रे तोडणे, खजिना लुटणे, दळणवळण यंत्रणा उध्वस्त करणे, ब्रिटिशांची शासन व्यवस्था कोलमडून टाकणे अशा विविध मार्गाचा अवलंब उठावकर्त्यांनी केला. या उठावामुळे कंपनी सरकारपुढे खूप मोठे आव्हान उभे केले. या व्यापक उठावाच्या पहिल्या टप्प्यात उठावाची तीव्रता व इंग्रजांचा बेसावधपणा यामुळे इंग्रजांना अनेक ठिकाणी माघार घ्यावी लागली. या उठावात दिल्लीचा मुघल बादशहा दुसरा बहादुरशहा जफर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवे, सेनापती तात्या टोपे, फैजाबादचा मौलवी अहमदुल्ला, अवधची बेगम हजरत महल, बिहारचा राणा कुवरसिंह, बरेलीचा जनरल बरकतखान, इत्यादी प्रमुख नेत्यांनी उठावात प्रमुख भूमिका पार पाडली. उठावकर्त्यांचा आत्मविश्वास वाढल्याने उठाववाल्यांनी ब्रिटिशांची सर्व यंत्रणा मोडून काढण्याचे सत्र अवलंबिले. लखनौ, दिल्ली, झाशी, कानपूर येथे झालेल्या उठावात ब्रिटिशांची प्रचंड मोठी हानी झाली. इंग्रजांनीही याचा बदला म्हणून मोठ्या प्रमाणात येथील लोकांची व हिंदी शिपायांची कत्तल केली.

**७) महाराष्ट्रातील उठाव :**

महाराष्ट्रात सन १८५७ ते १८५९ पर्यंत झालेले उठाव हे इंग्रजांच्या सामर्थ्यशाली कणखर विरोधाला न जुमानता झाले होते. इंग्रज राजवटीविरुद्ध धुमसणारा असंतोष या उठावातून दिसून आला. या उठावात अनेक नेत्यांनी प्राणाची आहुती दिली तर काहींना शिक्षा झाल्या. अशा नेत्यांनी ब्रिटिशांच्याविरोधी योजना व संघटन उभारून ब्रिटिशविरोधी लढा दिला. साताऱ्याचे रंगो बापूजी गुप्ते, पुण्याचे मौलवी नुरुल हुदा, कोल्हापूर येथील छत्रपती चिमासाहेब, रामजी शिरसाट, फिरंगोजी शिंदे, सावंतवाडीचे नाना, बाबा, हनुमंत फोंडसावंत हे तीन बंधू, औरंगाबादचे चेदीखान, अमीरखान, फिर फिदा अली, हैद्राबादचे मौलवी सईद अल्लाउद्दीन, तुरबाझखान, सोनाजीपंत पंडित, उस्मानाबादचे विठोजी खंडोजी, नरखेडचे रंगराव पागे, चंद्रपूर जिल्ह्यातील बाबूराव पुलेश्वरबापू राजगोंड व व्यंकटराव राजेश्वरराव राजगोंड, मुंबईचे सईद हुसेन, गुलमार दुबे, कामताप्रसाद, मंगल, ठाणे जिल्ह्यातील वेणेगावचे राघो विश्वनाथ, खानदेशचे काजीसिंग, भीमा नाईक, मोवासिया नाईक, अहमदनगर नाशिक जिल्ह्यातील भागोजी नाईक, पेठचे भगवंतराव निलकंठराव देशमुख (पवार) उर्फ भाऊराजा इत्यादी लोकांनी इंग्रज राजवटीविरुद्ध दिला.

**७) उठावाचा बीमोड :**

भारतीय राजे - रजवाडे, सैनिक, आदिवासी, सामान्य जनता यांनी ब्रिटिशांच्या विरुद्ध हाती मिळेल त्या शस्त्रांनिशी लढा दिला. परंतु या लढ्याला पूर्णपणे यश येऊ शकले नाही. ब्रिटिशांनी आपल्याकडील प्रशिक्षित सैन्य, प्रगत तोफखाना, आधुनिक शस्त्रे आणि कुटनीतीच्या बळावर उठावात सहभागी झालेल्या लोकांचा पराभव केला. भारतीय उठावाला एक संघ असे नेतृत्व लाभले नाही. नानासाहेब, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई, इत्यादींनी केलेले प्रयत्न हे वेगवेगळ्या प्रदेशापुरते मर्यादित राहिल्याने यश मिळू शकले नाही. या उलट लॉरेन्स, कॅनिंग, निकोलसन, हॅवलॉक, औट्रॅम, ह्यूरोज, नील यासारख्या अनुभवी इंग्रज सेनापतींनी पराक्रमाची शर्थ करून उठाव मोडून काढून परिस्थिती नियंत्रणात आणली. १८५७ च्या उठावात अनेक संस्थानिक इंग्रजनिष्ठ राहिले. याचबरोबर पंजाबमधील शीख व हैद्राबादचा सालारजंग यांनी इंग्रजांना मदत केली. या उठावात हिंदू मुस्लिम धर्मीयांबरोबर आदिवासी व इतर जाती-धर्माच्या लोकांचा ब्रिटिशांविरोधी असणारा असंतोष संघटीतरित्या

उठावाच्या स्वरूपात प्रकट झाला, ही बाब इंग्रज सरकारला विचार करायला लावणारी होती. अशा प्रकारे १८५७ च्या उठाव इंग्रजांनी मोडून काढला.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. संस्थाने खालसा धोरण ............... ने सुरू केले.

अ) लॉर्ड कॉर्नवॉलिस ब) लॉर्ड वेलस्ली

क) लॉर्ड डलहौसी ड) लॉर्ड कॅनिंग

२. कायमधारा पध्दती ............... याने सुरू केली.

अ) लॉर्ड डलहौसी ब) लॉर्ड रिपन

क) लॉर्ड कॉनवॉलिस ड) लॉर्ड मेयो

३. मंगल पांडे याने ............. या इंग्रज अधिकाऱ्यावर गोळ्या झाडल्या.

अ) मेजर ह्यूसन ब) लेफ्टनंट विलोबी

क) वॉरैन हेस्टींग्ज ड) लॉर्ड क्लाईव्ह

४. राणी लक्ष्मीबाई यांनी ............. येथून इंग्रजांविरुध्द उठाव केला.

अ) दिल्ली ब) झाशी

क) मेरठ ड) कानपूर

५. १८५७ च्या उठावात ............. हे संस्थान ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहिले.

अ) सातारा ब) झाशी

क) बरेली ड) ग्वाल्हेर

## १.२.२ १८५७ च्या उठावाचे स्वरूप आणि परिणाम (Nature of the 1857 Uprising) :

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय प्रदेश आपल्या नियंत्रणाखाली आणत असताना येथे राहत असलेल्या सर्व वर्गाच्या हक्क आणि अधिकारांमध्ये हस्तक्षेप केला. त्याचा परिणाम भारतीय लोकांकडून ब्रिटिश सत्तेला विरोध होऊ लागला. ब्रिटिशांच्या वसाहतवादी व आर्थिक शोषण नीतीमुळे त्यांच्या राजवटीविषयी सर्वत्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले. परिणाम स्वरूप देशाच्या विविध भागातील लोकांनी आपल्या स्तरावर छोटे–मोठे उठाव केले. परंतु ते उठाव ब्रिटिशांनी दडपून टाकले. मात्र १८५७ चा ब्रिटिश सत्तेविरोधी झालेला उठाव हा देशभर झाल्याने ब्रिटिश सत्तेसमोर एक मोठे आव्हान उभे केले. या उठावाचे स्वरूप विविध अंगी होते. यामुळे १८५७ च्या उठावाच्या स्वरूपाविषयी अनेक इतिहासकारांनी वेगवेगळी मते व्यक्त केली आहेत.

**विविध इतिहासकारांची मते :**

**१. सर जॉन सिली :** हा उठाव म्हणजे एक निव्वळ शिपाई बंड होते. तसेच स्वदेशी नेतृत्व आणि

लोकप्रिय पाठिंबा नसलेला स्वार्थी शिपाई बंड होते. सिली पुढे असे म्हणतो की हा उठाव म्हणजे प्रस्थापित शासनाविरुद्ध भारतीय सैनिकांचे बंड होते. त्यामध्ये काही संस्थानांचा सहभाग असला तरी ही संस्थाने डलहौसीच्या विलीनीकरण धोरणामुळे ब्रिटिशांच्यावर नाराज झालेली होती. ब्रिटिश सरकारने आपले कर्तव्य बजावून या बंडाचा नाश केला आणि पुन्हा शांतता, सुव्यवस्था निर्माण केली. परंतु वरील मते आणि स्पष्टीकरण योग्य वाटत नाहीत. त्याचे कारण म्हणजे प्रारंभी हा उठाव जरी सैनिकांच्या माध्यमातून झाला असला तरी तो सैनिकापुरता मर्यादित राहिला नाही तर हा उठाव देशभर पसरला. इंग्रजांवर असंतुष्ट असलेले समाजातील सर्व वर्गातील घटक या उठावात सामील झाले. तर अवध, बिहार सारख्या प्रदेशातील जनता या उठावात सहभागी झाली. पुढे सन १८५७-५९ मध्ये ब्रिटिशांनी भरलेल्या खटल्यांमध्ये सैनिकांच्या बरोबर अनेक सर्वसामान्य लोकांची नावे होती याचाच अर्थ असा होतो की या उठावात फक्त सैनिकच नाही तर सर्वसामान्य लोक ही सहभागी झाले होते.

**२. एल. आर. रीज :** हा उठाव म्हणजे ख्रिश्चन धर्माविरुद्धचे धर्म युद्ध होते. परंतु रीज यांचे हे मत मान्य करणे कठीण आहे. कारण १८५७ च्या उठावात विविध वर्ग व धर्म समूहातील लोकांनी सहभाग घेतला होता. त्यामुळे हा उठाव ब्रिटिशांच्या अन्याय व शोषक नीतीच्या विरोधी उठाव होता. तो ख्रिश्चन धर्मविरोधी नसल्यामुळे रीज यांनी केलेला तर्क मान्य होत नाही.

**३. सर जेम्स आऊटराम आणि डब्ल्यू टेलर :** हा उठाव म्हणजे हिंदू - मुस्लिम कटाचा परिणाम होय. परंतु या विद्वानांनी दिलेले स्पष्टीकरण असमाधानकारक आहे.

**४. बेंजामिन डिझरायली :** इंग्लंडमधील तत्कालीन परंपरावादी पक्षाचे नेते बेंजामिन डिझरायली यांच्या मते हा उठाव म्हणजे राष्ट्रीय उत्थान होय.

**५. अशोक मेहता :** यांनी आपल्या 'द ग्रेट रेबिलियन' या ग्रंथात उठावाचे वर्णन राष्ट्रीय उठाव असे केले आहे.

**६. डॉ. के. दत्ता :** १८५७ च्या उठावाला लष्करी उद्रेक मानतात. ज्याचा फायदा असंतुष्ट राजे व जमीनदारांनी घेतला होता. बदलत्या राजकीय व्यवस्थेमुळे हे संस्थानिक, जमीनदार, आदिवासी, सर्वसामान्य जनता इत्यादीवर वर्गातील लोक प्रभावित झाले होते. त्यामुळे त्यांनी संधी मिळताच उठावात सहभाग दर्शविला.

**७. के. लॉरेन्स, मॅलेसन, ट्रॅव्हिलियन, होम्ज, सीले, मुंशी जीवनलाल :** या ब्रिटिश धार्जिण्या विद्वानांच्या मते, १८५७ चा उठाव एक सैनिकी उठाव होता. या उठावाला जनतेचा पाठिंबा नव्हता.

**८. आर. सी. मुजुमदार :** यांनी The Sepoy Mutiny and The Revolt of 1857 या ग्रंथात उठावाचे वर्णन करताना म्हणतात, ''१८५७ चा उठाव हा स्वातंत्र्य युद्ध नव्हता. कारण देशाचा खूप मोठा भाग या उठावापासून अप्रभावित राहिला. बहुतांश लोकांनी या उठावात सहभाग घेतला नाही. ब्रिटिशाविरुद्ध लढणारे सर्वात महत्त्वाचे घटक सैनिक होते.'' असे असले तरी १८५७ साली देशाच्या ब्रिटिश सत्तेविरोधी झालेले उठाव नाकारता येत नाहीत.

९. काही ब्रिटिश इतिहासकारांनी १८५७ च्या उठावाचे वर्णन गोरे आणि काळे यांच्यातील संघर्ष असे केले आहे. भारतात राजवट प्रस्थापित करणारे सर्व ब्रिटिश राज्यकर्ते गोरे होते. परंतु उठावात काळे म्हणून भारतीय लोक एकत्र आले नव्हते. अनेक भारतीय जे ब्रिटिश राज्यकर्त्यांची सेवा करत होते, ते काळेच होते तरीही उठावाच्या वेळी अनेक गोऱ्या लोकांना सैनिकांनी धोक्याच्या क्षेत्राबाहेर काढले होते. त्यामुळे काळे-गोरे भेदामुळे उठाव झाला असे म्हणता येत नाही.

१०. काही मार्क्सवादी इतिहासकारांनी या उठावाचे वर्णन परकीय आणि सरंजामशाही गुलामगिरी विरुद्ध सैनिक, शेतकरी व लोकशाही आघाडीचा संघर्ष असे केले आहे. परंतु हे मत पूर्ण सहमत आहे असे होत नाही. कारण या उठावाचे नेते स्वतः सरंजामशाही पार्श्वभूमीतून आले होते. एरिक स्टोक्स यांनी या उठावाला स्वातंत्र्याचे पहिले युद्ध असे मानले आहे. ज्यामध्ये भारतातील विविध वर्ग आणि प्रांतांचा समावेश असलेल्या ब्रिटिश विरोधी युतीचा साधलेला समन्वय सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

थोडक्यात १८५७ च्या उठावाच्या स्वरूपाबद्दल वेगवेगळी मते असली तरी ती भारताच्या इतिहासातील एक उल्लेखनीय घटना म्हणून मानली जाते. कारण या उठावामुळे ब्रिटिशांच्या साम्राज्यवादाला आव्हान उभे केले आणि हा उठाव त्याचे प्रतीक बनला. पुढील काळात या उठावामुळेच भारतीय राजकारण, समाजकारण, अर्थकारण, धर्मकारण इत्यादींमध्ये बदल घडून आले.

**उठावास अपयश येण्याची कारणे :**

१८५७ च्या उठावाचे लोण संपूर्ण भारतभर पसरले. तात्पुरत्या स्वरूपात ब्रिटिशांची सर्व व्यवस्था कोलमडून जात आहे अशी भीती ब्रिटिशांना वाटू लागली. परंतु ब्रिटिशांनी या व्यापक उठावाच्या धक्क्यातून सावरल्यानंतर अतिशय नियोजितपणे उठाव दडपून टाकला आणि उठावास अपयश आले. त्याची कारणे पुढीलप्रमाणे -

**१. उठावाचे स्वरूप स्थानिक :**

ब्रिटिश साम्राज्याच्या विविध प्रदेशात १८५७ चा उठाव झाला असला तरी उठावकर्त्यांना अंतिम ध्येय काय हे निश्चित करता आले नाही. केवळ ब्रिटिश राजवटीच्या अन्यायी व शोषक धोरणाविरोधात उभारलेला लढा असे उठावाचे स्वरूप राहिले. उत्तरेत उठावाने रौद्र रूप धारण केले असले तरी दक्षिणेतही उठाव व उठावासंबंधित हालचाली मोठ्या प्रमाणात झाल्या. परंतु उठावात सामील झालेल्या समाजातील संस्थानिक, जमीनदार, वतनदार, सैनिक, आदिवासी, सर्वसामान्य लोकांचे प्रश्न हे स्थानिक स्वरूपाचे होते. त्यास एक राष्ट्रीयत्वाची झालर नसल्याने हे उठाव स्थानिक स्वरूपाचे राहिले.

**२. प्रभावी नेतृत्वाचा अभाव :**

१८५७ च्या उठावाचा प्रारंभ शिपायांच्या बंडापासून झाला. शिपायांनी उठावाचे नेतृत्व दिल्लीच्या मुघल बादशहाकडे दिले. परंतु मुघल बादशहाचा देशव्यापी प्रभाव पडू शकला नाही. झाशीची राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवे हे संस्थानिकासाठी ब्रिटिशांविरुध्द लढले. तात्या टोपे, रंगो बापूजी गुप्ते इत्यादींनी प्रयत्नांची शिकस्त केली. परंतु त्यांना प्रादेशिक मर्यादा पडल्या. दळणवळण व संदेशवहन यंत्रणेचा अभाव शिवाय एकमुखी

व प्रभावी नेतृत्व उठावकर्त्यांना लाभले नसल्याने हा उठाव मोडून काढणे सोपे गेले. उठाववाल्यांनी जमेल त्या पध्दतीने, हाती मिळेल त्या शस्त्रानिशी उठाव केल्याने त्यांना योग्य दिशा मिळू शकली नाही.

**३. आधुनिक शस्त्रसामुग्री व एकच नेतृत्व :**

ब्रिटिशांकडे असणारी आधुनिक शस्त्रास्त्रे हेही ब्रिटिशांच्या विजयाचे कारण ठरले. त्यांच्याकडे असणाऱ्या नव्या पध्दतीच्या बंदुका, रायफली, तोफा यामुळे हाती विळे, कोयते, काठ्या, भाले, तलवारी बाळगलेल्या उठावकर्त्यांना पराभूत करणे त्यांना शक्य झाले. तसेच ब्रिटिशांकडे हॅवलॉक, सर ह्यूरोज, औट्रॅम, लॉरेन्स, निकोलसन, बर्नार्ड, विल्सन, जेकब हे कसलेले ब्रिटिश सेनानी एकाच नेतृत्वाचे ओदश पाळून उठावकर्त्यांचा बिमोड करत होते. लॉर्ड कॅनिंगच्या नेतृत्वाखाली या उठावाचा शेवट घडवून आणला.

**४. राजे-राजवाड्यांच्या पाठिंब्याचा अभाव :**

भारतात सुमारे साडेपाचशे पेक्षा अधिक संस्थाने अस्तित्वात होती. हे संस्थानिक एखाद्या राजाप्रमाणे वागत असत. देशातील बहुतांश संस्थानिक पद, प्रतिष्ठा, स्वायत्तता व आपले संस्थान अबाधित राहण्यासाठी वाटेल ते करण्यास तयार होते. यामुळे ज्या संस्थानिकांना लॉर्ड डलहौसीच्या खालसा धोरणाचा म टका बसला तेवढ्यानीच १८५७ उठावात सहभाग घेतला. बाकीचे संस्थानिक ग्वाल्हेर, बडोदा, हैद्राबाद, जिंद, पतियाळा, कपूरधाळा, ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहिले. तर काही संस्थानिकांनी उठाव मोडून काढण्यासाठी इंग्रजांना मदत केली.

**५. एक राष्ट्रीयत्वाचा अभाव :**

१८५७ च्या उठावास प्रारंभ झाल्यानंतर या उठावात यश मिळाले तर पुढची दिशा काय ठरवायची? यासंदर्भात एकवाक्यता नव्हती. एक विशिष्ठ समान ध्येय क्रांतीकारकासमोर नसल्याने हा उठाव यशस्वी होऊ शकला नाही. एकराष्ट्रवाद निर्माण करण्यासाठी हे स्वातंत्र्ययुध्द लढले जात आहे, अशा प्रकारचा ठाम विश्वास क्रांतीकारकमध्ये नसल्याने १८५७ च्या उठावात एक राष्ट्रीयत्वाचा अभाव दिसून येतो.

**६. लष्करी डावपेच व मदतीचा अभाव :**

१८५७ च्या उठावाची सुरूवात सैनिकापासून झाली. प्रारंभी सैनिकांनी आपल्या शौर्याने अनेक आघाड्यांवर ब्रिटिशांना पराभूत केले. परंतु लढाईचे तंत्र व नीती याबाबतीत भारतीय शिपाई व नेते कमी पडले. त्यांना योग्यवेळी योग्य डावपेच आखता आले नाहीत. दिल्ली जिंकल्यानंतरही त्यांना विजय टिकवता आला नाही. इंग्रज सैन्य संख्येने कमी असून अनेक मोठ्या लढाया जिंकल्या. इंग्रजांकडे मोठी आर्थिक ताकद, आधुनिक शस्त्रास्त्रे, शिस्तबध्द सैन्य व अनुभवी सेनानी होते. शिवाय दळणवळण व संदेशवहनाचा ताबा इंग्रजांकडे असल्याने त्यांना सर्व प्रकारची मदत वेळेवर पोहचत होती. या तुलनेत उठावकर्त्यांना मदत वेळेत पोहचली नाही अथवा मिळालीच नाही. यामुळे या उठावास अपयश आले.

**७. उठावाची व्याप्ती मर्यादीत :**

भारताच्या भौगोलिक विस्ताराचा विचार करता १८५७ च्या उठावाची व्याप्ती मर्यादीत राहिली. या

उठावाचे लोण उत्तर भारतात व्यापक असले तरी सिंध, राजस्थान प्रांतात शांतता होती. पंजाबमधील शीखांनी इंग्रजांना मदत केली. इंग्रजांनी सैन्याच्या जोरावर दक्षिण भारतातील उठाव दडपून टाकला. संपूर्ण देशावर इंग्रजांचा प्रभाव असल्याने अनेक ठिकाणी उठाव होण्याअगोदर काळजी घेण्यात आली. एकूणच भारतासारख्या खंडप्राय देशाच्या मानाने उठावाची व्याप्ती मर्यादित राहिली. वरील सर्व कारणामुळे १८५७ चा उठाव दडपून टाकण्यात इंग्रज यशस्वी ठरले.

**ब) १८५७ च्या उठावाचे परिणाम :**

१८५७ चा उठाव अयशस्वी झाला असला तरी या उठावाचे भारताच्या इतिहासावर दूरगामी परिणाम झाले. या उठावाने भारतातील ब्रिटिश साम्राज्याच्या मजबूत पाया अस्थिर करण्याचा प्रयत्न केला.

**१. ईस्ट इंडिया कंपनीची राजवट संपुष्टात :**

सन १७५७ ते १८५७ या काळात कंपनी सरकारने व्यापार, साम्राज्यवाद व राज्यकारभार या त्रिसूत्रीचा वापर करीत संपूर्ण हिंदुस्थान आपल्या नियंत्रणाखाली आणला. या काळात कंपनी सरकार व त्यांच्या अधिकाऱ्यांनी येथील जनतेवर अन्याय, अत्याचार करून जास्तीत जास्त आर्थिक शोषण केले. कंपनीच्या सत्तेमुळे व शोषक धोरणामुळे भारतीयांच्या असंतोषात भर पडत गेली. याचे पडसाद सन १८५७ च्या रूपाने उमटले. भारतातील इंग्रजी राजवट ईस्ट इंडिया कंपनीच्या हातात असुरक्षित आहे, असे इंग्लंडच्या राणी व्हिक्टोरियास वाटल्यामुळे कंपनी राजवट संपुष्टात आल्याची घोषणा राणीने केली. १ नोव्हेंबर १८५८ रोजी इंग्लंडच्या राणीने जाहीरनामा प्रसिध्द करून ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यातील सर्व सत्ता आपल्या हाती घेत असल्याचे जाहीर केले.

**२. राणीचा जाहीरनामा :**

राणी व्हिक्टोरिया हिने सर्व भारतीयांना उद्देशून एक जाहिरनामा प्रसिध्द केला. तो जाहिरनामा १ नोव्हेंबर १८५८ रोजी अलाहाबाद येथे दरबार भरवून तेथे वाचून दाखविण्यात आला. भारतीयांच्या असंतोषाची तीव्रता कमी व्हावी म्हणून त्यांना विश्वासात घेऊन राज्यकारभार करण्यासाठी आश्वासने देणारा जाहीरनामा प्रसिध्द केला.

**३. भारतीय लष्कराची पुनर्रचना :**

१८५७ च्या उठावाची सुरुवात सैनिकांपासून झाली असल्याने उठावानंतर भारतीय सैनिकांना दोषी ठरवून मविभाजन व संतुलनम या तत्वाचा वापर करून लष्कराची पुनर्रचना करण्यात आली. ब्रिटिश लष्करातील ब्रिटिश सैनिकांचे भारतीय सैनिकांशी असणारे प्रमाण १ : २ करण्यात आले. हिंदुस्थानातील सर्व महत्वाची ठाणी इंग्रज फौजेच्या ताब्यात ठेवण्यात आली. पूर्वी लष्करात संमिश्र जातीच्या तुकड्या होत्या. त्याऐवजी पंजाबी, शीख, गुरखा, रजपूत, महार, मराठा अशा जातवार तुकड्या निर्माण केल्या. तोम खाना व शस्त्रास्त्र विभाग प्रामुख्याने सामान्य जनतेपासून दूर ठेवण्यात आले. याप्रकारे लॉर्ड कॅनिंगच्या कालखंडात लष्कराची पुनर्रचना करण्यात आली.

**४. एत्तदेशीय संस्थानिकाच्या धोरणात बदल :**

लॉर्ड डलहौसीच्या विलीनीकरण धोरणाचा परिणाम म्हणून अनक संस्थाने खालसा झाली. संस्थानिकांचे

तनखे, पदव्या रद्द करण्यात आल्या, यामुळे अशा संस्थानिकांनी व त्यांच्या अधिपत्याखालील जनतेने उठावात सहभाग घेतला तर अनेक संस्थानिकांनी ब्रिटिशांना मदत केली. यानिमित्ताने ब्रिटिशांना संस्थानिकांची ताकदही कळली. भारतामध्ये आपल्या सत्तेची पकड मजबूत करावयाची असेल तर संस्थानिकाबाबतच्या आक्रमण धोरणाचा त्याग केला पाहिजे याची जाणीव ब्रिटिशांना झाली. त्यामुळे ब्रिटिशांनी साम्राज्यवादी धोरणाचा शेवट करून संस्थानिकांना स्थानिक राजाचे अधिकार देण्याबरोबर त्याचे हक्क, अधिकार, सन्मान अबाधित राखले जातील याची हमी दिली.

**५. 'फोडा व झोडा' या भेदनीतीचा अवलंब :**

सैनिकापासून उठावास सुरुवात झाली. दिल्लीचा मुघल बादशहास नेतृत्व देण्यात आले. इंग्रज सत्तेचा शेवट करून मुस्लिम सत्तेची पुनर्स्थापना करावयाची असा उठावकर्त्यांचा डाव आहे असे ब्रिटिशांना वाटत होते. उठावाच्या कारस्थानात मुसलमानच प्रमुख आहेत असा दृढ समज झाला होता. या उठावात हिंदू-मुस्लिम या दोन धर्मीयातील ऐक्यभावही दिसून आला. या सर्व घटना अशाच घडत राहिल्या तर येथे राज्य करणे अवघड होईल अशी भिती ब्रिटिशांना वाटू लागली. यातूनच त्यांनी प्रथम मुस्लिमांबाबत कठोर धोरण स्विकारले. मुसलमान वतनदाराच्या जमिनी जप्त केल्या. दिल्ली, म त्तेहपूर येथील मशिदीत मुसलमानांना नमाज पडण्यास बंदी घातली. मात्र नंतरच्या काळात त्यांनी मुस्लिमाप्रतीचे धोरण बदलून मुस्लिमांचा वापर हिंदू समाजाविरुध्द आणि राष्ट्रीय भावनेच्या प्रसाराला रोखण्यासाठी केला व भविष्यात हे दोन्ही समाज (हिंदू-मुस्लिम) एकत्र येणार नाहीत याची काळजी घेतली. परिणामी देशात म ोडा-झोडा नीती यशस्वी झाली.

**६. नेतृत्व मध्यमवर्गाकडे :**

१८५७ च्या उठावात नेतृत्व करणारे नेते अंशतः सुशिक्षित होते. मात्र उठावात सहभागी झालेल्या सैनिकापासून सर्वसामान्य माणसापर्यंत बहुतांशी लोक अशिक्षित होते. ब्रिटिशांविरुध्द सशस्त्र उठाव करूनही अपयश आल्याने यापुढे सशस्त्र उठाव करणे म्हणजे आत्मघाताला निमंत्रण देणे होईल असे समाजाला वाटले. पुढील काळात सशस्त्र लढ्याऐवजी न्याय मागण्यासाठी घटनात्मक मार्गाचा अवलंब केला पाहिजे असे नवसुशिक्षित लोकांना वाटू लागले. यातूनच देशाचे नेतृत्व मध्यमवर्गाकडे गेले. या मध्यमवर्गाने लोकजागृती करून लोकांना आपल्या हक्काची जाणीव करून दिली. लोकमतचा सरकारवर दबाव आणून आपल्या मागण्या मान्य करून घेण्याचे सत्र अवलंबले.

**७. राष्ट्रीयत्वाचे बीजारोपण :**

१८५७ च्या उठाव असम ल ठरला असला तरी या लढ्यात ज्या शूर वीरांनी हौतात्म्य पत्करले, त्यांच्या प्रती लोकांच्या मनामध्ये अभिमान निर्माण झाला. बहादूर शहा, मंगल पांडे, नानासाहेब, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई, कुंवरसिंह, बेगम हजरत महल, रंगो बापूजी गुप्ते, चिमासाहेब महाराज इत्यादींनी देशासाठी आपल्या सर्वस्वाचे बलिदान दिले. त्यांच्या स्मृती पुढील काळात राष्ट्रीय भावना जागृत करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरल्या. ब्रिटिशांनी आपल्याला गुलामगिरीत ठेवले आहे, याची जाणीव भारतीय जनतेला झाल्याने ब्रिटिशांविरोधी संघटीत होऊन लढा दिला पाहिजे अशी भावना निर्माण झाली.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. द ग्रेट रेबिलियन हा ग्रंथ ............... यांनी लिहिला.

अ) डॉ. के. दत्ता  ब) अशोक मेहता

क) आर. सी. मुजुमदार  ड) सर जॉन सीली

२. १८५७ चा उठाव म्हणजे निव्वळ शिपायाचे बंड असे ............... यांनी म्हटले आहे.

अ) सर जॉन सीली  ब) अशोक मेहता

क) आर. सी. मुजुमदार  ड) एल. आर. रीज

३. १८५७ च्या उठावाला स्वातंत्र्याचे पहिले युद्ध असे ............... यांनी म्हटले आहे.

अ) एरिक स्टोक्स  ब) मुंशी जीवनलाल

क) के. लॉरेन्स  ड) सीले

४. ईस्ट इंडिया कंपनीची राजवट ............... उठावाने संपुष्टात आले.

अ) १८५७  ब) १७५७

क) १७७२  ड) १८४४

५. भारतात फोडा व झोडा या भेदनीतीचा अवलंब ............... यांनी केला.

अ) फ्रेंच  ब) इंग्रज

क) पोर्तुगीज  ड) डच

## १.२.३ १८५८ चा राणीचा जाहीरनामा :

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासकीय व आर्थिक धोरणामुळेच भारतीय समाजाच्या विविध वर्गामध्ये असंतोष निर्माण झाल्याने इंग्रजी सत्तेपुढे १८५७ च्या लढ्याचे आव्हान उभे राहिले याची जाणीव इंग्लंडच्या राणी व्हिक्टोरियाला झाली. भारतातील ब्रिटिश सत्ता कंपनीच्या हाती सुरक्षित नाही, कंपनीच्या कारभारामुळे इंग्लंडची प्रतिष्ठा धोक्यात आली आहे असे वाटल्याने इंग्लंडची तत्कालीन साम्राज्ञी राणी व्हिक्टोरिया हिने १ नोव्हेंबर १८५८ रोजी एक जाहीरनामा प्रसिध्द केला. त्यास मराणीचा जाहीरनामाम असे म्हटले जाते. हा जाहीरनामा इंग्लंडचे पंतप्रधान डीं यांनी तयार केला होता.

**जाहीरनाम्यातील तरतूदी :**

राणीचा जाहिरनामा हा भारतीय प्रजेला उद्देशून तयार करण्यात आला होता. लॉर्ड कॅनिंगने १ नोव्हेंबर १८५८ रोजी अलाहाबाद येथे दरबार भरवून राणीचा जाहिरनामा घोषित केला. हा जाहिरनामा सन १८५८ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया या अधिनियमान्वये प्रसृत करण्यात आला. १८५८ च्या कायद्याने भारतातील कंपनी राजवट बरखास्त करण्यात आली आणि इंग्लंडच्या राणीची प्रत्यक्ष राजवट सुरू झाली.

**राणीच्या जाहिरनाम्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे :**

१.संस्थानिकांच्या संबंधी असणाऱ्या धोरणात बदल करून संस्थानिक, राजेरजवाड्यांशी असणारे तह किंवा करारनामे पाळले जातील.

२. धार्मिक बाबतीत सरकार हस्तक्षेप करणार नसून सर्व धर्मियांना समान वागणूक मिळेल.

३. इंग्लंडला भारतात यापुढे राज्यविस्तार करण्याची अजिबात इच्छा नाही.

४. देशातील जनतेचे हित लक्षात घेऊन राज्यकारभार केला जाईल.

५. लोकांच्या चालीरिती, श्रध्दा, प्रथा, परंपरा विचारात घेऊन कायदे करून त्याची अंमलबजावणी केली जाईल.

६. सरकारी नोकरी देताना धर्म, जात, वर्ण, वंश व भाषा याचा विचार न करता केवळ शिक्षण आणि गुणवत्तेचा विचार करून नेमणूका दिल्या जातील.

७. मुघल बादशहा बहादूरशाहाचे नामधारी पद रद्द केले.

८. १८५७ च्या उठावात ब्रिटिश नागरिकांचा खून करणाऱ्यांना कैद्यांना सोडून इतर गुन्हेगारांना पश्चात्ताप झाल्यास सोडून दिले जाईल.

९. संस्थानिकांना दत्तक घेण्याचा अधिकार दिला जाईल. तसेच त्यांच्या पदव्या, मानसन्मान पूर्ववत ठेवले जातील.

एकंदरीत इंग्रजांच्या भारतविषयक धोरणात बदल होऊन या जाहिरनाम्याने भारतात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पावले उचलली गेली.

◆ **राणीच्या जाहीरनाम्याचे परिणाम :**

हिंदुस्थानातील ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यकारभाराचे उच्चाटन करण्याचा हेतू या जाहिरनाम्याने सम ल झाला. कंपनी राजवटीवरील भारतीयांचा असलेला असंतोष लक्षात घेऊन इंग्लंडमधील ब्रिटिश सरकारने १८५७ पूर्वी वीस-पंचवीस वर्षापासूनच कंपनी सरकारवर नियंत्रणे आणण्यास सुरूवात केली होती. १७८४, १८१३, १८३३, १८५३ असे प्रत्येक २० वर्षांनी केलेले कायदे त्याचेच प्रतीक होते. या सर्वांचा प्रभाव राणीच्या जाहिरनाम्यावर होता. यामुळे भारतातील कोणत्याही वर्ग अथवा गटाला दुखावून तेथे आपली सत्ता कायम ठेवणे हे कोणत्याही परिस्थितीत धोक्याचे आहे याची जाणीव इंग्लंडमधील सरकारला झाली होती. यातूनच इंग्लंडच्या संसदेने '१८५८ चा भारत सरकार अधिनियम' संमत करून त्यानुसार भारतातील सर्व प्रदेश, प्रशासन, महसूल कंपनी सरकारकडून काढून ते ब्रिटिश राजपदाच्या वर्चस्वाखाली आणले. राणीच्या जाहिरनाम्याचा परिणाम म्हणूनच भारतातील मध्यवर्ती, प्रांतिक, स्थानिक स्वराज्य संस्था, न्याय व्यवस्था इत्यादीमध्ये बदल करण्यात आले.

**१. भारतातील मध्यवर्ती प्रशासन व्यवस्थेतील बदल :**

१८५८ चा भारतविषयक कायदा इंग्लंड सरकारने मंजूर केला. या कायद्यानुसार 'कंपनी सरकारची' राजवट बरखास्त करून ती 'इंग्लंडच्या राजा'कडे (राजपद) देण्यात आली. (त्यावेळी इंग्लंडचे राजपद राणी व्हिक्टोरियाकडे

होते.) या कायद्यान्वये भारतातील प्रशासन राणीच्या नावाने चालविण्यात येईल त्यासाठी भारतमंत्री (भारत सचिव) व त्यांच्या मदतीला १५ सदस्यांचे सल्लागार मंडळ नेमण्यात आले. भारतमंत्री हा ब्रिटिश संसदेच्या मंत्रीमंडळातील मंत्री असल्याने तो इंग्लंडच्या राणीचा विश्वासू व जबाबदार घटक होता. पूर्वी कंपनी राजवटीत भारतमंत्र्याच्या ऐवजी 'बोर्ड ऑफ कंट्रोल' ही जबाबदारी पार पाडत होते.

भारतामध्ये प्रत्यक्ष राज्यकारभार चालविण्यासाठी पूर्वीच्या 'गव्हर्नर जनरल' ऐवजी 'व्हॉईसरॉय'ची (राजाचा वैयक्तिक प्रतिनिधी) नियुक्ती करण्यात आली. व्हॉईसरॉयच्या मदतीसाठी कार्यकारी परिषदेची (कौन्सिल/मंडळ) तरतूद करण्यात आली. प्रारंभी कार्यकारी परिषदेची संख्या ०४ अशी निश्चित करण्यात आली. कार्यकारी परिषदेतील सदस्य हे सरकारी विभागाचे प्रमुख व व्हॉईसरॉयचे सल्लागार म्हणून काम पाहणार होते. भारतमंत्र्याचे नियंत्रण व्हॉईस रॉयवर असेल. भारतीय प्रशासनाच्या सर्व घटकावर नियंत्रण भारतमंत्री ठेविल. बिकटप्रसंगी व्हॉईसरॉय निर्णय घेऊ शकत असे इतरवेळी प्रत्येक निर्णय भारतमंत्र्यांच्या सहमतीशिवाय घेता येत नसे. कायदेविषयक बाबींसंबंधी निर्णय घेण्यासाठी इ. स. १८६१ च्या 'इंडियन ॲक्ट'नुसार व्हॉईसरॉयच्या कार्यकारी परिषदेतील (कौन्सिल) सदस्यांची संख्या कमीतकमी ६ व जास्तीत जास्त १२ अशी वाढविण्यात आली. या कार्यकारी परिषदेला 'शाही कायदेमंडळ' (Imperial Legislative Council) या नावाने ओळखले जात असे. हे सदस्य नेमण्याचा अधिकार व्हाईसरॉयला देण्यात आला. याशिवाय सर्वप्रकारचे अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मात्र भारतमंत्र्यानंतर व्हाईसरॉयकडे देण्यात आले होते.

**२. प्रांतिक प्रशासन व्यवस्थेतील बदल :**

ब्रिटिशांनी प्रशासनाच्या सोयीसाठी भारताचे अनेक प्रांत पाडले. त्यामध्ये मुंबई, मद्रास व बंगाल हे प्रांत इलाखे किंवा 'प्रेसिडेन्सी' म्हणून ओळखले जात असत. या इलाख्याचा कारभार गव्हर्नर व त्याचे कार्यकारी मंडळ पाहत असे. हे कार्यकारी मंडळ ब्रिटिश सरकारने नियुक्त केले असे. प्रातांच्या आर्थिक बाबींबर केंद्र सरकारचे कठोर नियंत्रण होते. प्रांतीक सरकारने कार्यक्षम राहून महसूल वसूलीवर देखरेख करणे, केंद्र (मध्यवर्ती) सत्तेला शक्य नसल्याने इंग्रज अधिकाऱ्यांनी सार्वजनिक वित्त विभागाचे विकेंद्रीकरण करण्याबाबत पावले उचलली. इ. स. १८७० साली लॉर्ड मेयो याने केंद्रीय व प्रांतीक वित्त विभाग एकमेकांपासून वेगळे केले. शिक्षण, आरोग्य, पोलीस, तुरुंग, रस्ते इत्यादींच्या खर्चासाठी केंद्रीय महसूलातून ठराविक रक्कम (अनुदान) प्रांतांना देण्यात आले. इ. स. १८६१ व १८९२ च्या कायद्यानुसार प्रांतातील कायदेविषयक कामकाजासाठी विकेंद्रीकरणाचे धोरण ठरविण्यात आले. तसेच वित्तीय विकेंद्रीकरणामुळे प्रांतिक प्रशासनामध्ये उत्पन्न वाढवून खर्च कमी करण्याचा इंग्रजांचा हेतू काही अंशी सम ल झाला.

**३. स्थानिक स्वराज्य संस्था :**

इंग्रजांनी ग्रामीण शासन व्यवस्थेच्या पारंपारिक चौकटीला हात न लावता शहरी स्थानिक संस्थाची निर्मिती केली. ब्रिटिशांनी नगरपालिका व जिल्हा मंडळे (District Local Board) स्थापन करून जास्तीत-जास्त प्रशासनाचे विकेंद्रीकरण केले. खेड्याऐवजी जिल्हा हा स्थानिक प्रशासनाचा घटक बनविला. जिल्हा समित्या निर्माण करून ग्रामीण भागातील कर व उपकर वसूल करण्याची जबाबदारी या समित्यांवर टाकण्यात आली. जिल्हा अधिकारी या समित्यांचा अध्यक्ष असे. लॉर्ड मेयोने आर्थिक विकेंद्रीकरणाच्या धोरणाचा पुरस्कार

करून, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून स्थानिक लोकांकडून पैसा गोळा करून तो तेथील विकासासाठी वापरावा असे सुचविले. मेयोच्या या धोरणामुळे नगरपालिकांना आर्थिक स्वावलंबी बनविण्यासाठी कर आकारणीस मंजुरी देण्यात आली. पुढे लॉर्ड रिपनच्या उदारमतवादी धोरणामुळे त्याने १२ मे १८८२ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या स्थापनेसंबंधी निर्णय घेतला. यानुसार इ.स. १८८४ मध्ये मुंबई इलाख्यात मलोकल बोर्डम कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार जिल्हा व तालुका स्तरावर 'लोकल बोड' स्थापन करण्यात आली. याचाच परिपाक म्हणून पुढे प्रत्येक खेड्यांमध्ये ग्रामपंचायतीची स्थापना करण्यात आली.

**४. प्रशासकीय सेवा :**

ब्रिटिशांच्या भारतातील प्रशासन यंत्रणेत भारतीयांना म ारच कमी स्थान होते. तसेच प्रशासकीय धोरण ठरविताना भारतीयांना विचारात घेतले जात नसे. ब्रिटिश प्रशासनातील सर्व महत्त्वाची अधिकारपदे 'भारतीय सनदी सेवेतील' (Indian Civil Service) अधिकाऱ्यांना दिली जात असत. ही पद भरण्यासाठी दरवर्षी इंग्लंडमध्ये स्पर्धा परीक्षा होत असे. या परीक्षेस बसण्यास भारतीयांना परवानगी होती, परंतु परीक्षा केंद्र इंग्लंडमधील लंडन येथे असल्याने भारतीयांना सर्व पात्रता पूर्ण करून तेथे पोहचणे जिकीरीचे होत असे. कारण समुद्रामार्गेइंग्लंडला जाण्यासाठी पाच-सहा महिन्यांचा प्रवास करावा लागत होता. १८५८ च्या राणीच्या जाहिरनाम्यानंतर दोन वर्षांनी भारत मंत्र्यांनी नेमलेल्या एका कमिशनने शिम ारस केली की, 'भारतीय सनदी सेवा' (ICS) ही परीक्षा इंग्लंड व हिंदुस्थानात दोन्हीकडे होईल. इ. स. १८६३ साली सत्येंद्रनाथ टागोर हे पहिले भारतीय (ICS) परीक्षा उत्तीर्ण झाले. यानंतर सुरेंद्रनाथ बॅनर्जी, आर. सी. दत्त, बिहारीलाल गुप्ता यांनी (ICS) परीक्षेत यश मिळविले. तरीही प्रशासनातील पोस्ट व तार खाते, पोलीस, वन विभाग, अभियांत्रिकी, रेल्वे खात्यातील महत्त्वाची व मोठ्या पगाराची पदे ब्रिटिशांसाठी राखून ठेवली जात असत. भारतीयांना ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या वर्चस्वाखाली रहावे लागत असे.

**५. सैन्याची पुनर्रचना :**

सन १८५८ च्या राणीच्या जाहिरनाम्यानंतर पुन्हा सन १८५७ सारखा उठाव होणार नाही अशा रितीने सैन्याची पुनर्रचना करण्यात आली. ब्रिटिश लष्करातील भारतीय शिपाई व इंग्रज शिपाई व अधिकारी यांचे प्रांतानुसार प्रमाण बदलण्यात आले. भारतीय व इंग्रज शिपायाचे प्रमाण मुंबई व मद्रास सैनिकांमध्ये ३:१ तर बंगाल सैन्यामध्ये २:१ ठेवण्यात आले. तोफखाना, विविध महत्त्वाचे लष्करी विभाग, इंग्रज अधिकारी व सैन्याच्या ताब्यात राहतील याची दक्षता घेण्यात आली. भारतीय शिपायांच्या जातवार संघटना होऊ नयेत, यासाठी सैन्याची तुकड्यांची रचना जातभेदविरहित करण्यावर भर दिला. भारतीय सैनिकांमध्ये राष्ट्रभक्ती, राष्ट्रवाद वाढू किंवा निर्माण होऊ नये यासाठी मराठा, रजपूत, शीख, गुरखा, बलुची इत्यादी प्रादेशिक रेजिमेंटस् तयार करण्यात आल्या.

सैन्याच्या या पुनर्रचनेमुळे लष्करावरील खर्चात प्रचंड वाढ करण्यात आली. युरोपीयन सैनिकांना मिळणारा पगार हा देशी सैनिकांच्या पगारापेक्षा पाच पटीने जास्त होता. सन १९०४ साली एकूण भारतीय महसूलाच्या ५२% भाग सैन्यावर खर्च केला जात होता. यामुळे भारतीयांना महसूलापोटी प्रचंड मोठी रक्कम द्यावी लागत होती.

### ६. न्यायालयीन परिणाम :

कंपनी कालखंडात सर्वोच्च न्यायालयाची रचना दिवाणी सदर अदालत व निझामत सदर अदालत अशी द्विस्तरावर करण्यात आली होती. कलकत्ता येथे सर्वोच्च न्यायालय होते. पुढे इ. स. १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यानुसार धर्म, जात, वर्ण, वंश असा भेदभाव न करता कायद्यापुढे सर्व समान असतील असे आश्वासन मिळाले. इ. स. १८६१ मध्ये उच्च न्यायालय स्थापनेचा कायदा मंजूर झाला. या कायद्यान्वये मुंबई, मद्रास व कलकत्ता येथे उच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. सर्व प्रांतात एकसूत्री व समान न्यायव्यवस्था निर्माण करण्यात आली. तरीही बऱ्याचवेळा युरोपीयन व भारतीय यांच्यात न्यायदान होत असताना पक्षपात होतच राहिला.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. १ नोव्हेंबर १८५८ रोजी .............. या राणीने जाहिरनामा प्रसिध्द केला.
   अ) कॅथेराईन   ब) व्हिक्टोरिया
   क) एलिझाबेथ   ड) मेरी

२. भारतात .............. या ठिकाणी राणीचा जाहिरनामा वाचून दाखविण्यात आला.
   अ) मुंबई   ब) अलाहाबाद
   क) कलकत्ता   ड) मद्रास

३. .............. या व्हॉईसरॉयने केंद्रीय व प्रांतिक वित्तविभाग एकमेकांपासून वेगळे केले.
   अ) लॉर्ड कॅनिंग   ब) लॉर्ड मेयो
   क) लॉर्ड माऊंटबॅटन   ड) लॉर्ड कर्झन

४. लॉर्ड रिपन याने .............. धोरण स्विकारले.
   अ) साम्यवादी   ब) जहालवादी
   क) उदारमतवादी   ड) समाजवादी

५. .............. हे पहिले भारतीय 'भारतीय सनदी सेवा' (ICS) परीक्षा उत्तीर्ण झाले.
   अ) सत्येंद्रनाथ टागोर   ब) आर. सी. दत्त
   क) बिहारीलाल गुप्ता   ड) रविंद्रनाथ टागोर

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**१. उठाव :** एखादी राजकीय सत्ता उखडून टाकण्यासाठी केलेला प्रयत्न म्हणजे उठाव होय.

**२. वंशश्रेष्ठत्व :** गोऱ्या वर्णाचे लोक (युरोपियन) आफ्रिका व आशिया खंडातील काळ्या वर्णाच्या लोकांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत असे समजत असत.

**३. राष्ट्रीयत्व :** आपल्या मातृभूमीबद्दल, भाषा, धर्म, परंपरा, संस्कृती याबद्दल प्रत्येक व्यक्तीच्या मनात प्रेम आणि आदर असणे, तसेच राष्ट्रहितासाठी सर्वस्व बहाल करणे.

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न – १**

**अ)** १. (क) लॉर्ड डलहौसी　　२. (क) लॉर्ड कॉनवॉलिस

३. (अ) मेजर ह्यूसन　　४. (ब) झाशी

५. (ड) ग्वाल्हेर

**स्वयं अध्ययन प्रश्न – २**

**अ)** १. (ब) अशोक मेहता　　२. (अ) सर जॉन सीली

३. (अ) एरिक स्टोक्स　　४. (अ) १८५७

५. (ब) इंग्रज

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

**अ)** १. (ब) व्हिक्टोरिया　　२. (ब) अलाहाबाद

३. (ब) लॉर्ड मेयो　　४. (क) उदारमतवादी

५. (अ) सत्येंद्रनाथ टागोर

## १.५ सारांश :

१८५६ सालापर्यंत ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने तैनाती फौज, संस्थाने खालसा धोरण इत्यादी धोरणाचा वापर करून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे संपूर्ण भारतावर ताबा मिळविला. ब्रिटिशांचे व्यापारी धोरण, जमीन महसूलविषयक धोरण, वंशश्रेष्ठत्व, ख्रिश्चन धर्म प्रसाराला दिलेले अप्रत्यक्ष प्रोत्साहन, ब्रिटिश लष्करातील भारतीय सैनिकांच्या समस्या इत्यादी घटनामुळे १८५७ पूर्वी विविध ठिकाणी छोटे-मोठे उठाव घडून आले. या उठावातून देशपातळीवर ब्रिटिश राजवटीविषयी असंतोष पसरल्याने १८५७ चा उठाव घडून आला. १८५७ च्या उठावाची सुरुवात सैनिकांच्या बंडापासून झाली. २९ मार्च १८५७ रोजी बराकपूरच्या छावणीतील सैनिकांनी गाई व डुकराची चरबी लावलेली काडतुसे वापरण्यास नकार दिला. मंगल पांडे याने मेजर ह्यूसनवर गोळ्या झाडून ठार केले व उठावाचे लोण सर्वत्र पसरण्यास सुरूवात झाली. उत्तर भारत, बिहार, दिल्ली, राजपुताना, लखनौ, अलाहाबाद, कानपूर, बनारस, झाशी, बरेली, दक्षिणेत सातारा, कोल्हापूर, बेळगांवसह अनेक ठिकाणी उठावाचे लोण पसरले. या उठावाचे नेतृत्व मुघल बादशहा बहादुरशहा, नानासाहेब पेशवे, राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, कुवरसिंह, बेगम हजरत महल, रंगो बापूजी गुप्ते आदींनी केले. या उठावात सैनिक, राजे, संस्थानिक, सेनापती, जमीनदार, आदिवासी, सर्वसामान्य जनतेने सक्रिय सहभाग घेतला होता. परंतु उठावात संघटीत शक्तीचा अभाव, पारंपारिक शस्त्रे, एकराष्ट्रीयत्वाचा अभाव इत्यादी कारणामुळे ब्रिटिशांनी साम, दाम, दंड, भेद नीतीचा वापर करून उठाव मोडून काढला.

१८५७ च्या उठावाचा बिमोड केल्यानंतर पुन्हा अशा प्रकारचा उठाव होऊ नये म्हणून इंग्लंडच्या राणी व्हिक्टोरियाने १ नोव्हेंबर १८५८ रोजी 'राणीचा जाहिरनामा' प्रसिध्द केला. हा जाहिरनामा लॉर्ड कॅनिंगने अलाहाबाद येथे दरबार भरवून वाचून दाखविला. या जाहिरनाम्यानुसार हिंदुस्थानातील जनतेला विश्वास व अनेक आश्वासने दिली गेली. संस्थानिकांप्रती सकारात्मक धोरण, नोकरीच्या नेमणूका, निःपक्षपातीपणे, कायद्यापुढे सर्व समान, धर्माची सक्ती नाही अशा अनेक तरतुदी करण्यात आल्या. राणीच्या जाहिरनाम्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीची १०० वर्षाची कारकिर्द संपुष्टात आली. सन १८५८ च्या कायद्याने भारतात 'ब्रिटिश राज'च्या माध्यमातून राज्यकारभार सुरू झाला, त्याचे भारतीय राज्यकारभारावर परिणाम होऊन अनेक बदल घडून आले.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टीपा लिहा.**

१. १८५७ च्या उठावाची राजकीय कारणे
२. १८५७ च्या उठावाची सामाजिक कारणे
३. १८५७ च्या उठावाची आर्थिक कारणे
४. १८५७ च्या उठावाचे स्वरूप
५. राणीचा जाहिरनामा

**ब) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. १८५७ च्या उठावाची लष्करी कारणे स्पष्ट करा.
२. १८५७ च्या उठावाची अपयशाची कारणे सांगा.
३. १८५७ च्या उठावाचे परिणाम थोडक्यात लिहा.

**क) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. १८५७ च्या उठावाची कारणे स्पष्ट करा.
२. १८५७ च्या उठावाचे स्वरूप व परिणाम स्पष्ट करा.
३. १८५८ च्या राणीचा जाहिरनामा व त्याचे परिणाम विशद करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१. वैद्य, सुमन, कोठेकर, शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१७५७-१८५७), साईनाथ प्रकाशन, नागपूर

२. ग्रोव्हर, बी. एल., बेल्हेकर, एन. के., आधुनिक भारताचा इतिहास : एक नवीन मूल्यांकन, एस. चाँद पब्लिकेशन, नवी दिल्ली.

३. कुलकर्णी, अ. रा., कंपनी सरकार (ईस्ट इंडिया कंपनी), राजहंस प्रकाशन, पुणे.

४. कोलारकर श. गो., आधुनिक भारत (१६६० ते १९५०), श्री मंगेश प्रकाशन नागपूर,२००४.

५. वक्कानी नि. आ., आधुनिक भारताचा इतिहास (१७५७ ते १९६५), श्री मंगेश प्रकाशन नागपूर.

६. ओझा, एन. एन. (संपादक), आधुनिक भारत भाग-२, क्रॉनिकल बुक्स, नवी दिल्ली.

७. Sarakar Sumit, Modern India Macmillan India, 2005

८. Sen S.N. 1857, Publications Division, Ministry of Information Broadcasting, Government of India, 1957.

❍❍❍

घटक २

# सामाजिक व धार्मिक चळवळी

## (Social and Religious Movements)

---

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

 २.२.१ राजाराम मोहन रॉय आणि ब्राह्मो समाज

 २.२.२ स्वामी दयानंद सरस्वती आणि आर्य समाज

 २.२.३ स्वामी विवेकानंद आणि रामकृष्ण मिशन

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास ,

१. राजा राममोहन रॉय यांचा जीवन परिचय आणि ब्राह्मो समाजासाठी त्यांनी केलेल्या कार्याची माहिती मिळेल.

२. ब्राह्मो समाजाचे तत्त्वज्ञान आणि त्याच्या कार्याचे महत्त्व समजेल.

३. स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजासाठी दिलेल्या योगदानाची माहिती कळेल.

४. आर्य समाजाचे तत्त्वज्ञान आणि त्याच्या कार्याची माहिती घेता येईल.

५. रामकृष्ण परमहंस यांचे जीवन व कार्य याची माहिती मिळेल.

६. स्वामी विवेकानंद यांचे चरित्र आणि रामकृष्ण मिशनविषयी माहिती समजेल.

## २.१ प्रास्ताविक :

१९ व्या शतकात भारतात सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळींमुळे समाजाला नवी दिशा मिळाली. या चळवळींनी नवचेतना निर्माण करून बुद्धिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, तर्कवाद, वैज्ञानिक दृष्टी आणि डोळस श्रद्धेवर आधारित समाज निर्मितीसाठी महत्त्वाची पावले उचलली. शतकाच्या उत्तरार्धात सुधारणा चळवळींना अधिक वेग मिळाला आणि समाजाच्या जागृतीसाठी प्रभावी कार्य झाले.सुधारणा चळवळी दोन प्रकारच्या होत्या-१) ब्राह्मो समाज, ज्याने आपल्या क्षेत्रात सुधारणा घडवण्याचा प्रयत्न केला.२) आर्य समाज आणि रामकृष्ण मिशन, ज्यांनी पुनरुत्थानवादी दृष्टिकोन स्वीकारत प्राचीन धर्माच्या महानतेला मान्यता दिली. या चळवळींनी मर्यादित स्वरूपात आपल्या धर्मात सुधारणा घडवण्याचा प्रयत्न केला, पण पारंपरिक परंपरांचा गौरव मात्र कायम ठेवला.

## २.२ विषय विवेचन :

**सामाजिक व धार्मिक जागृतीची कारणे :**

१. **ब्रिटिश राजवटीचा प्रभाव –** ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतीय समाजात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली.

२. **शिक्षणाचा प्रसार –** इंग्रजी शिक्षणामुळे नवीन विचारप्रणालीचा प्रसार होऊन आधुनिक दृष्टिकोन विकसित झाला.

३. **वैचारिक बदल –** पारंपरिक भारतीय विचार आणि पाश्चात्य आधुनिकतेचा संयोग घडवण्याचा प्रयत्न झाला.

४. **धार्मिक सुधारणांची गरज –** जुन्या रूढी, अंधश्रद्धा आणि कर्मकांडांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले.

५. **सामाजिक सुधारणा चळवळी –** समाजसुधारकांनी शिक्षण, सामाजिक समता आणि वैज्ञानिक दृष्टिकोनावर भर दिला.

**६. धर्माचा नव्याने विचार –** हिंदू धर्मातील चुकीच्या प्रथा आणि अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी प्रयत्न झाले.

**७. पाश्चात्य प्रभावाचा स्वीकार –** पाश्चात्य विचारसरणीतील चांगल्या गोष्टी स्वीकारल्याने सामाजिक सुधारणांना गती मिळाली.

**८. समाजसुधारकांची भूमिका –** शिक्षण, स्त्री–पुरुष समता आणि सामाजिक न्याय यासाठी विविध समाजसुधारक पुढे आले.

**९. नवीन सामाजिक रचना –** जुन्या प्रथा मोडून आधुनिक, गतिमान आणि विकसित समाजरचना घडवण्यावर भर देण्यात आला.

**१०. सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन –** धर्म, समाज आणि शिक्षण क्षेत्रात सुधारणा घडवून भारताच्या प्रगतीसाठी कार्य झाले.

इंग्रजी राजवटीमुळे भारतीयांना पाश्चात्य आधुनिक संस्कृतीची ओळख झाली. सुशिक्षित वर्गाला पारंपरिक भारतीय समाज आणि पाश्चात्य संस्कृतीच्या तुलनेत असलेली पिछाडलेपणाची जाणीव झाली. पाश्चात्य संस्कृतीच्या बुद्धिवाद आणि व्यक्तिस्वातंत्र्याने भारतीय तरुणांवर प्रभाव टाकला. इंग्रजी शिक्षणामुळे पाश्चात्य राहणी, वेशभूषा, शिष्टाचार आणि खाण्या–पिण्याच्या पद्धतींचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती वाढली. काहींना पाश्चात्य संस्कृती म्हणजे आधुनिकता वाटली, तर काहींना पारंपरिक भारतीय संस्कृती मागासलेली वाटली.

परंतु, भारतीय सुशिक्षित विचारवंतांनी या प्रवृत्तीला थोपविण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यांनी भारतीय समाजातील दोष नष्ट करण्याची गरज अधोरेखित केली आणि प्राचीन भारतीय संस्कृतीतील चांगल्या गोष्टी स्वीकारण्याचे महत्त्व पटवून दिले. बुद्धिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, तर्कवाद, वैज्ञानिक दृष्टी आणि डोळस श्रद्धेवर आधारलेला धर्म व समाज निर्माण करण्यासाठी सुधारणा चळवळी सुरू करण्यात आल्या. जमीनदार, प्रशासकीय नोकरवर्ग आणि नव्याने उदयास आलेल्या मध्यमवर्गाने या सुधारणांचे समर्थन केले आणि समाजप्रबोधनासाठी पुढाकार घेतला.या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींमुळे भारतात व्यापक बदल घडून आले. यामुळेचब्राह्मो समाज, आर्य समाज आणि रामकृष्ण मिशनयांसारख्या संस्थांचा उदय झाला. या संस्थांनी समाज सुधारणा आणि धार्मिक पुनरुत्थानासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आणि देशहिताला मोठा हातभार लावला.

### २.२.१ राजाराम मोहन रॉय आणि ब्राह्मो समाज :

भारतात १९ वे शतक प्रबोधनाचे शतक म्हणून ओळखले जाते. या काळात पाश्चात्य विचारसरणीच्या प्रसारामुळे धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडून आले. राजा राम मोहन रॉय यांनी समाजात जागृती घडवून आणण्याचे कार्य केले, त्यामुळेच त्यांना आधुनिक भारताचे अग्रदूत म्हणून ओळखले जाते.

भारतीय प्रबोधनाचे प्रेषित आणि प्रणेते म्हणून राजा राममोहन रॉय यांचे आधुनिक भारताच्या इतिहासातील स्थान अनन्यसाधारण आहे. पुरोगामी व उदारमतवादी ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या संपर्कामुळे व इंग्रजी वाङ्मयाच्या अध्ययनाने त्यांची ज्ञानकक्षा व्यापक झाली. जीवनाकडे व समाजाकडे पाहण्याचा त्यांच्या दृष्टीकोन शास्त्रीय व बुद्धिवादी बनला. या दृष्टिकोनातून त्यांनी पाश्चात्य जीवनपद्धतीचा विचार प्रणालीचा आणि भारतीय धर्म व

समाज व्यवस्थेच्या तौलणिक अभ्यास केला त्यातूनच त्यांना धर्म सुधारण्याची प्रेरणा मिळाली धर्म ही भारतीय समाजाची धारक व प्रेरक शक्ती असल्याने मूळ धर्मातत्वावर चढलेली कर्मकांडांची बांडगुळे दूर करून मूळ धर्मतत्त्वांची ओळख भारतीयांना पटवून देण्याचे खोट्या धर्मनिष्ठांमुळे समाजात रुचलेल्या अनिष्ट चालीरीती व रुढी यावर हल्ला चढवून त्यांचे निर्मूलन करण्याचे इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार करून समाजात नवे आधुनिक विचार प्रस्तुत करण्याचे उत्तेजन देण्याचे कार्य राजाराम मोहनरायनी  केले. हे कार्य अधिक व्यापक प्रमाणात करता यावे म्हणून ब्राह्मो समाज नावाची संस्था त्यांनी उभी केली

राजा राममोहन रॉय यांचा जन्म बंगाल प्रांतातील हुगळी जिल्ह्यातील राधानगर या खेड्यात सुखवस्तू ब्राह्मण कुटुंबात १७७२ मध्ये झाला. त्यांचे पणजोबा श्री. कृष्णचंद्र बॅनर्जी हे बंगालच्या नवाबाच्या नोकरीस होते. नवाबने त्यांना रॉयही उपाधी बहाल केली होती. त्यावेळेपासून त्यांच्या पणजोबाने बॅनर्जी या मूळ आडनावा ऐवजी रॉय हीच उपाधी आडनाव वापरण्यास सुरुवात केली.

राजाराम मोहन रॉय यांच्या वडिलांचे नाव रामकांतो रॉय तर आईचे नाव तैरिणीदेवी होते. गावीच त्यांनी बंगाली भाषेचा अभ्यास केला.

त्या काळात प्रशासनासाठी वापरली जाणारी भाषा पर्शियन व अरेबिक होती. त्यामुळे संस्कृत व बंगाली भाषांबरोबरच अरेबिक व  पशियन  या भाषा शिकण्यासाठी वडिलांनी त्यांना पाटणा येथे पाठविले. त्यांनी इस्लाम धर्म आणि सुफी पंथ, शायर आणि शायरी यांचादेखील अभ्यास केला. हाफीज आणि सादी हे त्यांचे आवडते शायर होते.

हिंदू धर्माचे शिक्षण घेण्यासाठी म्हणून राममोहन राय यांना काशीला पाठवण्यात आले. तिथे त्यांनी संस्कृत भाषेबरोबरच वेद, वेदान्त, उपनिषदे अशा गोष्टींचा अभ्यास केला. सोळाव्या वर्षापर्यंत त्यांनी बनारसमधे वास्तव्य केले. त्यानंतर ते बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी बनारसला व नंतर तिबेटमध्ये गेले. पर्शियन लिपीत व अरेबिक भाषेत त्यांनी 'वेदान्त' ग्रंथ नावाचे पहिले पुस्तक लिहिले. १८१५ मध्ये कलकत्ता येथे परतल्यावर त्यांनी 'वेदान्त' ग्रंथाचे बंगाली भाषेत भाषांतर केले.

घरी परतल्यावर त्यांनी तुहम तूल मुवाहीद्दीन (एकेश्वरवाद्यांना भेट) नावाचा अरबीत प्रस्तावना असणारा एक लेख म ारसीमधे लिहिला. त्यामधे त्यांनी मूर्तिपूजेवर कडाडून टीका केली होती. त्यांच्या मते मूर्तिपूजा ही वेदांच्या शिकवणुकीच्या विरुद्ध होती.

त्यांनी हिंदू, खिस्ती, जैन, बौद्ध, यहुदी व पारशी इत्यादी धर्माचा व धर्मग्रंथांचा सखोल अभ्यास केला होता. या अभ्यासामुळे त्यांना खऱ्या धर्मतत्वाच्ची ओळख झाली. परमेश्वर एक आहे हे सर्व धर्मांचे सार असून सत्य आहे असे त्यांचे मत बनले. बहुदेवतावाद, अवतारवाद, मूर्तिपूजा, कर्मकांड, पोथीनिष्ठा या सर्व गोष्टी निरर्थक, अनावश्यक व भ्रामक आहेत असे त्यांना वाटू लागले. १८१४ राजा राममोहन रॉय कलकत्यात स्थायिक  झाल्यानंतर त्यांच्याकडे अनेक बंगाली तरुण आकर्षित झाले. त्याच्या सहकार्याने आपल्या विचारांच्या प्रसारासाठी त्यांनी इ. स. १८१५ मध्ये 'आत्मीय सभा' व १८२२ मध्ये 'युनिटरियन कमिटी' या दोन संस्थांची स्थापना केली. त्यांनी बंगाल मधील हिंदू धर्मियामध्ये असलेल्या अनिष्ट प्रथाविरुद्ध संघर्ष सुरु केला. विशेषतःमूर्तीपूजा, जातीपातीचे कठोर निर्बंध आणिअर्थहीन धार्मिक विधिना विरोध केला. पुरोहित

वर्गावर टीका केली.सर्व प्राचीन वेदादी ग्रंथात एकच देव अद्वैत मानण्यात आला आहे. आपले हे मत ठामपणे लोकासमोर ठेवण्यासाठी त्यांनी चार वेद व पाच उपनिषदे यांचे बंगालीत भाषांतर केले. याच मताचा पुरस्कार करण्यासाठी त्यांनी अनेक निवेदन, पत्रके व पुस्तिकाही प्रसिद्ध केल्या होत्या.

ख्रिश्चन धर्माचा आभ्यास केला. जुन्या प्रथा, परंपराविरुद्ध लढा दिला. भारतातील धर्मव्यवस्था, अर्थव्यवस्था, व शिक्षणव्यवस्था यासंदर्भात लेखन करण्यास सुरुवात केली. त्यासाठी काही वृतपत्रे तसेच सुधारणा चळवळ सुरू केली. त्यांनी ४ डिसेंबर १८२१ रोजी संवाद कौमुदी हे बंगाली भाषेतील तर १२ एप्रिल १८२२ रोजी मिरात-उल-अखबार हे पर्शियन वृतपत्र सुरू केले. त्यांनी १८२८ साली प्रेसिडेन्सी कॉलेज सुरू केले.त्याचप्रमाणे अशाच आधुनिक विचारांचा सर्व धार्मिक स्तरांमध्ये प्रसार व्हावा म्हणून त्यांनी 'मिरत-अकबर' व 'जमे-जहाँ नुमा' ही पर्शियन भाषेतील वृत्तपत्रेही सुरू केली. वृत्तपत्र स्वातंत्र्याचे पुरस्कर्तेअसल्याने त्यांच्या मुद्रित प्रकाशनावर सरकारने बंदी घातली, त्यावेळी त्यांनी सरकारी हुकूमाविरुद्ध उच्च न्यायालयाकडे तक्रार केली. न्यायालयाने त्यांची तक्रार फेटाळली, तेव्हा त्यांनी इंग्लंडच्या किया-इन-कौन्सिलकडे न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध दाद मागितली. अर्थात, तेथेही त्यांच्या अपिलास वाटाण्याच्या अक्षता लावल्या गेल्या. १८२७ च्या एका कायद्यान्वये हिंदू वा मुस्लीम ज्युरीपुडे हिंदू किंवा मुस्लीम गुन्हेगारांची कैफियत आणली जात असे, पण ख्रिश्चन गुन्हेगारांची कैफियत फक्त ख्रिश्चन ज्यूरीपुढेच मांडली जावी, असे बंधन घालण्यात आले होते. या पक्षपाती कायद्याविरुद्धही राममोहन रॉय यांचा तक्रार अर्ज न्यायालयासमोर आला होता, पण या अर्जाची गतही पूर्वीप्रमाणे, फेटाळण्यात झाली.

**ब्राह्मो समाज :**

हिंदुस्थानातील सामाजिक व धार्मिक सुधारणाची चळवळ ब्राह्मो समाजच्या स्थापनेने सुरु झाली. राजा राममोहन रॉय त्यांनी २० ऑगस्ट, १८२८ मध्ये द्वारकानाथ टागोर, कालीनाथ रॉय व मथुरानाथ मलिक या मित्रांच्या मदतीने कलकत्तामध्ये ब्राह्मो समाजाची स्थापना केली. भारतातील सामाजिक व धार्मिक सुधरणा करण्यासाठी स्थापन झालेली ती पहिलीच संस्था होती.

**ब्राह्मो समाजाचे उदेश्य :**

१. भारतीयांना त्यांच्या खऱ्या धर्मतत्त्वांची ओळख करून देणे.

२. समाजातील अनिष्ट चालीरीती, रूढी, प्रथा, परंपरा, नष्ट करणे

३. इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार करणे.

४. भारतीय समाजात आधुनिक विचार प्रस्तुत करणे .

**ब्राह्मो समाजाची तत्त्वे :**

ब्राह्मो समाजाच्या १८३० मध्ये तयार झालेल्या न्यास-पत्रात (Trust-Deed) त्यांच्या तत्त्वांचा समावेश करण्यात आला. या तत्त्वांनी समाजसुधारणेची नवी दिशा दिली.

**१. एकेश्वरवाद –** ईश्वर एकच असून तो निर्गुण, निराकार आणि सर्वव्यापी आहे. तोच या विश्वाचा निर्माता आहे.

२. **मूर्तिपूजेला विरोध –** ईश्वराचे अस्तित्व कोणत्याही मूर्तीत किंवा ठराविक वस्तूत असत नाही, म्हणून मूर्तिपूजा निरर्थक आहे.

३. **बंधुत्व –** ईश्वर हा सर्वांचा पिता असल्यामुळे संपूर्ण मानवजात बंधुभावाने वागली पाहिजे.

४. **अवतारवादास विरोध –** ईश्वर निराकार असल्याने तो कधीही साकार रूप धारण करू शकत नाही. त्यामुळे अवतारवाद ही एक भ्रामक कल्पना आहे.

५. **आत्म्याचे अमरत्व –** आत्मा अमर असून त्याच्या कृत्यांबद्दल तो केवळ ईश्वरासमोर जबाबदार असतो.

६. **प्रेम, परोपकार आणि सेवा –** समाजातील सर्व व्यक्तींनी प्रेमभाव, परोपकार आणि सेवाभावाने एकमेकांशी वागले पाहिजे.

या तत्त्वांमुळे ब्राह्मो समाजाने भारतीय धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**राजा राममोहन रॉय यांचे कार्य :**

राजा राममोहन रॉय यांच्या विचाराने व कार्याने प्रभावित होऊन हळूहळू ब्राह्मो समाजाची सदस्य संख्या वाढली. राजा राममोहन रॉय यांनी 'संवाद कौमुदी' या नियतकालिकातून ब्राह्मो समाजाच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार केला. रॉयनी या समाजाद्वारे धर्मसुधारणा चळवळीबरोबरच समाजसुधारणा चळवळ सुरू केली. स्त्री पुरुष समानतेची कल्पना मांडून स्त्रीदास्य विमोचनाचे कार्य सुरू केले.

राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथेविरुद्ध आंदोलन सुरु केल्यामुळेचे व्हॉईसरॉय लॉर्ड बेटिंग यांनी ४ डिसेंबर, १८२९ रोजी सतीबंदीचा कायदा केला. भारतीयांचे मागासलेपण दूर करण्यासाठी इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यासाठी महाविद्यालयही काढले. वेदांताच्या अभ्यासासाठी वेद्रांत कॉलेजही काढले. पाश्चात्त्य ज्ञान व भौतिकशास्त्राचे महत्त्व भारतीयांना पटविण्याचा प्रयत्न केला. वृत्तपत्रातून लिखाण करून लोकांच्यात नवजागृती घडवून आणली.

ब्रिटिशांच्या सेनेचे हिंदीकरण, कार्यकारी मंडळापासून न्यायव्यवस्था अलग, फौजदारी, दिवाणी कायदेसंहिता, कायदा करण्यापूर्वी हिंदी लोकांशी सल्लामसलत, पर्शियन, इंग्रजी ही कोर्टाची भाषा, अशा अनेक विषयांवर रॉय यांनी आपली मौलिक मते व्यक्त केली होती. त्यांच्या एका इंग्लिश चरित्रकाराने त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख करताना लिहिले आहे की, Ram Mohan Roy laid the foundation of all the principal movements for the rise of the Indians. राममोहन रॉय यांना धर्माविषयी असलेल्या शुद्ध तर्कवादी विचारांची फार मोठी किंमत मोजावी लागली. हिंदू धर्मावरील टीका आणि ख्रिश्चन व इस्लाम धर्माचे कौतुक त्यांनी केल्यामुळे सनातनी हिंदूंनी त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार घातला होता, त्यात त्यांची माताही सामील होती. त्यांना लोकांनी पाखंडी व जातिबहिष्कृत ठरविले. राजाराममोहन रॉय यांना धर्माविषयी असलेल्या शुद्ध तर्कवादी विचारांची म ार मोठी किंमत मोजावी लागली.

त्यांनी द्वारकानाथ टागोर, कालीनाथ मुंशी व स्वतःचा मुलगा राधाप्रसाद यांना ब्राह्मो समाजाचे विश्वस्त नेमले. राजा राममोहन रॉय मुघल बादशाहाचे वकील म्हणून१८३० मध्ये इंग्लंडला गेले. इंग्लंडचा राजा चौथा

विल्यम  याने त्यांना 'राजा' हा किताब बहाल केला. लंडनमधील विद्वांनमध्ये त्यांचे चांगले स्वागत झाले होते. त्यांचा मृत्यू २७ सप्टेंबर, १८३३ मध्ये झाला.

**देवेंद्रनाथ टागोर :**

राजा राममोहन रॉय यांच्या मृत्यूनंतर ब्राह्मो समाजाला नवजीवन देण्याचे कार्य देवेंद्रनाथ टागोर ( १८१८-१९०५) यांनी केले. देवेंद्रनाथ टागोर यांनी १८३८ मध्ये ब्राह्मो समाजात प्रवेश करून अनुयायाना मूर्तीपूजा, तिर्थयात्रा, कर्मकांड, प्रायश्चित्त घेणे इ. करण्यापासून रोखले. १८३९ मध्ये देवेंद्रनाथांनी 'तत्त्वबोधिनी सभा' नावाची संस्था स्थापन केली. धार्मिक शिक्षणासाठी एक ब्राह्मो विद्यालयही काढले. ते ब्राह्मो समाजाला हिंदू धर्मातील सुधारणा चळवळ मानीत असत. हिंदू धर्मावर टीका करणाऱ्या आणि हिंदूंचे धर्मांतर घडवून आणणाऱ्या ख्रिश्चन धर्मप्रचारकांना विरोध करीत होते. यांच्या नेतृत्वाखाली अनेक शहरात ब्राह्मो समाजच्या शाखा निघून समाजाचा संदेश दूर पर्यंत जाऊ लागला.

**केशवचंद्र सेन :**

केशवचंद्र सेन यांनी १८५७ मध्ये ब्राह्मो समाजात प्रवेश केला. यांना देवेंद्रनाथ टागोरानी  ब्राह्मो समाजाचे प्रमुख आचार्य म्हणून १८६२ मध्ये नियुक्त केले . त्यांच्या उदारमतवादी विचारामुळे व वक्तृत्वामुळे ब्राह्मो समाज लोकप्रिय बनला. त्याचा प्रसार बंगालच्या ब्राहेर उत्तर प्रदेश, पंजाब व मुद्रास प्रांतांतही झाला.

**भारतीय ब्राह्मो समाज :**

त्यांनी आंतरजातीय विवाहाचा व विधवा विवाहाचा पुरस्कार केला. ते हिंदू धर्माला संकुचित समजत. त्यांच्या सभेत सर्व धर्मांच्या ग्रंथांचे वाचन होत असे. त्यामुळे देवेंद्रनाथ व केशवचंद्र यांच्यात मतभेद होऊन १८६५ मध्ये त्यांना आचार्य पदावरून मुक्त करण्यात आले. तेव्हा केशवचंद्र यांनी ब्राह्मो समाजातून बाहेर पडून १८६६ मध्ये 'भारतीय ब्राह्मो समाजा'ची स्थापना केली. केशवचंद्र सेन यांच्या भारतीय ब्राह्मो समाजाचा प्रसार वेगाने झाला.केशवचंद्र सेननी स्त्रीशिक्षण, कामगारशिक्षण, स्वस्त दरात वाङमयनिर्मिती, नशाबंदी, दानधर्म व समाजकल्याण या क्षेत्रांत भरीव कामगिरी केली. ते कोणत्याच धर्माचे समर्थक नव्हते. सर्व धर्माबद्दल त्यांना आस्था होती. केशवचंद्र सेन त्यांच्या प्रयत्नामुळेच १८७२ साली सरकारने सिव्हिल मॅरेज ॲक्ट पास करून वधूवरांचे किमान वय १४ व १८ वर्षेकेले.

**आदि ब्राह्मो समाज :**

देवेंद्रनाथांच्या नेतृत्वाखालील समाज आदि ब्राह्मो समाज या नावाने चालू राहिला. पण तो समाज अनिष्ट प्रथांना पाठिंबा देणारा असल्याने मागे पडला,

**साधारण ब्राह्मो समाज :**

इ. स. १८७८ मध्ये  केशवचंद्र सेन यांच्या भारतीय ब्राह्मो समाजत पुन्हा फूट पडली. तरुण अनुयायांना सेन यांचा विचार मवाळ वाटू लागले.त्यांनी केशवचंद्र सेन यांची काही तत्वे अमान्य केली. विशेषतः स्त्री-पुरुषांचे सहवास्तव्य योग्य नाही, पडदा पद्धती अंशतः हटवावी; पूर्णतः नव्हे. हे केशवचंद्रांचे विचार तरुणांना पटेनात. त्यातच सेन यांनी १८७८ साली आपल्या १३ वर्षांच्या मुलीचा १६ वर्षांच्या कूपबिहारच्या राजपुत्राबरोबर

वैदिक पद्धतीने विवाह केला व आपणच सिव्हिल मॅरेज ॲक्टचा भंग केला. त्यामुळे शिवनाथ शास्त्री, आनंद मोहन बोस, शिवचंद्र दत्त, उमेशचंद्र दत्त यांसारख्या जहाल तरुणांनी भारतीय ब्राह्मो समाजातून बाहेर पडून १८७८ मध्ये 'साधारण ब्राह्मो समाजा'ची स्थापना केली.

**ब्राह्मो समाजाचे कार्य :**

ब्राह्मो समाजाने धर्मसुधारणा, समाजसुधारणा व शिक्षणप्रसार अशा विविध क्षेत्रांत कार्य केले आहे.

**धार्मिक सुधारणा :** १९ व्या शतकात हिंदू समाज धार्मिक विधी आणि कर्मकांडांमध्ये अडकलेला होता, त्यामुळे खरा हिंदू धर्म दुर्लक्षित झाला होता. या परिस्थितीचा म ायदा घेत ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आपल्या धर्मप्रचारासाठी संधी साधली. या पार्श्वभूमीवर ब्राह्मो समाजाने हिंदू धर्म आणि समाजसुधारणेची जबाबदारी स्वीकारली. त्यांनी वेद आणि उपनिषदांच्या आधारे हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व समाजाला पटवून दिले.

**सामाजिक सुधारणा :** ब्राह्मो समाजाने सती प्रथा, बालविवाह, बहुपत्नीकत्व, पडदा पद्धती या सर्व प्रथांना विरोध केला. या समाजाने ब्रिटिश सरकारकडून सतीबंदी कायदा व सिव्हिल मॅरेज ॲक्ट पास करून गेतले. ब्राह्मो समाजाने स्त्री उद्धाराचे कार्य केले.

**शिक्षण प्रसार :** ब्राह्मो समाजाने शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी ठिकठिकाणी शाळा आणि महाविद्यालये स्थापन केली, ज्यामुळे अनेकांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. त्यांनी वृत्तपत्रे आणि मासिके सुरू करून जनजागृती घडवून आणली. राजा राममोहन रॉय यांनी विविध ग्रंथ लिहून पारंपरिक शिक्षणापेक्षा भौतिक शास्त्र आणि आधुनिक ज्ञानावर भर दिला.

या समाजाने धार्मिक, सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रांत अनेक विचारवंत घडवले. देवेंद्रनाथ टागोर, केशवचंद्र सेन, अक्षयकुमार दत्त, ईश्वरचंद्र विद्यासागर, ईश्वरचंद्र गुप्त, बिपिनचंद्र पाल, सी. आर. दास, रवींद्रनाथ टागोर, आनंदमोहन दास आणि सुरेंद्रनाथ बॅनर्जी या महान नेत्यांनी विविध क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान दिले.

ब्राह्मो समाजाने भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींना व देशाच्या आधुनिकीकरणाला म ार मोठे योगदान दिले. प्राचीन भारतीय संस्कृतीचे गुणगान गाईले. भारतीयांच्या मनात स्वधर्माबद्दल आत्मविश्वास जागृत केला. भारतीयांच्यात बौद्धिक जागृती घडवून आणली. ब्राह्मो समाजाने सामाजिक, धार्मिक, व शैक्षणिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रांत भरीव कार्य केल्यामुळे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीची वैचारिक पार्श्वभूमी तयार झाली.

भारताच्या प्रबोधनकार्यात ब्राह्मो समाजाने महत्वाची भूमिका पार पाडली. एच. सी. ई. झाकोरीयाज म्हणतात आधुनीक भारताला घडविणाऱ्या सर्व प्रकारच्या सुधारणाचळवळीचा- (त्या चळवळी हिंदू धर्म, समाज, राजकाराण कशाशीही संबधित असोतो -) प्रारंभबिंदू म्हणजे राजाराममोहन रॉय व त्याचा ब्राह्मो समाज होता. ब्राह्मो समाजाच्या सुधारणावादी विचारांचा हिंदुवर प्रभाव पडला. ब्राह्मो समाजाने स्त्रीयांना प्रतिष्ठा मिळण्यासाठी प्रयत्न केले. बहुपत्नीत्त्व, सतीप्रथा, बालविवाह, पडदा पद्धती यांना विरोध केला व स्त्री शिक्षण आणि विधवा विवाहाला चालना दिली. जातिवाद व अस्पृश्यतेला समाजाचा पूर्ण विरोध होता.

ब्राह्मो समाजाने हिंदु समाजात जी जागृती केली, त्यामुळे हिंदू धर्मियांचा पाशचात्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण अमुलाग्र बदलून गेला. आजही ब्राह्मो समाजाचा शाखा काही ठिकाणी अस्तित्वात आहेत.

**स्वयं अध्ययन प्रश्न – १ :**

१. ............ यांना भारतीय प्रबोधनाचे अग्रदूत म्हटले जाते.

अ) राजा राम मोहन रॉय  ब) केशवचंद्रसेन

क) रामकृष्ण परमहंस  ड ) स्वामी विवेकानंद

२. राजा राम मोहन रॉय यांनी ............ मध्ये आत्मीय सभा स्थापन केली.

अ) १८१४  ब) १८१५

क) १८१७  ड) १८१८

३. ................ या नियतकालिकातून ब्राह्मो समाजाच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार करण्यात आला.

अ) संवाद कौमुदी  ब) सत्यार्थ प्रकाश

क) प्रभाकर  ड) दर्पण

४. देवेंद्र नाथांनी .............. नावाची संस्था स्थापन करून ब्राह्मो समाजाचा खेड्यापाड्यात प्रसार केला.

अ) आत्मीय सभा  ब) तत्वबोधिनीसभा

क) युनिटरियन कमिटी  ड) सत्यशोधक समाज

५. ............ यांनी भारतीय ब्राह्मो समाजाची स्थापना केली.

अ) शिवचंद्र दत्त  ब) देवेंद्रनाथ टागोर

क) केशव चंद्रसेन  ड) राजा राम मोहन रॉय

## २.२.२ स्वामी दयानंद सरस्वती आणि आर्य समाज :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक सुधारणा चळवळीत आर्य समाजाने महत्त्वाची भूमिका बजावली. हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा दूर करण्यावर त्यांनी भर दिला, तसेच प्राचीन भारतीय संस्कृतीतील मानवी मूल्यांचे महत्त्व स्पष्ट करून त्याचे तत्त्वज्ञान लोकांसमोर मांडले. स्वामी दयानंद सरस्वती आणि त्यांच्या आर्य समाजाने हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन घडवून आणले. अनिष्ट प्रथांना विरोध करत असताना, त्यांनी हिंदू संस्कृतीची महानता जगासमोर अधोरेखित केली. वैदिक धर्म आणि संस्कृतीच्या पुनरुज्जीवनासोबतच, हिंदूंमध्ये धर्माभिमान जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य आर्य समाजाने केले.

**स्वामी दयानंद सरस्वती :**

आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांचा जन्म १८२४ मध्ये गुजरातच्या मोरबी संस्थानातील टंकारा गावात झाला. त्यांचे मूळ नाव मूळशंकर होते. ते सामवेदी ब्राह्मण कुटुंबात जन्मले, जिथे

धार्मिक विधींना महत्त्व होते. त्यांच्या वडिलांनी त्यांच्यावर धार्मिक संस्कार केले, त्यामुळे त्यांना लहानपणापासून धर्म आणि संस्कृतीचे शिक्षण मिळाले.

त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा प्रसंग त्यांच्या चौदाव्या वर्षी महाशिवरात्रीच्या दिवशी घडला. त्या रात्री त्यांनी आपल्या वडिलांसोबत मंदिरात जाऊन शिवपूजा केली. पूजेच्या वेळी त्यांनी पाहिले की, महादेवाच्या पिंडीवर उंदीर फिरत आहेत आणि नैवेद्य खात आहेत. हे दृश्य पाहून त्यांच्या मनात मूर्तीपूजेबद्दल शंका निर्माण झाली. त्यांना वाटू लागले की मूर्ती म्हणजे परमेश्वर असू शकत नाही. त्यांनी वडिलांना विचारले, परंतु समाधानकारक उत्तर मिळाले नाही. त्यामुळे त्यांच्या मनात धर्माविषयी जिज्ञासा वाढली. सत्य परमेश्वर समजून घेण्याची तीव्र इच्छा त्यांच्यात निर्माण झाली आणि धर्मातील भ्रष्टाचार दूर करण्याची प्रेरणा मिळाली.

१८४५ मध्ये त्यांच्या विवाहाची चर्चा सुरू झाली. मात्र, विवाहाच्या बंधनात अडकल्यास सत्याचा शोध घेता येणार नाही, या विचाराने त्यांनी घर सोडले. १८६० पर्यंत त्यांनी भारतभर भ्रमंती केली आणि ज्ञान व सत्याचा शोध घेतला. योग्य गुरूच्या शोधात ते अरवली पर्वत, हिमालय आणि विविध स्थळी भटकले. अखेर मथुरेत त्यांना थोर पंडित स्वामी विरजानंद सरस्वती यांचे शिष्यत्व मिळाले. तिथे त्यांनी हिंदू धर्म आणि तत्त्वज्ञानाचे सखोल अध्ययन केले, तसेच पाणिनी आणि पतंजलीच्या ग्रंथांचा अभ्यास केला. सरस्वती संप्रदायामध्ये संन्यास ग्रहण करून त्यांनी दयानंद सरस्वती हे नाव स्वीकारले.त्यांनी वेद व योगाचा सखोल अभ्यास केला. तेव्हा त्यांना वैदिक धर्माची थोरवी कळली.

**आर्य समाज :**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी सुरुवातीला ब्राह्मोसामाजाच्या सहकार्याने धर्मसुधारानेचे कार्य केले.आर्य समाजाची स्थापना स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल १८७५ रोजी मुंबई मध्ये केली.

**आर्य समाजाचे उदेश्य :**

१. शुद्ध वैदिक तत्त्वावर हिंदू धर्म व हिंदू समाज यांची पुनर्रचना करणे.

२. बहुदेवतावाद, कर्मकांड, जातिभेद, अस्पृश्यता, मूर्तिपूजा इत्यादी अनिष्ट प्रथांचे उच्चाटन करणे.

३. समतेवर आधारलेली वेदकालीन समाजव्यवस्था पुन्हा प्रस्थापित करणे.

४. ख्रिश्चन व मुस्लीम यांच्या धर्मप्रसाराला प्रतिबंध करणे.

स्वामी दयानंद सरस्वती यांनी अशा भूमिकेतून आर्य समाजाची स्थापना केली व समाजाचे प्रचार कार्य सुरू केले. पुढे त्यांनी २४ जून, १८८७ रोजी लाहोर (पंजाब) येथे आर्य समाजाची शाखा काढली. पुढे लाहोर हेच आर्य समाजाचे प्रमुख केंद्र बनले. त्यांनी वेदांना प्रमाणभूत मानले. भारतभर फिरून त्यांनी आर्य समाजाचा प्रसार केला.

आर्य समाजाची स्थापना केल्यानंतर दयानंद सरस्वतींनी आपल्या आयुष्याची २ वर्षे आर्य समाजाचे तत्त्वज्ञान व विचार यांचा प्रचार करणे व आर्य समाज अनुयाया करणे. यात व्यतीत केली. त्यांनी वेदांचे भाषांतर

केले. तसेच आर्य समाजाचे तत्त्वज्ञान करणारे ‘सत्यार्थ प्रकाश’, ‘वेदभाष्य भूमिका’ आणि ऋग्वेद व यजुर्वेद यांवरील समालोचन असलेले ‘वेदभाष्य’ हे ग्रंथ लिहिले. आर्य समाजाचे त्यांचे कार्य पंजाब, गुजरात व राजस्थान या राज्यांत खूपच यशस्वी ठरले.

‘वेदाकडे चला’ (Go back to the Vedas) ही आर्य समाजाची मुख्य शिकवण होती. वेद अपौरुषेय आहेत, सर्व ज्ञानाचा उगम वेदांतून झाला आहे, वेदांवर पूर्ण श्रद्धा ठेवली पाहिजे, वेद हेच हिंदूंचे खरे धर्मग्रंथ आहेत व वेदकालीन समाजव्यवस्था ही आदर्श समाजव्यवस्था अशी आर्य समाजाची विचारसरणी होती. आचार्य जावडेकर आर्य समाजाच्या तत्त्वज्ञानाबद्दल म्हणतात, ‘परमेश्वराच्या शुद्ध स्वरूपाचे ज्ञान वेदात असून वेदाचे अध्ययन करणे हे प्रत्येक हिंदुमात्राचे कर्तव्य आहे.’ स्वामी दयानंद सरस्वतींनी बालविवाहास विरोध करून स्त्री-शिक्षण व विधवा विवाहास उत्तेजन दिले. वैदिक धर्माचे दरवाजे सर्व धर्मियांना खुले असावेत यासाठी त्यांनी शुद्धीकरण चळवळ हाती घेतली होती.

त्यांनी भारतात अनेक ठिकाणी आर्य समाजाच्या शाखा काढल्या. त्यांना अनेक त्यागी व एकनिष्ठ अनुयायी मिळाले. त्यामुळे भारताप्रमाणे विदेशातही समाजाच्या कार्याचा प्रसार झाला. लाला हंसराज, लाला लजपतराय, पंडित गुरुदत्त, स्वामी श्रद्धानंद यांसारखे शिष्य त्यांना मिळाले. त्यांनी समाजाच्या पंजाब, काश्मीर व वायव्य प्रांतांतही अनेक शाखा काँढल्या. स्वामी दयानंदांनी आपल्या आयुष्याची शेवटची दोन वर्षे राजस्थानात आर्य समाजाच्या प्रसारासाठी घालविली. हे कार्य करीत असताना ३० ऑक्टोबर, १८८३ मध्ये अजमेर येथे त्यांचे निधन झाले. स्वामी दयानंद सरस्वती यांनी धार्मिक व सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले.

**आर्य समाजाची तत्त्वे :**

आर्य समाजाने वैदिक तत्त्वज्ञान आणि आधुनिक बुद्धिवादी विचार यांची सांगड घालून आपले तत्त्वज्ञान विकसित केले. त्यानुसार, ईश्वर निर्गुण, निराकार आणि शुद्ध स्वरूपाचा आहे, याचे ज्ञान वेदांमध्ये आहे, त्यामुळे प्रत्येकाने वेदांचा अभ्यास केला पाहिजे. समाजरचनेसाठी आर्य समाजाने वर्णपद्धतीचा पुरस्कार केला, मात्र ही पद्धत जन्मावर नव्हे तर कर्मावर आधारित असावी, असे त्यांनी प्रतिपादन केले. तसेच, सर्व जाती-धर्माच्या लोकांना आर्य समाजात प्रवेशाची संधी उपलब्ध होती. त्यांच्या मते, आर्यांव्रत हा आर्यांचा देश आहे आणि हिंदू धर्माचा जगभर प्रचार केल्यास संपूर्ण मानवतेचा उद्धार होईल. या विचारसरणीवरच आर्य समाजाचे तत्त्वज्ञान आधारलेले आहे.

आर्य समाजाचे सिद्धांत आणि नियम सर्वप्रथम मुंबई येथे तयार करण्यात आले. नंतर, १८७७ मध्ये लाहोर येथे त्यामध्ये आवश्यक सुधारणा करून त्यांना निश्चित स्वरूप देण्यात आले. त्यानंतर आजपर्यंत त्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

आर्य समाजाची प्रमुख तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत -

१. वेदग्रंथांना अंतिम प्रमाण मानणे.

२. सर्व ज्ञानाचा उगम व सर्व वस्तूंचे आदिकरण ईश्वर आहे. ईश्वर सच्चिदानंद असून तो अनादी, अनंत, निराकार, सर्वसाक्षी, कनवाळू, सर्वशक्तिमान, अमर व पवित्र आहे. तो सर्वव्यापी असून सृष्टीचा निर्माता, आहे.

३. वेद हे ईश्वरनिर्मित आहेत. सर्व यथार्थ ज्ञानाचा उमग वेदांतच असल्याने वेदांचे अध्ययन करणे व करविणे, हे प्रत्येक आर्याचे कर्तव्य आहे.

४. सत्य स्वीकारण्यास आणि असत्याचा त्याग करण्यास नेहमी तयार राहावे.

५. प्रत्येकाने एकमेकांशी प्रेमाने आणि न्यायाने वागावे.

६. समाजाची प्रगती घडवून जगाचे कल्याण करणे हा समाजाचा मुख्य उद्देश असावा.

७. सर्वांशी धर्मानुसार प्रेमाने आणि योग्यरीत्या व्यवहार करावा.

८. अज्ञानाचा नाश करून ज्ञानाचा प्रकाश पसरवावा.

९. केवळ वैयक्तिक हित न पाहता, सर्वांच्या कल्याणातच आपले कल्याण मानावे.

१०. व्यक्तिगत प्रगतीपेक्षा मानवजातीचे कल्याण अधिक श्रेष्ठ मानावे.

**आर्य समाजाचे कार्य :**

आर्य समाजाने सामाजिक-धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे.

**धार्मिक सुधारणा :**

आर्य समाजाने हिंदू धर्मात महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणल्या आणि वेदांना प्रमाण मानून आपले तत्त्वज्ञान मांडले. त्यांनी मूर्तिपूजा, अवतारवाद, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये आणि पौराणिक अनुष्ठानांना नाकारले तसेच श्राद्धे बंद करण्यावर भर दिला. राम आणि कृष्ण हे ईश्वरी अवतार नसून महान व्यक्तिमत्त्वाचे आदर्श मानव असल्याचे प्रतिपादन केले.आर्य समाजाच्या मते, सत्कर्म हाच खरा धर्माचा आधार असून सदाचार, परोपकार, सेवा आणि दया ही धर्माचरणाची मूलभूत तत्त्वे आहेत. त्यांनी स्त्री-पुरुष समानता आणि शूद्रांसह सर्वांना वेदाध्ययनाचा अधिकार असल्याचे ठामपणे मांडले.

**शुदीकरण चळवळ :**

आर्य समाजाने शुद्धीकरण चळवळीच्या माध्यमातून हिंदू धर्मात परत येण्याचे कार्य हाती घेतले. ख्रिस्ती व मुस्लीम धर्मात गेलेल्या हिंदूंना पुनःस्वधर्मात सामावून घेण्याचा हा प्रयत्न क्रांतिकारक ठरला. हिंदू धर्माच्या कठोर रूढींमुळे धर्मांतरित झालेल्या व्यक्तींना परत हिंदू धर्मात येण्यास पारंपरिक सनातनी वर्गाचा विरोध होता. मात्र, आर्य समाजाने या विरोधाला न जुमानता धर्मपरिवर्तन झालेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात स्थान दिले आणि एक नवीन परंपरेची सुरुवात केली.

१८२१ मध्ये मुलबार येथे मोठ्या संख्येने हिंदूंना सक्तीने मुस्लीम धर्मात धर्मांतरित करण्यात आले होते. आर्य समाजाने पुढाकार घेत या परिस्थितीला आव्हान दिले आणि सुमारे अडीच हजार धर्मांतरित हिंदूंना पुन्हा हिंदू धर्मात सामावून घेतले. राजस्थान व हैदराबादमध्येही अशाच प्रकारे शुद्धीकरणाची मोहीम राबवण्यात आली. पंजाबमध्ये स्वामी श्रद्धानंद यांनी हे कार्य पुढे नेले. त्यांच्या प्रयत्नांमुळे हिंदू धर्मातील घटत्या संख्येला आळा बसला. एकंदरीत, हिंदू धर्माला शुद्ध आणि सशक्त स्वरूप देण्याच्या दिशेने आर्य समाजाने महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**सामाजिक सुधारणा :**

आर्य समाजाने जातिव्यवस्था, जातिभेद आणि अस्पृश्यतेला कट्टर विरोध केला. त्यांनी वर्णव्यवस्थेचा स्वीकार केला असला, तरी वर्ण हा जन्मावर नव्हे, तर गुण आणि कर्मावर आधारित असावा, असा ठाम विचार मांडला. स्वामी दयानंद हे पहिले समाजसुधारक होते, ज्यांनी शूद्र आणि स्त्रियांना वेदाध्ययन आणि उच्च शिक्षणाचा अधिकार असल्याचे प्रतिपादन केले आणि त्यासाठी सक्रिय चळवळ उभारली. त्यांनी मुलगा आणि मुलगी यांना समान दर्जा दिला.

आर्य समाजाने बालविवाह, कायमचे वैधव्य, विधवांचा तिरस्कार, पडदापद्धती, हुंडापद्धती, बहुपत्नी विवाह आणि देवदासी प्रथांसारख्या समाजातील अन्यायकारक प्रथांवर कठोर प्रहार केला. तसेच, आंतरजातीय विवाहांना पाठिंबा दिला आणि सामाजिक समतेचा पुरस्कार केला.

अस्पृश्यता नाकारत आर्य समाजाने जगात कोणीही अस्पृश्य नाही, असे ठामपणे घोषित केले. अस्पृश्यांना वेदाभ्यास आणि शिक्षणाचा अधिकार आहे, असे सांगत त्यांनी जातीयतेच्या संकुचित विचारसरणीला विरोध करून समाजात समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

**शैक्षणिक कार्य :**

आर्य समाजाने शिक्षण प्रसाराच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी देशभर अनेक शैक्षणिक संस्था स्थापन करून ज्ञानदानाचे कार्य सुरू केले. लाला हंसराज यांनी लाहोर येथे दयानंद अँग्लो वैदिक स्कूल ही संस्था स्थापन केली, जी पुढे महाविद्यालयात रूपांतरित झाली. या ठिकाणी इंग्रजी शिक्षणासोबतच वैदिक धर्माचे शिक्षणही दिले जात होते.

श्रद्धानंद यांनी गुरुकुल पद्धतीचे शिक्षण देणारी गुरुकुल योजना सुरू केली. येथे शिक्षण हिंदी माध्यमातून दिले जात असे, तसेच नैतिक शिक्षणालाही विशेष महत्त्व देण्यात आले. आर्य समाजाने महाराष्ट्रातही शैक्षणिक आणि सामाजिक सुधारणा चळवळींना चालना दिली. कोल्हापूर, सोलापूर आणि मुंबई येथे या समाजाच्या वतीने शैक्षणिक कार्य करण्यात आले. आजही सोलापुरातील दयानंद कॉलेज शिक्षण क्षेत्रात आपले योगदान देत आहे.

राजकीय नेतृत्व घडवण्यासाठी लाला लजपत राय यांनी टिळक स्कूल ऑफ पॉलिटिक्स ही संस्था सुरू केली, ज्यामुळे राष्ट्रवादी विचारसरणीचे कार्यकर्ते तयार होऊ लागले.

**राष्ट्रभक्तीचा प्रसार :**

आर्य समाजाने भारतीय लोकांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना जागृत करण्यास मोठे योगदान दिले. स्वामी दयानंदांच्या विचारांमुळे हिंदी समाजात देशप्रेमाची जाणीव वाढीस लागली. त्यांनी स्वदेशीला महत्त्व देत स्वराज्याची संकल्पना स्पष्ट केली. त्यांच्या मते, जरी अपूर्ण असले तरीही स्वराज्य हे परकीय सत्तेच्या सर्वोत्तम व्यवस्थेपेक्षा अधिक श्रेष्ठ आहे.

स्वामी दयानंदांचे विचार त्यांच्या अनुयायांमध्ये स्वदेशी आणि राष्ट्रभक्तीची ज्वलंत भावना निर्माण करणारे

ठरले. त्यामुळेच लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद आणि बिपिनचंद्र पाल यांसारखे तेजस्वी देशभक्त पुढे आले. त्यांच्या प्रभावामुळे आर्य समाज केवळ धार्मिक सुधारणांपुरता मर्यादित न राहता स्वातंत्र्यलढ्यातही सक्रिय झाला.याच कारणास्तव वेलेंटाईन चिरोल यांनी आर्य समाजाला भारतीय असंतोषाचा जनक असे संबोधले, कारण हा समाज ब्रिटिश सत्तेविरोधात राष्ट्रवादी भावना जागृत करणाऱ्या संघटनांपैकी एक होता.

आर्य समाजाने आपल्या वैभवशाली भूतकाळाबद्दल लोकांत अभिमान जागृत केला व पाशचात्य शिक्षनाच्या प्रसारासाठी अखंड परिश्रम केले. आर्य समाजाने त्यासाठी सर्व देशभर डी. ए. व्ही. (Dayanand -nglo-Vedic -D-V) शिक्षण संस्थांचे जाळे उभारले. राष्ट्रभक्तीची भावना जागृत करण्यासाठी आर्य समाजानेन केलेले कार्य प्रशंसनीय आहे. ' शुद्धी' चळवळ हाती घेऊन धर्मांतर करून परधर्मात गेलेल्यांना परत हिंदू धर्मात आणण्याचे महत्कार्य आर्य समाजाने केले. स्वामी दयानंद सरस्वतींनी आर्य समाजाला पारदर्शी लोकशाही कार्यपद्धती घालून दिल्यामुळे आर्य समाजाचे कार्य अखंड चालत राहिले.

**स्वयं अध्ययन प्रश्न – २ :**

१. स्वामी दयानंद सरस्वती यांनी ............... या ठिकाणी १८७५ मध्ये आर्य समाजाची स्थापना केली.

अ) पंजाब ब) पुणे

क) लाहोर ड) मुंबई

२. स्वामी दयानंद सरस्वती यांचे मूळ नाव ............... असे होते.

अ) नरेंद्रनाथ ब) गदाधर

क) मूळशंकर ड) रामकृष्ण

३. स्वामी दयानंद सरस्वती यांनी ............... यांचे शिष्यत्व स्वीकारले.

अ) स्वामी विरजानंद सरस्वती ब) गदाधर चट्टोपाध्याय

क) नरेंद्रनाथ ड) रामकृष्ण परमहंस

४. स्वामी दयानंद यांनी आर्य समाजाच्या प्रसारासाठी ............... हा ग्रंथ लिहिला आहे.

अ) सत्यार्थ प्रकाश ब) संवाद कौमुदी

क) प्रभाकर ड) मूकनायक

५. आर्य समाजाचे प्रमुख केंद्र ............... आहे.

अ) लाहोर ब) पुणे

क) मुंबई ड) नासिक

### २.२.३ स्वामी विवेकानंद आणि रामकृष्ण मिशन :

भारतीय समाजाच्या पुनरुज्जीवनासाठी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात स्थापन झालेल्या संस्थांमध्ये

रामकृष्ण मिशन महत्त्वपूर्ण ठरली. ही संस्था प्राचीन भारतीय धर्मतत्त्वांपासून प्रेरणा घेऊन कार्यरत होती. रामकृष्ण परमहंस हे या संस्थेच्या सदस्यांचे आध्यात्मिक प्रेरणास्थान होते. त्यांचे जीवन, विचार आणि कार्य हेच रामकृष्ण मिशनच्या तत्त्वज्ञानाचा आधार होते.

स्वामी विवेकानंदांनी १८९७ मध्ये आपल्या गुरु रामकृष्ण परमहंस यांच्या नावाने रामकृष्ण मिशन ची स्थापना केली. या मिशनचे मुख्य केंद्र म्हणून कोलकाता जवळील बेलूर मठ निवडण्यात आले. आजही या केंद्रामार्मत संपूर्ण जगभर या संस्थेचे प्रचार व समाजसेवेचे कार्य सुरू आहे.

**रामकृष्ण परमहंस :**

रामकृष्ण परमहंस यांचा जन्म १८ फेब्रुवारी १८३६ रोजी बंगाल प्रांतातील हुगळी जिल्ह्यातील कामारपुकुर या छोट्या खेड्यात एका गरीब ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे घराणे धार्मिक आणि सनातनी वृत्तीचे होते. त्यांचे मूळ नाव गदाधर चट्टोपाध्याय होते. लहानपणापासूनच त्यांना ईश्वरभक्तीची प्रबळ ओढ होती.

१८५३ साली ते आपल्या बंधू रामकुमार यांच्यासोबत कोलकात्याला आले. तेथे दक्षिणेश्वर कालीमंदिरात त्यांनी योगसाधना केली आणि तन-मन एकाग्र करून कालीमातेच्या भक्तीत तल्लीन झाले. याच काळात त्यांची मंदिराच्या पुजारी म्हणून नियुक्ती झाली. त्यांच्या भक्तीमुळे कालीमाता प्रसन्न झाल्याचा अनुभव त्यांनी घेतला.यानंतर, शंकराचार्यांचे अनुयायी तोतापुरी यांनी त्यांना संन्यास घेण्यास प्रवृत्त केले आणि त्यांचे रामकृष्ण असे नामकरण केले. याच नावाने पुढे ते प्रसिद्ध झाले. रामकृष्णांनी विविध धर्मीयांशी संवाद साधून त्यांच्या धार्मिक तत्त्वांचा अभ्यास केला, वेगवेगळ्या संप्रदायांचा सखोल अभ्यास केला आणि योगसाधनेच्या माध्यमातून नैतिक व आध्यात्मिक सामर्थ्य वाढवले.

त्यांनी सर्व धर्म सत्य असून ते परमेश्वराकडे नेणारे मार्ग आहेत, असा विचार मांडला. आत्मिक उन्नतीसाठी परमेश्वराची मूर्तीस्वरूपात पूजा करणे त्यांना मान्य होते, मात्र कर्मकांडांना त्यांनी विरोध केला. तसेच, जातीसंस्था आणि अस्पृश्यतेविरोधात त्यांनी ठाम भूमिका घेतली.

**रामकृष्ण परमहंसचे तत्वज्ञान :**

रामकृष्ण परमहंस यांनी आपले तत्त्वज्ञान साध्या आणि सरळ भाषेत समाजासमोर मांडले, ज्यामुळे त्यांच्या विचारांचा दूरवर प्रसार झाला.

१ सर्व धर्म सत्य असून ते परमेश्वराकडे नेतात.

२. आत्मिक उन्नतीसाठी सर्वशक्तिमान परमेश्वराची मूर्तिस्वरूपात पूजा करणे.

३. कर्मकांडाला विरोध करून श्रेष्ठतेला ते महत्त्व देणे.

४. ज्ञानापेक्षा शुद्ध चारित्र्य श्रेष्ठ आहे.

५. संसारात रहा पण सत्कार्य करा.

६. इच्छांवर लगाम ठेवून त्या ईश्वरप्राप्तीकडे वळवा.

७. मनुष्यमात्राची सेवां व कल्याण हाच खरा धर्म मानला.

८. मनुष्याने सत्कार्य करावे.

रामकृष्णांनी आपल्या अनुयायांशी केलेली संभाषणे महेंद्रनाथ गुप्ता या त्यांच्या एका अनुयायाने लिहून ठेवली आहेत. रामकृष्ण परमहंस यांनी हिंदू धर्मातील मौल्यवान तत्त्वज्ञान लोकांना समजावून सांगितले. त्यांच्या मते, मनुष्याचे अंतिम ध्येय परमेश्वरप्राप्ती असावे, आणि ही प्राप्ती अध्यात्ममार्गानेच शक्य आहे. विवेक आणि वैराग्य शिवाय अध्यात्मिक प्रगती साध्य होऊ शकत नाही. त्यांचे तत्त्वज्ञान पूर्णतः अध्यात्मवादी होते. ते वेद आणि उपनिषदांवरील श्रद्धा आणि विश्वास आवश्यक मानत. त्यांच्या मते, मानवधर्माचे सर्वश्रेष्ठ तत्त्व म्हणजे परमेश्वराचे चिंतन होय. हाच विचार पुढे स्वामी विवेकानंदांनी संपूर्ण जगभर प्रचारित केला. रामकृष्णांचा विवाह शारदा मणी यांच्याशी झाला होता. त्यांनी आपल्या पत्नीला देवीच्या स्वरूपात पाहिले. त्यांच्या शिकवणीनुसार, प्रत्येक पुरुषाने परस्त्रीकडे मातेसमान पाहावे आणि तिचा सन्मान करावा. त्यांच्या या विचारांचे त्यांच्या प्रमुख शिष्य स्वामी विवेकानंदांनी जगभर प्रसार केले, ज्यामुळे रामकृष्णांचे तत्त्वज्ञान जागतिक पातळीवर पोहोचले.

**स्वामी विवेकानंद (१८६३–१९०२) :**

रामकृष्ण परमहंस यांचे प्रमुख शिष्य स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकात्याच्या सिमुलिया येथे एका श्रीमंत कायस्थ कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ विश्वनाथ दत्त असे होते. त्यांनी ख्रिश्चन कॉलेज, कोलकाता येथून पदवी मिळवली. त्यांचे वडील हायकोर्टातील नामांकित वकील होते. शिक्षण घेत असताना त्यांनी जॉन स्टुअर्ट मिल, हर्बर्ट स्पेन्सर, ह्युम, हेगेल, डार्विन आणि मिल यांसारख्या तत्त्वज्ञांचे ग्रंथ अभ्यासले. तत्त्वज्ञान हा त्यांचा आवडता विषय होता. याच काळात, १८८१ मध्ये त्यांची रामकृष्ण परमहंस यांच्याशी भेट झाली. त्यांच्या सहवासामुळे विवेकानंदांच्या जीवनाला वेगळे वळण मिळाले, आणि ते रामकृष्णांचे परमशिष्य बनले. रामकृष्णांनी त्यांना मानवी जीवनात आध्यात्मिक जागृती निर्माण करणे आणि लोकांचे दुःख दूर करणे हे कार्य करण्यास प्रवृत्त केले.

रामकृष्णांच्या निधनानंतर, १८८६ साली विवेकानंदांनी त्यांच्या कार्याला पूर्णतः वाहून घेतले. त्यांनी आपल्या गुरुच्या आदेशानुसार त्यांच्या सर्व अनुयायांचे संघटन केले आणि बारा नगर येथे १८८७ मध्ये एक मठ स्थापन केला. त्यांनी स्त्री शिक्षण, बालविवाह निर्मूलन आणि शेती सुधारणा यांसारख्या सामाजिक विषयांवर काम करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना फारसा पाठिंबा मिळाला नाही.

त्यामुळे त्यांनी भारताचा पश्चिम किनारा आणि दक्षिण भागाचा प्रवास केला आणि लोकांच्या दुःखद स्थितीचा अभ्यास केला. खेत्रीच्या राजाच्या सल्ल्यानुसार त्यांनी विवेकानंद हे नाव धारण केले. या प्रवासात त्यांना भारतीय समाजातील दारिद्र्य, अस्वच्छता आणि भविष्याची उदासीनता जाणवली. भारतीयांना या संकटांतून मुक्त करण्यासाठी कोणतेही संघटन नव्हते, याची जाणीव त्यांना झाली. ते कन्याकुमारीतील खडकावर ध्यानस्थ बसले आणि भारताला दारिद्र्य, दुःख आणि अज्ञानातून मुक्त करण्याच्या उपायांवर चिंतन केले. याच वेळी त्यांनी लोकांना या परिस्थितीतून बाहेर काढण्याचा दृढ निश्चय केला.

**शिकागो जागतिक सर्वधर्म परिषद :**

शिकागो मध्ये १८९३ साली कोलंबसने अमेरिका शोधल्याच्या ४०० व्या वर्धापन दिनानिमित्त जागतिक धर्मपरिषदेचे आयोजन करण्यात आले होते. स्वामी विवेकानंद भारताची आध्यात्मिकता आणि भारतीय

समस्यांवर उपाय मांडण्यासाठी शिकागो धर्मपरिषदेत सहभागी झाले.या परिषदेच्या व्यासपीठावर त्यांनी हिंदू धर्म, भारतीय संस्कृती आणि त्याचे श्रेष्ठत्व प्रभावीपणे मांडले. त्यांच्या विचारांनी उपस्थित सर्व विद्वानांना प्रभावित केले. अमेरिका दौऱ्यात त्यांनी अनेक ठिकाणी व्याख्याने दिली.

इंग्लंडमध्ये त्यांनी मॅक्स म्युलर यांसारख्या विद्वानांवर खोल प्रभाव टाकला. भगिनी निवेदिता त्यांची प्रमुख शिष्या बनली. या दौऱ्यात त्यांनी अध्यात्माच्या प्रचारासाठी वेद-अध्ययन केंद्रे स्थापन केली आणि अनेक शिष्य तयार केले. त्यांच्या या कार्यामुळे भारतीय आध्यात्मिक विचारांचा पश्चिमी जगतात प्रभावी प्रसार झाला.

स्वामी विवेकानंद यांनी रामकृष्ण परमहंस यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी आणि हिंदूंच्या संघटनेसाठी पाश्चात्य देशांच्या संस्थांच्या धर्तीवर एक संघटना स्थापन करण्याचे ठरविले. तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि लोकसेवा यांचा संगम साधत, त्यांनी १८९७  मध्ये रामकृष्ण मिशनची स्थापना केली.

हे मिशन बेलूर, कोलकात्याच्या शेजारी मुख्य केंद्र म्हणून स्थापन करण्यात आले. पुढे मद्रास (चेन्नई), आसाम आणि इतर ठिकाणीही मठ उभारले गेले. कालांतराने, या मिशनच्या जगभर शाखा स्थापन करण्यात आल्या.

१८९९  मध्येस्वामी विवेकानंद पुन्हा युरोप आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले. रामकृष्ण मिशनचे अध्यक्ष म्हणून ते कार्यरत होते, पण प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांनी अध्यक्षपद ब्रह्मानंदांकडे सोपविले. १९०२  सालीत्यांचे निधन झाले.

**रामकृष्ण मिशन :**

स्वामी रामकृष्ण परमहंस यांनी जगासमोर अध्यात्मवादाची महत्त्वपूर्ण शिकवण मांडली. त्यांच्या मते, विकाररहित बुद्धीशिवाय धर्मशास्त्राचे ज्ञान आणि पवित्र ग्रंथांचा अभ्यास निरर्थक आहे. तसेच, विवेक व वैराग्याशिवाय आध्यात्मिक प्रगती साध्य होऊ शकत नाही.

स्वामी विवेकानंद हे रामकृष्ण परमहंस यांचे निस्सीम भक्त आणि शिष्य होते. आपल्या गुरूंच्या शिकवणीचा प्रचार करण्यासाठी आणि ती जिवंत ठेवण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. गुरूंच्या चिरंतन स्मृतीसाठी १८९७ मध्ये त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली, तर १८९९ मध्ये बेलूर मठाची स्थापना करून त्याला रामकृष्ण मिशनचे केंद्र बनवले.

आजही या मिशनच्या जगभरातील शाखांमार्मत धार्मिक आणि सामाजिक सुधारणा कार्यरत आहेत. 'वेदांताचे तत्त्व' हे या मिशनचे ध्येय असून, माणसातील आध्यात्मिक शक्ती जागृत करणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे.

**रामकृष्ण मिशनची तत्त्वे :**

रामकृष्ण मिशनची तत्त्वे खालील प्रमाणे आहेत.

**१. वेदांताचा प्रचार –** रामकृष्ण परमहंस यांनी दिलेल्या वेदांताच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार व लोकांना त्याचे सुलभ आकलन करून देणे.

**२. शिक्षणाचा समतोल दृष्टिकोन –** वेदांताबरोबरच आधुनिक विज्ञान व भौतिकशास्त्राच्या शिक्षणालाही महत्त्व देणे.

**३. सर्वधर्मसमभाव –** सर्व धर्म समान असून, त्यांचा तौलनिक अभ्यास करून बंधुभाव वाढवणे व धार्मिक ऐक्य प्रस्थापित करणे. सर्व धर्म सत्य असून ते परमेश्वराकडे नेणारे आहेत, हा संदेश देणे.

**४. आध्यात्मिकता आणि भौतिकता –** माणसाने केवळ धन-संपत्ती व भौतिक सुखाच्या मागे न लागता परमेश्वरचरणी लक्ष केंद्रित करावे.

**५. मोक्षप्राप्ती आणि आत्मसाक्षात्कार –** मोक्षप्राप्ती ही आत्मानुभूतीची अवस्था असून, मूर्तिपूजा आत्मसाक्षात्कारासाठी महत्त्वाची आहे.

**६. श्रद्धेचे महत्त्व –** कर्मकांडापेक्षा श्रद्धेला अधिक महत्त्व देणे. विवेक आणि वैराग्य यांच्याद्वारेच परमेश्वरप्राप्ती साध्य होते.

**७. संसार आणि आध्यात्मिकता –** मोक्षासाठी संसार त्यागण्याची आवश्यकता नाही; संसारात राहून सत्कर्म करणे, शुद्ध चारित्र्य राखणे आणि स्त्रियांना सन्मानाने वागवणे आवश्यक आहे.

**८. शुद्ध बुद्धी व वाङ्मय निर्मिती –** विकाररहित बुद्धीने पवित्र ग्रंथांचा अभ्यास करावा व मिशनच्या उद्दिष्टांचा प्रचार करणारे साहित्य निर्माण करावे.

**९. शिक्षण व समाजउन्नती –** विविध प्रकारचे शिक्षण देऊन समाजातील जनतेची परिस्थिती सुधारण्यावर भर देणे.

१०. **मानवतावाद –** मानवता हाच खरा धर्म असल्याने आपत्तीच्या वेळी लोकांना शक्य तेवढे साहाय्य करणे.

**११. स्वातंत्र्याचा पुरस्कार –** विचार व आचारस्वातंत्र्य हे जीवन व समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे. जिथे हे स्वातंत्र्य नाही, तिथे मानवता, धर्म आणि राष्ट्र अधःपतनास जाईल.

रामकृष्ण मिशन आजही या उद्दिष्टांच्या दिशेने कार्यरत असून, धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात आपला प्रभाव टिकवून ठेवत आहे.

**रामकृष्ण मिशनचे कार्य :**

रामकृष्ण मिशनचे कार्य खालीलप्रमाणे आहे.

**१. हिंदू धर्म व संस्कृतीचे श्रेष्ठत्व पटवून दिले :**

रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद आणि त्यांच्या शिष्यांनी भारतीय संस्कृती व हिंदू धर्माची महानता संपूर्ण जगाला पटवून दिली. सर्वधर्मसमभाव आणि मानवतेच्या सेवेचा संदेश त्यांनी जगभर पसरवला. भौतिकवादी पाश्चात्त्य देशांना भेटी देऊन हिंदू धर्माची महती स्पष्ट केली आणि त्याचे तत्वज्ञान प्रभावीपणे मांडले.शिकागो येथील विश्वधर्म परिषदेत स्वामी विवेकानंदांनी अद्वैत तत्त्वज्ञानाचे सार जगासमोर उलगडले. ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या

टीकेमुळे भारतीय समाजात निर्माण झालेला न्यूनगंड त्यांनी दूर केला. रामकृष्ण मिशनच्या माध्यमातून भारतीयांना आत्मगौरवाची जाणीव करून देण्याचे कार्य प्रभावीपणे राबवले गेले.

**२. मानवी सेवेला प्राधान्य :**

स्वामी विवेकानंदांनी मिशनऱ्यांच्या समाजसेवा वृत्तीचे महत्त्व ओळखले आणि रामकृष्ण मिशनच्या सेवकांना मानवजातीच्या सेवेचा संदेश दिला. त्यांनी दवाखाने, अनाथाश्रम आणि शाळा स्थापन करून गरीब, अज्ञानी, अस्पृश्य, अशिक्षित तसेच शारीरिक आणि मानसिक पीडितांच्या सेवेसाठी मिशन कार्यरत केले. नैसर्गिक आपत्तीच्या वेळीही मानवतेच्या दृष्टिकोनातून मदतकार्य सुरू ठेवले. लोकांना परमेश्वर मानून सेवा करण्याची पद्धत अंगीकारल्यामुळेच मिशनची अनेक केंद्रे लोकसेवेची केंद्रे बनली आहेत.रामकृष्ण मिशन शिक्षणाला विशेष महत्त्व देते. शिक्षण हे माणसाच्या जीवनाच्या आणि समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे. विचार व आचार स्वातंत्र्य हे प्रगतीसाठी अनिवार्य असून, शिक्षणाशिवाय ते शक्य नाही, असे मिशनचे ठाम मत आहे. विवेकानंदांचे विचार होते की, ज्यांच्या जीवावर तुम्ही शिकता, त्या लोकांकडे लक्ष दिले नाही, तर तुम्ही देशद्रोही आहात. या तत्त्वाला अनुसरून मिशनमध्ये शिक्षणाच्या विविध सुविधा निर्माण करण्यात आल्या. शिक्षण हे व्यक्तीच्या चारित्र्य संवर्धनासाठी महत्त्वाचे असून, स्त्रीशिक्षणालाही मिशनने विशेष प्रोत्साहन दिले आहे.

**३. अनिष्ट चालीरीतींना विरोध :**

रामकृष्ण मिशन हिंदू धर्मातील मूर्तिपूजा, कर्मकांड, अंधश्रद्धा आणि धर्मतत्त्वाच्या नावावर रूढ झालेल्या अनिष्ट चालीरीतींना विरोध करते. जातिव्यवस्थेवर त्यांनी कठोर टीका करून धार्मिक उदारता, समानता आणि सहकार्याला प्राधान्य दिले.मिशनच्या उपदेशानुसार, एकमेकांना मदत करा, संघर्ष टाळा आणि परस्पर समजूतदारपणाने वागा. समाजात ऐक्य निर्माण करून लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी मिशन कार्यरत आहे.

रामकृष्ण मिशनच्या शाखा आज देशभर आणि विदेशात सक्रिय आहेत. भारतीय सांस्कृतिक जीवनाचा तो अविभाज्य घटक बनला आहे. मिशनने हिंदू धर्मातील सकारात्मक मूल्यांचा स्वीकार करून समाजसेवा आणि आध्यात्मिकता यांचा सुरेख संगम घडवला. हा धर्म एकीकडे समाजसेवेतून मुक्तीचा मार्ग दाखवतो, तर दुसरीकडे श्रद्धेचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करतो. नव्या साधनांचा स्वीकार करणारी ही पहिली हिंदू चळवळ होती.

२० व्या शतकात रामकृष्ण मिशनने सामाजिक आणि धार्मिक सुधारणा प्रभावीपणे अंमलात आणल्या. विवेकानंदांविषयी चिकित्सक लेखक व्हॅलेंटाईन चिरोल लिहितो, प्राचीन भारतीय संस्कृती आणि नवजात भारतीय राष्ट्रवादाची पाश्चात्त्यांना प्रभावी जाणीव करून देणारा पहिला हिंदू विवेकानंद होता.त्यांच्या विचारांमुळे समाजात नवचेतना निर्माण झाली आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीला गती मिळाली.

रामकृष्ण मिशनच्या माध्यमातून विवेकानंदांनी अज्ञान आणि अंधश्रद्धांच्या विळख्यात सापडलेल्या समाजाला जागे करण्याचे कार्य केले. मिशनने समाजामध्ये राष्ट्रीय भावना, स्वाभिमान आणि अस्मिता निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांनी मुक्तीच्या संकल्पनेपेक्षा व्यक्तीच्या सामाजिक कल्याणाला अधिक महत्त्व दिले आणि आजही मिशन समाजसेवेचे व्रत अखंडपणे सुरू ठेवत आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३ :**

१. रामकृष्ण परमहंस यांचे मूळ नाव ............... होते.

अ) गटाधर चट्टोपाध्याय    ब) मूळशंकर

क) वीरजानंद सरस्वती    ड) नरेंद्र दत्त

२. रामकृष्ण मिशन ची स्थापना ............... यांनी केली.

अ) केशवचंद्र सेन    ब) राजा राममोहन रॉय

क) रवींद्रनाथ टागोर    ड) स्वामी विवेकानंद

३. विवेकानंदांचे मूळ नाव ............... होते.

अ) नरेंद्रनाथ विश्वनाथ दत्त    ब) गदाधर

क) मूळ शंकर    ड) गिरीधर

४. बेलूर मठाची स्थापना ............... यांनी केली.

अ) स्वामी विवेकानंद    ब) रामकृष्ण परमहंस

क) राजा राम मोहन रॉय    ड) स्वामी दयानंद सरस्वती

५. स्वामी विवेकानंद ............... या ठिकाणी जागतिक धर्म परिषदेसाठी गेले होते.

अ) बोस्टन    ब) कोलंबिया

क) न्यूयॉर्क    ड)शिकागो

## २.३ सारांश :

भारतीय समाजात राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती आणि स्वामी विवेकानंद यांनी वैचारिक जागृती घडवून आणण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. राजा राममोहन रॉय यांनी मूळ धर्मतत्त्वांची ओळख करून देत समाजातील अंधश्रद्धा, कुप्रथा आणि अन्यायकारक चालीरीतींवर प्रहार केला. त्यांनी इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार करून आधुनिक विचारांची मुहूर्तमेढ रोवली. खऱ्या अर्थाने भारतातील सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळीची सुरुवात ब्राह्मो समाजाच्या स्थापनेने झाली. ही हिंदू धर्मातील पहिली मोठी सुधारणा चळवळ होती. ब्राह्मो समाजाने स्त्री शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला आणि देशाच्या आधुनिकीकरणात महत्त्वाचे योगदान दिले. स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाज स्थापन करून हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणल्या. त्यांनी शूद्र व स्त्रियांनाही वेदाध्ययनाचा आणि उच्च शिक्षणाचा अधिकार मिळावा, यासाठी आवाज उठवला. आर्य समाजाने 'शुद्धी चळवळ' राबवून धर्मांतरित हिंदूंना पुन्हा त्यांच्या मूळ धर्मात परत आणले. तसेच त्यांनी भारतीय जनतेत राष्ट्रभक्तीची भावना जागृत केली. स्वामी विवेकानंद यांनी रामकृष्ण मिशनच्या माध्यमातून हिंदू धर्माचे आणि भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व जागतिक पातळीवर मांडले. त्यांनी सेवा हेच खरे धर्माचे तत्त्व असल्याचे सांगून मानवी सेवेला सर्वोच्च स्थान दिले. त्यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यांच्या विचारांमुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीला नवी दिशा मिळाली. या महान विचारवंतांच्या कार्यामुळे भारतीय समाजात

सामाजिक, धार्मिक आणि वैचारिक परिवर्तनाची चळवळ उभी राहिली आणि आजच्या आधुनिक भारताची पायाभरणी झाली.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**अग्रदूत –** मार्गदर्शक

**पाशात्य –** परकीय

**न्यास पत्र –** विशवास पत्र

**मिशन –** संस्था

**मिशनरी –** धर्मप्रचारक

**शुद्धिकरण –** पवित्रीकरण

**विशुद्धु –** निर्मळ

**पडदा पध्दती –** बुरखा घालण्याची पध्दती

**अनिष्ट –** हानिकारक

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न – १ :**

खालीलपैकी योग्य पर्याय निवडा

१) अ) राजा राम मोहन रॉय

२) ब) १८१५

३) अ) संवाद कौमुदी

४) ब) तत्वबोधिनी सभा

५) ड) राजा राम मोहन रॉय

**स्वयं अध्ययन प्रश्न – २ :**

खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

१) ड) मुंबई

२) क) मूळशंकर

३) अ) स्वामी विरजानंद सरस्वती

४) अ) सत्यार्थ प्रकाश

५) अ) लाहोर

**स्वयं अध्ययन प्रश्न - ३ :**

खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

१) अ) गटाधर चट्टोपाध्याय

२) ड) स्वामी विवेकानंद

३) अ) नरेंद्रनाथ विश्वनाथ दत्त

४) अ) स्वामी विवेकानंद

५) ड) शिकागो

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टिपा लिहा.**

१. सामाजिक-धार्मिक जागृतीची कारणे

२. केशव चंद्रसेन

३. साधारण ब्राह्मो समाज

४. स्वामी दयानंद सरस्वतीं

५.स्वामी विवेकानंद

**ब) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. राजा राममोहन रॉय यांचा जीवनाबद्दल माहिती लिहा

२. आर्य समाजाच्या कार्याचा थोडक्यात आढावा घ्या.

३. रामकृष्ण परमहंस यांचे कार्य विशद करा.

४. रामकृष्ण मिशनचे कार्य विशद करा.

**क) खालील प्रशांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. राजा राममोहन रॉय व ब्राह्मो समाजाची थोडक्यात माहिती द्या.

२. आर्य समाजाची तत्त्वे आणि कार्य स्पष्ट करा.

३. स्वामी विवेकानंद आणि रामकृष्ण मिशन यांच्या कार्याचा आढावा घ्या.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१. ग्रोव्हर, बी. एल.व बेल्हेकर एन के, - आधुनिक भारताचा इतिहास (१८५८-१९२०) एस. चांद आणि कंपनी, नवी दिली (२००३)

२. वैद्य, समुन, कोठेकर शांता., आधुनिक भारताचा इतिहास, श्री साइनाथ प्रकाशन, नागपूर, (२००४)

३. गाठाळ., एस. एच., आधुनिक  भारताचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, (२०००)

४. कदम य. ना. समग्र भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (२००३)

५. कोलारकर रा. गो. आधुनिक भारताचा इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर (१९८७)

६. सर देसाई व नलावडे, आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर. (२००७)

७. Sarkar, Sumit, Modern India (1885-1947), Macmillan India., (2005)

८. Chandra, Bipin, India's Struggle for Independence, Penguine Book, (1982)

❍❍❍

घटक ३

# राष्ट्रवादाचा उदय

## (Rise of Nationalism)

---

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ कारणे

  ३.२.२ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना

  ३.२.३ मवाळांचे योगदान

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१. भारतीय राष्ट्रवाद म्हणजे काय याची माहिती मिळेल.

२. भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाच्या कारणांचा परिचय होईल.

३. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपूर्वीच्या राजकीय संस्था, संघटनांची माहिती जाणून घेता येईल.

४. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेची माहिती मिळेल.

५. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या उगमासंदर्भातील वादविवादांचा परिचय होईल.

६. राष्ट्रवादाच्या उदय व विकासातील मवाळांच्या योगदानाची माहिती मिळेल.

७. विद्यार्थ्यांच्यामध्ये चिकित्सक दृष्टीकोन निर्माण होईल.

## ३.१ प्रास्ताविक :

सन १८५७ चा उठाव दडपून टाकण्यासाठी वसाहतवादी शासनाने भारतीयांच्यावर केलेले अनन्वित अत्याचार व अमानुष छळ पाहून भारतीयांची मने उद्विग्न झाली. इंग्रजांची दमननिती पाहून भारतीय लोक काही काळ आवाक झाले. या उठावानंतर नवशिक्षित तरुण वर्ग भारतीय परिस्थितीबद्दल, इंग्रजांच्या भारतातील जुलमी राजवटीबद्दल विचारमंथन करू लागला. यातूनच त्यांना वसाहतवादी शासनाच्या अंतरबाह्य स्वरुपाची जाणीव झाली. यातून वसाहतवादी शासनाने चालविलेले भारताचे अर्थशोषण त्यांच्या नजरेसमोर आले. या शोषणाविरुद्ध भारतीय समाजात असंतोष वाढू लागला. याचवेळी भारतात प्रबोधनाच्या चळवळीने जोर धरून भारतीय समाजातील दोष दूर करण्याचा प्रयत्न केला. यातून भारतात राष्ट्रवादाचा उदय झाला. भारताच्या विविध प्रांतात स्थानिक, प्रादेशिक संस्था-संघटना स्थापन होऊ लागल्या. या राष्ट्रवादाचा परमोच्च बिंदू म्हणजे १८८५ मध्ये स्थापन झालेली अखिल भारतीय राष्ट्रीय सभेची (काँग्रेस) स्थापना होय. अखिल भारतीय राष्ट्रीय सभे (काँग्रेस) च्या स्थापनेमुळे भारताच्या राजकीय जीवनात एक नवा कालखंड सुरु झाला. अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या नावाने एक संघटनात्मक व्यासपीठ अस्तित्वात आले. या व्यासपीठावरून भारताचा स्वातंत्र्यसंघर्ष लढला गेला. एक शिखर राष्ट्रीय संघटना म्हणून काँग्रेसने भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे धुरिणत्व केले. स्वातंत्र्य चळवळीच्या संपूर्ण पाऊण शतकावर अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा प्रभाव राहिला. दुभंगलेल्या भारतीय समाजाला एकाच व्यासपीठावर आणण्यासाठी वेगवगळ्या पातळीवर जरी संघर्ष करावा लागला तरी तीने स्वातंत्र्याची चळवळ कमजोर होऊ दिली नाही.

सुरुवातीच्या बाल्यावस्थेच्या मवाळ कालखंडात सरळसरळ वसाहतवादी शासनाला विरोध न करता अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने आपली संघटनात्मक बांधणी मजबूत केली. मवाळ नेत्यांनी आर्थिक राष्ट्रवादाची मांडणी करून ब्रिटीश वसाहतवादी शासनाच्या एकूण वसाहतवादी यंत्रणेचे शोषक स्वरूप जनतेसमोर मांडले. त्याच पायावर पुढील स्वातंत्र्य चळवळ स्थिर झाली.

### ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ कारणे (Causes) :

**राष्ट्रवाद :**

आधुनिक काळात राष्ट्र आणि राष्ट्रवाद यांना आदर्श मानून त्यावर श्रद्धा व निष्ठा ठेवण्यास आणि त्या निष्ठेतून राष्ट्रासाठी व्यक्तीला आपल्या सर्वस्वाचा त्याग करावयास शिकविणारी विचारसरणी म्हणून राष्ट्रवादी विचारप्रणालीकडे म्हणजेच राष्ट्रवादाकडे पाहिले जाते.राष्ट्रवादी विचारसरणीचा उदय प्रामुख्याने अठराव्या शतकापासून झाला असून याच शतकाच्या मध्यापासून तिच्या विकासाची प्रक्रिया वेगाने सुरु झाली.आज हा राष्ट्रवाद आधुनिक सार्वभौम राज्यव्यवस्थेचा आधार मानला जातो.

'एक राष्ट्र-एक राज्य' या सिद्धांतातूनच राष्ट्रवादाची संकल्पना उदयास आली. राष्ट्रवाद हा देशभक्ती, देशप्रेम, जातीय व धार्मिक एकता व भौगोलिक एकतेच्या धोरणातूनच विकसित झाला.

**राष्ट्रवादाच्या व्याख्या :**

अनेक विद्वानांनी, अभ्यासकांनी राष्ट्रवादाची संकल्पना स्पष्ट करण्याचा, व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातील काही व्याख्या पुढीलप्रमाणे.

गिलख्रिस्तच्या मते, राष्ट्रवाद म्हणजे सामान्यतः एकाच प्रदेशात राहणारे, एकाच वंशाचे, एकच भाषा असणारे, समान इतिहास, समान परंपरा, एकच धर्म तसेच समान हितसंबंध, समान राजकीय संघटन आणि त्यातून देशासाठी व्यक्त होणारी देशप्रेमाबरोबर राष्ट्रीय एकात्मतेची आणि अध्यात्मकतेची भावना म्हणजे राष्ट्रवाद होय.

प्रो. हॅन्सकोण म्हणतात, राष्ट्रवाद मुख्यत्वेकरून एक मनःस्थिती आहे; ती एक जागृती आहे.

प्रो. स्नायडर म्हणतात, राष्ट्रवाद म्हणजे इतिहासातील एका विशेष कालखंडात आढळून येणाऱ्या राजकीय, आर्थिक, सामाजिक व बौद्धिक व्यवहारांचा परिणाम होय.

बेनिडिक्ट अंडरसन यांच्या मते, राष्ट्राच्या निर्मितीसाठी भाषा, वंश, धर्म यासारखे सामाजिक घटक जबाबदार नसून राष्ट्रांना कल्पना करून अस्तित्वात आणले.

एकंदरीत राष्ट्रवाद म्हणजे प्रत्येक व्यक्तीला आपल्या राष्ट्राबद्दल वाटणारे प्रेम किंवा असलेली निष्ठा होय. राष्ट्रवाद ही संघ वा गट भावना असून मानवाची ती मानसिक तसेच सामाजिक अभिव्यक्ती आहे.

**राष्ट्रवादाच्या वाढीसाठी मुख्य घटक :**

प्रामुख्याने राष्ट्रवादाच्या उदय व वाढीसाठीपुढील काही घटक कारणीभूत ठरतात. त्या घटकांची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

**१. समान भूप्रदेश :**

एका विशिष्ट भौगोलिक सीमेने बद्ध लोकांच्यामध्ये भौगोलिक एकता निर्माण होते. अशा विशिष्ट भौगोलिक प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या लोकंमध्ये आपण एक असल्याची भावना निर्माण होते. त्यातूनच

राष्ट्रवादाची वाढ होते. जगातील बहुतांशी राष्ट्रे समान भूप्रदेशाच्या एकतेतून निर्माण झालेली आहेत.

**२. समान वंश :**

एकाच वंशाचे लोक फार लवकर एकत्र येतात आणि त्यांच्यात एकतेची भावना प्रबळ असते.

**३. समान इतिहास :**

ज्या लोकांचा इतिहास एकच असतो. असा इतिहास तेथील लोकांच्यात एकात्मतेची भावना जागृत करण्यास मदत करतो.

**४. समान हितसंबंध :**

लोकांचे राजकीय, सामाजिक, आर्थिक,धार्मिक व सांस्कृतिक हितसंबंध समान असतात. असे लोक सहजपणे एकत्र येतात.

**५. समान भाषा :**

लोकांच्यामध्ये विचार-आचारांचे, भावनांचे आदानप्रदान होण्यासाठी भाषा हे प्रभावी माध्यम असते. समान भाषा बोलणारे लोक सहज एकत्र येतात. त्यांच्यात राष्ट्रीयतेची भावना वाढीस लागते.

**६. समान संस्कृती :**

संस्कृती ही लोकसमुदायाला एकत्र आणणारा प्रमुख घटक आहे. सांस्कृतिकदृष्ट्या एकत्र असलेल्या लोकांच्यामध्ये राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागते.

**७. समान धर्म :**

समान धर्म असणारे लोक एकत्र येतात. त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागते.

वरील घटकांशिवाय समान परंपरा, समान आदर्श, समान उद्दिष्ट्ये हे घटकही राष्ट्रीयत्वाच्या वाढीस कारणीभूत ठरतात. एकंदरीत वरील एक किंवा अनेक घटकांच्या साहाय्याने राष्ट्रवाद वाढीस लागतो.

आधुनिक काळात राष्ट्रवादी विचारसरणीला अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. अठराव्या शतकात राष्ट्रवादाचा उदय झाला हे मान्य केले तरी एक गोष्ट मात्र नक्की असते ती म्हणजे कोणतेही तत्वज्ञान ज्या विशिष्ट काळात उदय पावत असते त्या काळाच्या खूप आधीच त्या तत्वज्ञानाची व विचारसरणीची बीजेही रोवलेली असतात. त्यामुळे असे म्हणता येईल कि, राष्ट्रवादी विचारसरणीच्या प्रभावाची सुरुवात जरी अठराव्या शतकात झाली असली तरी या विचारसरणीला पोषक असणारी प्रवृत्ती व भावना ही त्यापेक्षा अनेक शतके आधी विकसित होत होती.

राष्ट्र, राष्ट्रभावना, राष्ट्रीयत्व या संकल्पना एकमेकांना पूरक आहेत. युरोपमध्ये सुरु झालेल्या प्रबोधनाच्या उदरातून ज्या नव्या संकल्पना उदयास आल्या त्यात राष्ट्रभावना ही एक संकल्पना होती. फ्रान्समध्ये झालेल्या १७८९ चा क्रांतीमधून जी काही तत्वे, संकल्पना उदय पावल्या. त्यामध्ये राष्ट्र, राष्ट्रभावना, राष्ट्रवाद याही होत्या. फ्रान्समधील राज्यक्रांती चिरडून टाकण्यासाठी अन्य युरोपियन देशांनी ज्यावेळी फ्रान्सवर आक्रमण केले.

त्यावेळी राष्ट्रभावनेच्या आधारे फ्रेंच समाजात अभूतपूर्व ऐक्यभावना निर्माण होऊन फ्रांसने या परचक्राचा मुकाबला केला. त्यानंतर ऐक्यभावनेला, राष्ट्रभावनेला उत्तरोत्तर गती येत गेली. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला याच राष्ट्रवादी भावनेतून जर्मनी, इटली व अन्य युरोपियन देशांना नेपोलियनचे आक्रमण थोपविता आले.

पुढे १८१५ च्या व्हिएन्ना परिषदेने राष्ट्रवादाकडे दुर्लक्ष करून युरोपची कृत्रिम पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केल्याने तो अल्पजीवी ठरला. त्यानंतर याच राष्ट्रवादी भावनेतून ग्रीकचे स्वातंत्र्ययुद्ध झाले. याच राष्ट्रवादी भावनेतून हॉलंड व बेल्जियम हे देश एकमेकांपासून स्वतंत्र झाले. १८७०च्या दशकापर्यंत याच राष्ट्रवादाच्या आधाराने इटली, जर्मनीचे एकीकरण झाले आणि नंतर याच राष्ट्रवादाचा अतिरेक होऊन पहिले महायुध्दही झाले. त्यानंतर जगभरातील पारतंत्र्यात असलेले देश याच राष्ट्रवादी भावनेतून परकियांच्या जोखडातून, गुलामगिरीतून मुक्त झाले.

आधुनिक काळात राष्ट्र, राष्ट्रभावना, राष्ट्रीयत्व या संकल्पना नवीन आहेत. भारतात या संकल्पनांचा आधुनिक अर्थाने विचार प्रामुख्याने १८५७च्या उठावानंतर प्रथम केला जाऊ लागला. राष्ट्रभावना म्हणजे आपल्या राष्ट्रावर, मातृभूमीवर प्रेम करणे, त्यासाठी सर्वस्व अर्पण करणे असा अर्थ अभिप्रेत असेल तर प्राचीन काळापासून भारतीय लोक मातृभूमीवर प्रेम करत आलेले दिसून येतात. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेली स्वराज्याची स्थापना आणि महाराष्ट्र धर्म वाढविण्याचे केलेले आवाहन यात निश्चितच राष्ट्रभावना होती. परंतुनंतर ती कमी झाली होती.

सन १८५७ च्या उठावानंतर भारतात राष्ट्रभावनेचा उदय झाला असे मानण्यात येते. अर्थात अशा प्रकारची राष्ट्रभावना भारतात यापूर्वी कधीच नव्हती का असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचे उत्तर होकारार्थी किंवा नकारार्थी देणे अवघड आहे. कारण १८ व्या शतकापासून ज्या राष्ट्रवादी संकल्पनेचा आधुनिक अर्थाने जगाच्या इतिहासात अभ्यास केला जातो, तशा प्रकारची राष्ट्रभावना भारतात अस्तित्वात होती का याचे उत्तर शोधल्यास ते बहुतांशी नकारात्मकच येते.

ब्रिटीशांची राजवट स्थापन झाल्यानंतर भारतात राजकीय-सामाजिक परिवर्तनाचे आणि जागरणाचे एक नवयुगअवतरले. त्यानंतर भारतात प्रबोधनाची चळवळ सुरु झाली. त्याचवेळी १८५७च्या उठावानंतर भारतात राजकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर उलथापालथ होऊन राष्ट्रवादी विचारांचा नवा अंकुर भारतीय समाजात आकार घेऊ लागला.

**भारतीय राष्ट्रवादाच्या (काँग्रेसच्या) उदयाची कारणे :**

भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. राजकीय ऐक्याची निर्मिती :**

ब्रिटिशांनी हिमालय ते कन्याकुमारी आणि वायव्य सीमा ते ईशान्य भारतापर्यंतचा संपूर्ण भारत जिंकून भारतावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आपला एकछत्री अंमल प्रस्थापित केला. त्यामुळे भारतात राजकीय ऐक्य निर्माण होऊन शांततेची व प्रशासकीय ऐक्याची निर्मिती झाली. समान सत्ता, समान समस्या, समान कायदेप्रणाली यामुळे भारत एका सूत्रात बांधला गेला. या राजकीय ऐक्याने मानसिक ऐक्याला चालना दिली, प्रेरणा दिली.

**२. दळणवळण आणि संचार साधनांचा विकास :**

ब्रिटिशांनी भारत जिंकल्यानंतर प्रशासकीय सोयीसाठी, लष्करी संरक्षण व आवागमन, आर्थिक व व्यापारी शोषणाच्या उद्देशाने भारतात दळणवळण व संचार साधनांचा विकास केला. रेल्वे-रस्त्यांच्याद्वारे एक प्रांत दुसऱ्या प्रांताला आणि ग्रामीण भाग मोठमोठ्या शहरांना जोडण्यात आले. या दळणवळणाच्या विकासामुळे प्रवास सुरक्षित व सोयीचा झाला. अल्पावधीत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे यामुळे शक्य झाले. डाकव्यवस्था व तारायंत्रामुळे परस्परसंबंध वाढण्यास मदत झाली. एका प्रांतातील घटना दुसऱ्या प्रांतातील लोकांना ताबडतोब कळू लागल्या आणि त्यामुळे एकीची भावना वाढीस लागण्यास मदत झाली. भारतीय प्रदेश व व्यक्ती एकसंघ होऊन त्यांच्यातील राष्ट्रीय भावना अधिक तीव्र झाली.

**३. आधुनिक शिक्षणाचा प्रसार :**

ब्रिटिशांनी भारतावर आपली सत्ता स्थापन केल्यावर भारतात प्रशासकीय गरजेतून इंग्रजी माध्यमाच्या आधुनिक शिक्षणाची सुरुवात केली. या आधुनिक शिक्षण पद्धतीमुळे आधुनिक पाश्चात्य विचारांची तोंडओळख भारतीयांना होऊन भारतातील राजकीय विचारांना एक नवी दिशा मिळाली. आधुनिक शिक्षण घेतलेल्या नावशिक्षितांसाठी पाश्चात्य शिक्षणाचे दरवाजे खुले झाले. मिल्टन, शेले, बेंथम, मिल, स्पेन्सर, रुसो, व्हाल्टेअर यांच्या विचारांनी भारतीय बुद्धीजीविंमध्ये स्वातंत्र्याची, राष्ट्रवादाची, स्वशासनाची ज्योत प्रज्वलित झाली.

काही महत्वकांक्षी तरुण उच्च शिक्षणासाठी युरोप, अमेरिकेत गेले. त्यांचा तेथील राजकीय संस्था, संघटना, तत्वप्रणाली व शासनव्यवस्थेशी जवळून संबंध आला. इंग्रजी माध्यमातून दिल्या जाणाऱ्या आधुनिक शिक्षणाचा एक फायदा म्हणजे भारतातील वेगवेगळ्या प्रांतातील विभिन्न भाषिक प्रदेशातील जनतेला इंग्रजी या भाषा माध्यमातून विचारांची देवाणघेवाण करणे सहजशक्य झाले. इंग्रजीच्या माध्यमातून परस्परसंपर्क साधने, एकमेकांच्या अडचणी जाणून घेणे व त्यावर परस्पर विचारविनिमय करणे, सुशिक्षितांना सहज शक्य झाले. याचा परिणाम त्यांच्यात राष्ट्रवादी भावना वाढीस लागली.

**४. भारतीय वृत्तपत्रांचा उदय :**

वसाहतवादी राजवटीकडून राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक मार्गांनी होणारा अन्याय भारतीय वृत्तपत्रांनी दाखवून भारतात राष्ट्रवाद विकसित करण्याचे कार्य केले. भारतीय वृत्तपत्रांनी राष्ट्रवादाच्या प्रसारात आणि त्यासाठी जनमत तयार करण्यात महत्वाची भूमिका बजावली. केशरी, मराठा, काळ, ज्ञानप्रकाश, हिंदू, आंध्र प्रकाशिका, कोहिनूर, हिंदू पेट्रीयट, इंडियन मिरर, बंगाली, अमृत बझार पत्रिका यासारख्या इंग्रजी व प्रादेशिक भाषांतील वृत्तपत्रांनी वसाहतवादी शासनाच्या अत्याचारांना वाचा फोडून त्यांचे शोषणकारी स्वरूप जनतेसमोर मांडले.भारतातील वेगवेगळ्या प्रांतातील स्थानिक भाषेतील वृत्तपत्रांनी त्या त्या स्थानिक भाषेतून राजकीय जागृती करण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्य, प्रातिनिधिक शासन लोकशाही संस्था ह्या विचारांना लोकमाणसात लोकप्रिय करण्याचे कार्यही वृत्तपत्रांनी केले. त्याकाळात भारतीय वृत्तपत्रे म्हणजे भारतीय राष्ट्रवादाचा आरसा बनली होती.

**५. मध्यमवर्गीय बुद्धीजीवींचा उदय :**

ब्रिटीशांच्या प्रशासकीय व आर्थिक क्षेत्रातील नव्या पद्धतीमुळे भारतात मध्यमवर्गीय बुद्धीजीवी वर्गाचा

उदय झाला. या वर्गाने भारतीय राष्ट्रवादाच्या उदयास मोठ्या प्रमाणावर हातभार लावला. स्पीयर लिहितो, हा नवा मध्यम वर्ग संघटीत असा अखिल भारतीय वर्ग होता. ज्याची पाश्वभूमी भिन्न असली तरी ज्ञान, विचार आणि मूल्याची समानता होती. हा वर्ग भारतीय समाजात संख्येने छोटा असला तरी गतिमान होता. त्यांच्यात समान उद्दिष्टांची व आकांक्षांची भावना होती. १८५७ च्या उठावानंतर याच वर्गात मोठ्या प्रमाणावर जागृती होऊ लागली. त्यातून त्यांनी भारतात छोट्या-मोठ्या संस्था स्थापून एकत्र येण्यास सुरुवात केली. याच वर्गाने पुढे सामाजिक व राजकीय चळवळीचे नेतृत्व केले. हाच मध्यम वर्ग आधुनिक भारताचा आत्मा बनला आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा कणा बनला.

**६. सामाजिक व धार्मिक प्रबोधन :**

भारतात ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळी व समाजसुधारकांची एक फळी निर्माण झाली. भारतातील या सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळी व समाजसुधारकांनी भारतीय समाजातील दोष नष्ट करून भारतीय समाजाला अंतरबाह्य बदलून टाकले आणि हा बदललेला भारतीय समाज नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठीसमर्थ बनला.

या सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळींचा उद्देश राजकीय जागृतीचा नसला तरी त्यांच्या संपर्कात येणारे लवकरच आत्मसन्मानाच्या व देशभक्तीच्या भावनेने प्रभावित होत होते. या सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीनी आणि समाजसुधारकांनी जी सामाजिक-धार्मिक जागृती केली, त्यामुळे राष्ट्रवादाची जोपासना झाली.

**७. वसाहतवादी शासनाविरुद्धचा असंतोष :**

भारतावर ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर भारत एका परकीय सत्तेच्या नियंत्रणाखाली गेला. ब्रिटिशांनी भारत आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची जुलमी धोरणे अवलंबिली. त्याचा परिणाम राज्यकर्ते व जनता यांच्यातील दरी सतत वाढत गेली आणि लोकांच्या मनात जुलमी शासनाविरुद्धचा असंतोष वाढू लागला. याचा परिणाम काही ठिकाणी सशक्त प्रतिकारही झाले.

**८. वसाहतवादी आर्थिक शोषण :**

ब्रिटीश राजवटीचा भारतावर झालेला सर्वात वाईट परिणाम म्हणजे भारताचे झालेले आर्थिक शोषण होय. ब्रिटिशांनी भारतीय अर्थव्यवस्था इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेशी जोडून भारताचे आर्थिक शोषण केले. भारतातील आर्थिक धोरणे ही भारतीयांचे हित सामोर ठेवून ठरविली गेली नाहीत तर ती इंग्लंडच्या जनतेचे हित डोळ्यांसमोर ठेवून ठरविली गेली. त्यामुळे ब्रिटिशांनी भारताला कच्चा माल पुरविणारी आणि पक्का माल खरेदी करणारी हक्काची बाजारपेठ बनविली. त्याचा परिणाम उत्पादक असणारा भारत कर्जबाजारी बनला. जमीन महसूलव्यवस्था, शेतीचे व्यापारीकरण, हस्तोद्योगांचा ऱ्हास, मुक्त व्यापारी धोरण यासारख्या मार्गांनी भारतीय अर्थव्यवस्थेचा ऱ्हास घडवून आणला. त्यामुळे भारतात सतत दुष्काळाची परिस्थिती निर्माण होऊन भारत दारिद्र्याच्या खाईत लोटला गेला. याची जाणीव भारतीयांना होऊ लागली. त्यातूनच दादाभाई नौरोजी, रोमेशचंद्र दत्त, न्या. रानडे यांनी ब्रिटीशांच्या शोषक नितीचे भारतावर झालेले दुष्परिणाम दाखवून दिले आणि दादाभाई नौरोजींनी तर

संपत्तीच्या अपहरणाचा सिद्धांत मांडून वसाहतवादी शासनाचे शोषक स्वरूप जनतेला दाखवून दिले. या आर्थिक शोषणाच्या जाणीवेतून आर्थिक राष्ट्रवादाचा विकास झाला.

**९. ब्रिटीशांचे वंशवादी धोरण :**

ब्रिटिशांनी भारतात स्विकारलेले वंशवादी धोरण भारतीयांच्यात राष्ट्रीय भावना जागृत होण्यास आणि राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेस कारणीभूत ठरले. गोरे ब्रिटीश अधिकारी, राज्यकर्ते यांना स्वतःच्या संस्कृतीचा आणि वंशश्रेष्ठत्वाचा जास्त अभिमान होता. गोऱ्या लोकांकडून भारतीयांना काळे समजून भारतीयांची सतत अवहेलना केली जात असे. अनेक ठिकाणी फक्त गोऱ्यांनाच प्रवेश असत. तिथे जाण्याची भारतीयांना परवानगी नसे. अनेक ठिकाणी गोऱ्यांच्या क्लबच्या प्रवेशद्वारावर Indians and Dogs not allowed अशा पाट्या लावलेल्या असत. नोकरीमध्ये,प्रवासाच्या साधनांमध्ये सरळ पक्षपाती व्यवस्था असे. भारतीयांना हीन लेखून, त्यांना प्रशासनातील उच्च पदापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न सातत्याने ब्रिटीश राज्यकर्त्यांनी केलेला दिसून येतो. सर्वांसाठी समान कायदा असे ब्रिटीश न्यायव्यवस्थेचे तत्व असतानाही भारतीय आणि युरोपियानांसाठी कायदा व्यवस्थेत भेदभाव केला जात असे. गोऱ्या लोकांच्याविरुद्धचा खटला फक्त गोऱ्या न्यायाधीशांसमोरच चालविला जात असे. सन १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्याने भारतीयांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पक्षपात केला जाणार नाही, असे आश्वासन देण्यात आले असले तरी प्रत्यक्षात मात्र त्याचा अवलंब केला गेला नाही. ब्रिटीशांच्या वंशवादी धोरणामुळे सुशिक्षित भारतीयांच्या मनात आपल्या गुलामगिरीविरुद्ध चीड निर्माण होणे साहजिकच होते. या वेदनेतूनच भारतात राष्ट्रवादी विचार मूळ धरू लागला.

**१०. ऐतिहासिक संशोधन व राष्ट्रीय साहित्याची निर्मिती :**

विल्यम जोन्स, मॅक्समूलर, ससान, रॉय, विलियम्स यासारख्या परकीय विद्वानांनी केलेल्या प्राचीन भारताच्या संशोधनामुळे भारताची समृद्ध संस्कृती पुढे आली. कनिंगहॅमसारख्या पुरातत्ववेत्यांनी केलेल्या उत्खानांनी भारताच्या महानतेचे, गौरवशाली परंपरेचे नवे रूप दिसून आले. या युरोपियन विद्वानांनी वेदांचे व उपनिषदांचे साहित्यिक श्रेष्ठत्व मान्य करण्याबरोबरच त्यातील मानवी मनाच्या सुंदर विश्लेषणाबद्दल भरपूर स्तुतीही केली. त्याचवेळी स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंदांनी भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचे दर्शन संपूर्ण जगाला करून दिले. त्यामुळे भारतीय हे राज्यकारभार करण्यास समर्थ नाहीत. भारताला इतिहासच नाही, भारताला प्राचीन वारसा नाही या युरोपियनांनी निर्माण केलेल्या मिथकांना तडा जाऊन प्राचीन भारतीय संस्कृती ही गौरवशाली होती अशी मानसिक आत्मगौरवाची भावना सुशिक्षित भारतीयांच्या मनात निर्माण झाली. त्याने राष्ट्र जाणिवांना उत्तेजन मिळाले.

त्याचवेळी दीनबंधूमित्रा, हेमचंद्र बॅनर्जी, नारायणचंद्र सेन, बंकिमचंद्र चटर्जी, रवींद्रनाथ टागोर, ईश्वरचंद्र विद्यासागर, आगरकर-चिपळूणकर यासारख्या साहित्यिकांनी राष्ट्रीय साहित्याची निर्मिती केली. तत्कालीन भारतातील राष्ट्रीय साहित्यातून राष्ट्रभावनेची निर्मिती झाली.

**११. लॉर्ड लिटनची दडपशाही :**

व्हाईसरॉय लॉर्ड लिटनच्या दडपशाही धोरणाने भारतीयांच्यात राष्ट्रभावना चेतविण्याचे कार्य केले. १८७६

ते १८७८ चा दक्षिण भारतातील दुष्काळ, लॉर्ड लिटनचा देशी वृत्तपत्रांवर निर्बंध घालणारा १८७८ चा भारतीय भाषा वृत्तपत्र कायदा, भारतीय शस्त्र कायदा (आर्म्स अक्ट १८७८), आयसीएस परीक्षेची वयोमर्यादा २१ वरून १९ वर्षे करणे यासारख्या कायद्यांनी भारतीयांवर अनेक निर्बंध लावण्यात आले. भारतात भीषण दुष्काळ असताना १८७७ मध्ये दिल्ली दरबारावर लक्षावधी रुपये खर्च केले. या लॉर्ड लिटनच्या कृत्यांमुळे भारतीयांमध्ये असंतोष निर्माण झाला. यामुळे सरकारविरोधी चळवळ चालविण्यासाठी भारतात अनेक राजकीय संस्था स्थापन झाल्या.

**१२. इल्बर्ट विधेयकावरील वाद :**

प्रांतांच्या राजधानीव्यतिरिक्त असलेल्या हिंदी न्यायाधीशांना युरोपीय गुन्हेगारांची चौकशी करण्याचा अधिकार नव्हता. न्यायव्यवस्थेतील हा पक्षपात दूर करण्यासाठी व्हाईसरॉय लॉर्ड रिपनने तत्कालीन सरकारचा कायदा सल्लगार कर्टर्ना इल्बर्टयास न्यायालयीन भेदभाव दूर करण्यासाठी विधेयक मांडण्यास सांगितले. युरोपियन लोकांना हा आपला अपमान झाल्याची भावना झाली आणि यामुळे युरोपियन गुन्हेगारांना जबर शिक्षेस सामोरे जावे लागेल या भीतीने त्यांनी युरोपियन डिफेन्स असोसिएशन स्थापन करून लॉर्ड रिपन विरुद्ध भारतात व इंग्लंडमध्ये चळवळ चालविली. या सर्वांचा परिणाम ब्रिटीश संसदेने हस्तक्षेप करून या बिलात बदल घडवून आणला. कायदेशीर आंदोलन कसे करावे व त्यासाठी संघटीत होण्याचे ज्ञान भारतीयांना या बिलावरील घडामोडींवरून आले.

एकंदरीत भारतातील राष्ट्रवादाचा उदय हा सामान्यपणे विदेशी शासनाच्या शोषणाला प्रतिक्रिया म्हणून उदयास आला. ए. डी. स्मिथ म्हणतात, Nationalism is really only anti-colonialism. भारतीय राष्ट्रवादाचा उदय हा काही प्रमाणात भारतीय प्रबोधनाचा परिणाम तर काही प्रमाणात इंग्रजांच्या भारतातील वसाहतवादी धोरणाच्या परिणाम होता.

ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात ब्रिटिशांनी सुरुवातीला संपूर्ण भारत आपल्या ताब्यात घेऊन भारताला एका सूत्रात बांधण्याचा प्रयत्न केला. परंतु १८५७ च्या उठावानंतर भारतीय समाजात त्यांच्या फोडा आणि झोडा या धोरणाने धर्म, जाती, भाषा या आधारावर तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे भारतीय समाज एकसंघ होऊ शकत नाही. त्यामुळे भारताचा राष्ट्र म्हणून विचार होऊ शकत नाही. अर्थात भारतात राष्ट्रवाद नाही असा युक्तिवाद करण्याचा ब्रिटिश शासकांनी प्रयत्न केला.

सुरुवातीला वसाहतवादी शासक भारतात राष्ट्रवादाचे अस्तित्वच मानायला तयार नव्हते.जे. आर. सिलीने सन १८८३ मध्ये भारताचा उल्लेख राष्ट्रीय ऐक्याची भावना नसलेला भौगोलिक प्रदेश असा केला. भारतीय प्रशासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी जॉन स्ट्रॅचीने सन १८८४मध्ये केंब्रिज विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्यासमोर बोलताना म्हटले होते, भारतासंबंधी सर्वप्रथम व सर्वात आवश्यक जाणून घेण्यासारखी गोष्ट म्हणजे भारत अस्तित्वात नाही आणि कधीही नव्हता. तसेच भारत कधीही राष्ट्र बनणार नाही. India will never become a united nation असे भाकितही त्याने केले. पण जेव्हा १९ व्या शतकाच्या शेवटी आणि २० व्या शतकाच्या प्रारंभी जेव्हा भारतात राष्ट्रवाद बळकट होऊ लागला. तेव्हा वसाहतवादी शासकांनी आपले प्रतिपादन बदलून भारतीय राष्ट्रवादाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न चालविला. त्याचे प्रतिबिंब मॉटफोर्ड अहवालातही दिसून येते.

क्रुपलॅंडही म्हणतो, भारतीय राष्ट्रवाद इंग्रजी सत्तेचे अपत्य आहे. Indian nationalism was the child of the British Raj. पण क्रुपलॅंड या गोष्टीकडे दुर्लक्ष करतात की, भारताचा राष्ट्रवाद इंग्रजांच्या इच्छेविरूद्धचे अपत्य होते. ज्याला जन्मताच दूध पाजण्यास इंग्रज सत्तेने नकार दिला. एवढेच नव्हे तर त्याचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला.

**स्वयं अध्ययन प्रश्न – १ :**

१. ………… भारताला कच्चा माल पुरविणारी आणि पक्का माल खरेदी करणारी हक्काची बाजारपेठ बनविली.

अ) अमेरिकनांनी ब) ब्रिटिशांनी

क) चीनने ड) रशियनांनी

२. दादाभाई नौरोजींनी ………… सिद्धांत मांडला.

अ) खंड वाहनाचा ब) मुक्त व्यापारी धोरणाचा

क) खुल्या व्यापाराचा ड) संपत्तीच्या अपहरणाचा

३. सन १८७८ मध्ये ………… याने भारतीय भाषा वृत्तपत्र कायदा केला.

अ) लॉर्ड डफरीन ब) लॉर्ड कर्झन

क) लॉर्ड लिटन ड) लॉर्ड रिपन

४. ……….. च्या काळात इल्बर्ट विधेयक मांडण्यात आले.

अ) लॉर्ड डफरीन ब) लॉर्ड कर्झन

क) लॉर्ड लिटन ड) लॉर्ड रिपन

### ३.२.२ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना :

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना हा केवळ योगायोग नव्हता. त्यापाठीमागे भारतातील दीर्घकालीन सामाजिक आर्थिक, बौध्दिक व राजकीय परिस्थिती कारणीभूत होती. सन १८८५ मध्ये राष्ट्रीय सभेची (काँग्रेस) स्थापना झाली. तेव्हापासून भारताच्या राजकीय जीवनातील एक नवा कालखंड सुरु झाला. अखिल भारतीय काँग्रेस या नावाने एक संघटनात्मक व्यासपीठ अस्तित्वात आले. या व्यासपीठावरून भारताचा स्वातंत्र्यसंघर्ष लढला गेला आणि या व्यासपीठावरूनच भारताला स्वातंत्र्य मिळाले.

सन १८५७च्या उठावानंतर भारतात मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय जाणीवा निर्माण होऊ लागल्या. त्यातून राष्ट्रवादाचा उदय झाला. या राष्ट्रवादाचा परिणाम म्हणजे राजकीय जागृती होऊन सन १८८५ मध्ये अखिल भारतीय राष्ट्रीय सभेची म्हणजेच काँग्रेसची स्थापना झाली.असे असले तरी राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना ही काही आकस्मिक घडलेली घडलेली घटना नव्हती. त्यापाठीमागे वर्षानुवर्षाची पार्श्वभूमी कारणीभूत होती.

ब्रिटिशांनी संपूर्ण भारत जिंकून भारतावर आपला एकछत्री अंमल प्रस्थापित केल्यामुळे भारतात राजकीय

ऐक्य निर्माण झाले. आपल्या प्रशासकीय सोयीसाठी, लष्करी संरक्षण व आवागमन, आर्थिक व व्यापारी शोषणाच्या उद्देशाने भारतात दळणवळण व संचार साधनांचा विकास केला.त्यामुळे भारतीय प्रदेश व व्यक्ती एकसंघ होऊन त्यांच्यातील राष्ट्रीय भावना अधिक तीव्र होत जाऊन एखादी अखिल भारतीय स्तरावर सर्वांचे नेतृत्व करणारी संघटना अस्तित्वात येणे अत्यंत गरजेचे आहे, याची जाणीव लोकांना होऊ लागली.

ब्रिटिशांनी प्रशासकीय गरजेतून इंग्रजी माध्यमाच्या आधुनिक शिक्षणाची सुरुवात केली.त्यामुळेआधुनिक पाश्चात्य विचारांची तोंडओळख भारतीयांना होऊन त्यांच्यामध्ये स्वातंत्र्याची, राष्ट्रवादाची, स्वशासनाची भावना निर्माण झाली. आधुनिक शिक्षणामुळे भारतात मध्यमवर्गीय बुद्धीजीवी वर्गाचा उदय झाला. याच वर्गाने पुढे सामाजिक व राजकीय चळवळीचे नेतृत्व केले. हाच मध्यम वर्ग भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा कणा बनला.

भारतात ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर निर्माण झालेल्या सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीनी जी सामाजिक-धार्मिक जागृती केली, त्या आधारावरच राजकीय चळवळ उभी राहिली.

ब्रिटिशांनी भारत आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी जी जुलमी धोरणे अवलंबिली. त्याचा परिणाम जुलमी वसाहतवादी शासनाविरुद्धचा असंतोष वाढू लागून या जुलमी शासनसंस्थेला नमविण्यासाठी शांततापूर्ण सनदशीर चळवळीचा विचार मूळ धरू लगला. यातूनच अखिल भारतीय काँग्रेसचा जन्म झाला.

ब्रिटिशांनी केलेल्या वसाहतवादी आर्थिक शोषणामुळे आर्थिक राष्ट्रवादाचा विकास होऊन एखाद्या देशव्यापी संघटनेची गरज भारतीयांना वाटू लागली.

ब्रिटिशांच्या भारतातील वंशवादी धोरणामुळे भारतीयांच्यात राष्ट्रीय भावना जागृतझाली.यातूनच आपल्याला एकत्र येवून आपल्या हक्कांसाठी एखादी देशव्यापी संघटना उभारण्याची गरज भारतीयांना वाटू लागली.

भारतीय व परकीय विद्वानांनी केलेल्या प्राचीन भारताच्या संशोधनामुळे भारतीयांच्या मनात आत्मगौरवाची भावना निर्माण झाली.त्याचवेळीराष्ट्रीय साहित्याची निर्मिती झाली. याच काळात भारतीय वृत्तपत्रांनी भारतीय समाजात नवविचारांचा प्रसार करून राष्ट्रवादी विचारांना चालना दिली. त्यासाठी जनमत तयार करण्यात महत्वाची भूमिका बजावली.

व्हाईसरॉय लॉर्ड लिटनच्या दडपशाही धोरणांना विरोध करण्यासाठी भारतात अनेक राजकीय संस्था स्थापन झाल्या. लॉर्ड रिपनच्या काळात न्यायव्यवस्थेतील पक्षपात दूर करण्यासाठी कर्टर्ना इल्बर्ट याने मांडलेल्या विधेयकास विरोध करण्यासाठी युरोपियनांनी ज्यापद्धतीने चळवळ करून या विधेयकात बदल घडवून आणला. त्यातून संघटीत होण्याचे ज्ञान भारतीयांना या बिलावरील घडामोडींवरून आले.

भारताच्या वेगवेगळ्या भागात स्थानिक पातळीवर वेगवेगळ्या राजकीय संस्था व संघटनांची स्थापना झाली. या स्थानिक पातळीवरील राजकीय संघटनांनी संघटनात्मक बांधणी त्या त्या स्थानिक भागात मजबूत करून स्थानिक पातळीवर सदृढ राजकीय नेतृत्व तयार केले. या स्थानिक नेतृत्ववाला देशपातळीवर संघटना निर्माण करण्याची गरज वाटू लागली. थोडक्यात वेगवेगळ्या प्रांतातील या संघटनांमुळे काँग्रेसच्या स्थापनेला गती आली.

१८५७ च्या उठावानंतर भारतात राष्ट्रवादाचा विचार मूळ धरू लागला आणि १९ व्या शतकाच्या

उत्तरार्धात राष्ट्रवादाची पायाभरणी झाली. त्यामुळे भारतीयांना संघटीत होण्याची आणि देशपातळीवर काम करणाऱ्या एखाद्या संघटनेची गरज वाटू लागली. या गरजेतूनच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस जन्माला आली. थोडक्यात वेगवेगळ्या कारणांनी भारतात जो राष्ट्रवाद निर्माण झाला. त्या राष्ट्रवादातूनच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. भारतीय राष्ट्रवादाच्या उदारतूनच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म झाला.

**भारतातील वेगवेगळ्या राजकीय संस्था व संघटना :**

१९ व्या शतकाच्या मध्यापासून भारतात राष्ट्रीय जाणीवा निर्माण होण्यास प्रारंभ झाला. त्याचीच एक परीनिती म्हणून अखिल भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. परंतु काँग्रेसची स्थापना काही अचानक झाली नाही. तर काँग्रेसच्या स्थापनेपूर्वी भारतात सामाजिक, धार्मिक व राजकीय सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक संस्था, संघटना स्थापन झाल्या होत्या. यातील बहुतांशी संघटनांची व्याप्ती स्थानिक व प्रादेशिक स्तरापर्यंत मर्यादित होती. पण ह्या संस्थांचे वैशिष्ट्य म्हणजे धर्म व जात ह्या परिघापासून त्यांचे उद्देश दूर होते. या संघटनांमध्ये वकील, पत्रकार, शिक्षक, डॉक्टर या सुशिक्षित मध्यमवर्गीयांचा भरणा होता. या संघटनांनी ब्रिटीश पार्लमेंटकडे व हिंदुस्थानातील ब्रिटीश राज्यकर्त्यांकडे अर्ज विनंत्याद्वारे काही राजकीय मागण्या सादर केल्या होत्या. वेगवेगळ्या प्रांतातील या संघटनांमुळे काँग्रेसच्या स्थापनेला गती आली.

भारतीय राष्ट्रीय सभेच्या (काँग्रेस) स्थापनेपुर्वीच भारतातील वेगवेगळ्या प्रांतात उदयास आलेल्या राजकीय संस्थापैकी काही संस्था पुढीलप्रमाणे -

**१. बंगाल प्रांतातील राजकीय संस्था :**

**वंगभंग प्रकाशिका सभा :**

राजा राममोहन रॉय यांच्या सहकाऱ्यांनी सन १८३६ मध्ये कलकत्ता येथे 'वंगभंग प्रकाशिका सभा' या नावाची पहिली संस्था स्थापन केली. सरकारच्या धोरणाबाबत संबंधित विषयाची चर्चा करून, अध्ययन करून त्यात सुधारणा करण्यासाठी सरकारला विनंतीपत्रे पाठविणे अशा प्रकारचे कार्य या संस्थेचे होते.

**लॅण्ड होल्डर्स असोसिएशन** (Land Holders -ssociation) **:**

सन १८३७ मध्ये द्राकानाथ टागोर यांनी 'लॅण्ड होल्डर्स असोसिएशन' (Land Holders -ssociation) नावाची एक संघटना स्थापन केली. जमीनदार वर्गाच्या हितसंबंध रक्षणासाठी ही संघटना स्थापन करण्यात आली होती. आपली गाऱ्हाणी सरकारकडे मांडण्यासाठी या संघटनेने सनदशीर राजकीय मार्गाचा अवलंब केला होता.या संस्थेचे उद्दिष्ट मर्यादित असले तरी ती एखाद्या राजकीय संघटनेसारखीच काम करीत होती. या संघटनेचा इंग्लंडमधील ब्रिटीश इंडिया सोसायटी शी संपर्क होता.

**बंगाल ब्रिटीश इंडिया सोसायटी :**

एप्रिल १८४३ मध्ये 'बंगाल ब्रिटीश इंडिया सोसायटी' या नावाची राजकीय संस्था अस्तित्वात आली. इंग्रजांच्या नियंत्रणाखालील भारतीय जनतेची वास्तविक स्थिती जाणून घेणे, जनतेच्या प्रगतीसाठी शांततामय व कायदेशीर मार्गाचा अवलंब करणे, जनतेला त्यांचे न्याय्य अधिकार मिळविण्यासाठी प्रयत्न करणे असे या संस्थेचे उद्देश होते.

**ब्रिटीश इंडियन असोसिएशन** (British Indian -ssociation) **:**

लॅण्ड होल्डर्स असोसिएशन (Land Holders -ssociation) आणि बंगाल ब्रिटीश इंडिया सोसायटी या दोन्ही संस्थांचे विलीनीकरण होऊन २८ ऑक्टोबर १८५१ रोजी 'ब्रिटीश इंडियन असोसिएशन' नावाची संस्था स्थापन करण्यात आली. या संस्थेतही प्रामुख्याने जमीनदारांचेच प्रभुत्व होते. जमीनदारांचे हितसंबंध जोपासणे हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असले तरी या संस्थेमार्फत १८५३ मध्ये चार्टर कायद्याच्या नुतणीकरणावेळी 'लोकप्रिय पद्धतीचे कायदे मंडळ असावे, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांचे कार्यक्षेत्र स्वतंत्र असावे, मोठमोठ्या अधिकाऱ्यांचे वेतन कमी करण्यात यावे. मीठ, अबकारी व मुद्रा कर समाप्त केला जावा' अशा मागण्या असलेले विनंतीपत्र ब्रिटीश पार्लमेंटकडे पाठविले होते. सन १८५३ च्या चार्टर ॲक्टवेळी गव्हर्नर जनरल इन कौन्सिलमध्ये कायदेविषयक कामकाजासाठी सहा अतिरिक्त सदस्यांचा समावेश करण्याची तरतूद करण्यात आली. अर्थात यावर या असोसिएशनच्या मागणीचा थोडाफार प्रभाव होता. या संस्थेने २०व्या शतकापर्यंत एखाद्या राजकीय संघटनेप्रमाणे कार्य केले. अर्थात काँग्रेसवर या संस्थेचा प्रभाव निश्चितच होता.

**इंडियन लीग** (Indian League) **:**

सन १८५७च्या उठावानंतर काही अवकाश निघून गेल्यानंतर वसाहतवादी शासनाच्या प्रतिगामी धोरणामुळे भारतातील राजकीय जागृती वाढू लागली. त्याचा परिणाम भारतात नवीन राजकीय विचारांचे उत्थान झाले. सुशिक्षित भारतीयांना राजकीय हक्काची जाणीव होऊ लागली. नव्या विचारांसाठी नव्या व्यासपीठांची गरज वाटू लागली. या गरजेतूनच नव्या राजकीय संघटना स्थापन होऊ लागल्या. यातूनच लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना जागृत करण्यासाठी व लोकांना राजकीय शिक्षण देण्यासाठी 'अमृत बझार' पत्रिकेचे संपादक बाबू शिशिरकुमार घोष यांनी सन १८७५ मध्ये 'इंडियन लीग'ची स्थापना केली. भारतीय जनतेत राजकीय जागृती करण्याचा या संस्थेचा उद्देश होता. बंगालच्या वेगवेगळ्या भागात कार्य करीत असलेल्या स्थानिक संस्थांशी संपर्क साधून परिणामकारक राजकीय कार्य करण्यासाठी सर्वांनी संघटीत होण्याचे आव्हान या संस्थेने केले. या संस्थेच्या कार्याबद्दल कलकत्यातील एका वृत्तपत्राने म्हटले, 'भारतीय जनतेतील राजकीय जागृतीचा अविष्कार प्रथमच स्पष्ट करणारी संघटना.'

**इंडियन असोसिएशन** (Indian -ssociation) **:**

भारताच्या राजकीय चळवळीला एक राष्ट्रीय स्वरूप देण्याचा प्रयत्न करणारी पहिली संघटना म्हणून इंडियन असोसिएशनकडे पहिले जाते. बंगालमधील तरूण युवकांनी सुरेद्रनाथ बॅनर्जी व आनंद मोहन घोष यांच्या नेतृत्वाखाली २६ जुलै १८७६ रोजी कलकत्याच्या अल्बर्ट हॉलमध्ये 'इंडियन असोसिएशन' या संस्थेची स्थापना केली. ही संस्था अखिल भारतीय चळवळीचे केद्र असावी असा या संस्थेच्या स्थापनेचा उद्देश होता. कारण सर्व भारतीयांना एका समान व्यासपीठावर एकत्र आणण्याची गरज बंगालमधील नेत्यांना वाटत होती.तत्कालीन बंगालमधील राजकीय संस्था जमीनदार वर्गाच्या नियंत्रणाखाली असलेल्या आणि त्यांच्याच हितसंबंधाचे रक्षण करणाऱ्या होत्या. त्यामुळे सर्वसामान्य, मध्यमवर्गीयांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी या संघटनेची स्थापना झाली. अल्पावधीतच ही संघटना सुशिक्षित मध्यमवर्गीयांच्या प्रतिनिधींची केंद्र बनली.

या संघटनेला सुरुवातीला लोकमत जागृत करण्यासाठी पोषक वातावरण तयार झाले. कारण लॉर्ड लिटन

हा या काळात प्रतिगामी धोरणाचा व्हाईसरॉय भारतात होता. त्याने भारतीय नागरी सेवेची वयोमर्यादा २१ वर्षावरून १९ वर्षे केली. भारतीयांनी ही परीक्षा उत्तीर्ण होऊ नये हा त्यापाठीमागील हेतू होता. त्यामुळे सुरेंद्रनाथ बॅनर्जी याविरुद्ध भारतीयांना राष्ट्रीय पातळीवर एकत्रित करण्यासाठी या संघटनेच्या व्यासपीठाचा वापर केला. यात त्यांना अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळाल्यामुळे त्यांचा उत्साह वाढला. त्यामुळे या संघटनेला लोकप्रियता मिळू लागली. त्यानंतर या संस्थेने सरकारच्या अन्याय्य धोरणाविरुद्ध आवाज उठवून लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला. सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी या संस्थेच्या माध्यमातून देशभर दौरे काढून जनजागृती केली. त्यामुळे या संघटनेला अखिल भारतीय स्वरूप मिळाले. या संस्थेच्या शाखा बंगालमध्ये व बंगाल बाहेरही होत्या. सन १८८३ साली या संस्थेने राष्ट्रीय परिषद (National Conference) बोलाविली. त्याला दक्षिण भारत वगळता भारतातील इतर प्रांतातील जवळपास १०० प्रतिनिधी उपस्थित होते.या परिषदेला उपस्थित असलेल्या डब्ल्यू. एस. ब्लंट याने 'राष्ट्रीय परिषदेच्या दृष्टीने टाकलेले पहिले पाऊल' असे या परिषदेचे वर्णन केले. थोडक्यात राजकीय चळवळीला व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न या संघटनेने केला.

पुढे राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाल्यावर इंडियन असोसिएशनच्या पुढाऱ्यांनी आपले राष्ट्रीय परिषदेचे स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवण्याचा आग्रह न धरता त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. हे त्यांच्या निस्वार्थी राष्ट्रवादी वृत्तीचे द्योतक होते.

**२. मुंबई इलाख्यातील राजकीय संस्था :**

**बॉम्बे असोसिएशन** (Bombay -ssociation) **:**

जगन्नाथ शंकर शेठ यांच्या पुढाकाराने मुंबईतील काही उत्साही, सुशिक्षित तरुणांनी एकत्र येऊन 'बॉम्बे असोसिएशन' नावाची संस्था मुंबई येथे सन १८५२ मध्ये स्थापन केली. जनतेचे प्रश्न, अडचणी सरकारपर्यंत पोहचविणे व सनदशीर मार्गाने ते सोडविण्याचा प्रयत्न करणे असे या संस्थेचे उद्दिष्ट होते. प्रसंगी सरकारच्या चुकीच्या धोरणावर टीकाही या संस्थेने केली. सन १८५३ मध्ये कंपनीच्या सनदेचे नुतणीकरण करणार हे ध्यानात घेऊन या संस्थेने इंग्लंडच्या संसदेला एक निवेदन दिले. त्या निवेदनात नव्या कायदेमंडळाची निर्मिती आणि त्यात भारतीयांना प्रतिनिधित्व देण्याची मागणी करण्यात आली. ही संस्था पुढे फार काळ टिकली नाही.

**सार्वजनिक सभा :**

मुंबई इलाख्यात राजकीय चळवळीची पायाभरणी करणारी पहिली नावाजलेली संस्था म्हणून सार्वजनिक सभेचा उल्लेख केला जातो. पुण्यात गणेश वासुदेव जोशी यांच्या पुढाकाराने सन १८६७ मध्ये 'पुना असोसिएशन' या संस्थेची स्थापना झाली. पुढे तीन वर्षांनी सन १८७० मध्ये तिचे 'सार्वजनिक सभा' असे नामांतरण झाले.औद्योगिकीकरण, शेती, स्वदेशीविषयी या संस्थेने कार्य केले. पुण्याच्या जवळ असलेल्या राजेराजवाड्यांचा या संस्थेशी निकटचा संबंध होता. न्या. रानडे हे या संस्थेचे प्रेरणाशक्ती व सुत्रचालक होते. त्यांनी या सभेच्या व्यासपीठावरून भारतच्या आर्थिक परिस्थितीबाबत व्याख्याने दिली. सार्वजनिक काकांनी स्वदेशी मालाला उत्तेजन देऊन राजकीयदृष्ट्या लोकमत जागृत करण्यात व राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करण्यास मदत केली.

महाराष्ट्रातील सन १८७७ च्या दुष्काळावेळी या संस्थेने गावोगावी आपले कार्यकर्ते पाठवून दुष्काळग्रस्तांना मदत केली. दुष्काळग्रस्त जनतेच्या व शेतकऱ्यांच्या मागण्या सरकारला सदर करून शेतकऱ्यांना सवलती

मिळवून देण्याचा प्रयत्न केला. या संस्थेच्या अविरत व निस्वार्थी कार्यामुळे, सार्वजनिक प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या त्यांच्या प्रयत्नामुळे सार्वजनिक सभा ही महाराष्ट्रातील लोकमान्य राजकीय संस्था बनली. तिच्या शाखा पश्चिम महाराष्ट्रातील वाई, सातारा, सोलापूर, नाशिक येथे स्थापन झाल्या. पुढे गोपाळ कृष्ण गोखले हे या संस्थेचे सचिव बनले. सन १८९६ नंतर लोकमान्य टिळकांच्या हातात या संस्थेची सूत्रे गेल्यानंतर टिळकांनी राजकीय जागृतीसाठी सार्वजनिक सभेचा वापर केला. एकंदरीत महाराष्ट्रातील जनतेत राजकीय हक्कांची जाणीव निर्माण करून राजकीय चळवळीची पायाभरणी या संस्थेने केली.

**बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन** (Bombay Presidency Association) **:**

जनतेच्या  मागण्या सरकारपुढे प्रभावीपणे मांडण्यासाठी मुंबईत अस्तित्वात असलेल्या संघटना फारश्या क्रियाशील नसल्यामुळे सन १८८५ साली फिरोजशहा मेहता, बद्रुद्दीन तय्यबजी आणि न्या. के. टी. तेलंग यांनी 'बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन' ही संस्था स्थापन केली. जनतेच्या अडचणी व मागण्या अर्ज विनंतीद्वारे सरकारला सादर करण्याचे कार्य या संस्थेने केले.या संस्थेचे व पुण्यातील सार्वजनिक सभा परस्पर सहकार्याने काम करीत होत्या.

**३. मद्रास इलाख्यातील राजकीय संस्था :**

**मद्रास नेटिव्ह असोसिएशन** (Madras Native -ssociation) **:**

सन १८५२ साली 'मद्रास नेटिव्ह असोसिएशन'ची स्थापना झाली. बंगालमधील ब्रिटीश इंडियन असोसिएशनची शाखा म्हणून या संस्थेकडे पहिले जात असे. या संस्थेने १८५३ च्या कायद्यापुर्वी कंपनी सरकारच्या गैरकारभाराबाबत प्रकाश टाकणारे एक निवेदन ब्रिटीश पार्लमेंटला सादर केले होते. सरकारकडून शेतकऱ्यांवर लादला गेलेला अवास्तव कर, महसूल अधिकाऱ्यांकडून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक ही वस्तुस्थिती सांगून कालवे, धरणे आणि पूल बांधण्याची, शिक्षणाचा प्रसार करण्याची आणि स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्याची विनंतीही त्यामध्ये केली होती. परंतु या संघटनेचा प्रभाव जनतेवर तसेच सरकारवर फारसा पडला नाही. १८५७ च्या उठावानंतर तर जवळपास अस्ताकडे गेली.

**मद्रास महाजन सभा** (Madras Mhajan Sabha) **:**

मद्रासमध्ये सन १८८४ साली रंगय्या नायडू, सुब्रहमण्यम, सुब्बाराव पंतलु, एम. वीर राघवाचार्य, सुब्रम्हण्यम अय्यर यांनी 'मद्रास महाजन सभे'ची स्थापना केली. डिसेंबर १८८४ ते जानेवारी १८८५ याकाळात या सभेने एक मोठी परिषद आयोजित केली होती. या परिषदेमध्ये कायदेमंडळाचा विस्तार, भारतीयांना त्यात अधिकाधिक प्रतिनिधित्व, सत्तेचे विभाजन अशा राजकीय मागण्याकरणारे ठराव केले.

न्यूयार्क येथे स्थापन झालेल्या थिऑसॉफीकल सोसायटीचे अधिवेशन मद्रासजवळील अडड्यार येथे सन १८८४ मध्ये भरले. या अधिवेशनास सुरेंद्रनाथ बॅनर्जी, दादाभाई नौरोजी यांच्यासह भारताच्या विविध प्रांतातून आलेले १७ प्रतिनिधी उपस्थित होते. अधिवेशानंतर दिवाणबहादूर रघुनाथराव यांच्या निवासस्थानी एक बैठक झाली. त्यामध्ये अखिल भारतीय स्वरुपाची एखादी राजकीय संघटना स्थापन करण्याचा निश्चय करण्यात आला.

## ४. भारताबाहेरील संघटना :

**लंडन इंडियन सोसायटी** (London Indian Society) **:**

भारताबरोरच भारताबाहेरही काही संघटनांची भारतीयांनी स्थापना केली होती. त्यामध्ये दादाभाई नौरोजी यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या सहाय्याने सन १८६५ साली लंडनमध्ये 'लंडन इंडियन सोसायटी' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी तर सचिव व्योमेशचंद्र बॅनर्जी हे होते.

**ईस्ट इंडिया असोसिएशन** (East India -ssociation) **:**

लंडन इंडियन सोसायटीतील काही सदस्यांच्या सहाय्याने दादाभाई नौरोजी यांनी सन १८६६ मध्ये लंडन येथे 'ईस्ट इंडिया असोसिएशन' ही संघटना स्थापन केली.भारतीय प्रश्नांवर विचार करणेतसेच भारताच्या कल्याणाच्या दृष्टीने इंग्लंडच्या नेत्यांना प्रभावित करणे हे या संघटनेचे उद्दिष्ट होते. या संघटनेच्या शाखा भारतातील प्रमुख शहरामध्येही स्थापन करण्यात आल्या. भारताबद्दल सहानुभूती असलेल्या सर्वांनाच या संघटनेमध्ये सामील करून घेतले जात असल्यामुळे विलियम वेडरबर्न, हेन्री मॅसेट, चार्ल्स ब्राडलॉ, विलियम दिग्बी यासारखी काही निवृत्त ब्रिटीश अधिकारी व इंग्लंडमधील उदारमतवादी लोकांचा समावेश होता.या उदारमतवादी इंग्रजांनी भारताविषयी इंग्लंडमध्ये ब्रिटीश लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला.

**इंडियन सोसायटी** (Indian Society) **:**

केंब्रीज विद्यापीठात शिकत असलेल्या आनंद मोहन बोस यांनी सन १८७२ मध्ये 'इंडियन सोसायटीची' स्थापना केली. इंग्लंडमधील भारतीयांना संघटीत करणे आणि भारतातील समस्यांबाबत विचार करणे हे या संघटनेचे उद्दिष्ट होते.

वरीलप्रमाणे वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या संघटना स्थापन झाल्या होत्या. पण त्या संघटनांची व्याप्ती व कार्य फारच सीमित होते. यातील बहुतांशी संघटना स्थानिक प्रश्नांना घेऊन लढत होत्या. तसेच त्यांचे नेतृत्व किंवा सदस्य एखादे शहर किंवा एखाद्या प्रांतातील लोकांपर्यंत मर्यादित होते.

**भारतीय राष्ट्रीय सभेची (कॉंग्रेस) स्थापना :**

सन १८८५मध्ये स्थापन झालेली भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना ही काही आकस्मिक घडलेली घटना नव्हती किंवा कोणताही योगायोग नव्हता. १८६० आणि १८७० च्या दशकात भारतीयांमध्ये राष्ट्रीय जागृती होऊ लागली होती. या राष्ट्रीय जागृतीचा परमोच्च बिंदू राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना होता. भारतातील जागृत बुद्धीजीवी वर्गामध्ये स्थानिक हिताऐवजी राष्ट्रीय हितासाठी संघर्ष करण्याची भावना निर्माण झाली. याचाच परिणाम भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना हा होता आणि १८८५ हे वर्ष या प्रक्रियेतील मैलाचा दगड ठरले.

सन १८८५ पूर्वीच्या दशकातील राजकीय जागृतीचा परमोच्च बिंदू म्हणजे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना हा होय. काही मुलभूत उद्दिष्ट्ये व कामगिरी निश्चित करून त्यासाठी लढा देण्याची परिस्थिती सन १८८५ पर्यंत निर्माण झाली होती. एकमेकांशी निगडीत असलेली ही निरनिराळी उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी राजकीय कार्यकर्त्यांनी अखिल भारतीय स्वरूपाच्या एकाच संघटनेत सामील होण्याची गरज होती. २८ डिसेंबर

१८८५ रोजी मुंबई येथे जमलेले नेते या उद्दिष्टांनी प्रेरित झालेले होते. ती साध्य करण्याची प्रक्रिया सुरु होण्याची त्यांना आशा वाटत होती.

भारतीय राष्ट्रवाद्यांना परदेशी शासन आणि शोषणाविरुद्ध एक होण्याची गरज वाटू लागली होती. अखिल भारतीय राजकीय संघटनेच्या स्थापनेची वेळ आलेली होती. वेगवेगळ्या प्रांतात स्थापन झालेल्या संघटनापासूनच अखिल भारतीय स्वरुपाची एक संघटना असावी असे विचार सुरु झाले होते. पण ते प्रत्यक्ष अंमलात यायला १८८५ साल उजाडले. सन १८८५ पूर्वीही त्यादृष्टीने काही थोडेफार प्रयत्न झालेले होते. सन १८७७ मध्ये पुण्याच्या सार्वजनिक सभेने मुंबई व कलकत्याच्या प्रतिनिधींना एकत्र कार्य करण्याची प्रेरणा दिली. सार्वजनिक सभेने सन १८७८ मध्ये कलकत्याला एक शिष्टमंडळ भारतीय वृत्तपत्रांच्या व कलकत्त्याच्या राजकीय प्रतिनिधींनी भाग घेऊन विचारविनिमय करण्यासाठी कलकत्याला एक अधिवेशन घ्यावे या हेतूने पाठविले होते. सन १८७८ मध्ये लायसेन्स कर लावण्याविरुद्ध आणि सन १८७९ मध्ये सुती कापडावरील आयात कर हटविण्याच्या विरोधात भारतात ठिकठिकाणी सभा आयोजित करण्यात आल्या होत्या. सन १८८४ मध्ये लॉर्ड रिपनच्या परत जाण्याबद्दल ठिकठिकाणी निदर्शने झाली. 'टाईम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्राने त्यावर अशी टिप्पणी केली कि, 'ह्या निदर्शनातून संघटनांचा राष्ट्रीय आत्मा जाणवला जी गोष्ट यापूर्वी कधीच अनुभवला आली नव्हती.' भारताच्या सर्वच भागात जागृती झालेली होती आणि सर्वांनी एका व्यासपीठावर यावे अशी सार्वत्रिक भावना होती. एखादी देशव्यापी परिषद घेण्याच्या दृष्टीने इंडियन असोसिएशन आणि तिचे प्रमुख सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचे कार्य महत्वाचे आहे. इंडियन असोसिएशनने सन १८८३ च्या डिसेंबरमध्ये प्रथम 'इंडियन नॅशनल कॉन्फरन्स' बोलाविली होतीआणि त्यासाठी भारताच्या सर्व प्रमुख शहरातून प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले. या परिषदेस जवळपास १०० प्रतिनिधी हजर होते. या कॉन्फरन्सच्या अध्यक्षस्थानी असलेल्या आनंदमोहन बोस यांनी असा आशावाद व्यक्त केला कि, 'राष्ट्रीय संसद' अस्तित्वात येण्याच्या दृष्टीने हे अधिवेशन पहिले पाहुल ठरेल. इंडियन नॅशनल कॉन्फरन्सचे दुसरे अधिवेशन कलकत्ता येथे सन १८८५च्या नाताळमध्ये घेण्याचे ठरले. दरम्यान काँग्रेसच्या स्थापनेच्या हालचाली घडून आल्या. त्यामध्ये इंडियन असोसिएशनचे नेते सहभागी झाले.

अखिल भारतीय संघटना स्थापन करण्यासाठी आवश्यक अशी पार्श्वभूमी तयार झाली होती. त्यास मूर्त स्वरूप देऊन प्रत्यक्षात आणण्याचे श्रेय निवृत्त ब्रिटीश सनदी अधिकारी सर ॲलन आक्टेव्हिएन ह्यूम यांना मिळाले. ॲलन ह्यूम पंजाबचे माजी ले. गव्हर्नर व गव्हर्नर जनरलचे सेक्रेटरी होते. विचाराने उदारमतवादी असलेल्या ॲलन ह्यूमला भारतीयांबद्दल तळमळ होती. हिंदी लोकांना सन्मानाने वागवावे, त्यांना प्रशासनात सहभाग द्यावा असे ॲलन ह्यूमला वाटत होते. त्याचवेळी ब्रिटीश वसाहतवादी धोरणाविरुद्ध मोठ्या प्रमाणात भारतीयांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. या असंतोषाचा स्फोट होऊन ब्रिटीशांच्या भारतातील साम्राज्याला धोका निर्माण होऊ नये, हे टाळण्यासाठी ॲलन ह्यूमने दूरदृष्टीने हिंदी लोकांच्या असंतोषाला विधायक चळवळीचे स्वरूप देण्याच्या उद्देशाने सुशिक्षित भारतीयांची संघटना स्थापन करण्याची योजना तयार केली होती. कारण त्यांना त्यासाठी अखिल भारतीय व्यासपीठ स्थापन होणे गरजेचे वाटत होते. सन १८८२ नंतर त्यांनी तसा जाणीवपूर्वक प्रयत्न केला होता. १ मार्च १८८३ रोजी कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीधरांना उद्देशून ॲलन ह्यूमने एका जाहीर पत्रात म्हटले, 'आपण सर्व सुख व चैनीचा त्याग करून सार्वजनिक कार्यासाठी एकत्र आले पाहिजे. देशाचा विकास करण्यासाठी पन्नास सुशिक्षित एकत्र आल्यास देशाच्या विकासाचा, प्रगतीचा मार्ग सुकर होईल.'

ॲलन ह्यूमच्या या आव्हानाला भारतीय तरुणांनी प्रतिसाद दिला आणि या तरुणांच्या सहकार्याने ॲलन ह्यूमने सन १८८४मध्ये 'इंडियन नॅशनल युनियन' या नावाची संघटना स्थापन केली आणि तिच्या शाखाही सर्वत्र काढण्यात आल्या. 'सामाजिक सुधारणा व देशाची प्रगती सरकारच्या मदतीने आणि सनदशीर मार्गाने घडवून आणणे' हे या संघटनेचे ध्येय होते. याचवेळी सुरेंद्रनाथ बॅनर्जी व आनंदमोहन बोस यांनी इंडियन असोसिएशनच्या मार्फत अशी देशव्यापी संघटना निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून भारतातील प्रमुख शहरातील प्रतिनिधींना आमंत्रित करून इंडियन नॅशनल कॉन्फरन्सचे अधिवेशन भरविले होते.

ॲलन ह्यूमच्या विचारांना लॉर्ड नॉर्थब्रूक, जॉन ब्राईट, लॉर्ड रिपनसारख्या उदारमतवाद्यांनी उत्तेजन दिले. तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड डफरीनशी चर्चा केल्यानंतर ॲलन ह्यूमने १८८५ साली राष्ट्रीय सभेचे अधिवेशन पुण्यामध्ये घेण्याचे निश्चित केले. परंतु ऐनवेळी पुण्याएवजी मुंबईला अधिवेशन घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईच्या गोकुळदास तेजपाल कॉलेजमध्ये राष्ट्रीय सभेचे अधिवेशन पार पडले.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पहिले अधिवेशन मुंबई येथे २८ डिसेंबर १८८५ रोजी व्योमेशचंद्र बॅनर्जी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या अधिवेशनात अधिकृतपणे राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. या अधिवेशनाला देशाच्या वेगवेगळ्या भागातून ७२ प्रतिनिधी उपस्थित होते. त्यामध्ये फिरोजशहा मेहता, न्या. के. टी. तेलंग, दादाभाई नौरोजी, लाला लजपतराय, गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, दिनशा वाच्छा, नरेंद्रनाथ सेन, गीरीजाभूषण मुखर्जी, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, रंगय्या नायडू, इ. प्रमुख भारतीय नेते उपस्थित होते. याशिवाय ॲलन ह्यूम, विल्यम वेडरबर्न, हॅन्री कॉटन, नॉटन या युरोपियन व्यक्तीही उपस्थित होत्या.

काँग्रेस या शब्दाचा अर्थ 'लोकांचा समूह' किंवा 'लोकांचे मंडळ' असा आहे. राष्ट्रीय सभेचे नाव म्हणून वापरलेला काँग्रेस हा शब्द उत्तर अमेरिकेच्या इतिहासातून उचलण्यात आलेला आहे. काँग्रेसची रचना संसदीय पद्धतीची होती. तिचे संपूर्ण कामकाज लोकशाही पद्धतीने चालत असे.धर्मनिरपेक्षतेच्या तत्वावर भारताच्या निर्मितीसाठी देशव्यापी नेतृत्वाची जी गरज होती, ती गरज काँग्रेसने पूर्ण केली.

**भारतीय राष्ट्रीय सभे (काँग्रेस) ची उद्दिष्ट्ये :**

भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष व्योमेशचंद्र (उमेशचंद्र) बॅनर्जी हे होते तर सचिव ॲलन ह्यूम हे होते. त्यांनी आपल्या भाषणात काँग्रेसची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितली.

१. देशाच्या विविध प्रांतातील लोकांना देशहिताच्या कार्यासाठी एकत्र करणे आणि त्यांच्यामध्ये मैत्रीपूर्ण संबंध वाढविण्याचा प्रयत्न करणे.

२. जातीय, धार्मिक, प्रांतिक आणि वांशिक भेदभाव दूर करून राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेचा विकास करणे तसेच देशप्रेमी नागरिकांना देशहिताच्या कार्यासाठी उत्तेजन व प्रेरणा देणे.

३. राजकीय कार्य यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आणि देशहिताच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या साधनांचा व मार्गाचा शोध घेणे.

४. महत्वाच्या विषयावर भारतातील सुशिक्षितांच्या मतांचा विचार करणे.

५. आपल्या मागण्या सनदशीर मार्गाने शासनापुढे ठेवणे.

६. ब्रिटीशांच्या न्यायप्रियतेवर विश्वास ठेवणे. अर्ज, विनंत्या आणि शिष्टमंडळे या मार्गांनी आपल्या मागण्या सरकारपुढे ठेवणे.

७. देशाच्या विकासासाठी प्रयत्न करणे, त्यासाठी ब्रिटीश शासनाशी एकनिष्ठ राहून सहकार्य करणे.

८. देशाची आर्थिक पिळवणूक थांबविणे, देशात स्वराज्यसंस्था स्थापन करणे, तसेच आफ्रिकेतील भारतीय लोकांना समतेची वागणूक देण्यासाठी प्रयत्न करणे.

**काँग्रेसच्या स्थापने संदर्भातील मतभेद :**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना ज्या वेळी, ज्या परिस्थितीत, ज्या पद्धतीने आणि ज्या व्यक्तींच्या पुढाकाराने झाली. त्यावरून ही संघटना स्थापन करण्यामागील उद्देश आणि या संघटनेच्या स्थापेमागील ॲलनह्यूमच्या भूमिकेबाबत राजकीय नेते आणि इतिहासकारांमध्ये बरीच मतमतांतरे आहेत. ज्या परिस्थितीमध्ये काँग्रेसची स्थापना झाली त्या परिस्थितीमध्ये ॲलनह्यूमने काँग्रेसच्या स्थापनेत काही ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या संमतीने पुढाकार का घेतला, त्यावरून काँग्रेसच्या स्थापनेची मूळ कल्पना कोणाची होती आणि तिचा उद्देश काय होता हे प्रश्न विद्वानांना पडणे स्वाभाविक आहे. तत्कालीन संबंधित राजकीय पुढाऱ्यांनी यासंदर्भात वेगवेगळी वक्तव्ये केलेली असल्यामुळे या प्रश्नांना अधिकच महत्व प्राप्त झाले.

याअनुषंगाने काँग्रेसची स्थापना करण्याची मूळ कल्पना कोणाची, ह्यूमची की डम रीनची?हा प्रश्न प्रथमतः पडतो. काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष व्योमेशचंद्र बनर्जींनी एका वक्तव्यात म्हटले होते की, ॲलनह्यूम यांची सुरुवातीची कल्पना सामाजोन्नतीची होती, परंतु लॉर्ड डफरीन यांच्या सूचनेवरून तिला राजकीय स्वरूप देण्याचा निर्णय घेण्यात आला. ॲलनह्यूम याचे चरित्रकार वेडरबर्न यांच्या मतानुसार काँग्रेसच्या स्थापनेची कल्पना ॲलनह्यूम आणि लॉर्ड डफरीन यांच्यातील चर्चेतून आली. इंग्लंडमधील विरोधी पक्षाप्रमाणे काम करणारी एखादी संस्था भारतामध्ये असावी आणि तिच्या स्थापनेमध्ये ॲलनह्यूमने पुढाकार घ्यावा असा सल्ला चर्चेदरम्यान डफरीन यांनी ॲलनह्यूमला दिला. त्यामुळे काँग्रेसच्या स्थापनेची कल्पना लॉर्ड डफरीन यांची होती असे वाटते. परंतु नंतरच्या घडामोडींवरून आणि त्यांनी केलेल्या काँग्रेस संदर्भातील वक्तव्यावरून ही कल्पना डफरीनची असल्याचे वाटत नाही. तर ती कल्पना ॲलनह्यूमचीच असावी असा निष्कर्ष निघतो. फार तर या कल्पनेला डफरीनने विरोध दर्शविला नसावा.

मद्रास येथे भरलेल्या थिऑसफिकल सोसायटीच्या बैठकीला उपस्थित असलेल्या भारतीय पुढाऱ्यांच्या बैठकीत काँग्रेसची मूळ कल्पना जन्माला आल्याची ॲनी बेझंट आपल्या एका ग्रंथात उल्लेख करतात. परंतु त्यांच्या या विधानाला कुठेही पुष्टी मिळत नाही.

यासंदर्भात दुसरा प्रश्न म्हणजे काँग्रेसच्या स्थापनेमागील ॲलनह्यूमची भूमिका काय होती. डॉ. एन. एल. चटर्जी व डॉ. आर. सी. मुजुमदार यांनी आपल्या ग्रंथांमध्ये सुरेद्रनाथ बॅनर्जी आणि त्यांच्या इंडियन असोसिएशनला एक पर्यायी संस्था म्हणून ॲलन ह्यूमने काँग्रेसची स्थापना केली. कारण सुरेद्रनाथ बॅनर्जीसारख्या जहाल

विचारांच्या ब्रिटीशविरोधी नेत्याकडे राष्ट्रीय संघटनेचे नेतृत्व जाण्यापेक्षा त्यांचे खच्चीकरण करून काँग्रेसला राष्ट्रीय संघटना बनविण्याची त्यांची भूमिका होती. परंतु याला प्रबळ पुरावा उपलब्ध होत नाही.

काँग्रेसच्या स्थापनेमागील ॲलनह्यूमची भूमिका सुरक्षा झडपेसारखे काम करावे अशी होती का? याला सुरक्षा झडपेचा सिद्धांत/ विवाद असे म्हटले गेले.

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेभोवती सुरक्षा झडप हा एक मजबूत व दीर्घकालीन विवाद गुंफण्यात आलेला आहे. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष असलेले व्योमेशचंद्र (उमेशचंद्र) बॅनर्जी यांनी असे मत व्यक्त केले कि, काँग्रेसचा विचार लॉर्ड डफरीनच्या मेंदूतून उत्पन्न झाला आणि त्यानेच ॲलनह्यूमला तसे करण्यास सांगितले. या विधानापासून या विवादाला सुरुवात झाली. ब्रिटीश वसाहतवादी शासनाविरुद्ध भारतीयांच्यात मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला होता. या असंतोषाचे पर्यवसन ब्रिटीश विरोधी रक्तरंजित उठावात किंवा स्फोटात झाले असते. भारतीय जनतेच्या या वाढत्या असंतोषाला घटनात्मक व शांततामय वाट करून देण्यासाठी सुरक्षा झडप बसविणे गरजेचे होते. म्हणून व्हाईसरॉय लॉर्ड डफरीन यांच्या अधिकृत मार्गदर्शनाखाली, त्यांच्या सल्ल्यानुसार व त्यांच्या पुढाकाराने ॲलनह्यूम व इतरांनी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना केली. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाल्यानंतर अशा उठावाची किंवा स्फोटाची शक्यता दूर झाली. कारण काँग्रेसच्या स्थापनेमुळे या असंतोषाचे पर्यवसान रक्तरंजित उठावात, क्रांतीमध्ये किंवा विस्फोटक परिस्थितीत न होता या असंतोषाला विधायक संवेधानिक वाट करून त्या असंतोषातील हवाच काढण्यात आली. हा या विवादाचा मूळ गाभा आहे. प्रत्येक गटाने काँग्रेसवर टीका करण्यासाठी आपापल्या सोयीनुसार या विवादाचा आधार घेतलेला दिसून येतो. काँग्रेस साम्राज्यवादाविषयी अगदी एकनिष्ठ नसली तरी नेहमी तडजोडीची भूमिका घेत असे. हा आपला आरोप सिद्ध करण्यासाठी जहालवादी या सिद्धांताचा आधार घेतात. तर राष्ट्रीय काँग्रेस सुरुवातीपासूनच राष्ट्रविरोधी होती हे दाखविण्यासाठी सनातनवादी लोक तिचा उपयोग करतात. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस खऱ्या अर्थाने क्रांतीला विरोध करणारी संस्था बनली कारण तिच्यात सुरुवातीलाच साम्राज्यवाद्यांनी या सिद्धांताचे बीज रोवले होते हे सिद्ध करण्यासाठी डावेही या सिद्धांताचा आधार घेतात. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या धर्मनिरपेक्षतेचा आणि म्हणून उभरत्या राष्ट्रवादाला विरोध करण्याचे काँग्रेसने कार्य केले. हा आरोप सिद्ध करण्यासाठी संघानेही या कथेचा आधार घेतला.

सुरक्षा झडप या सिद्धांताचा किंवा विवादाचा साकल्याने विचार करता असे लक्षात येईल की, तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड डफरीनचा राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत आशीर्वाद होता असे म्हणता येणार नाही. कारण तत्कालीन कागदपत्रातून किंवा काँग्रेसप्रती नंतरच्या अधिवेशनाबाबत लॉर्ड डफरीनने घेतलेल्या भूमिकेवरून ते स्पष्ट होते. ॲलनह्यूमच्या बाबतीत म्हणता येईल की, एखाद्या राष्ट्रीय स्वरुपाची संघटना असावी अशा स्वरूपाची तयारी किंवा विचार सन १८८५ पूर्वीपासूनच चालू होता. ॲलनह्यूमने फक्त यासाठी तयार झालेल्या परिस्थितीचा फायदा उठविला. ॲलनह्यूम जरी एक जागरूक साम्राज्यवादी होता, भारतातील वाढत्या असंतोषाने तो चिंतीत होता असे जरी आपण स्वीकारले तरी ॲलनह्यूमने आपल्या उदारमतवादाची छाप समकालीन भारतीयांवर पाडली होती. राष्ट्रीय काँग्रेसचे संस्थापक सदस्य स्वतः पराकोटीचे कर्तबगार व चारित्र्यसंपन्न अशा व्यक्ती होत्या. दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, न्या. रानडे, सुरेंद्रनाथ बॅनर्जी यासारख्या धीरोदात्त आणि बांधिलकी मानणाऱ्या नेत्यांनी ॲलन ह्यूमशी सहकार्य केले. कारण एका उच्च ध्येयाने प्रेरित झालेला एखादा

माणूस ज्याच्याशी सहकार्य करण्यात कोणताही कमीपणा नव्हता. शिवाय एक निवृत्त सनदी अधिकारी जर राष्ट्रीय काँग्रेसचा प्रमुख असेल तर राज्यकर्त्यांना तिच्याविषयी वाटणारा संशय कमी होईल. तसेच एका संभाव्य धोकादायक संघटनेवर सरकारमार्म त घाला घातला जाण्याची शक्यताही कमी होईल. हा सुज्ञपणा त्यापाठीमागे होता.

ॲलन ह्यूम व इतर उदारमतवादी इंग्रजांना राष्ट्रीय काँग्रेसचा उपयोग 'सुरक्षा झडप' असा करावयाचा असला तरी भारतीय नेत्यांना ॲलन ह्यूमचा उपयोग एक विद्युतवाहक असा करावयाचा होता. भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसच्या यशा-पयशावरून भारतीय आपल्या उद्देशांमध्ये सफल झाल्याचा प्रत्यय येतो.

**स्वयं अध्ययन प्रश्न - २ :**

१. २६ जुलै १८७६ रोजी ............ येथे 'इंडियन असोसिएशन' या संस्थेची स्थापना झाली.

अ) मुंबई ब) मद्रास

क) पुणे ड) कलकत्ता

२. मद्रासमध्ये सन १८८४ साली रंगय्या नायडू, सुब्रहमण्यम, सुब्बाराव पंतलु, एम. वीर राघवाचार्य यांनी ............. ची स्थापना केली.

अ) मद्रास महाजन सभा ब) इंडियन असोसिएशन

क) मद्रास नेटिव्ह असोसिएशन ड) मद्रास प्रेसिडेन्सी असोसिएशन

३. सन १८६६ साली इंग्लंडमध्ये ............. यांनी 'ईस्ट इंडिया असोसिएशन' ही संघटना स्थापन केली.

अ) दादाभाई नौरोजी ब) लोकमान्य टिळक

क) न्या. रानडे ड) सुरेंद्रनाथ बॅनर्जी

४. भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष ............. हे होते.

अ) दादाभाई नौरोजी ब) व्योमेशचंद्र बॅनर्जी

क) जॉर्ज यूल ड) सुरेंद्रनाथ बॅनर्जी

५. २८ डिसेंबर १८८५ रोजी ............. मध्ये भारतीय राष्ट्रीय सभेचे(कॉग्रेस) अधिवेशन पार पडले.

अ) मद्रास ब) कलकत्ता

क) मुंबई ड) पुणे

### ३.२.३ मवाळांचे योगदान (Contribution of Moderates 1885-1905) :

काँग्रेसच्या स्थापनेपासून देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत म्हणजे १८८५ पासून १९४७ पर्यंत भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसच्या कार्याची ढोबळ मानाने तीन कालखंडात विभागणी केली जाते. सन १८८५ पासून १९०५ पर्यंतचा मवाळ कालखंड, १९०५ पासून १९२० पर्यंतचा जहाल कालखंड आणि १९२० पासून १९४७ पर्यंतच्या

कालखंडाला गांधी युग म्हटले जाते. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे पहिल्या २० वर्षातील ब्रिटीशविरोधी धोरण हे 'नेमस्त' किंवा 'मवाळ' होते. म्हणून या कालखंडाला नेमस्त किंवा मवाळ कालखंड म्हटले जाते. दुसऱ्या शब्दातब्रिटीश सत्ताधाऱ्यांचे बोट धरून त्यांच्या कलाने भारताची प्रगती करु इच्छिणाऱ्या जेष्ठ नेत्यांच्या गटाला मवाळ असे म्हटले जाते आणि या मवाळ गटाचा प्रभाव असलेल्या कॉंग्रेसच्या कालखंडाला मवाळ किंवा नेमस्त कालखंड म्हटले जाते.

या कालखंडातील कॉंग्रेसच्या राजकारणावर दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनशा वाच्छा, व्योमेशचंद्र बॅनर्जी, सुरेद्रनाथ बॅनर्जी, न्या. रानडे यासारख्या नेत्यांचा प्रभाव होता. हे सर्व लोक उदारमतवादी आणि मवाळ राजकारणावर विश्वास ठेवणारे होते. त्यांना मवाळ ही संज्ञा यासाठीच देण्यात आली की, २० व्या शतकातील जहालवादी राजकारणी लोकांपासून त्यांना वेगळे समजले जावे. मवाळ म्हणजे काय हे सांगतांना न्या. महादेव गोविंद रानडे यांनी लिहिले होते, मवाळ याचा अर्थ अप्राय गोष्टींची खोटी आशा धरू नये आणि जे मिळविण्यासारखे आहे ते मिळविण्यासाठी चांगल्या व समझोत्याच्या मार्गाने समोर जाणे.

मानवांमधील समता, कायद्यासमोर समानता, नागरिक स्वातंत्र्याचा प्रसार, प्रतिनिधिक संस्थांचा विकास, धर्म व जात संबंधात पक्षपात न करणे अशा प्रकारची उद्दिष्ट्ये कॉंग्रेसच्या या उदारमतवादी व मवाळ नेत्यांसमोर होती. मवाळ नेते घटनात्मक मार्गाने आणि टप्याटप्याने जाण्यावर विश्वास ठेवीत होते.

मवाळवादी काळात कॉंग्रेसची राजकीय विचारसरणी प्रामुख्याने दोन प्रकारची होती.

१. राष्ट्रभावना व राजकीय जागृती करण्यासाठी प्रभावी लोकमत तयार करून त्यांना योग्य प्रकारचे शिक्षण देणे आणि त्यानंतर समान राजकीय प्रश्नांवर त्यांना एकत्र आणणे.

२. ब्रिटीश सरकार व ब्रिटीश लोकमत आपल्या बाजूला वळवून भारतीयांनी मागितलेल्या राजकीय सुधारणा सरकारला मान्य करण्यास भाग पाडणे.

**मवाळांची कार्यपद्धती :**

मवाळवादी कालखंडातील भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनातील ठराव आणि मवाळवाद्यांनी अवलंबिलेले धोरण यावरून मवाळांची कार्यपद्धती स्पष्ट होते.

**१. सनदशीर घटनात्मक मार्गावर विश्वास :**

या काळातील भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस वकील, पत्रकार, डॉक्टर, इंजिनिअर, साहित्यिक या मध्यमवर्गीय बुद्धीजीवींच्या ताब्यात होती. या वर्गाची विचारसरणी उदारमतवादी होती. घटनात्मक चौकटीतून सनदशीर मार्गाने चळवळ करण्यावर या काळातील नेत्यांचा विश्वास होता. लोकांना आधुनिक राजकारणाचे शिक्षण देणे, लोकांच्यात राजकीय जागृतीकरणे आणि विविध प्रश्नांवर संघटीत लोकमत तयार करणे हे मवाळवाद्यांनी आपले कार्य मानले. आपल्या मागण्या वसाहतवादी शासनाकडे त्यांनी घटनात्मक मार्गानीच मांडल्या.

**२. मागण्यांचा पुनरुच्चार :**

मवाळवादी कॉंग्रेसने आपल्या मागण्यांचा सतत पुनरुच्चार केला. सन १८८५ च्या मुंबईच्या अधिवेशनात

किंवा नंतर ज्या मागण्यांचे निवेदन सरकारला दिले त्या मागण्यांचा पुनरुच्चार मवाळांनी सातत्याने केला. त्यासाठी अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळ पाठविण्यावर त्यांचा भर होता. आपल्या मागण्यांचा सातत्याने पुनरुच्चार करून त्यामागण्यांचा त्यांनी सतत पाठपुरावा केला. या मागण्या प्रामुख्याने कायदेमंडळाचा विस्तार, त्यांना जास्तीचे अधिकार, त्यामध्ये भारतीयांना अधिकाधिक प्रतिनिधित्व, प्रशासकीय सेवेत भारतीयांना अधिकाधिक जागा, त्याकरिता असलेली परीक्षा लंडनबरोबर भारतात घेतली जावी अशा प्रकारच्या होत्या.

**३. टप्प्याटप्प्याने मिळणाऱ्या सुधारणांवर विश्वास :**

मवाळवाद्यांचा टप्प्याटप्प्याने मिळणाऱ्या सुधारणांवर विश्वास होता. पहिल्यांदा काही सुधारणा मिळाल्यास त्या पेलण्याएवढे आम्ही समर्थ झाल्यास पुढच्या आणखी सुधारणा मिळाव्यात. यामुळे भारतीयांना राजकीय शिक्षण मिळेल व त्यांच्यात राजकीय जागृती होईल अशी मवाळांची इच्छा होती. मवाळवाद्यांनी स्वराज्याची किंवा स्वशासानाची मागणी कधी जाहीरपणे केली नाही. मवाळवाद्यांचे ध्येय स्वराज्य नव्हते तर जनतेत राजकीय जागृती करण्याचे होते.

**४. ब्रिटीश सत्तेशी एकनिष्ठ :**

काँग्रेसचे तत्कालीन मावळवादी नेते इंग्रजांच्या इतिहासाने व संस्कृतीने अत्यंत प्रभावित झालेले होते. इंग्रजांची भारतातील सत्ता भारतीयांसाठी हितकारक आहे. त्यामुळे इंग्रजांची सत्ता भारतात रहावी असे मवाळांचे मत होते. भारतातील इंग्रजांची सत्ता शांततेचे व सुव्यवस्थेचे प्रतिक आहे आणि त्यांचे दीर्घकाळ भारतात राहणे आवश्यक आहे ही भावना व्यक्त करताना गोपाळ कृष्ण गोखले म्हणाले होते, इंग्रज नोकरशाही कितीही वाईट असो-आजव्यवस्था टिकवून ठेवण्यात फक्त इंग्रजांनाच यश मिळाले आहे आणि व्यवस्थेशिवाय उन्नती शक्य नाही. मवाळवाद्यांच्या मतानुसार भारताची उन्नती इंग्रजांच्याच नियंत्रणाखाली होऊ शकते. म्हणून मवाळवादी नेते ब्रिटीश राजपदाला एकनिष्ठ होते. इंग्रजी राज्य कमकुवत होऊ द्यावयाची मवाळांची तयारी नव्हती. ब्रिटीश राजपदाशी एकनिष्ठ राहणे हाच त्याचा राजकीय धर्म होता.

एकंदरीत या काळातील काँग्रेसची उद्दिष्ट्ये अस्पष्ट, संदिग्ध व अंधुक होती, त्यामध्ये स्पष्टता नव्हती. कारण ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या खच्चीकरणातून हा मवाळवादी वर्ग अजून बाहेर पडला नव्हता. शिवाय पाठीमागील सरंजामशाहीची भिती या मवाळ वर्गाला होती. त्यामुळे भारतीय राज्यकारभार करण्यास आपण समर्थ आहोत कि नाही या मानसिकतेतच मवाळवाद्यांचा सुरुवातीचा बहुतेक काळ गेलेला दिसून येतो. या काळातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस बाल्यावस्थेत होती. त्यामुळे तिची उद्दिष्ट्ये सिमित होती. घटनात्मक सनदशीर मार्गाचा अवलंब, घटनात्मक मार्गाची कार्यपद्धती, टप्प्याटप्प्याने जाण्यावर विश्वास, घटनात्मक चौकटीत चळवळ करण्यावर भर, ब्रिटीश राजपदाशी एकनिष्ठ, इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर, वार्षिक अधिवेशनावर, भाषणबाजीवर, ठराव संमत करण्यावर आणि इंग्लंडमध्ये शिष्टमंडळ पाठविण्यावर मवाळवाद्यांचा विश्वास होता.

राजकीय कार्यकर्त्यांमध्ये, स्वातंत्र्यप्रेमींमध्ये राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे, जनतेमध्ये राजकीय भावना निर्माण करून जात-पात, धर्म बाजूला ठेवून एकत्र येण्याची त्यांची मानसिकता तयार करणे, राजकीय व आर्थिक कार्यक्रमांच्या आधारावर भारतीयांना संघटीत करणे ही उद्दिष्ट्ये प्रामुख्याने मवाळवादी काँग्रेसची होती.

**मवाळवादी काँग्रेसचे कार्य :**

या काळातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस प्रामुख्याने बाल्यावस्थेत होती आणि त्यांची विचारसरणी वसाहतवादी ब्रिटीश सत्तेशी संघर्ष करण्याची नव्हती. मवाळांनी आपले कार्य व राजकीय चळवळ सनदशीर घटनात्मक मार्गाने चालविली होती.साहजिकच त्यांच्या राजकीय चळवळीची गती मंद होती.

काँग्रेसचे पहिले अधिवेशन २८ डिसेंबर १८८५ मध्ये मुंबई येथे व्योमेशचंद्र बॅनर्जी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या अधिवेशनात ठरल्याप्रमाणे दरवर्षी डिसेंबर महिन्यामध्ये काँग्रेसचे अधिवेशन देशाच्या वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या व्यक्तींच्या अध्यक्षतेखाली होत राहिले. त्यानुसार काँग्रेसचे दुसरे अधिवेशन दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली २८ डिसेंबर १८८६ रोजी कलकत्ता येथे पार पडले. या अधिवेशनासाठी ४२६ प्रतिनिधी हजर होते. काँग्रेसचे तिसरे अधिवेशन सर बद्रुद्दीन तय्यबजी यांच्या अध्यक्षतेखाली मद्रास येथे झाले, त्यासाठी ६०७ प्रतिनिधी हजर होते. चौथे अधिवेशन स्कॉटिश व्यापारी जॉर्ज यूल यांच्या अध्यक्षतेखाली अलाहाबाद येथे सन १८८८ मध्ये झाले. या अधिवेशनासाठी १२४८ प्रतिनिधी हजर होते.

मवाळ कालखंडात काँग्रेसची दरवर्षी ठरल्याप्रमाणे अधिवेशने होत गेली. काँग्रेसच्या प्रतिनिधींची संख्या उत्तरोत्तर वाढत गेली. एकंदरीत या पहिल्या मवाळ कालखंडातील काँग्रेसचे कार्य पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१. राजकीय जागृती :**

मवाळवादी कालखंडातील काँग्रेसचे हे फार महत्वाचे कार्य होय. मवाळवादी काँग्रेसने हिंदी जनतेला राजकीयदृष्ट्या जागृत करून त्यांच्यामध्ये राजकीय जागृती केली. भारतीय लोक राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक ऋणानुबंधाने एकमेकांशी बांधलेले आहेत. ही जाणीव या काळातील काँग्रेसने भारतीय जनतेत निर्माण केली. नागरी स्वातंत्र्य, लोकशाही, व्यक्तीस्वातंत्र्य, राजकीय हक्क या संकल्पना मवाळांनी जनतेपर्यंत पोहचविल्या आणि त्यातून राजकीय जागृती केली. त्यामुळे आधुनिक राजकारणाचे धडे मिळालेले अनेक राष्ट्रीय कार्यकर्ते या काळात तयार झाले. त्यांना राजकीय कल्पनांचा व सिद्धांताचा परिचय झाला. राष्ट्रीय जाणिवांची भारतीय जनतेत निर्मिती करण्याचे महत्वपूर्ण कार्य मवाळांनी केले.

**२. राष्ट्रवादाचा विकास :**

राष्ट्रवादाच्या उदयातूनच काँग्रेसची स्थापना झाली हे खरे असले तरी या काळातील राष्ट्रवाद हा बाल्यावस्थेत होता. मवाळवादी काँग्रेसने हा राष्ट्रवाद विकसित केला. लोकांच्यात राष्ट्रभावना निर्माण करून आपण भारत या एकाच राष्ट्राचे नागरिक आहोत ही भावना सर्व लोकांच्यात निर्माण केली. भारताच्या सर्व कानाकोपऱ्यातून जनतेचे प्रतिनिधी म्हणून आलेले काँग्रेसचे सदस्य एकत्र येऊन जनतेच्या अडीआडचणी, समस्या यावर चर्चा करीत. यातून आपण सर्व एक आहोत, आपणा सर्वांच्या समस्या, अडचणी एकच आहेत आणि भारतीयांच्या प्रगतीतील वसाहतवादी शासन हा एकमेव अडसर आहे ही भावना वाढीस लागली. हाच संदेश प्रत्येक जण आपापल्या बांधवापर्यंत पोहोचवू लागला. यातून हिंदी राष्ट्रवादाचा विकास होऊ लागला. अशा पद्धतीने मवाळांनी राष्ट्रवादाच्या प्रश्नाला भारतीय जीवनाशी जोडले.

**३. जनतेच्या मागण्या सरकारपुढे मांडल्या :**

भारतीयांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रातील मागण्या मवाळांनी प्रभावीपणे सरकारपुढे मांडल्या. त्यामध्ये प्रशासकीय सुधारणा, न्यायविषयक सुधारणा, शेतीविषयक सुधारणा, वैद्यकीय व आरोग्यविषयक सोयी-सवलती, आर्थिक सुधारणा, औद्योगिक सुधारणा, घटनात्मक सुधारणा यासारख्या जनतेच्या मागण्या सातत्याने सरकारपुढे मांडल्या. त्याचा सातत्याने पाठपुरावा केला. प्रसंगी या मागण्यांच्या पूर्ततेसाठी चळवळी केल्या, सरकारवर दबाव आणला. यातील काही मागण्या सरकारने मान्यही केल्या.

**४. परदेशातील भारतीयांच्या समस्यांकडे लक्ष :**

ब्रिटीशांच्या वसाहती सर्व जगभर पसरल्या होत्या. त्या वसाहतींमध्ये भारतीयांना मजूर म्हणून भारतातील वसाहतवादी शासनाने पाठविले होते. परंतु तेथे भारतीयांना तुच्छतेची वागणूक मिळत असे. भारतीयांवर अन्याय-अत्याचार केले जात. विशेषतः दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांना काळे म्हणून हिणवले जात. साहजिकच काँग्रेसने परदेशातील आपल्या देशबांधवावरील अन्याय दूर करण्याकडे लक्ष दिले. काँग्रेसच्या अधिवेशनात तसे ठराव पास करून सरकारचे त्या प्रश्नांकडे लक्ष वेधले.

**५. काँग्रेसचे इंग्लंडमधील कार्य :**

भारतातील धोरणात्मक निर्णय हे ब्रिटीश पार्लमेंटमध्ये होत असल्याने इंग्लंडमध्ये हिंदी सुधारणांसाठी अनुकूल जनमत बनविण्यासाठी आणि भारतीयांच्या समस्यांकडे इंग्लंडमधील लोकांचे लक्ष वेधण्याची गरज होती. त्यासाठी काँग्रेसने जाणीवपूर्वक इंग्लंडमध्ये कार्य केले. सन १८८७ मध्ये दादाभाई नौरोजींनी इंग्लंडमध्ये 'इंडियन रिफॉर्म असोसिएशन' नावाची संघटना स्थापन केली. सन १८८९ मध्ये 'ब्रिटीश कमिटी ऑफ दि इंडियन नॅशनल काँग्रेस' (British Committee of the India National Congress) नावाची काँग्रेसची शाखा इंग्लंडमध्ये काढण्यात आली. या मार्फत सभा, पत्रके, लिखाण या मार्गाने भारतीय मागण्यांबाबत इंग्लंडमधील जनतेला माहिती दिली. इंग्लंडमध्ये 'इंडिया' (India) नावाचे मासिक सुरु करून त्यातून भारतातील सत्य परिस्थिती इंग्लंडमधील जनतेसमोर मांडली. सन १८९३मध्ये ब्रिटीश संसदेत इंडियन पार्लमेंटरी कमिटी स्थापन करण्यात आली. यामध्ये अनेक ब्रिटीश संसद सदस्य सभासद होते. शिवाय काँग्रेसने हिंदी लोकांची वेळोवेळी शिष्टमंडळे इंग्लंडला पाठवून हिंदी जनतेच्या प्रश्नांकडे ब्रिटीश संसदेचे लक्ष वेधण्याचे कार्य केले.

**६. भारतमंत्र्याचे कार्यालय :**

सन १८५८ च्या कायद्याने कंपनीच्या भारतातील सत्तेचा शेवट होऊन भारताचा राज्यकारभार ब्रिटीश संसदेकडे आला. ब्रिटीश संसदेने त्यासाठी भारतमंत्री व त्याच्या मदतीला १५ सदस्यांचे एक 'भारत मंडळ' इंग्लंडमध्ये निर्माण केले आणि त्या सर्वांचा पगार भारतीय तिजोरीतून देण्याची तरतूद केली. तो खर्च जवळपास दरसाल ३५ लाख रुपये होता. ब्रिटीशांच्या अन्य वसाहतींसाठीही वसाहतमंत्री असत व त्यांचा खर्च ब्रिटीश संसदेकडून भागविला जात असे. तशाच प्रकारचा खर्च भारतमंत्री व त्याच्या कार्यालयावर ब्रिटीश संसदेने करावा अशी मागणी काँग्रेसने केली व तसा ठराव पहिल्याच अधिवेशनात काँग्रेसने केला. त्याचा पाठपुरावा काँग्रेस सतत करीत राहिली.

**७. भारतीयांची प्रशासकीय पात्रता सिद्ध केली :**

भारतीय लोक अज्ञानी असून त्यांना जबाबदार राज्यकारभार करता येणार नाही. असा समज इंग्रजांनी भारतीयांमध्ये निर्माण केला होता. त्याला तडा देऊन काँग्रेसने आपल्या कामगिरीतून प्रशासकीय पात्रता सिद्ध केली. मुळात काँग्रेसची कार्यपद्धती लोकशाही मार्गाने चालत होती. सन १८९२ चा कायदा राबविताना काँग्रेसने हे दाखवून दिले की, तो हिंदी लोकांची प्रतिनिधित्वाची गरज भागवू शकत नाही. काँग्रेस नेत्यांनी अभ्यासपूर्ण माहिती मिळवून राज्यकर्त्यांवर टीकास्त्र सोडले, राज्यकर्त्यांचे दोष चव्हाट्यावर मांडले आणि भारतीयांची कार्यक्षमता दाखवून दिली.

**८. राष्ट्रीय चळवळीची पायाभरणी :**

मवाळवादी काँग्रेसने राष्ट्रीय चळवळीच्या पायाभरणीचे महत्वाचे कार्य केले. त्यांनी भारतीयांमध्ये राजकीय जागृती केली. भारतातील खालावलेल्या आर्थिक परिस्थितीचा संबंध इंग्रजांनी चालविलेल्या आर्थिक शोषणाशी जोडला आणि हे सर्व वसाहतवादी धोरणामुळेच होत असल्याचे सप्रमाण दाखवून दिले. भारतातील बहुतांशी मोठ्या शहरांमध्ये काँग्रेसची अधिवेशने घेऊन व काँग्रेसच्या संघटनेचे जाळे मोठ्या प्रमाणावर पसरवून राष्ट्रीय चळवळीच्या गरजेची भारतीयांना जाणीव करून दिली. त्यामुळे राजकारणात व राजकीय साधने वापरण्यात जरी ते मवाळ असले तरी प्रत्यक्षात राजकीय व आर्थिक स्वरूप कसे विदारक आहे हे त्यांनी दाखवून राष्ट्रीय चळवळीची पायाभरणी केली.

**९. आर्थिक राष्ट्रवाद :**

मवाळवादी काँग्रेसने भारतातील खालावलेल्या आर्थिक स्थितीचे विवेचन केले. भारताच्या अधोगतीला वसाहतवादी शासनाची धोरणेच कारणीभूत असल्याचे दाखवून दिले. मवाळांनी वसाहतवादी शासनाची जाणीव जनतेमध्ये निर्माण करून आर्थिक राष्ट्रवादाची समीक्षा केली. दादाभाई नौरोजी, न्या. रानडे यांनी आर्थिक दृष्टीकोनातून भारताच्या अधोगतीची कारणमीमांसा केली. दादाभाई नौरोजींनी संपत्तीवहनाचा सिद्धांत मांडून आर्थिक राष्ट्रवादाला तात्विक आधार दिला. महत्वाचे म्हणजे भारतीय दारिद्र्याची सांगड वसाहतवादी धोरणांशी घालून भारतातील दारिद्र्य हे वसाहतवादी धोरणाचे प्रतिक असल्याचे म्हटले.

वरीलप्रमाणे मवाळ कालखंडात काँग्रेसने कार्य केले. याकाळात काँग्रेस बाल्यावस्थेत होती. राष्ट्रवादाचा विकास होत होता. राष्ट्रीय चळवळीची पायाभरणी होत होती. अशा काळात मवाळवादी काँग्रेसने केलेल्या कार्याला कमी लेखून चालणार नाही.

**काँग्रेसप्रती सरकारी रोख :**

ब्रिटीशांप्रती एकनिष्ठ राहूनही, मवाळ मार्गाचे अनुकरण करूनही काँग्रेसच्या मागण्यांना सरकारकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. सन १८८८ नंतर सरकारने काँग्रेसविरोधी भूमिका घेण्यास सुरुवात केली. काँग्रेसला राष्ट्रीय मानावयास किंवा काँग्रेस सर्व भारतीयांचे प्रतिनिधित्व करते म्हणून मानावयास नकार दिला. लॉर्ड डफरीनने म्हटले, 'काँग्रेस केवळ संकुचित अल्पसंखी असलेल्यांचे प्रतिनिधित्व करते.' (A microscopic minority of the people) तसेच काँग्रेसच्या मागण्यांना त्याने अंधारातील उडी असे नाव दिले. (Congress

demands as "big jump into the unknown) सन १८९०मध्ये सरकारी कर्मचाऱ्यांवर काँग्रेसमध्ये भाग न घेण्याचे बंधन घालण्यात आले. लॉर्ड कर्झनची मजल तर असे म्हणण्यापर्यंत गेली की,काँग्रेस आपल्या विनाशाकडे पडत-झडत जात आहे. शिवाय तो काँग्रेसच्या चळवळीला हवेचे बुडबुडे (Jetting of Gas) असे म्हणत असे.

**मवाळ काँग्रेसचे मूल्यमापन :**

मवाळांच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेस जवळपास २० वर्षे कार्यरत होती. याकाळातील मवाळांच्या कार्याचे मूल्यमापन करताना त्यामध्ये अनेक गुण-दोष दाखविले जातात. विशेषतः २०व्या शतकाच्या प्रारंभी जहालांनी काँग्रेसच्या मवाळ धोरणांवर आणि त्यांच्या कामगिरीवर टीका केली. त्यांनी जुन्या नेत्यांच्या धोरणाला 'राजकीय भिक्षावृत्ती' असे म्हटले. लाला लजपतरायनी 'संधिसाधू चळवळ' असे काँग्रेसचे वर्णन केले आणि त्याला पुस्ती जोडली की, यामुळे ढोंगीपणाला व देशद्रोहाला जास्तीत जास्त चालना मिळाली. काही लोकांना तर देशभक्तीचा व्यापार करण्याची संधी मिळाली. महात्मा फुलेंनी काँग्रेसवर आरोप करताना म्हटले, जोपर्यंत काँग्रेस नेते महार, मांग आणि शेतकरी यांच्या हिताची कळवळ बाळगत नाहीत तोपर्यंत राष्ट्रीय सभा ही खऱ्या अर्थाने राष्ट्रीय होऊ शकत नाही, एकात्म होऊ शकत नाही.

मवाळांविरुद्ध सर्वात मोठा आरोप 'ब्रिटीश राजपदाशी एकनिष्ठ' असणे हा होता. मवाळांचे असे समर्थन होते की, भारतात अजून राष्ट्रवाद विकसित झालेला नाही. भारत हे राष्ट्र बनण्याच्या प्रक्रियेत आहे. हे सर्व आरोप होण्यापाठीमागे सर्वात महत्वाचे म्हणजे मवाळांच्या हातून कोणतेही भरीव असे कार्य झाले नाही. त्यामुळेच तर लोकमान्य टिळकांनी काँग्रसला 'बेडकांच्या ओरडण्याची' उपमा दिली.

हे जरी खरे असले तरी राष्ट्रीय काँग्रेसने जी उद्दिष्ट्ये समोर ठेवली होती ती कितपत यशस्वी झाली, यावरून सुरुवातीच्या मवाळ काँग्रेसचे यशापयश मोजता येईल. सन १८८५ मध्ये अवघ्या ७२ प्रतिनिधींच्या सहाय्याने लहान प्रमाणात सुरु झालेल्या काँग्रेसचे रुपांतर पुढे २० व्या शतकात एका विशाल लोकप्रिय आंदोलनात झाले. त्याची पायाभरणी मवाळ काळातच झालेली दिसून येते. काँग्रेसच्या सुरुवातीच्या काळातील मवाळ नेते पराकोटीचे राष्ट्रवादी होते. दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, गोपाळ कृष्ण गोखले, दिनशा वाच्छा, सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे लोक समकालीन भारतीय समाजातील सर्वात प्रगतीशील आणि खरे देशभक्त होते. त्यांनी काँग्रेसला लोकप्रियता मिळवून देण्यासाठी परिश्रम घेतले. सुरुवातीला घटनात्मक मार्गाचा अवलंब केला व अतिरेकी जहाल मार्गाकडे दुर्लक्ष केले. ज्यामुळे काँग्रेस याकाळात जिवंत राहू शकली आणि आपली संघटनात्मक बांधणी तळागाळापर्यंत करू शकली. तसेच पुढील काळातील व्यापक चळवळीसाठी राष्ट्रवादाची पायाभरणी करू शकली.

मवाळ गटाचे सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे त्यांनी भारतीय समाजात राजकीय जागृती करून त्यांच्यात राजकीय जाणीवा निर्माण केल्या आणि राष्ट्रवादाचा विकास केला. वसाहतवादी शासनाचे शोषक स्वरूप जनतेसमोर मांडून वसाहतवादाच्या मुळावरच घाव घातला. त्यासाठी त्यांनी आर्थिक राष्ट्रवादाची मांडणी करून भारताच्या दारिद्र्याचे प्रमुख कारण वसाहतवादी शासन असल्याचे सप्रमाण दाखवून दिले. भारताचे दारिद्र्य हे ब्रिटीशांच्या आर्थिक शोषणाचा परिणाम असल्याचे सप्रमाण दाखवून देऊन वसाहतवादी व्यवस्थेच्या मुळावरच घाव घालण्याचा प्रयत्न केला.

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३ :**

१. सन १८८६मध्ये कलकत्ता येथे काँग्रेसचे दुसरे अधिवेशन ........... यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

अ) गोपाळ कृष्ण गोखले ब) व्योमेशचंद्र बॅनर्जी

क) जॉर्ज यूल ड) दादाभाई नौरोजी

२. सन १८८७मध्ये ........... यांनी इंग्लंडमध्ये 'इंडियन रिफॉर्म असोसिएशन' नावाची संघटना स्थापन केली.

अ) गोपाळ कृष्ण गोखले ब) लोकमान्य टिळक

क) दादाभाई नौरोजी ड) सुरेंद्रनाथ बॅनर्जी

३. सन १८८९ मध्ये 'ब्रिटीश कमिटी ऑफ दि इंडियन नॅशनल काँग्रेस'(British Committee of the India National Congress) नावाची काँग्रेसची शाखा .......... मध्ये काढण्यात आली

अ) इंग्लंड ब) भारत

क) अमेरिका ड) जपान

४. काँग्रेसने इंग्लंडमध्ये ........... नावाचे मासिक सुरु केले.

अ) इंडिया ब) इंडियन मिरर

क) बेंगाल गॅझेट ड) हिंदू पेट्रीयट

५. ........... काँग्रेसच्या चळवळीला हवेचे बुडबुडे (Jetting of Gas) असे म्हणत असे.

अ) लॉर्ड लिटन ब) लॉर्ड कर्झन

क) लॉर्ड रिपन ड) लॉर्ड डमरीन

## ३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**राष्ट्रवाद :** प्रत्येक व्यक्तीला आपल्या राष्ट्रबद्दल वाटणारे प्रेम किंवा असलेली निष्टा

**काँग्रेस :** लोकांचा समूह किंवा लोकांचे मंडळ

**संपत्तीवहन :** एका देशाकडून दुसऱ्या देशाकडे कोणताही भौतिक परतावा न मिळता होत असलेले संपत्तीचे वहन किंवा अपहरण

**स्वराज्य :** स्वतःचे राज्य किंवा आपले राज्य

**मवाळ :** ब्रिटीश सत्ताधाऱ्यांचे बोट धरून त्यांच्या कलाने भारताची प्रगती करू इच्छिछणाऱ्या जेष्ठ नेत्यांचा गट

**जहाल :** भारताच्या प्रगतीसाठी स्वावलंबनाचा, आत्मनिर्भरतेचा व जनजागृतीच्या मार्गाचा अवलंब करणारा गट

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न – १ :**

१. ब) ब्रिटिशांनी

२. ड) संपत्तीच्या अपहरणाचा

३. क) लॉर्ड लिटन

४. ड) लॉर्ड रिपन

**स्वयं अध्ययन प्रश्न – २ :**

१. ड) कलकत्ता

२. अ) मद्रास महाजन सभा

३. अ) दादाभाई नौरोजी

४. ब) व्योमेशचंद्र बॅनर्जी

५. क) मुंबई

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३ :**

१. ड) दादाभाई नौरोजी

२. क) दादाभाई नौरोजी

३. अ) इंग्लंड

४. अ) इंडिया

५. ब) लॉर्ड कर्झन

## ३.५ सारांश :

सन १८५७ चा उठाव वसाहतवादी शासनाने पाशवी दमननीतीने दडपून टाकला. त्यामुळे भारतीय समाज काही काळ त्या दमननीतीच्या दडपणाखाली दबला गेला. परंतु तो १८५७ च्या उठावाच्या स्मृती विसरला नाही. याचवेळी वसाहतवादी शासनाने वेगवेगळ्या मार्गांनी भारताचे अव्याहतपणे चालविलेले आर्थिक शोषण आणि त्यामुळे सतत दारिद्र्य, दुष्काळाच्या चक्रात भारतीय समाज सापडला. नवशिक्षित तरुणांनी या परिस्थितीचे अवलोकन करण्यास सुरुवात केली. त्यातून त्यांना वसाहतवादी सरकार भारतीयांचे मानसिक खच्चीकरण करून, भारतीयांना जास्तीत जास्त गुलामगिरीच्या बेड्यात अडकवून भारतीयांचे आर्थिक शोषण करीत असल्याचे जाणवले. भारतीयांना जखडून ठेवण्यासाठी वसाहतवादी शासनाने वापरलेल्या मार्गांची जाणीव या नवशिक्षितांना होऊ लागली. शिवाय सामाजिक–धार्मिक सुधारणा चळवळीमुळे भारतीय समाजातील दोष दूर होऊन भारतीय समाजात नवचैतन्य निर्माण झाले. वसाहतवादी शासन हे भारतीयांच्या अधोगतीचे प्रमुख कारण आहे. याची जाणीव भारतीयांना होऊ लागली. यातून भारतात मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय जाणीवा निर्माण होऊन भारतात राष्ट्रवादाचा उदय झाला.

सन १८८० च्या दशकापर्यंतचा काळ भारतीय राष्ट्रवादाच्या बिजारोपनाचा काळ होता. सर्वसामान्य जनतेमध्ये धुमसत असलेल्या प्रखर असंतोषाची तीव्र जाणीव भारतीय नेतृत्वाला होऊन त्याचे पडसाद भारतात वेगवेगळ्या प्रांतात स्थापन झालेल्या राजकीय संस्था-संघटनांमध्ये दिसून येते. या संघटनांची व्याप्ती स्थानिक असल्यामुळे आपल्या हक्कांसाठी अखिल भारतीय स्तरावर कार्य करणाऱ्या देशव्यापी संघटनेची गरज भारतीयांना जाणवू लागली होती. त्याचाच परिणाम म्हणजे सन १८८५ मध्ये स्थापन झालेली अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना. तेव्हापासून भारताच्या राजकीय जीवनात एक नवा कालखंड सुरु झाला. अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या नावाचे एक संघटनात्मक व्यासपीठ अस्तित्वात आले आणि या व्यासपीठावरूनच भारताचा स्वातंत्र्यसंघर्ष लढला गेला. या व्यासपीठावरूनच भारताला स्वातंत्र्य मिळाले.

काँग्रेसच्या सुरुवातीच्या काळातील मवाळ नेत्यांनी काँग्रेसला लोकप्रियता मिळवून देण्यासाठी परिश्रम घेतले. त्यांनी सनदशीर घटनात्मक मार्गाचा अवलंब करून अतिरेकी जहाल मार्गाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे काँग्रेस याकाळात जिवंत राहू शकली आणि आपली संघटनात्मक बांधणी करून राष्ट्रवादाची पायाभरणी करू शकली. पुढील काळात काँग्रेसने भारताच्या तळागाळातील लोकांपर्यंत राजकीय जाणीव निर्माण केली.पुढे जहालमतवाद्यांनी ब्रिटीश वसाहतवादी शासनाविरुद्ध निशस्त्र प्रतिकाराचा अवलंब करून काँग्रेसची संघटनात्मक बांधणी आणखी मजबूत केली.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय :

**ब) टिपा लिहा.**

१) इलबर्ट विधेयकावरील वाद

२) इंडियन असोसिएशन

३) सार्वजनिक सभा

४) सुरक्षा झडपेचा विवाद

५) मवाळवादी काँग्रेसचे इंग्लंडमधील कार्य

**क) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) राष्ट्रवादाच्या वाढीसाठी आवश्यक असलेले मुख्य घटक सांगा.

२) ब्रिटीशांचे वंशवादी धोरण स्पष्ट करा.

३) काँग्रेसच्या स्थापनेपूर्वीच्या बंगाल प्रांतातील राजकीय संस्था स्पष्ट करा.

४) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची उद्दिष्ट्ये सांगा.

५) मवाळ काँग्रेसचे मूल्यमापन करा.

**ड) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे स्पष्ट करा.

२) काँग्रेसच्या स्थापनेपूर्वीच्या भारतातील वेगवेगळ्या राजकीय संस्था व संघटनांचा आढावा घ्या.

३) मवाळांची कार्यपद्धती स्पष्ट करा.

४) मवाळवादी काँग्रेसचे कार्य स्पष्ट करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :

१. Chandra Bipin, "Rise and Growth of Economic Nationalism in India", Delhi, 1966.

२. Chandra Bipin, "Nationalism and Colonialism in Modern India", Orient Longman, Delhi, 1996.

३. Tara Chand, "History of Freedom Movement in India", Vol. I to IV, Government of India, New Delhi, 1972.

४. सरकार सुमित, 'आधुनिक भारत (१८८५-१९४७)', राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, १९९३.

५. डॉ. ग्रोव्हर बी. एल., डॉ. बेल्हेकर एन. के., 'आधुनिक भारताचा इतिहास', एस. चंन्द, २००२.

६. वैद्य सुमन, कोठेकर शांता, 'आधुनिक भारताचा इतिहास', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०००

७. चंद्र बिपन, 'इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स भारताचा स्वातंत्र्य संघर्ष', के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००३.

❍❍❍

घटक ४

# टिळक युग

## (Age of Tilak)

---

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ जहालमतवादाचा उदय (Rise of Extremists)

४.२.२ बंगालची फाळणी व स्वदेश चळवळ (Partition of Bengal and Swadeshi Movement)

४.२.३ होमरूल लिग चळवळ (Home Rule League Movement)

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर विद्यार्थ्यांना पुढील मुद्दे स्पष्ट होतील...

१. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेनंतर जहालमतवादाचा उदय कसा झाला, याचे स्पष्टीकरण देता येईल.

२. लोकमान्य टिळक यांचेकडे राष्ट्रीय सभेचे नेतृत्त्व कसे आले ते स्पष्ट करता येईल.

३. लोकमान्य टिळक यांचे कार्य समजून घेता येईल.

४. सन १९०५ ते १९२० या कालखंडातील भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील प्रमुख घटना सांगता येतील.

५. चतु:सूत्रीची संकल्पना स्पष्ट करता येईल.

६. स्वदेशी चळवळ कशी घडून आली ते सांगता येईल.

७. होमरुल चळवळीची पार्श्वभूमी, वाटचाल व परिणाम विशद करता येईल.

## ४.१ प्रास्ताविक :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतामध्ये जहालमतवादी नेतृत्व उदयास येऊ लागले. १८८५ साली राष्ट्रीय सभेची स्थापना झाली, त्यानंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळ मवाळ (नेमस्त) नेत्यांच्या नेतृत्वाखाली सुरू होती. मात्र त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल जनतेत व राष्ट्रीय सभेमध्ये असलेल्या जहालमतवादी गटात नाराजी दिसून येत होती. कारण मवाळ नेत्यांचा भर अर्ज, विनंत्या, निवेदने यावर होता. नवशिक्षित तरुण नेत्यांना असे वाटत होते की, ब्रिटिशांकडे अर्ज व विनंत्या करून कोणत्याही सुधारणा मिळणार नाहीत. ब्रिटिश साम्राज्यवादाची धोरणे पाहता, त्यांच्याकडून न्याय अथवा सुधारणा अपेक्षित ठेवणे चूक आहे. आपले हक्क आणि स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रत्यक्ष कृती करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय सभेमध्येही या विचारांचा प्रभाव दिसून येऊ लागला. स्वातंत्र्यासाठी आक्रमक भूमिका घेण्याचे विचार पुढे येत होते. अर्ज व विनंत्या करून काही साध्य होणार नाही, हा विचार स्वीकारल्यामुळे राष्ट्रीय सभेत जहालमतवादी विचारसरणी अधिक गतिमान झाली.

स्वातंत्र्य मागून मिळणारी गोष्ट नाही, यावर या गटाचा ठाम विश्वास होता. कारण ब्रिटिशांच्या शोषणाच्या धोरणांमुळे त्यांच्याकडून स्वातंत्र्याची अपेक्षा करणे म्हणजे मूर्खपणा आहे, असे जहालमतवादी नेत्यांचे मत होते. लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल व अरविंद घोष हे जहालमतवादी नेते म्हणून पुढे आले.या नेत्यांचे मत होते की, राष्ट्रीय सभा अधिक शक्तीशाली बनली पाहिजे. यासाठी त्यांनी बहुजन समाजात जागृती घडवून सामान्य जनतेला राष्ट्रीय सभेमध्ये सहभागी करून घेण्यावर भर दिला. त्याद्वारे भारतीय स्वातंत्र्य चळवळीला गती देण्याचा प्रयत्न करण्यात आला. टिळकांचे म्हणणे होते की, ''चळवळीचे चटके बसल्याशिवाय ब्रिटिश सत्ता वितळणार नाही.'' टिळकांनी ब्रिटिशांकडून होणाऱ्या अन्यायाची जाणीव जनतेला करून देण्यासाठी विविध व्यासपीठांवरून आपली निर्भीड मते मांडायला सुरुवात केली. अन्यायी व जुलमी सत्तेचे नाक दाबल्याशिवाय ती सत्ता तोंड उघडणार नाही, या विचारांवर विश्वास ठेवत त्यांनी स्वातंत्र्य चळवळीला अधिक आक्रमक व गतिशील बनवले. टिळकांनी यासाठी आपल्या चतु:सूत्रीचा (स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार) प्रभावी कार्यक्रम जनतेसमोर मांडला, जो मवाळ नेत्यांना मान्य नव्हता. सन १९०५ ते १९२० या कालखंडातील प्रमुख घडामोडींचा अभ्यास या संदर्भात महत्त्वाचा ठरतो.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ जहालमतवादाचा उदय (Rise of Extremists) :

**(अ) जहालमतवादाच्या उदयाची कारणे :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये सन १९०५ ते १९२० या कालखंडामध्ये जहालमतवाद्यांचे वर्चस्व होते. या जहालमतवादाचा उदयास खालील कारणे कारणीभूत होती.

**१) ब्रिटिशांनी भारताचे केलेले आर्थिक शोषण :**

ब्रिटिशांनी भारतामध्ये जे आर्थिक शोषणाचे धोरण अवलंबलेले होते. त्याविषयी मवाळ नेत्यांनी सतत आपले विचार मांडले होते. परंतु प्रत्यक्षात हे शोषण थांबविण्यासाठी काहीच केलेले नव्हते. दादाभाई नौरोजी, दिनशा वाच्छा व न्या. एम. जी. रानडे इत्यादी विचारवंतांनी ब्रिटिशाद्वारे केल्या गेलेल्या आर्थिक शोषणाचे अभ्यासपूर्ण विवेचन केलेले होते. भारतीयांच्या कल्याणापेक्षा ब्रिटिश आपल्या कारखानदारांची अधिक काळजी घेतात, हे स्पष्ट केलेले होते. भारतातून मिळविलेल्या पैशाच्या जोरावरच इंग्लंडमधील औद्योगिकीकरण झालेले होते. दादाभाई नौरोजींनी आपल्या 'आर्थिक नि:सारणाच्या सिद्धांता'द्वारे सिद्ध केले होते. भारतीय बाजारपेठ प्राप्त करण्यासाठी ब्रिटिशांनी पद्धतशीरपणे भारतातील उद्योगधंदे बंद पाडले. इंग्लंडहून आयात होणाऱ्या ब्रिटिश मालावरील जकात कर माफ केली व भारतामधून इंग्लंडमध्ये निर्यात होणाऱ्या मालावर अधिक कर लादला. त्यामुळे भारतीय उद्योगधंद्यांचा ऱ्हास घडून आला. भारत केवळ कच्च्या मालाचा उत्पादक आणि इंग्लंडमध्ये तयार झालेल्या पक्क्या मालासाठी हक्काची बाजारपेठ अशा स्वरुपाचे धोरण होते. ब्रिटिश भांडवलदारांनी नीळ, रबर, चहा, कॉफी इत्यादी उत्पादन भांडवल गुंतवून या उत्पादनातून ते भारतीय मजूरांचे खूप मोठ्या प्रमाणात शोषण करत होते. ब्रिटिशांच्या या आर्थिक शोषणाच्या धोरणामुळे नवतरुणांच्यामध्ये संतापाची भावना निर्माण झाली होती. याकरिता जहालमतवाद्यांनी स्वदेशी मालाचा स्विकार व परदेशी मालावर बहिष्काराचे धोरण स्विकारले.

**२) सन १८९२ च्या कायद्याने भारतीयांची केलेली निराशा :**

सन १८९२ मध्ये कौन्सिल कायदा अस्तित्वात आला. या कायद्यान्वये केंद्रीय व प्रांतिक कायदेमंडळात भारतीय सदस्यांच्या संख्येत वाढ केली होती व त्यांना काही हक्क दिले होते. परंतु वास्तवात या कायदेमंडळात सरकारी सदस्यांचे बहुमत होते व गव्हर्नर जनरलला अधिक अधिकार मिळालेले होते. त्यामुळे या कायद्याने भारतीय नेत्याचा भ्रमनिराश झाला. अंदाजपत्रकावर भारतीय सदस्यांना चर्चा करण्याचा अधिकार होता. परंतु त्यांना मतदान करण्याचा अधिकार नव्हता. ब्रिटिशांचे हे कूटील धोरण नेमस्त पुढाऱ्यांच्या लक्षात आले नाही. ब्रिटिशावरील नेमस्ताचा विश्वास अवास्तव आहे अशी भूमिका मांडून जहालमतवाद्यांनी नेमस्तावर टिका केली. लोकमान्य टिळक म्हणतात की, राजकीय हक्काबाबत आपण लढाच दिला पाहिजे. काँग्रेसमधील मवाळांना वाटते की, राज्यकर्त्यांचे हृदयपरिवर्तन करुन राजकीय हक्क प्राप्त करुन घेऊ. परंतु राज्यकर्त्यांवर दबाव आणल्याशिवाय हक्क मिळत नसतात. नेमस्तांच्या मवाळ धोरणामुळे काही साध्य होणार नाही, त्यासाठी जहलमतवाद्यांनी राष्ट्रीय कार्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले.

**३) प्लेगच्या साथीकडे ब्रिटिशांनी केलेले दुर्लक्ष :**

सन १८९६-९७ मध्ये पश्चिम महाराष्ट्रात प्लेगची साथ पसरलेली होती. प्लेगच्या साथीचे निवारण करण्यासाठी रँड या अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. पण त्यांनी प्लेगच्या साथीचे निवारण करताना भारतीयांच्या भावना पायदळी तुडवण्याचे काम केले. ब्रिटिश सैनिक प्लेगचे जंतू नष्ट करण्याच्या नावाखाली देवघरात प्रवेश करणे, सामानाची नासधूस करणे इत्यादी स्वरुपाचे प्रकार करु लागले. सनातनी वृत्तीच्या लोकांना हे सहन झाले नाही. प्लेगच्या साथीत लाखो लोक मृत्यू पावले. परंतु ब्रिटिश अधिकाऱ्यांनी या समस्येकडे गांभीर्याने पाहिले नाही. त्यामुळे सर्व सामान्य जनतेतील प्रक्षोभ वाढत गेला. या प्रक्षोभाची प्रतिक्रिया म्हणजेच पुण्यातील चाफेकर बंधूंनी २२ जुलै १८९७ रोजी रँड व ॲम्हर्स्ट या ब्रिटिश अधिकाऱ्यांचे खून केले. लोकमान्य टिळकांनी या घटनेचे समर्थन करत केसरीतून लिखाण केले. ब्रिटिश सरकारवर टिका केली म्हणून टिळकांना १८ महिन्यांची सक्त कारावासाची शिक्षा केली. या घटनेमुळे ब्रिटिशविरोधी जनमत संघटित होण्यास मदत झाली व जहालमतवादी विचारसरणीस पोषक वातावरण निर्माण झाले.

**४) भारतातील दुष्काळाबाबत ब्रिटिशांची उदासीनता :**

सन १८७५ ते १९०० या काळामध्ये भारतातील विविध भागामध्ये वारंवार दुष्काळ पडलेले होते. या दुष्काळाबरोबर रोगराई वाढलेली होती व लाखो लोक उपासमारीचे बळी ठरलेले होते. परंतु या दुष्काळाच्या काळातही ब्रिटिश अधिकारी शेतकऱ्यांकडून शेतसारा वसूल करत होते. उपासमारीकडे सरकारने पूर्ण दुर्लक्ष केलेले होते. ब्रिटिशांची दुष्काळनिवारण यंत्रणा पूर्णपणे निष्फळ झालेली होती. भयंकर दुष्काळी परिस्थितीकडे सरकारने दुर्लक्ष केल्याने सर्वसामान्यांच्यात प्रचंड रोष व चिड निर्माण होऊन हे लोक जहालवादी विचाराकडे आकर्षित झाले.

**५) लॉर्ड कर्झनचे प्रतिगामी धोरण :**

सन १८९८-१९०५ या काळात लॉर्ड कर्झन भारताचा व्हाईसरॉय म्हणून कार्यरत होता. भारतीयांबद्दल सहानुभूती नसणाऱ्या कर्झनला आपण भारतावर राज्य करण्यासाठीच जन्माला आलेलो आहोत, अशी त्याची भावना होती. कर्झन भारताला राष्ट्र मानायला तयार नव्हता व भारतीयांच्या चळवळीला तो 'हवेचे बुडबुडे' म्हणत असे. उच्चशिक्षित भारतीय हे प्रशासकीय क्षेत्रामध्ये नालायक आहेत अशी तुच्छ लेखणारी विधाने तो जाहीरपणे व्यक्त करीत असे. राष्ट्रीय सभा व राष्ट्रीयत्व यांचा शांतपणे मृत्यू घडून येईल, असे कर्झनचे म्हणणे होते. परंतु भारतामध्ये कर्झनच्या काळात त्याच्या विधानामध्ये विपरित परिस्थिती निर्माण झाली. कलकत्ता महापालिका कायदा (१८९९), सरकारी गुप्ततेचा कायदा विद्यापीठ कायदा (१९०४), बंगालची फाळणी (१९०५) या कर्झनच्या धोरणामुळे भारतीयांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला. कर्झनची भारतातील ७ वर्षांची एकतंत्री व अनियंत्रित राजवट म्हणजे शिष्टमंडळे, चुका आणि आयोग अशीच होती. त्यामुळे भारतीय जनमानसावर त्यांची तीव्र प्रतिक्रिया उमटली व जहालमतवाद्यांच्या उदयास मदत झाली.

**६) काँग्रेसची ध्येय धोरणे व कामगिरीबद्दल नाराजी:**

काँग्रेसने सुरवातीच्या १५-२० वर्षांच्या काळात अंगिकृत केलेल्या ध्येय-धोरणानुसार व प्रत्यक्ष

कार्यपद्धतीमुळे काही साध्य झाले नाही. काँग्रेसच्या एकूण कामगिरीबद्दल तरुणांमध्ये नाराजी होती. ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेवर आणि समानतेच्या तत्त्वावर नवतरुणांचा विश्वास राहिलेला नव्हता. शांततामय व घटनात्मक मार्गाने करावयाच्या आंदोलनामुळे काहीही साध्य होणार नाही. अर्ज, विनंत्या, निवेदने व शिष्टमंडळे पाठवून काहीही उपयोग होणार नाही. ब्रिटिश साम्राज्यवाद नष्ट करण्यासाठी लढाच द्यावा लागेल, असे जहालमतवादी गटाला वाटत होते. काँग्रेसच्या धोरणावर टिका करताना लाला लजपतराय म्हणतात की, काँग्रेस संघटना जनतेच्या चळवळीतून झालेली नाही. ती मूठभर लोकांची संघटना आहे. राष्ट्रकार्यासाठी कोणतेही कष्ट सोसण्याची त्यांची तयारी नाही आणि असे नेतृत्व निर्माण झाल्याखेरिज व ही चळवळ जनतेपर्यंत पोहोचविल्या खेरीज भारतीयांना न्यायअधिकार मिळणार नाहीत. लोकमान्य टिळक काँग्रेसवर टिका करताना लिहितात की, ''काँग्रेस खुशामतखोरांचा मेळावा आणि काँग्रेसची अधिवेशने म्हणजे, सुट्टीतील मनोरंजन आहे.'' अशाप्रकारे या काळात काँग्रेसवर फार मोठी टिका जहाल मतवादाकडून करण्यात आली.

**७) वाढत्या पाश्चात्यीकरणास विरोध :**

प्रारंभीच्या काँग्रेस नेत्यांवर पाश्चात्य विचारांचा पगडा होता. यापैकी काही नेत्यांना पाश्चिमात्य धर्म, साहित्य, राजकीय संस्था, भाषा व संस्कृती ही भारतीयापेक्षा श्रेष्ठ आहे असे वाटत होते. भारतीय जीवनावर व विचारावर पडत असलेला पाश्चात्यांचा प्रभाव नव्या नेतृत्त्वाला चिंतित करणारा होता. ख्रिश्चन धर्माने व उपयुक्ततावादाच्या तत्त्वज्ञानाने भारतीय धर्म व विचारासमोर मोठे आव्हान निर्माण केलेले होते. यावेळी आपल्या देशाबद्दल व धर्माबद्दल स्वाभिमान निर्माण करण्याचे कार्य स्वामी विवेकानंद, स्वामी रामकृष्ण परमहंस, रविंद्रनाथ टागोर व लाला लजपतराय इत्यादी व्यक्तींनी केले. हिंदी राष्ट्रवाद हा हिंदू संस्कृतीचेच एक अंग आहे असे सर्वांना वाटत होते. शिकागोच्या जागतिक व्यासपीठावरुन स्वामी विवेकानंदांनी हिंदूधर्माचे श्रेष्ठत्व प्रतिपादन केले.

राजकीय वर्चस्वाचा उपयोग ब्रिटिश लोक धार्मिक वर्चस्वासाठी करुन घेत आहेत, हे लक्षात आल्यावर भारतात असंतोष निर्माण होऊ लागला. लोकमान्य टिळकांनी गणपती उत्सव व छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्सव सुरू केला. बंगालमध्ये अरविंद घोष, बिपिनचंद पाल यांनी जहालमतवाद्यांचा प्रचार केला. राष्ट्रकार्य म्हणजे धर्मकार्य, ईश्वरकार्य असे सांगून अरविंद घोषांनी आपल्या विचारांना आध्यात्मिक बैठक प्राप्त करुन दिली. बंगालमध्ये त्यांनी काली उत्सव सुरू केला व त्याच्या माध्यमातून हिंदूंना संघटित करण्याचा प्रयत्न केला. बंकिमचंद्र चॅटर्जी व रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्यामधून नवतरुणांना लढाऊ राष्ट्रवादाची प्रेरणा मिळाली. या काळात बंकिमचंद्राच्या 'आनंद मठ' कादंबरीतील 'वंदे मातरम्म' हे गीत फार लोकप्रिय झाले. वि. दा. सावरकरांनी लिहिलेल्या 'भारतीय इतिहासाची सहा सोनेरी पाने' व '१८५७ चे स्वातंत्र्य समर' या ग्रंथांनी जहाल राष्ट्रवादाला प्रोत्साहन देण्याचे कार्य केले.

**८) तत्कालीन आंतरराष्ट्रीय घटनांचा प्रभाव :**

१९ व्या शतकाच्या अखेरिस वसाहतवादाच्या विरोधी ज्या चळवळी किंवा लढे जागतिक पातळीवर लढले गेले त्या घटना भारतातील जहाल राष्ट्रवादाच्या उदयास प्रेरक ठरलेल्या दिसतात. इजिप्त, इराण, तुर्कस्थान व रशियामधील नवसमाजाच्या निर्मितीसाठी झालेल्या राष्ट्रवादी चळवळीमुळे भारतीयांच्यामध्ये नवीन

आकांक्षा निर्माण झाल्या. यामध्ये चिनी लोकांनी परकीय दडपशाहीविरुद्ध केलेले बॉक्सर बंड, इजिप्तमधील राष्ट्रवाद्यांनी पाश्चात्य सत्तांच्या दडपशाहीविरुद्ध चालवलेली चळवळ, आर्यलंडमधील ब्रिटिशविरोधी सिनकिन चळवळ इत्यादींचा समावेश होता. सन १८९६ मध्ये अडोवाच्या लढाईत ॲबिसिनियाने इटालीचा पराभव केला. सन १९०४-०५ मध्ये जपानने खंडप्राय रशियाचा पराभव केला. परिणामी युरोपीय राष्ट्रे अजिंक्य आहेत व आशियायी राष्ट्रे मागास आहेत या कल्पनेला तडा गेला. वरील आंतरराष्ट्रीय घटनांमुळे ब्रिटिशांचा पराभव करु शकतो असा आत्मविश्वास जहालमतवाद्यांना वाटू लागला.

**९) भारतीयांना दिली जाणारी अपमानास्पद वागणूक :**

ब्रिटिश लोक स्वतःला वांशिकदृष्ट्या उच्च मानत होते. ब्रिटिशांचा धर्म व संस्कृती भारतीयांपेक्षा श्रेष्ठ आहे असा त्यांचा दावा होता. भारतीय लोकांना परदेशातही अपमानास्पद वागणूक दिली जात होती. दक्षिण आफ्रिकेत भारतीय जनतेवर अनेक निर्बंध लादलेले होते. शिवाय भारतीयांना भयंकर वर्णद्वेषाचा सामना करावा लागत होता. ब्रिटिश वसाहतीत जाण्यासाठी भारतीयांना प्रलोभने दाखवली जात. तेथे गेल्यावर त्यांच्याकडून गुलामाप्रमाणे कामे करुन घेत. विशिष्ठ शाळा, दवाखाने, उपहारगृहे व रेल्वेच्या प्रथम श्रेणीच्या डब्यामध्ये भारतीयांना प्रवेश नव्हता. एखाद्या समान गुन्ह्याबद्दलसुध्दा ब्रिटिश व भारतीयांना भिन्न - भिन्न शिक्षा दिल्या जात. या वंशश्रेष्ठत्वाच्या अहंकाराचा परिणाम म्हणून तरुणांचा गट जहालवादाकडे आकर्षित झाला.

**१०) जहालमतवादाच्या उदयास वृत्तपत्रांनी दिलेली प्रेरणा :**

जहालमतवादाच्या उदयात तत्कालीन अनेक वृत्तपत्रांनी महत्त्वाची भूमिका बजावली. लोकमान्य टिळक यांनी, 'मराठा' व 'केसरी' आणि बिपिनचंद्र पाल यांनी 'न्यू इंडिया' या वृत्तपत्रातून ब्रिटिशांच्या धोरणावर कठोर टिका केली. लाला लजपतराय यांनी 'ट्रिब्यून' या वृत्तपत्राच्या माध्यमातून पंजाबमधील तरुणांच्यापर्यंत जहाल राष्ट्रवादाचा संदेश पोहचवण्याचे काम केले. बंगालमध्ये 'बंगाली', 'संध्या', 'युगांतर' व 'हिंदूपेट्रियट' या वृत्तपत्रांनी जहालमतवादाच्या प्रसाराचे काम केले. हिंदू पेट्रियटने तर ब्रिटिश निळ बागायतदारांच्याकडून मजूरांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले. याशिवाय किशोरीचंद्र मित्र यांनी 'इंडियन फिल्ड', गिरीषचंद्र घोष यांनी संपादित केलेले 'बंगाली' व 'नवगोपाळ' अशा वृत्तपत्रांनी व साप्ताहिकांनी जहाल राष्ट्रवादाच्या प्रसाराचे कार्य केले.

**११) बंगालची फाळणी :**

लॉर्ड कर्झन याने सन १९०५ मध्ये बंगाल प्रांताचा विस्तार क्षेत्रफळ १ लाख ९० हजार चौ. मैल, लोकसंख्या ८ कोटी व प्रशासकीय गैरसोयींचे कारण पुढे करुन पूर्व बंगाल व पश्चिम बंगाल अशी फाळणी केली. पश्चिम बंगालमध्ये बहुसंख्य हिंदू होते व पूर्व बंगालमध्ये बहुसंख्य मुस्लीम संख्यांक होते. हिंदू-मुस्लीम यांच्यात या फाळणीच्या माध्यमातून फूट पाडणे व भारतीय स्वातंत्र्य चळवळीला खिळ घालणे हा खरा हेतू या फाळणीच्या मागे होता. 'फोडा व झोडा' या नितीचा अवलंब करुन हिंदू-मुस्लीम अशी फूट पाडण्याच्या कर्झनच्या धोरणाला तीव्र विरोध झाला. फाळणीच्या विरोधात वंगभंग आंदोलन सुरू केले. या चळवळीच्या माध्यमातून जहालमतवाद्यांनी स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य व राष्ट्रीय शिक्षण या चतुःसूत्रीचा कार्यक्रम घोषित केला. विदेशी वस्तूच्या बहिष्काराला व्यापक स्वरूप प्राप्त झाले व संपूर्ण भारतातून याला प्रतिसाद मिळाला.

त्यामुळे स्वदेशी वस्तूचा वापर वाढला. राष्ट्रवादी तरुणांनी क्रांतिकारी गुप्तसंघटना स्थापन केल्या. बंगालच्या फाळणीविरुद्ध निर्माण झालेली जनचळवळ व तिच्या माध्यमातून उदयास आलेला प्रखर जहाल राष्ट्रवाद ब्रिटिशांच्या नजरेत भरणारा व नोंद घेण्यासारखा ठरला.

**(ब) जहालमतवाद्यांची विचार प्रणाली (Ideology of Extremists) :**

ब्रिटिश सरकारच्या दडपशाही आणि बंगालच्या फाळणीमुळे जहालमतवादी विचारधारा अधिक ठळकपणे समोर आली. ब्रिटिशांच्या 'फोडा आणि राज्य करा' या धोरणामुळे भारतीय तरुण जहालमतवादाकडे आकर्षित झाले. राष्ट्रीय सभेच्या निष्क्रियतेमुळे जहालमतवाद्यांनी स्वतंत्र राजकीय गट स्थापन केला आणि त्यांनी स्वराज्यासाठी लढण्याचा निर्धार केला.

**जहालमतवादी विचारसरणीचे प्रमुख मुद्दे :**

**१) स्वराज्याची मागणी :** जहालमतवादी केवळ घटनात्मक सुधारणा नव्हे, तर संपूर्ण स्वराज्यासाठी आग्रही होते. लोकमान्य टिळक म्हणत, ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच.''

**२) स्वदेशी चळवळ :** स्वदेशी वस्त्र, साहित्य आणि उद्योग यांचा प्रचार करून ब्रिटिश उत्पादनांवर बहिष्कार टाकण्याचा आग्रह धरण्यात आला.

**३) अहिंसात्मक पण संघर्षशील आंदोलन :** बिपिनचंद्र पाल यांनी जाहीर केले की, 'संपूर्ण निर्भेळ स्वातंत्र्य हे आमचे ध्येय आणि निःशस्त्र प्रतिकार हे आमचे साधन आहे.'

**४) राष्ट्रीय शिक्षण :** ब्रिटिश शिक्षण व्यवस्थेच्या जोखडातून मुक्त होऊन भारतीय संस्कृती आणि विचारसरणीला प्रोत्साहन देणारे शिक्षण महत्त्वाचे मानले गेले.

**५) धार्मिक राष्ट्रवाद :** अरविंद घोष यांनी अध्यात्मिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. राष्ट्र ही मातृदेवता आहे आणि तिच्या मुक्तीसाठी प्रत्येकाने लढा दिला पाहिजे.

**६) परकीय नियंत्रणातून मुक्ती :** जहालमतवादी भारतीय स्वायत्तता आणि परकीय निर्बंध मुक्त प्रशासन यावर भर देत. ते ब्रिटिश प्रशासनाला स्वराज्याचे पर्याय मानत नव्हते.

**मवाळ व जहाल यांतील फरक :**

मवाळ नेते घटनात्मक सुधारणा, अर्ज-निवेदने, आणि शिष्टमंडळे यांवर भर देत होते, तर जहालमतवादी प्रत्यक्ष संघर्ष आणि जनजागृतीद्वारे स्वराज्य मिळवण्याच्या बाजूने होते. टिळक, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल यांनी जनतेला ब्रिटिश शासनाच्या विरोधात संघटित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रचार केला. लाला लजपतराय म्हणत, ''कोणतेही हक्क आपणास मागून मिळत नाहीत, ते तीव्र आंदोलन करून हिसकावून घेतले पाहिजेत.''

थोडक्यात जहालमतवाद्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीला एक नवे वळण दिले. त्यांनी स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य या चतुःसूत्री कार्यक्रमाद्वारे स्वातंत्र्याच्या लढ्याला वेग दिला. त्यांची विचारधारा भारतीय स्वातंत्र्यासाठी निर्णायक ठरली आणि त्यांच्याच मार्गाने पुढे स्वातंत्र्य संग्राम अधिक तीव्र झाला.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. आर्थिक नि:सारणाचा सिद्धांत .......... यांनी मांडला.

अ) लोकमान्य टिळक ब) दादाभाई नौरोजी

क) म. गो. रानडे ड) लाला लजपराय

२. बंगालची स्थापना ............. साली करण्यात आली.

अ) १९०३ ब) १९०४

क) १९०५ ड) १९०६

३. ........... व्हाइसरॉयच्या काळात बंगालची फाळणी झाली.

अ) लॉर्ड कर्झन ब) लॉर्ड हेस्टिंग्ज

क) लॉर्ड डलहौसी ड) लॉर्ड हार्डिंग्ज

४. १९०७ सालच्या सूरत येथील कोंग्रेस अधिवेशनाचे ............. हे अध्यक्ष होते.

अ) लोकमान्य टिळक ब) डॉ. रासबिहारी बोस

क) गोपाळकृष्ण गोखले ड) डॉ. सुरेन्द्रनाथ

५. अरविंद घोष यांनी ......... कॉलेजची स्थापना केली.

अ) पूना ब) बंगाल राष्ट्रीय

क) मद्रास ड) मुंबई

### ४.२.२ बंगालची फाळणी व स्वदेश चळवळ :

**(Partition of Bengal and Swadeshi Movement) :**

**(अ) बंगालची फाळणी (१९०५) :**

भारतीय राजकारणाला व स्वातंत्र्य चळवळीला कलाटणी देणारी घटना म्हणून बंगालची फाळणी ओळखली जाते. राष्ट्रीय सभा मवाळ विचारसरणीकडून जहालवादाकडे झुकण्याच्या संक्रमणावस्थेत भारताचा व्हाईसरॉय म्हणून लॉर्ड कर्झन सन १८९९ मध्ये भारतात आला. या काळात भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाला एक निश्चित दिशा मिळत होती. कारण ब्रिटिशांनी दुष्काळ व प्लेगच्या बिकट परिस्थितीत जो सहानुभूती शून्य व्यवहार केला त्या विरुद्ध संतप्त प्रतिक्रिया उमटत होत्या. त्यात कर्झनने या काळात अनेक प्रतिगामी कायदे करुन जहाल मतवादी विचारसरणीला एकप्रकारे खतपाणीच घातले होते. ब्रिटिशविरोधी जनतेतील असंतोष वाढत आहे हे लक्षात येताच लॉर्ड कर्झनने 'फोडा व राज्य करा' या नीतीचा अतिशय खूबीने वापर करुन हिंदू व मुस्लीम यांच्यात फूट पाडण्याच्या उद्देशाने प्रशासकीय कारण पुढे करून जुलै १९०५ मध्ये बंगालच्या फाळणीची घोषणा केली. बंगालच्या फाळणीचे नैमित्तिक कारण: बंगाल प्रांताची प्रचंड लोकसंख्या व क्षेत्र

फळही प्रचंड असल्याने प्रशासकीय सोयीचे कारण पुढे करुन बंगालची फाळणी करण्यात येत आहे असे घोषित केलेले होते. बंगाल प्रांतात या वेळी बंगाल, बिहार व ओरिसा प्रदेशांचा समावेश होता. लोकसंख्या ७ कोटी ८० लाख इतकी होती. कर्झनने जुलै १९०५ मध्ये या प्रांताची विभागणी करुन जुन्या बंगाल प्रांतातील १५ जिल्हे आसाम व चितगाव जोडून नवीन पूर्व बंगाल प्रांत निर्माण करण्याचा निर्णय घेतला. या नवीन प्रांताचे क्षेत्रफळ १ लाख ६५४० मैल होते व लोकसंख्या ३ कोटी १० लाख होती. यामध्ये १ कोटी ८० लाख मुस्लीम व १ कोटी २० लाख हिंदू लोकसंख्या होती. पश्चिम बंगालमध्ये जून्या बंगालचा पश्चिम भाग, बिहार, ओरिसा इत्यादीचा समावेश होता. याचे क्षेत्रफळ १ लाख ४१५८० चौ. मैल इतके होते. या नवीन प्रांतामध्ये एकून ५ कोटी ४० लाख इतकी लोकसंख्या होती. त्यापैकी ४ कोटी २० लाख हिंदू व ९० लाख मुस्लिमांची संख्या होती. बंगालच्या फाळणीसाठी प्रशासकीय कारण जरी पुढे करण्यात आलेले असले तरी खरे कारण बंगाल प्रांतात वाढत असलेला राष्ट्रवाद हेच होते. बंगालमधील वाढता जहाल राष्ट्रवाद ब्रिटिशांना धोकादायक वाटत होता. हिंदू-मुस्लीम अशी फूट पाडून मुस्लीम समुदायाला स्वातंत्र्य चळवळीपासून दूर ठेवणे हा प्रमुख उद्देश होता.

**बंगालच्या फाळणीला झालेला प्रखर विरोध (वंगभंग आंदोलन) :**

बंगालच्या फाळणी विरोधात बंगालबरोबरच भारततही प्रखर असंतोष निर्माण झाला. बंगाली जनता व वृत्तपत्रांनी फाळणीविरोधी प्रखर टिका केली. 'स्टेटमेंट' या वृत्तपत्राने फाळणीविषयी लिहिले की, ब्रिटिशांकित भारताच्या इतिहासात पूर्वी कधीही झाली नसेल इतकी लोकमताची बेदकार पायमल्ली सध्याचे शासन उघडपणे करीत आहे. सुरेंद्रनाथ बॅनर्जी व दादाभाई नौरोजी या राष्ट्रसभेच्या नेत्यांनी ही ब्रिटिश सरकारवर अतिशय कडाडून टिका केली. इंग्लंडमधील 'डेलीन्यूज' व 'गार्डियन' या वृत्तपत्रांनी ही या फाळणीचा निषेध केला. फाळणी विरोधात बंगालमधील जनतेने फार मोठे आंदोलन सुरू केले. सभा, मिरवणूका, निषेध मोर्चे व विदेशी मालावर बहिष्कार अशा स्वरुपाचे हे आंदोलन होते. हे आंदोलन 'वंगभंग आंदोलन' म्हणून देखील ओळखले जाते.

१६ ऑक्टोबर १९०५ हा फाळणीचा दिवस बंगालमध्ये राष्ट्रीय शोक दिन म्हणून पाळण्यात आला. यानंतर फाळणीला असलेला जनतेचा विरोध अधिक तीव्र झाला. ऑक्टोबर १९०५ पर्यंत २००० पेक्षा जास्त निषेध सभा घेण्यात आल्या. या आंदोलनाचे नेतृत्त्व सुरेंद्रनाथ बॅनजी, रवींद्रनाथ टागोर, बिपिनचंद्र पाल, आनंद मोहन बोस यांनी केले. लोकमान्य टिळकांनी या आंदोलनाला पाठिंबा देऊन स्वदेशी व बहिष्काराचे आंदोलन करण्यावर भर दिला. वंगभंग आंदोलनाची प्रखरता पाहून ब्रिटिश सरकारने हे आंदोलन दडपशाहीच्या मार्गाने थोपविण्याचा प्रयत्न सुरू केला. लॉर्ड कर्झन नंतर व्हॉईसरॉय म्हणून लॉर्ड मिंटो आला. त्याने ही फाळणी रद्दची मागणी फेटाळून लावली. १९११ मध्ये लॉर्ड हॉर्डिग्ज व्हाईसरॉय म्हणून भारतात आला. लॉर्ड हॉर्डिग्ज भारतात आला तेंव्हा युरोपमध्ये पहिल्या महायुद्धाचे वातावरण तयार झालेले होते. युद्धप्रसंग निर्माण झाला तर भारताची मदत लागेल, परंतु भारतामधील हा असंतोष असाच राहिला तर भारतीयांची मदत मिळवणे शक्य होणार नाही असे त्याला वाटत होते. भारतीयांचा असंतोष कमी करण्यासाठी व संभाव्य मदतीच्या धोरणातून १२ डिसेंबर १९११ रोजी दिल्ली येथे ब्रिटिश युवराजाच्या सन्मानार्थ भरलेल्या कार्यक्रमात बंगालची फाळणी रद्द केल्याची घोषणा केली.

**फाळणीचा परिणाम :**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील अतिशय महत्त्वाची घटना म्हणून बंगालच्या फाळणीचा उल्लेख केला जातो. मवाळवादी धोरण वंगभंग आंदोलनामुळे मागे पडले व जहालवादाचे महत्त्व अधोरेखित झाले. भारतातील मुस्लिम समुदाय या आंदोलनामुळे स्वातंत्र्य चळवळीच्या प्रवाहात येण्यास मदत झाली. स्वदेशी व बहिष्कार आंदोलनामुळे स्वदेशी वस्तूच्या उत्पादनात वाढ झाली व परकीय मालाचा भारतातील खप मोठ्या प्रमाणात कमी झाला. ब्रिटिश सरकारने वंगभंग आंदोलन दडपशाहीने फोडण्याचा प्रयत्न केल्यामुळे ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवरचा भारतीय लोकांचा खास करुन मवाळवाद्यांचा विश्वास कमी झाला. सुरत अधिवेशन (सन १९०७) व राष्ट्रीय सभेतील फूट: दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कलकत्ता (१९०६) अधिवेशनात स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार व स्वराज्य हे जहाल मतवाद्यांचे कार्यक्रम मवाळानी मान्य केल्यामुळे जहालांना आनंद झाला होता. परंतु कोणत्याही परिस्थितीत राष्ट्रीय काँग्रेसला जहालमतवादी होऊ द्यायचे नाही असा निर्णय फिरोजशहा मेहता सारख्या नेत्यांनी घेतलेला होता. जहालमतवादी नेते अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल, लोकमान्य टिळक व लाला लजपतराय यांनी मवाळांशी तडजोड न करता राष्ट्रसभेला जहाल मार्गी बनविण्याचा निर्णय घेतला होता. जहालमतवादी व मवाळवादी या दोन्ही गटांनी काँग्रेसवर ताबा मिळविण्याचा छूपा प्रयत्न चालविला होता. परंतु मवाळ व जहाल यांच्यातील हा मतभेद सूरत अधिवेशनापर्यंत टोकाला गेला आणि राष्ट्रसभेत उभी फूट पडली.

सन १९०७ मध्ये राष्ट्रसभेचे अधिवेशन नागपूरला घेण्याचे ठरलेले होते. परंतु लोकमान्य टिळकांच्या नेतृत्त्वाखालील जहालमतवादी गट महाराष्ट्रात प्रभावी असल्याने नागपूरला अधिवेशन झाले तर लोकमान्य टिळकांना अध्यक्षपद देण्यास जहालमतवादी भाग पाडतील अशी भिती त्यांना वाटत होती. त्यामुळे मवाळांनी फिरोजशहा मेहता यांचा बालेकिल्ला असलेल्या सूरत येथे अधिवेशन घेण्याचा निर्णय घेतला. मवाळ व जहालांच्या प्रखर मतभेदाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रसभेचे २३ वे अधिवेशन डिसेंबर १९०७ रोजी सूरत येथे संपन्न झाले. अधिवेशनाच्या अध्यक्षपदी डॉ. रासबिहारी घोस यांच्या नावाला सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी अनुमोदन दिले. परंतु जहालांनी त्याला विरोध दर्शविला. लोकमान्य टिळक बोलण्यास उभे राहिले असता मवाळांनी त्यांना बोलण्यासही विरोध दर्शविला. त्यामुळे संतप्त झालेल्या जहाल मतवाद्यांनी सभामंडपात गोंधळ घातला. जहालमतवादी नेते लाला लजपतराय नुकतेच तुरुंगातून बाहेर आलेले होते. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी त्यांना अध्यक्षपद द्यावे व कलकत्ता अधिवेशनात मांडलेल्या चतु:सूत्रीस सुरत अधिवेशनात मान्यता मिळावी हा उद्देश जहालांचा होता. लोकमान्य टिळकांनी यामध्ये तडजोड करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना यश आले नाही. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीही टिळकांना भाषण करण्यास मज्जाव केल्याने जहाल मतवाद्यांनी सभा मंडपात गोंधळ घातला. मवाळांनी स्वतंत्र बैठक घेऊन जहालगटाची राष्ट्रसभेतून हकालपट्टी केल्याची घोषणा केली. परिणामी, मवाळ व जहाल अशी उभी फूट पडली. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी फुटीच्या संदर्भात जाहीर आनंद व्यक्त केला. कारण ब्रिटिशांना होणारा काँग्रेसचा विरोध आता नाहीसा होईल, असा त्यांचा अंदाज होता. टिळकांनी वारंवार प्रयत्न करून ही मवाळ गटाने जहालांच्याबरोबर युती करण्याचे टाळले. कारण भारत मंत्री मोर्ले यांनी गोपाळ कृष्ण गोखले यांना राजकीय सुधारणांचे आश्वासन दिलेले होते. सूरत अधिवेशनापासून ते सन १९१६ च्या लखनौ अधिवेशनापर्यंत जहालमतवाद्यांचा गट काँग्रेसबाहेरच होता.

### ४) स्वदेशी चळवळ (Swadeshi Movement) :

जहाल मतवादी विचारसरणीच्या उदयाने भारतीय स्वातंत्र्य चळवळीस एक वेगळी दिशा मिळाली. लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, बिपिन चंद्र पाल व अरविंद घोष यांच्या विचारांचा जहाल मतवाद्यांच्या गटावर विशेष प्रभाव होता. सन १८८५ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेवर मवाळवादी विचारसरणीच्या नेत्याचा प्रभाव २० वर्षे होता. अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळे व निवेदने देण्यावर त्यांचा विश्वास होता. परंतु केलेले अर्ज, विनंत्या करणे किंवा ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास ठेवून आपणास राजकीय किंवा इतर तत्सम स्वरुपाच्या सुधारणा मिळतील यावर जहालमतवाद्यांचा विश्वास नव्हता. ब्रिटिशाबरोबर प्रत्यक्ष संघर्ष केल्याशिवाय काहीही मिळणार नाही. यावर जहाल गट ठाम होता. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सनदशीर मार्गाच्या ऐवजी 'जशाच तसे' या तत्त्वाचा स्वीकार केला पाहिजे व विविध वृत्तपत्रे, भाषणे यामधून जहालवादाचा प्रचार व प्रसार करण्यावर भर दिला. स्वातंत्र्य चळवळीसाठी आंदोलनात्मक मार्ग स्विकारला व त्यासाठी स्वदेशी, बहिष्कार राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतु:सूत्रीचा प्रत्यक्षकृती कार्यक्रम जाहीर केला. याला टिळकांची 'चतु:सूत्री' म्हणून देखील ओळखले जाते.

प्रस्तुत उपघटकामध्ये स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतु:सूत्रीच्या माध्यमातून लाल, बाल, पाल यांच्या नेतृत्त्वाखाली जी स्वदेशी चळवळ घडून आली त्यासंबंधी अभ्यास करावयाचा आहे. स्वदेशी किंवा बहिष्कार हा जहालमतवाद्यांचा आंदोलनात्मक संघर्षाला जो मार्ग होता तो परस्पर पूरक स्वरुपाचा होता. बंगालच्या फाळणी नंतर स्वदेशी व बहिष्काराच्या माध्यमातून भारतीय स्वातंत्र्य चळवळीला अधिक गती व चालना मिळाली. स्वदेशी आंदोलनामुळे स्वातंत्र्य चळवळ अधिक गतीमान होण्यास मदत झाली. लोकमान्य टिळकांच्या नंतर महात्मा गांधींनी ही स्वदेशी व बहिष्कार या तत्त्वाचा आपल्या आंदोलनात्मक चळवळीमध्ये स्थान दिलेले होते.

#### १) चतु:सूत्रीची संकल्पना :

लाल, बाल, पाल या जहालमतवाद्यांनी भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीसाठी जो आंदोलनात्मक संघर्षाचा मार्ग स्विकारला त्यामध्ये स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीचा समावेश होता.

**अ) स्वराज्य :**

लोकमान्य टिळकांनी 'स्वराज्य' हा शब्द फार व्यापक अर्थाने वापरला. स्वराज्याचा अर्थ परकीय सत्तेच्या नियंत्रणापासून मुक्ती असा सामान्यतः घेण्यात येतो. परंतु स्वराज्य इतकाच मर्यादित अर्थ टिळकांना अभिप्रेत नव्हता. स्वराज्य ही एक नैतिक राष्ट्रीय आवश्यकता आहे, या दृष्टिकोणातून स्वराज्याकडे पाहिले पाहिजे असे टिळकांचे मत होते. भारतीय संस्कृतीच्या सांस्कृतिक मूल्यांशी 'स्वराज्य' हा शब्द संबंधित आहे. अशी टिळकांची धारणा होती. स्वराज्य म्हणजे आपले राज्य. प्रजेच्या प्रतिनिधी मार्फत चालणारे राज्य, ब्रिटिशांच्या राज्यास स्वराज्य कधीच म्हणता येणार नाही, असे टिळकांचे मत होते. कारण राज्यकर्ते परधर्मी व परदेशी आहेत. त्यांचे हितसंबंध त्यांच्या स्वत:च्या देशात गुंतलेले आहेत. स्वराज्याचा 'प्रजासत्ताक राज्य' हा अर्थ त्यांनी लोकांच्या पर्यंत पोहचवला.

**ब) स्वदेशी :**

भारतात तयार होणाऱ्या वस्तूंचा वापर भारतीयांनी करावा आणि भारताबाहेर जाणाऱ्या पैशाचा ओघ स्वदेशी माल वापरून थांबवावा ही स्वदेशीची संकल्पना होती. स्वदेशीमुळे खेड्यातील उद्योगधंद्यांना संरक्षण मिळेल व त्यांचा विकास होईल. राजकीय, औद्योगिक, सामाजिक, नैतिक व सांपत्तिक या सर्वच दृष्टीने स्वदेशीची चळवळ आवश्यक आहे, असे टिळकांचे मत होते.

**क) बहिष्कार :**

बहिष्कार म्हणजे कोणतीही विदेशी वस्तू न वापरणे होय. ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकून त्या द्वारे ब्रिटिशांची आर्थिक व्यवस्था खिळखिळीत करणे. शिवाय ब्रिटिशांना प्रशासनात असहकार्य करुन आडवणूक करणे.

**ड) राष्ट्रीय शिक्षण :**

ब्रिटिश शिक्षणपद्धती त्रि:सत्व, ध्येय शून्य आहे, ती फक्त कारकून तयार करते असे टिळकांचे मत होते. भारतातील शिक्षण पद्धती लॉर्ड मेकॉलेने सुरू केली होती व ती भारतीयांच्या विचारांशी सुसंगत नव्हती म्हणून राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठी देशभर शाळा, महाविद्यालये उघडण्याची योजना मांडण्यात आली. यातून भारतीय संस्कृतीशी व मूल्यांशी सुसंगत असे शिक्षण देण्यात यावे असा उद्देश होता. राष्ट्रीय शिक्षणामुळे राजकीय व सामाजिक जाणीव निर्माण झाली पाहिजे. स्वत:च्या पायावर उभा राहणारा देशाभिमानी तरुण निर्माण झाला पाहिजे असे टिळकांचे मत होते.

**२) लोकहितवादींनी स्वदेशीची मांडलेली संकल्पना :**

गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी आधुनिक महाराष्ट्रातील राष्ट्रवादी विचाराचे प्रवर्तक म्हणूनते ओळखले जातात. लोकहितवादींनी सन १८४८ पासून भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर' या साप्ताहिकातून लिहिण्यास सुरुवात केली. समाजाला उद्देशून लिहिलेल्या त्या पत्रांना 'शतपत्रे' असे संबोधले जाते. लोकहितवादींनी भारतातील आर्थिक दारिद्र्याचे विवेचन करताना स्वदेशीची संकल्पना प्रथम मांडली. राजकीय पारतंत्र्यामुळे भारताची आर्थिक स्थिती अतिशय दयनिय झाली आहे. ब्रिटिश सरकार आपल्या सत्तेच्या अंकुशाने गुलामगिरी लादत आहे. परदेशी माल व मेळावे ही आपल्या देशावरील मोठी संकटे आहेत असे लोकहितवादींना वाटत होते. ही संकटे दूर होण्यासाठी त्यांनी राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. ७ जानेवारी १८५६ रोजी 'ज्ञानप्रकाश'मध्ये लिहिलेल्या लेखात स्वदेशी संदर्भात ते म्हणतात की, रयतपासून जो पैका उत्पन्न होतो तो स्वदेशीय राष्ट्रात पुन्हा त्याच लोकास परत जातो ही गोष्ट इंग्रजांच्या राज्यात घडत नाही. यामुळे इंग्रजी मुलुखाला रयतेची नेहमी जिकीर असते व नेहमी त्याची दुर्दशा असून पैशाची चणचण असते. सर्व बरे आहे, पण पैसा नाही व रोजगार नाही हे त्यांचे म्हणणे दर गावी ऐकतो. दरसाल पैसा कमी होऊन विलायत पाहतो. सबब रयतेमध्ये कमी होतो. असा पर्याय स्वराज्यात नसतो. लोकांची दुर्दशा होऊन दीनासारखेला चार झाले आहेत. ते स्थिती बदलून स्वातंत्र्य सौख्य भोगतील असे थोरांनी करीत जावे ही विनंती.

लोकहितवादीं स्वदेशी धंद्याच्या उद्धारार्थ कशी चळवळ करावी याचे विवेचन करताना म्हणतात की, तूर्त

दारिद्र फोडण्यास एक उपाय असा आहे की, ब्राह्मण लोकांनी आपल्या मुर्खपणाच्या समजूती सोडाव्या आणि केवळ कारकून आणि भट हे दोन रोजगार आम्ही करु, असे म्हणू नये. यादेशात आणखी पुष्कळ रोजगार आहेत व तेही दिवसेंदिवस इंग्रज घेत चालले, सावकारी, शेतकरी वगैरे इंग्रज करु लागले. हे रोजगार आपल्या लोकांनी करावे, कोणते म्हणाल तर काय, कापड, सुरी, कात्री, लाकडी सामान, घड्याळे, चाबूक, यंत्रे इत्यादी पुष्कळ इंग्रज खपवितात, ही सर्व आपले लोकांनी करावयास शिकावे व येथे जो माल खपणार नाही तो दुसऱ्या देशात घेऊन जावा आणि तेथे विकावा. अनेक देश आहेत त्यांचा शोध करावा व इंग्रजांचे देशाचे सामान बंद करावे. किंबहुना आपले सामान त्यांना द्यावे. विलायती कापड घेऊ नये. जो इकडे उत्पन्न होईल तितका घ्यावा. यास्तव आपल्यास जाडी मोठी कपडे नेसाव्यास लागली तर काय चिंता आहे? परंतु आपल्या देशाचे संरक्षण करावे असे झाले म्हणजे बहुत रोजगार राहतील. आपण आपल्या देशात कापड वगैरे तयार करुन इतर देशात जाऊन व्यापार करु लागलो म्हणजे आपली सांपत्तिक स्थिति सुधारेल. लोक सुखी होतील. लोकहितवादी यांच्या प्रमाणे व स्वदेशी संदर्भात दादाभाई नौरोजी, न्या. म. गो. रानडे, गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका इत्यादी नेत्यांनीही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या स्वदेशीचे महत्त्व पटवून देण्याचे कार्य केले.

**३) लोकमान्य टिळक व स्वदेशी चळवळ :**

स्वदेशी म्हणजे आर्थिक स्वावलंबन. स्वदेशात तयार झालेली वस्तू वापरणे म्हणजे देशाची आर्थिक स्थिती बळकट करणे. ब्रिटिशांच्या औद्योगिक आणि व्यापार विषयक धोरणामुळे भारताला आर्थिक हालाखी प्राप्त झाली असे टिळकांनी प्रतिपादीत केले होते. स्वदेशीच्या पुरस्कारामागे ब्रिटिशांची अर्थव्यवस्था कोलमडून टाकण्याचा उद्देश होता. इंग्लंडचे औद्योगिकरण पूर्ण झालेले होते. त्यामुळे तेथील वस्तू कमी किंमतीत भारतात विकल्या जात होत्या. परिणामी भारतातील लघुउद्योग बंद पडून हजारोंच्या संख्येने कारागीर बेकार झालेले होते. बेकार लोकशेतीकडे वळल्याने शेतीवरही बोजा पाडलेला होता.

भारतात उत्पादित होणाऱ्या वस्तूंच्या स्पर्धेत आपल्या वस्तू टिकाव्यात म्हणून ब्रिटिश सरकारने भारतातील वस्तूंवरील कर वाढवला व इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या वस्तू व सूतावरील जकात काढून टाकली. यावर उपाय म्हणून टिळकांनी जनतेला देशी कापड व देशी वस्तू वापरण्याचे आवाहन केले.

सन १८९६ मध्ये ब्रिटिश सरकारने इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या सुतावरील जकात रद्द केली व इंग्लंडमधून येणाऱ्या कापडावर व भारतामधील गिरण्यात तयार होणाऱ्या सर्व प्रकारच्या कापडावर शेकडा पाचऐवजी शेकडा साडे तीन टक्के जकात लावली. मँचेस्टरच्या कापडाला उत्तेजन देण्यासाठी आता गरीब लोकांना लागणाऱ्या देशी कापडावरही साडे तीन टक्के जकात द्यावी लागणार होती. पूर्वी इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या कापडावर व सूतावर शेकडा पाच टक्के जकात होती. आकारली जाणारी ही जकात देशी सुतापैकी फक्त दोन नंबरच्या वरील सूतावर व कापडावरच होती. परंतु १८९६ नंतर देशी कनिष्ठ दर्जाच्या जाड सुतावरही शेकडा साडेतीन टक्के जकात लावली गेली. त्यामुळे इंग्लंडमधील गिरणी कारखानदारांना जाड कापडाच्या बाबतीतही भारतीय गिरणीवाल्यांच्या बरोबर स्पर्धा करण्याची संधी मिळाली. उच्च दर्जाचे कापड वापरणाऱ्या श्रीमंताच्यावरील कर कमी झाला व स्वदेशी जाड कापड वापरणाऱ्या गरीबावर नवा कर बसला. या अन्यायकारक कायद्याचे परिणाम विषद करताना ११ फेब्रुवारी १८९६ च्या केसरीच्या लेखात टिळक म्हणतात की, देशी गिरण्यात निघणाऱ्या जाड कापडावर शेकडा ३% कर बसविण्यात कोणतेही योग्य कारण नव्हते. केवळ मँचेस्टरवाल्यांच्या आग्रहाखातर हा कर

बसविला आहे व तो अर्थशास्त्राप्रमाणे गैरवाजवी आहे. बारीक कापड वापरणाऱ्या सुखवस्तू लोकास कापडाच्या किंमतीवर शेकडा ५।।% कर द्यावा लागत होता. तो आता ३।।% द्यावा लागणार आणि जाड कापड वापरणाऱ्या गरीब लोकांस मुळीच कर नव्हता तो शेकडा ३।।% होणार. म्हणजे श्रीमंतावरचे करांचे ओझे कमी करुन गरीब लोकांवर लादण्याचे हिंदुस्थान सरकारने ठरविले आहे. तेव्हा सर्व लोकास आमची आग्रहपूर्वक अशी विनंती आहे की, त्यांनी आपल्या हातून या अन्यायाचा होईल तितके करुन प्रतिकार करण्यास झटले पाहिजे. हिंदुस्थानचे नवे राज्य हिंदुस्थानच्या कल्याणाकरिता चालवायचे आहे. मँचेस्टरचे कल्याणाकरिता नाही. कायदा कितीही कडक असला तरी जर तो अन्यायाचा असेल तर त्याचा प्रतिकार करण्यास कडक उपायांचीच योजना केली पाहिजे.

स्वदेशी चळवळीच्या संदर्भात सुशिक्षित मध्यमवर्गाची जबाबदारी मोठी आहे असे टिळकांचे ठाम मत होते. जे लोक गरीब आहेत किंवा ज्यांना दोन वेळच्या जेवणाची भ्रांत आहे ते विदेशी वस्तू, कपडे इत्यादी वापरू शकत नाहीत. म्हणून सुशिक्षित मध्यम वर्गास आवाहन करताना ते म्हणतात की, हिंदुस्थानचे राज्य लोकांच्या कल्याणासाठी चालविले जावे असे वाटत असेल तर देशी वस्तू व कपडे वापरण्याचा निश्चय करा. पुढे ते असेही म्हणतात की, तुमच्या अंगात जर काही माणुसकी असेल, सरकारने व इतर लोकांनी केलेला अन्याय जर तुम्हाला खपत नसेल अथवा त्यामुळे अंत:करणास जर चटका बसला असेल तर तुम्ही देशी कापड वापरण्याचा निश्चय करुन मँचेस्टरवाल्यांचा त्यांनी केलेल्या अन्यायाबद्दल सूड घेतल्या शिवाय राहू नका. याकाळात निर्माण झालेला स्वदेशी चळवळी संदर्भात सुशिक्षित वर्गाला विदेशी माल स्वस्त आहे. त्यामुळे तो वापरण्यास काही हरकत नाही असा युक्तिवाद होता. या धोरणावर टिका करताना टिळक म्हणतात की, हे पुस्तकी किडे हे विसरतात की देश कालपरत्वे व्यावहारिक शास्त्राची तत्त्व बदलत जातात. टिळक पुढे असे ही म्हणतात की, स्वदेशी माल महाग असल्यामुळे जास्त पैसे द्यावे लागून नुकसान होत असले तरी तो सर्वच पैसा देशात राहतो आणि भांडवलशाहीच्या दृष्टीने तो उपयोगी पडू शकतो. त्यामुळे उद्योगधंदे वाढून कालांतराने वस्तूच्या किंमती घटतात याकडेही लक्ष दिले पाहिजे. यासाठी नुकसान सोसूनही स्वदेशी वस्तूच वापराव्यात. त्यामुळे ग्रामीण उद्योगधंद्यास उत्तेजन मिळून शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या कमी होईल आणि दुष्काळाची तीव्रताही कमी होऊ शकेल. परकीय राज्यकर्ते केव्हांही त्याचाच फायदा पाहणार ते काही देशी धंद्यांना संरक्षण देणार नाहीत. स्वदेशी धंद्याना उत्तेजन देण्यासाठी जनतेनेच स्वदेशीचा पुरस्कार केला पाहिजे. असे त्यांना वाटत होते.

राष्ट्रसभेचेने ते दिनशॉ वाच्छा यांनी स्वदेशी बहिष्कार चळवळीवर आक्षेप घेतले होते. त्यांच्या मते, स्वदेशी चळवळ जरी देशाभिमानाची असली तरी ती आकाशाला गवसणी घालणारी आहे. कारण सर्वांनी देशी कापड वापरावयाचे ठरविल्यास भारतात गिरण्या कमी असल्यामुळे आवश्यक तेवढ्या प्रमाणात कापड उपलब्ध होऊ शकणार नाही. वाच्छा यांच्या आक्षेपांना उत्तर देताना टिळक लिहितात की, अर्थशास्त्रात माल कसा उत्पन्न होतो याबद्दल जे नियम दिले आहेत त्यानियमात कोणत्याही मालाचा खप वाढला. म्हणजे तो माल जास्त उत्पन्न होऊ लागतो असे लिहिले नाही का? देशी कापड वापरण्याबद्दलची चळवळ जसजशी जास्त पसरेल त्याप्रमाणे देशी मालास जास्त मागणी येईल आणि तशी मागणी आली म्हणजे आज जो माल येथे होत नाही तो येथे तयार करण्याकडे व्यापारी लोकांचे लक्ष लागेल.

लोकमान्य टिळकांनी स्वदेशीचा वापर एक राजकीय शस्त्र म्हणून वापरकरण्याची योजना मांडलेली होती. स्वत: या धोरणाचा स्विकार करत वर्तमान पत्रासाठी स्वदेशी कागद वापरणे. पैसा फंड स्थापन करणे, देशी धंद्यांना मदत करणे, स्वदेशी वस्तूंचे प्रदर्शन भरविणे व स्वदेशी सहकारी भांडारांना मदत करणे इत्यादी मार्गांचा अवलंब केला.

**४) अरविंद घोष व स्वदेशी चळवळ :**

ब्रिटिशांच्या आर्थिक शोषणाच्या धोरणामुळे त्यांचे राज्य भारतात टिकून राहिले असे अरविंद घोष यांचे मत होते. ब्रिटिशांच्याकडून होणारे आर्थिक शोषण थांबविण्यासाठी स्वदेशी व बहिष्काराचा स्विकार केला पाहिजे. ब्रिटिश मालावर आपण जर बहिष्कार टाकला तर त्यांचे आर्थिक व राजकीय जीवन संपुष्टात येईल. इंग्लंडमध्ये उत्पादित होणारा कोणताही माल भारतीयांनी वापरू नये. असे झाले तर ब्रिटिश लोक अडचणीत येतील, असे अरविंद घोष यांना वाटत होते. ५ ऑगस्ट १९०५ रोजी कलकत्ता येथील टाऊन हॉलमध्ये हाजारोंच्या सभेत जोपर्यंत फाळणी रद्द होत नाही तोपर्यंत ब्रिटिशांचा माल कोणीही विकत न घेण्याचा ठराव पास केला.

**५) स्वदेशी चळवळीचे स्वरूप :**

बंगालच्या फाळणीनंतर वाराणसी येथे भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनात स्वदेशी व बहिष्कार चळवळीला पाठिंबा जाहिर केला. त्यामुळे लोकमान्य टिळकांनी ज्या दृष्टिकोणातून स्वदेशी चळवळीचा आग्रह धरलेला होता त्याला अधिक बळ मिळाले. भारतातील प्रमुख शहरांमध्ये व बंगालमधील जाहीर सभा व मोर्च्यातून स्वदेशी व बहिष्कारांचा संदेश देण्यात आलेला होता. स्वदेशी व बहिष्कार ही आंदोलने परस्परपूरक स्वरूपाची होती. एकीकडे परदेशी वस्तूची होळी करावयाची व दुसरीकडे परदेशी मालावर बहिष्कार म्हणजे स्वदेशीचा स्वीकार करावयाचा. परदेशी मालाच्या दुकानाच्या समोर निदर्शने करणे व स्वदेशीच्या वापराचा प्रचार करणे, स्वदेशी मालाच्या उत्पादनाला व विक्रीला चालना देणे हे स्वदेशी चळवळीचे स्वरूप होते. संपूर्ण भारतामधून बंगालच्या फाळणीला प्रतिक्रिया म्हणून स्वदेशी चळवळीला मोठा प्रतिसाद मिळाला.

भारतात तयार झालेली कपडे लोकांनी वापरण्यास सुरुवात केली. विविध धंदेवाईकांनी खाद्य वस्तूसाठी परदेशी साखर न वापरण्याची प्रतिज्ञा केली. लॉंड्रीचा व्यवसाय करणाऱ्या परीट लोकांनी परदेशी कपडे धुण्यास नकार दिला. काचेच्या परदेशी बांगड्या व इतर काचेच्या वस्तू वापरणे स्त्रियांनी बंद केले. विद्यार्थ्यांनी परदेशी कागद वापरणे सोडून दिले व वकिलांनी परदेशी मालाचा व्यवसाय करणाऱ्या लोकांचे न्यायालयीन दावे स्विकारणे बंद केले. बारीसालसारख्या शहरातील व्यापाऱ्यांनी परदेशी कपडा कवणे स्वखुशीने बंद केले. स्वदेशी मालाच्या उत्पादनाला व विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्तरातून अनेक प्रयत्न झाले. स्वदेशी चळवळीला पाठिंबा देणाऱ्या व्यक्तींना मात्र ब्रिटिशांच्या दडपशाहीला सामोरे जावे लागले.

**६) स्वदेशी चळवळीचा परिणाम :**

१) स्वदेशी चळवळीमुळे स्वदेशी वस्तूची मागणी वाढली.

२) परदेशी कापड खरेदी करणे बंद केल्याने इंग्लंडमधील कापड गिरण्यावर प्रतिकूल परिणाम झाला.

३) स्वदेशी वस्तूंचा वापर होऊ लागल्याने देशी ग्रामोद्योगधंद्यांना चालना मिळाली.

४) भारताच्या विविध भागामध्ये कापड व तागाच्या गिरण्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. उदा. भारतामध्ये १९०४-०५ मध्ये कापड गिरण्यांची संख्या २०६ इतकी होती ती वाढून सन १९९४ मध्ये २६४ पर्यंत पोहचली, सन १९०० मध्ये तागाच्या मागांची संख्या १५,००० इतकी होती ती वाढून १९१३-१४ मध्ये ३६,००० इतकी झाली.

५) स्वदेशी चळवळीला प्रोत्साहन देण्यासाठी स्वदेशी वस्तू भांडारांची उभारणी केली. उदा. आचार्य प्रमु ल्लचंद्रे यांनी 'बंगाल रासायनिक स्वदेशी वस्तू भांडार' सुरू केले. तसेच रवींद्रनाथ टागोरांनी एक स्वदेशी वस्तू भांडार उभारण्यास मदत केली.

६) नविन कारखान्यांची उभारणी होण्यास मदत झाली. उदा. सन १९०७ मध्ये संपूर्णपणे भारतीय भांडवलावर आधारित राय आर्यन ॲण्ड स्टील कंपनीची स्थापना झाली व मद्रास प्रांतात कोरोमंडल किनाऱ्यावर तुतिकोरीन येथे चिदंबरम पिले यांनी स्वदेशी जहाज वाहतूक कंपनी स्थापन केली.

७) स्वदेशी चळचळीचा एक भाग म्हणून पंजाब, संयुक्त प्रांत व पश्चिम भारतात भारतीय बँकांची स्थापना झाली. उदा. बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ म्हैसूर इत्यादी.

**लोकमान्य टिळक व बहिष्कार आंदोलन :**

'बहिष्कार' ही स्वदेशी चळवळीची दूसरी बाजू होती. ब्रिटिश माल व ब्रिटिश प्रशासनावर बहिष्कार हे यांचे मुख्य तत्त्व होते. परदेशी वस्तू आपण खरेदी केल्यामुळे ब्रिटिशांना त्यांचा आर्थिक फायदा होतो. आपण जर त्या खरेदी करणे बंद केले तर ब्रिटिशांची आर्थिक व्यवस्था कोलमडेल, आपला परदेशात जाणारा पैसा बंद होईल व स्वदेशी माल खरेदी केल्याने आपला पैसा आपल्याच लोकांच्या हातात राहील आणि देशी उद्योगधंद्यांची प्रगती होईल, असे टिळकांचे मत होते. टिळकांना बहिष्कारांच्या आर्थिक महत्त्वापेक्षा त्याचे राजकीय महत्त्व फार वाटत होते. कारण केवळ अर्ज, विनंत्या, निवेदने व शिष्टमंडळे पाठवून ब्रिटिश राज्यकर्ते आपणास काहीही देणार नाहीत. परंतु त्यांचा जो आर्थिक स्वार्थ आहे त्याला जर फटका बसायला सुरुवात झाली म्हणजे ते आपोआप आपल्या राजकीय धोरणात बदल करतील. विदेशी माल खरेदी करुन आपण विदेशी कारखानदार, व्यापारी व मूजरांना कोट्यावधी रुपये प्रतिवर्षी देतो असे केल्यास ब्रिटिशांची अर्थव्यवस्था मोडकळीस येईल त्यासाठी आपण विदेशी मालावर बहिष्कार टाकला पाहिजे. त्यामुळे टिळकांना बहिष्कार हे राजकीय शस्त्र वाटत होते. या संबंधी ते म्हणातात की, ''आमच्याकडे ब्रिटिशांशी लढण्यासाठी शस्त्रे नाहीत. आम्हाला त्याची गरजही नाही. आमच्याकडे बहिष्कार हे शक्तीशाली शस्त्र आहे. इंग्रज हे आमच्या साहाय्यावर राज्यकारभार करत आहेत. आम्हाला आमच्या स्वराज्याच्या राज्यकारभाराचा ताबा हवा आहे. त्यासाठी बहिष्काराच्या शस्त्राने आपण ब्रिटिशांना नमवले पाहिजे. बहिष्काराचा मार्ग हा राजकीय गुन्हा ठरत नाही. विद्यार्थी, शेतकरी व कष्टकऱ्यांनी बहिष्काराची चळवळ हाती घेतली, मध्यम व श्रीमंतवर्गातील लोकांनी विदेशी वस्तूवर बहिष्कार टाकला.

बहिष्कारासारख्या तीव्र चळवळीमुळे  आपली संघशक्ती एकवटून राज्यकर्त्यांची धुंदी उतरू शकतो. त्याशिवाय पर्याय नाही असे टिळकांना वाटत होते. बहिष्काराची ही चळवळ आर्थिक, औद्योगिक कारणांसाठी नाही तर ती राजकीय आहे. बहिष्काराचे दोन फायदे आहेत.

१) ब्रिटिशांची अर्थव्यवस्था खिळखिळीत होईल.

२) स्वदेशी वस्तूचे उत्पादन वाढेल.

बहिष्कारात विदेशी मालाबरोबर शासन यंत्रणा, न्यायसंस्था व करवसुली यावरील बहिष्कारही अभिप्रेत होता. बहिष्काराच्या चळवळीत समाजातील सर्वच स्तरातील जनतेने सहभागी व्हावे असे ते सांगत, बहिष्काराची परिणामकारकता ही कृतीत आहे, शब्दात नाही. असे टिळकांचे मत होते.

**बहिष्कार व बिपिनचंद्र पाल :**

बंगालच्या फाळणीनंतर विविध प्रांतात जाऊन आपल्या वक्तृत्वाद्वारे स्वदेशी व बहिष्काराचा अर्थ व संदर्भ जनतेला पटवून देण्याचे कार्य पाल यांनी केले. स्वराज्याच्या प्राप्तीसाठी स्वदेशी व बहिष्कार ही साधने त्यांना अधिक प्रभावी वाटत होती. स्वदेशी व बहिष्कार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. वंगभंग आंदोलनाच्या काळात त्यांनी बहिष्काराला अधिक प्रवाही, गतिशील व क्रांतीकारक आशय प्राप्त करुन दिला. जोपर्यंत राष्ट्र या नात्याने इतर राष्ट्राच्याबरोबर हिंदुस्थानला सन्मानाचे स्थान प्राप्त होत नाही तोपर्यंत बहिष्कारांची चळवळ चालू राहिली पाहिजे, असे त्यांचे मत होते.

**बहिष्कार व अरविंद घोष :**

अरविंद घोष यांना मवाळवाद्याचा अर्ज, विनंत्या, निवेदने देणे हा मार्ग पसंत नव्हता. घोष बहिष्काराला 'सविनय प्रतिकार' असे म्हणत. बहिष्कार या शस्त्राचा वापर करुन ब्रिटिशांना शासन करणे अशक्य झाले पाहिजे अशी भूमिका मांडत. अन्याय व अत्याचार रोखण्याचे बहिष्कार हे मुख्य नैतिक शस्त्र आहे त्याचा वापर करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. बहिष्काराचे अरविंद घोष यांनी पाच प्रकार सांगतले  आहेत.

**१) आर्थिक बहिष्कार :** स्वदेशीचा वापर व विदेशीचा बहिष्कार

**२) शैक्षणिक बहिष्कार :** राष्ट्रीय शिक्षण सुरू करणे.

**३) न्यायालयीन बहिष्कार :** राष्ट्रीय लवाद न्यायालये स्थापन करणे.

**४) कार्यपालिकेवरील बहिष्कार :** राष्ट्रीय संघटन तयार करणे.

**५) सामाजिक बहिष्कार :** ब्रिटिश राज्यकर्त्यांना मदत करणाऱ्यावर बहिष्काराचा वापर करुन आपण स्वदेशी मालाला प्रोत्साहन दिले पाहिजे. देशी वस्तू जर जनतेने वापरण्यास सुरुवात केली तर ब्रिटिश साम्राज्याची मुळे खिळखिळी होतील व भारतीय स्वावलंबनाधिष्ठीत आर्थिक पुनरुज्जीवनाची पायाभरणी होईल, असे अरविंद घोष यांना वाटत होते.

ब्रिटिशांनी निर्माण केलेली न्याय व्यवस्था पक्षपाती स्वरुपाची आहे. सरकारी न्यायालयावर लोकांनी बहिष्कार टाकावा व पर्यायी यंत्रणा म्हणून राष्ट्रीय लवाद न्यायालये स्थापन करावीत असे सुचविले. घोष यांनी न्यायालयीन बहिष्काराची सैद्धांतिक संकल्पना मांडली होती. परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही. ब्रिटिश सत्ता भारतीयांच्या सहकार्याशिवाय राज्यकारभार करु शकणार नाही, त्यामुळे आपण ब्रिटिश सत्तेला असहकार्य करुन बहिष्कार टाकावा व ब्रिटिशांचे कार्यकारी नियंत्रण कमी करण्यासाठी राष्ट्रीय संघटन तयार केले पाहिजे. बहिष्कारामध्ये जे भारतीय लोक सहभागी होणार नाहीत किंवा ब्रिटिश सत्तेला सहकार्य किंवा मदत करतील त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार घालावा असे आवाहन अरविंद घोष यांनी केले.

**बहिष्कार चळवळीचे स्वरूप :**

बहिष्कार म्हणजे विदेशी मालाचा वापर बंद करणे व स्वदेशीचा वापर करणे. बहिष्कार फक्त परदेशी मालापुरता मर्यादित नव्हता तर तो ब्रिटिश प्रशासनावरसुद्धा होता. म्हणजे ब्रिटिश सरकारला असहकार्य करणे, बहिष्काराची ब्रिटिश सरकारला जाणीव करुन देण्यासाठी लोकांनी मोठ्या प्रमाणात परदेशी मालाची होळी करण्यास सुरुवात केली. पंजाबमध्ये लाला लजपतराय यांच्या नेतृत्त्वाखाली बहिष्काराची चळवळ मोठ्या प्रमाणात घडून आली. विदेशी साखरेवर बहिष्कार टाकण्यात आला. रावळपिंडीच्या वापाऱ्यांनी विदेशी साखर न विकण्याची प्रतिज्ञा केली. बहिष्कारांची चळवळ हळूहळू दिल्ली, जम्मू, कांगडा व हरिद्वारपर्यंत वाढलेली होती. सय्यद हैदर रेझा यांना दिल्लीतील स्वदेशी चळवळीचे प्रवर्तक म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रामध्येही लोकमान्य टिळकांच्या नेतृत्त्वाखाली स्वदेशी चळवळीने गती घेतलेली होती.

**लोकमान्य टिळक व राष्ट्रीय शिक्षण :**

राष्ट्रीय पद्धतीचे शिक्षण हे स्वदेशी चळवळीचे मूलभूत अंग होते. भारतीय तरुणांमध्ये राष्ट्रीय वृत्ती निर्माण करण्याचे साधन म्हणून लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार केला. ज्या शिक्षणाने भारतीय तरुण मनाने व विचाराने भारतीय बनतील, असे टिळकांना वाटत होते. राष्ट्राच्या प्रगतीस आवश्यक असणाऱ्या ज्ञानाची व कलांची माहिती सध्याचे शिक्षण देऊ शकणार नाही म्हणून राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा, महाविद्यालये स्थापन करायला पाहिजे. राष्ट्राची राजकीय, औद्योगिक व सामाजिक प्रगती होईल असे शिक्षण वास्तविक पाहाता ब्रिटिशांनी देणे आवश्यक होते, परंतु राष्ट्रीय शिक्षण म्हणजे राजद्रोह समजला जात असे. त्यामुळे अशा शिक्षण संस्थांना सरकारी अनुदान मिळत नव्हते. अशा शिक्षण संस्था लोकांच्या मदतीने स्थापन होणे आवश्यक होते.

सतीशचंद्र मुखर्जी हे 'डॉन' या इंग्रजी वृत्तपत्राचे संपादक होते. त्यांनी सन १८९८ मध्ये राष्ट्रीय शिक्षणाची योजना तयार केली. तर लोकमान्य टिळकांनी केसरीतून विविध लेख लिहून राष्ट्रीय शिक्षणाचे महत्त्व विशद केले. राष्ट्रीय चळवळीपासून तरुणांना दूर ठेवणे हे ब्रिटिशांच्या शिक्षणपद्धतीचे गुपीत आहे असे त्यांचे ठाम मत होते. 'राष्ट्रीय शिक्षण व खाजगी शाळांची जबाबदारी' या शीर्षकाचे तीन लेख सन १९०६ मध्ये लिहिले. यालेखातून टिळकांनी राष्ट्रीय शिक्षण देशी भाषेतून द्यावे, व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण सुरू करावे, शिक्षण सक्तीचे व मोफत असावे, सक्तीच्या शिक्षणासाठी लोकमताचा दबाव सरकारवर आणला पाहिजे इत्यादी मते त्यांनी आग्रहाने मांडली.

**राष्ट्रीय शिक्षण व लाला लजपतराय :**

लाला लजपतराय हे जहालांच्या नेत्यामधील एक प्रमुख नेते होते. त्यांनी लाहोर येथे 'ॲग्लो वैदिक कॉलेज'च्या उभारणीसाठी प्रयत्न केले. धार्मिक शिकवणूकीच्या माध्यमातून राष्ट्रभावना अधिक बळकट करणे, फुटीर, संकुचीत व कूपमंडूक वृत्तीचा प्रतिकार हे राष्ट्रीय शिक्षणाचे हेतू असावेत, असे त्यांना वाटत होते. जुन्या व कालबाह्य शिक्षण पद्धतीचा त्याग करुन आधुनिक व प्रभावी शिक्षण पद्धतीचा अवलंब केला पाहिजे असे त्यांचे मत होते.

**राष्ट्रीय शिक्षण व अरविंद घोष :**

लोकांच्या जाणिवा त्या देशातील शिक्षणाद्वारे आकार घेत असतात असे घोष यांचे विचार होते. परंतु भारतात जे शिक्षण दिले जात आहे त्या शिक्षणापासून भारतीयांच्या गुणवैशिष्ट्यांचे दर्शन घडत नाही तर केवळ पाश्चात्य दृष्टिकोण व संस्कृतीचे संस्कार होतात असे घोष यांना वाटत होते. ब्रिटिश शिक्षणामुळे ब्रिटिश शासनास आवश्यक असणारे कारकून तयार होत आहेत. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या शिक्षणपद्धतीत अभ्यासक्रम हे भारताच्या सामाजिक व आर्थिक वास्तव्याशी सुसंगत नाहीत. ब्रिटिश शिक्षण पद्धतीतून परीक्षा व पदवी या भोवती केंद्रित झालेली आहे त्यामुळे या शिक्षण पद्धतीतून गुलामगिरी निर्माण होत आहे. त्यासाठी राष्ट्रीय शाळा व महाविद्यालये स्थापन करुन पर्यायी व्यवस्था उपलब्ध करुन दिली पाहिजे. स्वत: अरविंद घोष यांनी सन १९०६ मध्ये कलकत्ता येथे 'बंगाल राष्ट्रीय कॉलेज' स्थापन करण्यास मदत केली व ते या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य झाले.

**राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार :**

बंगालच्या फाळणीनंतर बंगालमधील जनतेने ब्रिटिशांनी सुरु केलेल्या शाळा महाविद्याल यावर बहिष्कार टाकून राष्ट्रीय शिक्षण संस्था सुरू केल्या. सुरेंद्रनाथ बॅनजी यांनी राष्ट्रीय शिक्षण संस्था स्थापन करुन राष्ट्रीयभावनेचे बीजारोपण होईल असा अभ्यासक्रम तयार केला. सन १९०५ मध्ये बंगालमधील नेत्यांनी राष्ट्रीय शिक्षण समिती स्थापन केली. त्यामुळे एकट्या बंगाल मध्ये ३०० प्राथमिक, २५ माध्यमिक शाळा सुरू झाल्या. रविंद्रनाथ टागोरयांनी शांतिनिकेतनची स्थापना करुन राष्ट्रीय शिक्षणाचा मार्ग आखून दिला.

राष्ट्रीय शिक्षणाचा विचार सर्व जहाल नेत्यांनी फक्त मांडलाच नाही तर त्याचा पुढाकार करुन अनेक राष्ट्रीय शिक्षण संस्था स्थापन केल्या. यामध्ये बनारस हिंदू विद्यापीठ, गुजरात विद्यापीठ, काशी विद्यापीठ, बंगाल नॅशनल युनिव्हर्सिटी इत्यादींचा उल्लेख करावा लागतो. मुंबई व पुणे येथे राष्ट्रीय शिक्षणाच्या काही शाळा लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, शि. म. परांजपे, वि. गो. विजापूरकर यांनी सुरू केल्या. पंजाबमध्ये आर्य समाजाच्या बरोबर गोपाळराम गंगाराम, पंडित चंद्रिका दत्त, मुन्शीराम व लाला लजपतराय यांनी ही काही शाळा स्थापन करण्यास मदत केली. मद्रास इलाख्यामध्ये सुब्रह्मण्यम अय्यर व पी. आनंदाचार्य इत्यादींनी लोकवर्गणी गोळा करुन राष्ट्रीय शिक्षण संस्था उभा केलेल्या होत्या. अशा प्रकारे स्वदेशी चळवळीच्या माध्यमातून संपूर्ण भारतामध्ये राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू झालेल्या दिसतात.

**स्वराज्य :**

स्वराज्य मिळवणे जहालमतवादी नेते व टिळकांचे अंतिम ध्येय होते. ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच''अशी त्यांची घोषणा होती. स्वराज्य म्हणजे आपले राज्य, प्रजेच्या प्रतिनिधीमार्फत चालविले जाणारे राज्य. स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या तत्त्वाचा आंदोलनासाठी उपयोग करुन घेणे व त्याद्वारे स्वराज्य मिळवणे हे टिळकांचे ध्येय होते. टिळकांच्या मते, नैतिक व आध्यात्मिक विकास होण्यासाठी अनुकूल परिस्थिती फक्त स्वराज्यात असते. स्वराज्य हे धार्मिक व नैतिकदृष्ट्या आवश्यक आहे. इंग्रजांना इंग्लंडमध्ये जे हक्क मिळतात ते हक्क भारतीयांना भारतात मिळाले पाहिजेत, हिंदुस्थानचे सरकार हे हिंदी लोकांचेच असले पाहिजे व भारतीयांची प्रगती ही केवळ स्वराज्यातच होऊ शकते. टिळकांनी स्वदेशीची कल्पना मांडून लोकप्रिय केली. चळवळीचे स्वरुप दिले. स्वराज्याचे हप्ते ब्रिटिशांनी ठरवावे हे आम्हाला मान्य नाही ते आम्ही ठरविले पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते.

बिपिनचंद्र पाल म्हणतात की, ''स्वराज्य ही दैवी देणगी असल्यामुळे ती प्राप्त करुन घेणे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. राष्ट्राची भावना आणि आत्मानुकूलशासनाची स्थापना म्हणजे स्वराज्य.'' अशी स्वराज्याची व्याख्या त्यांनी केली. अरविंद घोष यांनी स्वराज्याची आवश्यकता खालील तीन कारणांसाठी पाहिजे असा आग्रह होता.

१) स्वातंत्र्य ही राष्ट्रीय जीवनाची गरज आहे म्हणूनच आम्हास स्वराज्य हवे आहे.

२) माणसाच्या व राष्ट्राच्या नैतिक, बौद्धिक व राजकीय विकासासाठी स्वराज्य आवश्यक आहे.

३) आत्मिक उन्नती हा प्रत्येक माणसाचा हक्क आहे. जगाच्या आत्मिक उन्नतीत भारत पुढाकार घेणार आहे. म्हणून भारताला स्वराज्य हवे आहे. स्वराज्य प्राप्तीसाठी अरविंद घोष यांनी पुढील मार्ग सूचविले होते.

(अ) सविनय प्रतिकारांचा मार्ग

(ब) राष्ट्राच्या उज्वल परंपरांचे व संपन्न वारशांचे स्मरण करणे

(क) प्रत्यक्ष क्रांतीकारक कृतीचा मार्ग.

अरविंद घोष यांनी स्वराज्य व आध्यात्मिक प्रगती व त्यातून उन्नती असा अर्थ त्यांना अभिप्रेत होता.

लोकमान्य टिळकांनी सांगितलेली चतु:सूत्री ही राष्ट्रीय चळवळीची मार्गदर्शक तत्त्वे बनलेली होती. भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत दीर्घकाळ चालविल्या गेलेल्या या चळवळीत सदैव प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे तिचा संदर्भ आलेला दिसतो. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे जे राजकीय तत्त्वज्ञान मांडले जाईल त्यात चतु:सूत्री हा अविभाज्य भाग आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. राष्ट्रीय सभेतील ........... यांनी स्वदेशी चळवळीवर आक्षेप घेतला.

अ) म. गो. रानडे　　　ब) दिनशॉ वाच्छा

क) मेहता　　　ड) सुरेंद्रनाथ बॅनर्जी

२. टाटा आयर्न अ‍ॅण्ड स्टील कंपनीची स्थापना ...........मध्ये झाली.

अ) १९०५　　　ब) १९०६

क) १९०७　　　ड) १९०८

३. लाला लजपतराय यांनी ...........बँकेची स्थापना केली.

अ) पंजाब नॅशनल　　　ब) महाराष्ट्र

क) स्टेट　　　ड) रिझर्व्ह

४. अरविंद घोष यांनी ........... कॉलेजची स्थापना केली.

अ) पूना　　　ब) बंगाल राष्ट्रीय

क) मुंबई　　　ड) कलकत्ता

५. सुब्रह्मण्यम अय्यर यांनी ...........इलाख्यात राष्ट्रीय शिक्षण संस्था काढली.

अ) मद्रास　　　ब) बंगाल

क) मद्रास　　　ड) मुंबई

### ४.२.३ होमरूल लिग चळवळ (Home Rule League Movement) :

**१) होमरुल चळवळीची पार्श्वभूमी :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात 'होमरुल चळवळ' ही एक वैशिष्ट्यपूर्ण चळवळ मानली जाते. सन १९०६ मध्ये मुस्लीम लीगची स्थापना झाली. राष्ट्रीय सभेपासून दूर राहण्यातच आपला स्वार्थ आहे, असे मुस्लिम नेत्यांना वाटत होते. सन १९०९ मध्ये त्यांना विभक्त मतदारसंघ मिळाल्यामुळे ब्रिटिश आपले तारक आहेत असे वाटू लागले होते. परंतु ब्रिटिश सरकारने सन १९११ मध्ये बंगालची फाळणी रद्द केली, स्वाभाविकच ब्रिटिशांनी आपले स्वप्न भंग केला आहे असे मुस्लिम नेत्यांना वाटू लागले. सन १९१४ मध्ये लोकमान्य टिळकांची मंडालेच्या तुरुंगातून सुटका झाली. राष्ट्रीय चळवळीला आलेली मरगळ झटकून टाकण्यासाठी ती पुन्हा सक्रिय करण्याचा निर्णय घेतला. या काळात मवाळ व जहाल यांच्यातील मतभेद दूर करण्यात नेत्यांना यश आलेले होते. ब्रिटिशांच्या धोरणावर नाराज असलेल्या मुस्लिम लीगने ही राष्ट्रीय सभेला सहकार्य करण्याचे मान्य केले होते. अशा पार्श्वभूमीवर होमरुल चळवळीचा निर्णय घेण्यात आला.

**२) होमरुल चळवळ :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीस नवचैतन्य निर्माण करण्याच्या लोकमान्य टिळकांच्या विचारांचे दृश्यस्वरुप म्हणजे होमरुल चळवळ होय. डॉ. अ‍ॅनी बेझंट, लोकमान्य टिळक व जोसेफ बॅप्टिस्थ यांच्या नेतृत्त्वाखाली भारतात ही चळवळ घडून आली. होमरुल लीगच्या विविध संघटना अस्तित्वात आल्या. परंतु ही चळवळ

एकच होती. होमरुल चळवळीने भारतीय स्वातंत्र्य चळवळीस अधिक गतिमान करण्याचे काम केले. मुंबई, कानपूर, अलाहाबाद, कलकत्ता व मद्रास या ठिकाणी होमरुल लीगच्या संघटना स्थापन झाल्या होत्या.

**३) होमरुल म्हणजे काय? :**

स्वराज्य प्राप्ती म्हणजे 'होमरुल' होय. आपल्या देशाचा राज्यकारभार करण्याचा अधिकार आपण प्राप्त करुन घेणे म्हणजे होमरुल होय. होमरुलची चळवळ ही मूळात आयर्लंडमधील लोकांनी ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी जोखडातून मुक्त होण्यासाठी श्री. रेडमांड यांच्या नेतृत्त्वाखाली आयरिश लोकांनी सुरू केलेली होती. श्रीमती ॲनी बेझंट याही जन्माने आयरिश होत्या. त्यांनी या चळवळीचे बारकाईने निरीक्षण केलेले होते. भारत व आयर्लंड या दोन देशांची राजकीय समस्या सारखीच असल्याने आयर्लंड प्रमाणे भारतात ही होमरुल चळवळ सुरू केली तर भारतीय लोकांत जागृती निर्माण होईल असे बेझंट यांना वाटत होते.

**४) डॉ. ॲनी बेझंट :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ॲनी बेझंट यांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांचा जन्म १ ऑक्टोबर १८४७ रोजी झाला. इंग्लंड व जर्मनीत त्यांचे शिक्षण पूर्ण झाले. इंग्लंडमधील आगपेट्यांच्या कारखान्यात काम करणाऱ्या स्त्रियांच्या हक्कासाठी त्यांनी त्याठिकाणी चळवळ सुरू केली. सन १८९३ मध्ये त्यांनी शिकागो येथील धर्मपरिषदेत सहभाग घेतला. त्यावेळी स्वामी विवेकानंदानी केलेल्या भाषणामुळे त्या हिंदू धर्म व संस्कृतीकडे आकर्षित झाल्या. सन १८९३ मध्ये बेझंट भारतात आल्या. भारतात आल्यानंतर सन १८९३ ते १९१२ या काळात थिऑसॉफिकल सोसायटीचे कार्य केले. प्राचीन धर्म ग्रंथांचा अभ्यास करण्यासाठी बनारस येथे 'सेंट्रल हिंदू कॉलेज' स्थापन केले. दरम्यानच्या काळात त्यांनी "The sons and doughters of India' ही संस्था स्थापन केली (१९१०). पुढे सन १९१३ मध्ये त्यांनी काँग्रेसचे सदस्यत्व स्वीकारले. राजकीय जीवनात कार्यरत असताना त्यांनी काँग्रेसकडे होमरुल चळवळ सुरू करावी अशी मागणी केली. परंतु काँग्रेसमधून त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही.

भारताला स्वराज्याचे हक्क मिळाले पाहिजेत अशी भूमिका घेऊन त्यांनी या विचाराच्या प्रसारासाठी मद्रास येथे सन १९९४ मध्ये 'कॉमनवील' हे साप्ताहिक व 'न्यू इंडिया' हे वृत्तपत्र सुरू केले. सन १९१७ मध्ये बेझंट यांनी "Women's India Association" ची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून भारतीय स्त्रीयांचा दर्जा उंचावण्यासाठी कार्य केले. डॉ. बेझंट यांनी १०० पुस्तके लिहिली व २०,००० पेक्षा जास्त व्याख्याने देऊन प्रबोधनाचे कार्य केले.

**५) होमरुल लीगची स्थापना :**

डॉ. ॲनी बेझंट यांनी सन १८९५ मध्ये मुंबई येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात काँग्रेसने होमरुल चळवळीचा कार्यक्रम स्विकारावा अशी विनंती केली. परंतु या काळात काँग्रेस मवाळ गटाच्या ताब्यात असल्याने बेझंट यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. लोकमान्य टिळकांची तुरुंगातून सुटका झाल्यानंतर टिळकांनी या चळवळीस पाठिंबा दर्शविला. यानंतर डॉ. बेझंट यांनी सप्टेंबर १९१६ मध्ये होमरुल लीगची स्थापना केली. कलकत्ता, मद्रास, कानपूर अलाहाबाद इत्यादी ठिकाणी होमरुल लीगच्या शाखा स्थापन झाल्या.

### ६) होमरुल चळवळ व लोकमान्य टिळक :

लोकमान्य टिळकांची सन १९१४ मध्ये मांडलेल्या तुरुंगातून सुटका केली. ब्रिटिश सरकार या काळात पहिल्या महायुद्धात गुंतलेले होते. परंतु भारतीय स्वातंत्र्य चळवळ मंदावलेली होती. पहिल्या महायुद्धातील भारतीयांच्या सहकार्याबद्दल ब्रिटिशांच्याकडून जास्तीत जास्त राजकीय हक्क मिळाले पाहिजे असे टिळकांना वाटत होते. राजकीय हक्काची मागणी करण्यासाठी स्वातंत्र्य चळवळ अधिक गतीशील झाली पाहिजे व हे काम काँग्रेस अंतर्गत व्हावे असे टिळकांना वाटत होते. डॉ. बेझंट टिळकांच्या काँग्रेस प्रवेशा बाबत आग्रही होत्या, परंतु फिरोजशहा मेहतांच्या विरोधामुळे असे करणे शक्य झाले नाही. टिळकांना राष्ट्रीय चळवळ अधिक गतीमान करण्याची गरज वाटत असल्याने डॉ. बेझंट यांची 'होमरुल'ची संकल्पना उचलून धरली. २८ एप्रिल १९१६ रोजी बेळगाव येथे भरलेल्या बैठकीत 'होमरुल लीग'ची स्थापना केल्याचे घोषित केले व त्याचे कार्यालय पुणे येथे ठेवले. जोसेफ बॉप्टीस्टा यांना लगीचे अध्यक्ष नेमले व न. चि. केळकर यांना सचिव म्हणून घोषित केले. दादासाहेब खापर्डे, डॉ. मुंजे, शि. ल. करंदीकर इत्यादी मंडळी या संघटनेच्या प्रमुख कार्यकर्त्यांपैकी होते.

### ७) होमरुल लीगची उद्दिष्टे :

भारतीय स्वातंत्र्य चळवळीला अधिक गती देऊन सर्वसामान्य जनतेच्या मनात राजकीय हक्काची जाणीव निर्माण करणे, स्वयशासनाची मागणी ब्रिटिशापर्यंत पोहचवण्यासाठी संपूर्ण देशभर प्रचार करणे व स्वयशासनाचे ध्येय पूर्ण होईपर्यंत सनदशीर मार्गाची चळवळ अधिक गतिशील करणे हे लीगचे उद्दिष्ट होते. होमरुल संबंधी आपली भूमिका विशद करताना टिळक म्हणतात की, होमरुल किंवा स्वराज्याचे तत्त्व १९०६ सालीच काँग्रेसला मान्य झाले आहे. पण काँग्रस ही वर्षातून एकदा भरणारी असल्यामुळे या राष्ट्रीय ध्येयास व्यवस्थित रुप देऊन तत्पीत्यर्थ जे प्रयत्न करावयास पाहिजेत, त्यासाठी काँग्रेसने अद्याप काही तजवीज केलेली नाही. ही तजवीज करणे हे होमरुल लीग किंवा हिंदी स्वराज्य संघाचे मुख्य काम होय. यात काँग्रेसला विरोध नाही, इतकेच नव्हे तर हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रांतात निरनिराळे स्वराज्य संघ निघाले तरी त्यांच्यामध्ये परस्पर विरोध होणे शक्य नाही. बेझंट यांनीही आपल्या वृत्तपत्रात अशाच स्वरुपाची भूमिका मांडत होत्या. भारताला स्वराज्याचे हक्क मिळालेच पाहिजेत. होमरुल म्हणजे जबाबदार शासन पद्धती होय अशी बेझंट यांची भूमिका होती.

### ८) होमरुलचा प्रचार व प्रसार :

लोकमान्य टिळक व डॉ. बेझंट यांनी होमरुल लीगची स्थापना केल्यानंतर अल्पावधीत देशाच्या अनेक भागात लीगच्या शाखा स्थापन झाल्या. टिळकांनी केसरी व मराठा या वृत्तपत्रातून होमरुल चळवळीचा प्रचार केला. सन १९१६ मध्ये देशव्यापी दौरा काढून होमरुलसंबंधी आपली भूमिका मांडण्याचे काम टिळकांनी केले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात सुशिक्षित वर्ग होमरुल चळवळीकडे आकर्षित झाला. सन १९१६ मध्ये टिळकांनी स्थापन केलेल्या लीगचे १४००० सभासद होते तर ही संख्या सन १९१७ मध्ये ३३,००० वर गेलेली होती. सन १९९७ मध्ये लोकमान्य टिळकांनी होमरुल लीगचे नाशिक येथे अधिवेशन घेतले. या अधिवेशनानंतर लीगचे कार्यकर्ते संपूर्ण देशभर प्रचार व प्रसाराचे काम करु लागले. बॅ. जीना महमदअली, शौकत अली यांच्या सारखे मोठे नेते ही या चळवळीत सामील झालेले होते. पश्चिम भारतात या चळवळीचा फार मोठा प्रसार झाला.

### ९) होमरुल विरुद्ध ब्रिटिशांची दडपशाही :

ब्रिटिश सरकार पहिल्या महायुद्धात गुंतलेले असताना उद्भविलेल्या होमरुल चळवळीची मुस्कटदाबी करण्यासाठी ब्रिटिशांनी दडपशाहीचे धोरण स्विकारले. ब्रिटिशांनी ही चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला तेव्हा जे लोक होमरुल लीगबाबत उदासीन होते तेही या चळवळीत दाखल झाले. लोकमान्य टिळक यांच्यावर मुंबई सरकारने खटला दाखल केला. या सुमारास डॉ. ॲनी बेझंट यांच्यावरही मद्रास सरकारने खटला दाखल केला. डॉ. बेझंट यांना मुंबईत येण्यास प्रतिबंद केला. टिळकांचे दुसरे सहकारी बिपिनचंद्र पाल यांना पंजाब व दिल्ली येथे येण्यास प्रतिबंद केला. टिळकांच्यावर भरलेल्या खटल्यातून टिळक निर्दोष सुटले परंतु १५ जून १९१७ रोजी डॉ. बेझंट व बी. पी. वाडिया यांना अटक केली. त्यामुळे संपूर्ण देशात प्रक्षोभ निर्माण झाला. जनतेच्या वाढत्या प्रक्षोभामुळे अस्वस्थ झालेल्या गव्हर्नर जनरलने भारत मंत्र्यास कळविले की, इंग्लंडने भारतास स्वराज्य द्यावे अशी मागणी टिळक व बेझंट करत आहेत. त्यांचा जबरदस्त प्रभाव जनमानसावर पडत आहे. राष्ट्रीय चळवळी पासून दूर असणारे उच्चभ्रूही यास पाठिंबा देत आहेत. यावर एकच उपाय म्हणजे भारतास राजकीय अधिकार देण्याबाबतची घोषणा करणे होय. लोकमान्य टिळकांनी डॉ. बेझंटबाई यांच्या सुटकेसाठी सत्याग्रह करणार असल्याचे कळल्यानंतर डॉ. बेझंट यांची सुटका करण्यात आली व वाढता असंतोष कमी करण्यासाठी मॉटेग्यू यांने २० ऑगस्ट १९१७ रोजी भारतास जबाबदार सरकार देण्याचे धोरण जाहीर केले.

### १०) होमरुल लीगचे परदेशातील कार्य :

अमेरिका व इंग्लंडमधील काही वृत्तपत्रे व नेत्यांनी होमरुल चळवळीस सहानुभूती दाखवली. त्यामुळे मद्रास प्रांतातील होमरूल लीगचे अध्यय सर सुब्रह्मण्यम अय्यर यांनी जून १९१७ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांना पत्र पाठवून होमरुल चळवळीस मदत करण्याची विनंती केली. विल्सन यांनी जी युद्धतत्त्वे घोषित केलेली होती त्यामध्ये स्वयं निर्णयाचे तत्त्व होते. या तत्त्वानुसार भारताचा स्वयंनिर्णयाचा प्रश्न सोडवावा अशी मागणी अय्यर यांनी केली. हे पत्रवृत्तपत्रांनी प्रसिद्ध केले. त्यामुळे संसदेत ब्रिटनच्या धोरणावर टिका झाली.

जुलै १९१७ मध्ये जोसेफ बॅप्टिस्टा यांच्या नेतृत्त्वाखाली एक शिष्टमंडळ इंग्लंडला पाठविले. या शिष्टमंडळाने इंग्लंडचा दौरा करुन भारतीय स्वराज्याचा प्रश्न ब्रिटिश जनतेपुढे मांडला. सन १९१८ मध्ये टिळकांनी आणखी दोन शिष्टमंडळे इंग्लंडला पाठवण्याचे ठरविले. परंतु त्यांच्यावर बंदी घालण्यात आल्याने ते जाऊ शकले नाही. लोकमान्य टिळकांनी स्वत:च होमरुल चळवळीसाठी इंग्लंडला जाण्याचा निर्णय घेतला. टिळक, न. चि. केळकर, दादासाहेब खापर्डे, बिपिनचंद्र पाल इत्यादी मंडळी इंग्लंडला जाण्यास निघाली. मात्र त्यांचे पासपोर्ट रद्द केल्याने मधून परत यावे लागले. टिळकांनी यानंतरही हार न मानता लाला लजपतराय, एस. एस. हार्डीकर व के. डी. शास्त्रीयांना अमेरिकेस पाठविले. त्यांनी भारतीय होमरुल चळवळीची भूमिका अमेरिकन जनतेसमोर मांडली. सॅनफ्रांन्सिस्को येथे होमरुल लीगची शाखा स्थापन केली व भारतीय स्वराजाच्या प्रश्ना संदर्भात अमेरिकन जनतेचा विश्वास संपादण्यात यश मिळवले. परिणामी भारतीय होमरुल चळवळीला जागतिक स्वरुप येण्यास मदत झाली. फ्रान्सचे पंतप्रधान क्लेमेन्शो यांना ही टिळकांनी पत्र पाठवून हिंदुस्थानला स्वराज्य प्राप्त करुन देण्यासंदर्भात प्रयत्न करावेत असे कळविले.

**११) जोसेफ बॅप्टिस्टा व होमरुल चळवळ :**

लोकमान्य टिळकांचे विश्वासू सहकारी व होमरुल  चळवळीचे खंदे पुरस्कर्ते म्हणून जोसेफ बॅप्टिस्टा ओळखले जातात. केंब्रिज विद्यापीठातून बॅप्टिस्टा यांनी कायद्याची पदवी घेतलेली होती. मूळचे हिंदू सारस्वत पाठारे असलेल्या बॅप्टिस्टा यांच्या कुटूंबियांनी ख्रिश्चन धर्म स्विकारलेला होता.

टिळकांच्या कार्यावर प्रभावित होऊन बॅप्टिस्टा टिळकांच्या कार्याकडे आकर्षित झाले. टिळकांचे राजकीय सल्लागार म्हणून त्यांची ओळख निर्माण झालेली होती. टिळकांनी होमरुल लीगची स्थापन केल्यानंतर जोसेफ बॅप्टिस्टा यांना अध्यक्ष म्हणून नियुक्त केले. होमरुलचा प्रसार करण्यासाठी नंतर ते इंग्लंडला गेले. इंग्लंडमध्ये भारतीय होमरुल चळवळीचे कार्य व प्रश्न इंग्लंडच्या पार्लमेंटपर्यंत पोहचवण्यात व पार्लमेंटच्या सदस्यांचा पाठिंबा मिळवण्यात त्यांना यश आले.

जोसेम बॅप्टिस्टा यांनी भारतीय मजूर चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. अखिल भारतीय मजूर संघाच्या स्थापनेमध्ये त्यांचाही मोठा सहभाग होता. मजूर वर्गाचा प्रतिनिधी, मजूरांच्या प्रश्नाबद्दल आस्था असणारा नेता म्हणून त्यांची ओळख होती. मुंबईमधील मंजूर संघाचे ते अध्यक्ष होते. 'ईस्ट इंडिया' नावाचे मासिक त्यांनी सुरू केलेले होते. टिळकांच्या मृत्युनंतर टिळक अनुयायांशी त्यांचे मतभेद झाल्याने त्यांनी सक्रिय राजकारणात फारसा सहभाग घेतला नाही. टिळकांच्या अनुयायानीच माझे राजकारण बुडविले असा त्यांचा आरोप होता.

**१२) होमरुल चळवळीचे परिणाम :**

१) मवाळवादी नेते राजकारणापासून दूर फेकले गेले व जहालाचे वर्चस्व पुन्हा निर्माण झाले.

२) भारतीय स्वातंत्र्यलढ्याची सूत्रे होमरुलमुळे टिळकांच्या हातात आली.

३) राष्ट्रीय सभेनेही ब्रिटिशाकडे स्वराज्याची मागणी करण्यास सुरुवात केली.

४) होमरुल लीगने परदेशात केलेल्या कामाच्या परिणाम स्वरुप नॉटिंगहॅम परिषदेत मजूर पक्षाने भारताला वसाहतीचे स्वराज्य देण्यात यावे असा ठराव मंजूर केला.

५) २० ऑगस्ट १९१७ मध्ये भारतमंत्री मॉटेस्क्यूने भारतात जबाबदार सरकार देण्याचे ब्रिटिश शासनाचे धोरण जाहीर केले.

**१४) होमरुल चळवळीच्या ऱ्हासाची कारणे :**

होमरुल चळवळीने अल्पावधीत आपला प्रभाव निर्माण केला व महत्त्वपूर्ण कामही केले, परंतु ही चळवळ फार काळ चालू राहिली नाही. त्यांची कारणे पुढील प्रमाणे,

१) होमरूल लीगने केलेली वसाहतीच्या स्वराज्याची मागणी जहाल तरुणांना मवाळ स्वरुपाची वाटत होती. त्यामुळे त्यांच्यात निराशा पसरली.

२) होमरुल चळवळीच्या शाखा फक्त भारतातील प्रमुख शहरामध्ये स्थापन झाल्या त्यामुळे ही चळवळ सर्वसामान्या पर्यंत पोहचली नाही.

३) होमरुल चळवळीवर ब्राह्मणांचा प्रभाव आहे असा प्रचार झाला त्यामुळे बहुजन समाज या चळवळीपासून बाजूला राहिला.

४) राष्ट्रीय सभेचा होमरुल चळवळीला विरोध होता.

५) लोकमान्य टिळकांच्या मृत्युनंतर महात्मा गांधीचा राजकीय जीवनात उदय झाला. गांधीजींचे नेतृत्त्व व सत्याग्रहाचे तत्त्व यामुळे होमरुल चळवळ बाजूला गेली.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. आयर्लंडमध्ये ................ यांच्या नेतृत्त्वाखाली होमरुल चळवळ सुरू झाली.

अ) रेडमांड ब) लोकमान्य टिळक

क) ॲनीबेझंट ड) महात्मा गांधी

२. लोकमान्य टिळकांना ........... या तुरुंगात सहा वर्षे कैद करून ठेवले होते.

अ) मंडाले ब) येरवडा

क) कळंबा ड) रंगून

३. लोकमान्य टिळकांचे............. हे राजकीय सल्लागार म्हणून ओळखले जात.

अ) जोसेम बॅप्टिस्टा ब) ॲनी बेझंट

क) ना. गोखले ड) दिनशॉ वाच्छा

४. डॉ. ॲनी बेझंट यांनी ......... येथे सेंट्रल हिंदू कॉलेज स्थापन केले.

अ) बनारस ब) लाहोर

क) अमृतसर ड) मुंबई

५. कॉमन वील हे साप्ताहिक .......... यांनी सुरू केले.

अ) डॉ. ॲनी बेझंट ब) लाला लजपतराय

क) लोकमान्य टिळक ड) बिपीन चंद्रपाल

## ४.३ सारांश :

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासामध्ये सन १९०५ ते १९२० हा कालखंड 'टिळक युग' म्हणून ओळखला जातो. त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जहालमतवादी नेत्यांनी राष्ट्रीय चळवळीला अधिक व्यापक बनविली. मवाळवाद्यांच्या सनदशीर मार्गाने काहीही होणार नाही. ब्रिटिशांना सहकार्या ऐवजी असहकार व ब्रिटिशांच्या अन्यायपूर्ण धोरणाला प्रतिकाराने उत्तर देण्याचे धोरण स्विकारले पाहिजे याला महत्त्व दिले. ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास ठेवून काहीही मिळणार नाही, त्यासाठी लढाच दिला पाहिजे हा विचार सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यात जहालमतवाद्यांना यश आले. मर्यादित लोकांच्यापुरती स्वातंत्र्य चळवळ

ठेवून स्वातंत्र्य मिळणार नाही तर त्याला सर्वसामान्यांचा पाठिंबा मिळाला पाहिजे. या विचारालाही महत्त्व आले. जहालवाद्यांच्या या धोरणामुळे व अहिंसात्मक प्रतिकाराच्या चळवळीमुळे राष्ट्रवाद्यांच्या मनामध्ये एक नवा आत्मविश्वास व स्वशक्तीची भावना निर्माण होण्यास मदत झाली. ब्रिटिश लोकांचाही आपण पराभव करु शकतो, याबद्दलही जनतेला खात्री वाटू लागली. भारतीय समाजातील वाढता असंतोष अधिक कृतिशील बनविण्याचे काम जहालमतवाद्यांनी केले.

बंगालच्या फाळणीनंतर उदयास आलेल्या स्वदेशी चळवळीच्या माध्यमातून जहाल मतवाद्यांनी स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य व राष्ट्रीय शिक्षण या तत्त्वाच्या आधारे ब्रिटिशांची अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याचा प्रयत्न केला व परिणामी भारतीय उद्योगधंद्यांना एक प्रकारे उभारी देण्याचे कार्य केले. स्वदेशी चळवळीच्या माध्यमातून भारतीय उद्योगधंद्यांना चालना व प्रोत्साहान मिळालेच परंतु ब्रिटिशांना बंगालची फाळणी ही रद्द करावी लागली. हे जहालमतवाद्यांच्या कार्याचे यश होते. ॲनी बेझंट व लोकमान्य टिळकांच्या नेतृत्त्वाखाली स्थापन झालेल्या होमरुल चळवळीमुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळ जगभर पोहचण्यास मदत झाली. होमरुल चळवळीच्या माध्यमातून जहालमतवाद्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीला जागतिक स्तरावर नैतिक पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला. परिणामी ब्रिटिश सरकारला १९१९ चा भारत सरकार कायदा संमत करणे भाग पडले.

## ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**मवाळवादी :** स्वातंत्र्य चळवळीसाठी सनदशीर व शांततेच्या मार्गाचा म्हणजेच अर्ज, विनंत्या, निवेदने व शिष्टमंडळे पाठवून आपल्या मागण्या मागणारा राष्ट्रीय सभेतील एक गट

**जहालमतवादी :** स्वातंत्र्य चळवळीसाठी आंदोलनाच्या मार्गांचा पुरस्कार करणारा राष्ट्रीय सभेतील एक गट

**होमरुल :** साम्राज्य अंतर्गत स्वराज्याच्या मागणीसाठी सुरू केलेली चळवळ

**चतु:सूत्री :** जहाल मतवाद्यांनी राष्ट्रीय आंदोलनासाठी पुरस्कृत केलेली स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य व राष्ट्रीय शिक्षणाची तत्त्वे

**गव्हर्नर :** व्हाइसरॉयला जबाबदार राहून भारतातील प्रांतिक राज्यकारभार पाहणारा ब्रिटिश अधिकारी

**गव्हर्नर जनरल :** ब्रिटिश सरकारचा भारतातील वरिष्ठ अधिकारी

**व्हाईसरॉय :** इंग्लंडच्या राजपदाचा भारतातील सर्वोच्च प्रतिनिधी

**भारतमंत्री :** भारतातील ब्रिटिशांच्या राज्यकारभारावर देखरेख करणारा व ब्रिटिश संसदेला जबाबदार असलेला इंग्लंडच्या मंत्रिमंडळातील सदस्य.

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१) ब) दादाभाई नौरोजी २) क) १९०५

३) अ) लॉर्ड कर्झन
४) ब) डॉ. रासबिहारी बोस
५) ब) बंगाल राष्ट्रीय

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१) ब) दिनशॉ वाच्छा
२) क) १९०७
३) अ) पंजाब नॅशनल
४) ब) बंगाल राष्ट्रीय
५) क) मद्रास

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) क) ॲनी बेझंट
२) अ) मंडाले
३) अ) जोसेफ बॅप्टिस्टा
४) अ) बनारस
५) अ) डॉ. ॲनी बेझंट

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टीपा लिहा.**

१) बंगालची फाळणी

२) डॉ. ॲनी बेझंट

३) राष्ट्रीय शिक्षण

४) स्वदेशी चळवळ

५) बंगालच्या फाळणीचे परिणाम

**ब) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) जहालमतवाद्यांची विचारप्रणाली विशद करा.

२) चतु:सूत्री संकल्पनेवर सविस्तर चर्चा करा.

३) बहिष्कार आदोलनाची माहिती द्या.

४) होमरूल चळवळीचे परिणाम सांगून तिच्या ऱ्हासाची कारणे सांगा.

**क) खालील प्रश्नांची विस्तृत उत्तरे लिहा.**

१) जहालमतवादाच्या उदयाची कारणे स्पष्ट करा.

२) लोकमान्य टिळकांच्या कामगिरीचे मूल्यमापन करा.

३) होमरूल चळवळीचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान स्पष्ट करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :

१. गोव्हर, बी. एल., आधुनिक भारताचा इतिहास, एस. चांद आणि कंपनी, नवी दिल्ली,२००३

२. वैद्य सुमन, कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपूर, २००४

३. जावडेकर शरद, आधुनिक भारत, सुलभ राष्ट्रीय ग्रंथालय, पुणे

४. सरदेसाई, बी. एन., आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००४

५. पवार, जा. भा., हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९७

६. गाठाळ, एस. एच., आधुनिक भारताचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०००

७. किर, धनंजय., लोकमान्य टिळक, मुंबई (१९६५)

८. Sarkar, Sumit.,Modern India (1885-1947), Macmillan India,2005

९. Chandra, Bipin.,Indias Struggle for Independence, Penguine Book,1982

❍❍❍

घटक १

# गांधी युग
## (Gandhian Era)

---

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ असहकार चळवळ

१.२.२ सविनय कायदेभंग चळवळ

१.२.३ चलेजाव चळवळ

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ सारांश

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

१. महात्मा गांधीजींचे तत्त्वज्ञान समजून घेता येईल.

२. असहकार चळवळ तिची कारणे व तिचा प्रभाव अभ्यासता येईल.

३. सविनय कायदेभंग चळवळ तिची वाटचाल व तिचे योगदान समजून घेता येईल.

४. चलेजाव चळवळीचा इतिहास समजून घेता येईल.

५. महात्मा गांधीजींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान अभ्यासता येईल.

## १.१ प्रास्ताविक :

आधुनिक भारताच्या इतिहासात महात्मा गांधी यांचे स्थान एकमेवद्वितीय असे आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी जी लढ्याची पद्धती वापरली व जे योगदान दिले त्याला इतिहासात तोड नाही. १९२० ते १९४७ या कालखंडात त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. त्यांच्या कार्यामुळे व कार्यकर्तृत्वाचा प्रभावामुळे या कालखंडाला गांधीयुग (Gandhian Era) म्हटले जाते. त्यांनी सत्य, अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने ब्रिटिश साम्राज्यविरुद्ध दिलेला लढा हा मानव जातीच्या इतिहासातील अपूर्व लढा मानावा लागेल. त्यांनी तो लढा हाती शस्त्र न घेता अहिंसेच्या मार्गाने लढविला. भारतीय इतिहासात १९२० हे वर्ष अपूर्व मानावे लागेल. कारण यावर्षी भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाला नवे वळण लागले आणि भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात आघाडीला असलेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्यपद्धतीला नवी दिशा मिळाली.

१ ऑगस्ट, १९२० या दिवशी जहाल चळवळीचे जनक लोकमान्य टिळक यांचे देहावसन झाले आणि स्वातंत्र्यसंग्रामाची धुरा महात्मा गांधीजींच्या कडे आली. १९२० च्या नागपूर अधिवेशनात घेण्यात आलेल्या अनेक महत्त्वपूर्ण निर्णयामुळे ह्या राष्ट्रीय संघटनेच्या घडणीत व उद्दिष्टांमध्ये आणि कार्यपद्धतीत अमुलाग्र बदल घडून आले. ही संघटना खऱ्या अर्थाने बहुजन समाजाला आपल्यात सामावून घेणारी राष्ट्रीय संघटना बनली. याचे श्रेय प्रामुख्याने महात्मा गांधीजींकडे जाते. टिळकांचे निधन झाले त्याचवेळी गांधीजींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय पातळीवर अभूतपूर्व अशा अहिंसक असहकार आंदोलनाचा श्री गणेशा झाला. त्यामुळे टिळक युगाच्या अस्ता बरोबर गांधी युगाचा उषःकाल झाला. १९२० साली गांधीजींना मिळालेला हा बहुमान, प्राप्त झालेले अग्रस्थान पुढील २०-२५ वर्षे कायम टिकले. अशाप्रकारे १९२० ते १९४७ हा, 'गांधी युगाचा' काळ ठरला. या कालखंडात गांधीजींच्या नेतृत्वाखाली देशाने ब्रिटिश राजवटीविरुद्ध यशस्वी लढा दिला. हाती शस्त्र न घेता अहिंसेचा मार्गाने लढविला. हे जगातले पहिले यशस्वी आणि आदर्श उदाहरण होय. त्यांच्या काळात स्वातंत्र्य चळवळ खेड्यापाड्यापर्यंत आणि सामान्य माणसांपर्यंत पोहोचली.

असहकार चळवळीच्या रूपाने महात्मा गांधीजींनी इंग्रज सरकारशी संघर्ष सुरू केला. पुढे सविनय कायदेभंग आणि चलेजाव चळवळीच्या रूपाने इंग्रजांना निर्वाणीचा इशारा दिला. जीवाची पर्वा न न करता 'जिंकू किंवा मरू' या निर्धाराने करोडो भारतीयांनी या लढ्यात भाग घेतला आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी

या लढ्याला यश येऊन देश स्वतंत्र झाला. या पर्वाच्या अखेरीस भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि म्हणूनच या पर्वाला 'सत्याग्रह पर्व' असे संबोधण्यात येते.असहकार, सविनय कायदेभंग चळवळ आणि चलेजाव चळवळ या तीन चळवळीतून गांधीयुगाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**महात्मा गांधीजींचे पूर्व चरित्र :**

महात्मा गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर, १८६९ रोजी गुजरात मधील पोरबंदर येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे होते. त्यांचे वडील करमचंद हे राजकोट संस्थांनचे दिवाण होते. त्यांच्या आईचे नाव पुतळाबाई होते. करमचंद गांधी यांना लक्ष्मीदास, रलियत, करसनदास, मोहनदास ही चार मुले होती. मोहनदास गांधी हे सर्वात लहान व शेवटचे अपथ्य होते.त्यांचे माध्यमिक शिक्षण सुरू असतानाच वयाच्या बाराव्या वर्षी कस्तुरबांशी त्यांचा विवाह झाला. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण मुंबई विश्वविद्यालयात झाले. १८८८ ते १८९१ या काळात ते इंग्लंडला वकिलीच्या शिक्षणासाठी गेले. १८९१ ला ते बॅरिस्टरची (बार-एट-लॉ) पदवी घेऊन भारतात परतले व त्यांनी मुंबई व राजकोट येथे वकिली सुरू केली. तेथे जवळजवळ दीड वर्षे त्यांनी वकिली व्यवसाय केला परंतु त्यांना व्यावसायिक स्थैर्य लाभले नाही. त्या काळात त्यांची रामचंद्र रावजी भाई यांच्याशी मैत्री जुळली. भारतीय राजकारणाची ओळख गांधीजींना त्यांच्याकडूनच झाली. एका मुस्लिम फर्मच्या कामानिमित्त गांधीजींना दक्षिण आफ्रिकेत जावे लागले. ही घटना गांधींजींचे जीवनचक्र बदलविण्यास कारणीभूत ठरली. तेथेच त्यांच्या राजकीय जीवनाचा शुभारंभ झाला.

दक्षिण आफ्रिकेत त्यावेळी तीव्र स्वरूपाचा वर्णद्वेष होता. तेथील ब्रिटिश भारतीयांचा द्वेष करून त्यांच्यावर सतत अन्याय, अत्याचार करत असे. तेथे युरोपीय राज्यकर्त्यांकडून वार्षिक भेदभावातून त्यांना आलेल्या अत्यंत वाईट अनुभवातून त्यांचे सगळे आयुष्यच बदलून गेले आणि गांधीवादाची यातून सुरुवात. झाली.

## १.२ विषय विवेचन :

### महात्मा गांधीजींचे तत्त्वज्ञान :

महात्मा गांधीजींचे जीवन चरित्र हेच एक आदर्श तत्त्वज्ञान होते. ते जसे बोलत तसेच वागत त्यात कधीच विसंगती नव्हती. गांधीजींच्या व्यक्तिमत्वावर कोणत्याही एका धर्माचा, पंथाचा ठसा पडलेला नव्हता. परंतु त्यांनी विविध धर्माचा, तत्त्वज्ञानाचा, अनेक ग्रंथांचा त्यांनी अभ्यास केला आणि त्यातून त्यांनी चांगले विचार, तत्त्वे आत्मसात केली. शुद्ध चारित्र्य, प्रामाणिकपणा व कठोर परिश्रमाची सवय हे गांधीजींच्यामध्ये असलेले अंगभूत गुण होते. त्यांचे राजकीय तत्त्वज्ञान सत्य, अहिंसा व सत्याग्रह असे होते. या त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानामुळे शेकडो वर्ष राज्य करणारी ब्रिटिश सत्ता संपुष्टात आणणे शक्य झाले. या तत्त्वज्ञानामुळेच कोट्यावधी भारतीय जनता महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली अविरतपणे ब्रिटिश साम्राज्यविरुद्ध लढा देत राहिली. 'माझे सत्याचे प्रयोग' हे गांधीजींचे आत्मचरित्र अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. दक्षिण आफ्रिकेत 'इंडियन ओपिनियन' व भारतात 'यंग इंडिया, नवजीवन, हरिजन' ही वृत्तपत्रे त्यांनी स्वतःच्या संपादकत्त्वाखाली चालवली आणि आपले तत्वज्ञान या वृत्तपत्रांच्या माध्यमातून मांडले. म्हणूनच गांधीजींचे हे तत्त्वज्ञान समजून घेणे आवश्यक आहे.

**(अ) १) सत्य :–**

गांधीजी टॉलस्टॉयच्या 'किंगडम ऑफ गॉड' या ग्रंथातील 'ईश्वराचे साम्राज्य तुमच्यात आहे' या संदेशाने गांधीजी भारावले होते. या तत्त्वज्ञानात गांधीजींवर टॉलेस्टायचा प्रभाव होता. सत्याचे खरे उपासक या नात्याने गांधीजी सत्य म्हणजे ईश्वर आणि ईश्वर म्हणजे सत्य यावर श्रद्धा ठेवीत. त्यांच्यामध्ये असणारे सहिष्णुता, विनम्रता, कणखरपणा, सहानुभूती हे असामान्य गुण होते. त्यांचे जीवन हेच एक तत्त्वज्ञान होते. त्यांनी सत्य म्हणजे खरेपणा हे साध्य मानले आणि या ध्येयापासून ते कधीही ढळले नाहीत. जेथे सत्य तेथे परमेश्वर असे ते मानत. या विचारांवर त्यांचा प्रचंड विश्वास होता. यातूनच त्यांची सामाजिक नितीमूल्ये विकसित होत गेली.

**२) अहिंसा :–**

सत्य व अहिंसा या दोन्ही गोष्टी एकमेकास पूरक आहेत. 'अहिंसा म्हणजे भेकडपणा किंवा पळपुटेपणा नसून मृत्यूला सामोरे जाणाऱ्या शूरांचा तो मार्ग आहे' असे अहिंसा या तत्त्वाचे स्पष्टीकरण त्यांनी १९२० साली 'यंग इंडिया' साप्ताहिकात केले आहे. गांधीजींच्या सत्याच्या प्रयोगामध्ये अहिंसेच्या तत्त्वास अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. त्यांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सत्य व अहिंसा या दोन बाबी महत्त्वाच्या वाटत होत्या. कोणत्याही प्राण्याला विचार, उच्चार आणि आचार तिन्ही दृष्टीने न दुखावणे म्हणजे अहिंसा होय. अहिंसा म्हणजे मनुष्याच्या अंतर्गत आणि नैतिक प्रवृत्तीत असलेला तो एक कार्य प्रमाण गुण आहे. अहिंसेच्या मार्गाने सत्याकडे जाता येते.

**३) सत्याग्रह :–**

गांधीजींनी आपल्या विचारसणीत व राजकीय चळवळीत सत्याग्रहाला फार मोठे महत्त्व दिले. सत्यासाठी केलेला आग्रह म्हणजे सत्याग्रह. सत्याग्रहामध्ये सत्य आणि अहिंसा यांचा समावेश असतो. सत्याग्रह प्रत्यक्ष कृतीचा प्रभावी मार्ग आहे अशी त्यांची धारणा होती. सत्याग्रहांमध्ये आत्मकलेश महत्त्वाचा असतो. सत्याग्रहाचा आग्रह करताना त्यामध्ये हिंसेचा वापर न करता सहानभूतीपूर्वक त्याला चुकांपासून परावृत्त करावे. सत्याग्रह पूर्वसूचना न देता करता येणार नाही. सत्य आणि अहिंसा यांचा समन्वय म्हणजे सत्याग्रह. सत्याग्रह म्हणजे प्रत्यक्ष कृती होय. तो चुकीच्या गोष्टी पुढे नमत नाही. त्यासाठी त्यांनी भय, द्वेष आणि असत्यांचा त्याग केला पाहिजे, अशी सत्याग्रहाची धारणा महात्मा गांधीजींची होती. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये असहकार, सविनय कायदेभंग, स्वदेशी, हरताळ व बहिष्कार यासारख्या सत्याग्रहाच्या मार्गांचा अवलंब केला.

**१. असहकार :–**

स्वातंत्र्य चळवळीची सूत्रे हाती घेतल्यानंतर सुरुवातीलाच गांधीजींनी इंग्रजांच्या विरोधात या मार्गाचा अवलंब केला. असहकार या तंत्रामागे सरकारला त्यांच्या चुकांची जाणीव करून देणे व जी सत्य स्थिती आहे ती स्वीकारण्यात लावणे, हे मुख्य सूत्र आहे. जनतेच्या सहकार्यावर शासन चालत असते. जनतेचे सहकार्य नसेल तर कोणते शासन चालत नाही. म्हणून भारतीय जनतेने ब्रिटिश शासनास कोणते सहकार्य करू नये अशी भूमिका गांधीजींनी मांडली. असहकारचा मार्ग अत्यंत प्रभावी असून राजकीय क्षेत्रातच नव्हे तर जीवनाच्या

कोणत्याही क्षेत्रात असहकाराच्या मार्गाचा अवलंब करावा असे गांधीजी म्हणत. असहकाराचा लढा हा अहिंसक लढा हे अत्यंत प्रभावी अस्त्र आहे.

**२. सविनय कायदेभंग :–**

सरकार जर अन्याय व जुलमी कायदे करीत असेल तर त्या कायद्याचा सविनयपणे भंग करणे हेच योग्य असते. अन्यायी कायदे मोडण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला असतो. अन्याय व जुलमी कायदा रद्द होईपर्यंत, आपणास न्याय मिळेपर्यंत हा लढा चालू ठेवता येतो. या चळवळीत शस्त्राचा वापर न करता संयम, विवेक, अहिंसा या तत्त्वांद्वारे हा लढा लढविला जातो.

**३. स्वदेशी :–**

स्वदेशी ही गांधीजींची लोकप्रिय चळवळ होती. त्यांचा हा स्वदेशी कार्यक्रम राजकीय चळवळीप्रमाणे सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांशी निगडित होता. यासाठी त्यांनी खादी ग्रामोद्योग सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. ब्रिटिशांनी चालवलेल्या आर्थिक शोषणाविरुद्ध गांधीजींनी ग्रामीण भागात स्वयंरोजगारास चालना दिली. सर्वांनी स्वदेशी वस्तूंचा वापर करावा यासाठी खेड्यापाड्यातून निरनिराळे उद्योग सुरू व्हावेत अशी त्यांनी चळवळ सुरू केली. यातून भारतीयांना रोजगार मिळाला व स्वस्त दराने वस्तू मिळू लागल्या. लोक देशप्रेमाने भारावल्याने स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले. यातून ब्रिटिशांनी चालवलेल्या आर्थिक शोषणाला आळा बसला.

**४. हरताळ :–**

हरताळ याचा अर्थ कामकाजावर बहिष्कार घालणे व काम बंद पाडणे असा होतो. कामगार, विद्यार्थी, शिक्षक, व्यापारी यांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध या तंत्राचा वापर करावा असे गांधीजींनी सुचवले होते. हरताळ याचा अर्थ व्यवहार बंद ठेवणे आणि तेही इच्छेने सक्तीने नव्हे. यामध्ये सक्ती झाली तर हरताळ यशस्वी होत नाही. तसेच तो पुन्हा पुन्हा करायचा नसतो. कारण त्यामुळे जनजीवन विस्कळीत होते.

**५. बहिष्कार :–**

महात्मा गांधीजींनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये बहिष्कार या तत्त्वाचा वापर केला. या चळवळीमुळे ब्रिटिश सरकारला राज्यकारभार करणे कठीण होईल व प्रशासनाच्या अपयशातून, असहकारातून ब्रिटिश सरकार हतबल होईल व भारतीयांना स्वातंत्र्य देईल. असे गांधीजींचे मत होते. म्हणून त्यांनी १९२० ते १९३० साली बहिष्काराचे शस्त्र वापरले. यावेळी जनतेने शाळा- महाविद्यालय, शासकीय कचेरी, न्यायालय, शासकीय कार्यक्रम, कायदेमंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, विदेशी वस्त्र इत्यादीवर बहिष्कार टाकला होता.

वरील मार्गांचा गांधीजींनी ब्रिटिशांविरुद्ध स्वातंत्र्य चळवळीत वापर केला आणि भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. त्यांनी आपल्या वाणीत व कृतीत कधीही विसंगती होऊ दिली नाही.

**ब) गांधीजींचे आफ्रिकेतील कार्य :–**

इ. स. १८९३ मध्ये गांधीजी आपल्या वकिलीच्या व्यवसायानिमित्त आफ्रिकेला गेले. तेथे त्यांना अनेक बरे वाईट अनुभव आले. तेथील आफ्रिकन लोक काळे होते आणि गोरे लोक त्यांच्यावर अन्याय करत होते. नोकरी, कामाधंदया निमित्त तेथे गेलेल्या भारतीयांची संख्याही मोठी होती. गोरे राज्यकर्ते या सर्वांवर

अन्याय करीत असत. प्रत्यक्ष गांधीजींना सुद्धा अनेक वाईट अनुभव आले. एकदा ते रेल्वेच्या प्रथम वर्गातून प्रवास करीत होते पण त्या वर्गात फक्त गोऱ्यांनीच बसायचे असे सांगून गांधीजींचे साहित्य बाहेर फेकून दिले. ही घटना गांधीजींचे जीवन बदलून टाकणारी ठरली. या वर्णभेदाविरुद्ध लढा देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. काळया लोकांवर याप्रमाणे अनेक प्रकारे अन्याय केला जात होता. उदा. त्यांना मताधिकार नव्हता, हिंदी लोकांनी सतत ओळखपत्र बाळगावे, त्यांच्यावर दरवर्षी जिजीया करा सारखा 'पोल टॅक्स' म्हणून ३ पौंड द्यावे लागत होते. फक्त ख्रिस्ती धर्मपद्धतीनेच त्यांनी लग्न करावे अशा अनेक जाचक अटी हिंदी लोकांवर त्यांनी लादल्या होत्या. त्यामुळे ख्रिश्चन धर्म धार्मिक रिति विभाजनुसार नोंद न केलेले विवाह तेथील सरकारने अवैध ठरवले. त्यामुळे हिंदू, मुस्लिम आणि पारशी विभाजनुसार झालेले तेथील विवाह बेकायदेशीर ठरले व त्यांची मुले अनौरस ठरली. या अपमान कारक कायद्या विरुद्ध गांधीजीनी १९०६ पासून सत्याग्रह सविनय कायदेभंग यांच्या माध्यमातून चळवळ सुरू केली. हिंदी व आशियाई लोकांवरील अन्याय दूर करण्यासाठी तेथील ब्रिटिश राज्यकर्त्यांकडे अर्ज विनंती द्वारे सनदशीर मार्गाचा अवलंब केला. त्याचप्रमाणे त्यांनी आफ्रिकेत 'नाताळ इंडियन काँग्रेस' नावाची हिंदी लोकांची संघटना स्थापन केली व 'इंडियन ओपिनियन' नावाचे वृत्तपत्र सुरू केले. वर्ण देशाचे चटके सोसणाऱ्या तेथील लोकांमध्ये जागृती निर्माण केली माणूस म्हणून त्यांना असणाऱ्या त्यांच्या मूलभूत हक्कांची जाणीव करून देऊन अहिंसात्मक कायदेभंग असहकार सत्याग्रह असे मार्ग आक्रमित करत गांधीजींनी हा लढा जिंकला.सरकारने ही चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. गांधीजींचा खूप छळ केला. मारहाण, तुरुंगवास झाला. पण त्यांनी अहिंसेच्या मार्गाने सत्याग्रह चालूच ठेवला.भारतात त्याचे पडसाद उमटले. काँग्रेसने त्याची दखल घेतली. नामदार गोखले यांनी भारतभर दौरा करून त्यांना पाठिंबा दिला. शेवटी गांधीजींना यश आले. तत्कालीन व्हाईसरॉय हार्डिंग यानेही दक्षिण आफ्रिकन सरकारवर टीका केली. याचा परिणाम दक्षिण आफ्रिकन सरकारने पोलटॅक्स, ओळखपत्रे, विवाह वैधता कायदा रद्द करणे इत्यादी प्रमुख मागण्या मान्य केल्या. अहिंसा आणि निशस्त्र प्रतीकरातून केलेल्या सत्याग्रहाचा हा पहिला विजय होता.

**क) म. गांधीजींचे भारतात आगमन व प्रारंभिक कामगिरी :-**

गांधीजींच्या कार्याला सुरुवात झाली ती दक्षिण आफ्रिकेमध्ये. व्यवसायाच्या निमित्ताने आफ्रिकेत गेलेले गांधीजी वर्ण द्वेशाविरोधी चा यशस्वी लढा करून २२ वर्षांनी जानेवारी १९१५ मध्ये भारतात परतले. ते भारतात येण्यापूर्वी त्यांची येथील जनतेत आणि काँग्रेस पुढाऱ्यातही 'एक यशस्वी नेता' अशी प्रतिमा निर्माण झाली होती. त्यांनी ना. गोखले यांना आपले गुरु मानले. सर्व भारतभर फिरून त्यांनी भारतीयांच्या परिस्थितीचा अभ्यास केला व शेतकरी, कामगार, दलित त्यांचे प्रश्न हाती घेतले. १९१६ साली त्यांनी साबरमती आश्रम स्थापन केला व राजकीय चळवळी बरोबर समाजसेवेला वाहून घेतले. त्यांनी स्वातंत्र्य चळवळ व सामाजिक सुधारणा यांना बरोबरीचे महत्त्व दिले. गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत नवीन विचार प्रवाह सुरू केला. त्यामुळे गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळ ही सर्वसामान्य जनतेची चळवळ झाली.

**१) चंपारण्य सत्याग्रह (१९१७) :-**

गांधीजींनी चंपारण्य सत्याग्रह ही पहिली सविनय कायदेभंगाची चळवळ हाती घेतली. बिहारमधील निळ पिकवणाऱ्या शेतकऱ्यांवर ब्रिटिश मळेवाले जुलूम करीत होते. आपणास पाहिजे त्या किमतीला माल

देण्याची सक्ती करत असत. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेतील गांधीजींची ख्याती ऐकून चंपारण्यतील शेतकऱ्यांनी बिहारमधील निळीच्या शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाकडे लक्ष देण्याची गांधीजींना विनंती केली. १९१६ साली राष्ट्रीय सभेच्या लखनऊ अधिवेशन प्रसंगी राजकुमार शुक्ला या स्थानिक शेतकऱ्याने चंपारण मधील शेतकऱ्यांवर होत असलेला अन्याय गांधीजींच्या कानावर घातला.त्यानुसार गांधीजी डॉ. राजेंद्र प्रसाद, जे. बी. कृपलानी, महादेव भाई देसाई, नरहरी पारिख इत्यादींना घेऊन चंपारण येथे आले आणि तेथील शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष परिस्थितीची त्यांनी चौकशी करण्यास सुरुवात केली. तेव्हा तेथील ब्रिटिश जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना चंपारण सोडून जाण्याचा आदेश दिला. परंतु हा आदेश गांधीजींनी मानला नाही. गांधीजींवर प्रवेश बंदी हुकूम मोडल्याबद्दल खटला भरण्यात आला. या खटल्याकडे सर्व देशाचे लक्ष वेधून राहिले. गांधीजींनी या खटल्यास तोंड देऊन तुरुंगात जाण्याची तयारी दर्शवली. गांधीजींच्या या पवित्र्या मुळे ब्रिटिश अधिकाऱ्यांनी नमते घेतले व शेतकऱ्यांवरील अन्यायाची चौकशी करण्यासाठी समिती नेमली व त्या समितीच्या अहवालानुसार सरकारने सक्तीच्या नीळ लागवडीची पद्धत रद्द केली व शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करण्यासाठी एक कायदा सरकारला पास करावा लागला.

**२) खेडा सत्याग्रह (१९१८) :-**

गुजरातमध्ये १९१८ साली दुष्काळ पडला होता. खेड्या जिल्ह्यातील परिस्थिती तर भयानकच होती. त्यातच १९१७ साली प्लेगची साथ आली. त्यामुळे शेतकऱ्यांना सारा भरणे अशक्य झाले. त्यांनी सरकारकडे सारा माफीची मागणी केली. परंतु ब्रिटिश सरकारने ती अमान्य केली. तेव्हा मोहनलाल पंड्या या स्थानिक शेतकऱ्याच्या पुढाकाराने १९१८ मध्ये खेडा जिल्ह्यात साराबंदीची चळवळ सुरू झाली. गांधीजींनी शेतकऱ्यांचे नेतृत्व स्वीकारले व साराबंदीचा सत्याग्रह सुरू केला. यावेळी सरदार वल्लभ भाई पटेल हे आपली वकिली सोडून गांधीजींच्या बरोबर प्रथमच सत्याग्रहात उतरले. सरकारने या सत्याग्रहाची दखल घेऊन खेड्यातील शेतकऱ्यांना शेतसारा देण्याबाबत सवलत दिली.

**३) अहमदाबाद गिरणी कामगारांचा संप (१९१८) :-**

अहमदाबाद येथील कापड गिरणी मालक प्रचंड नफा मिळवित असत. परंतु कामगारांची मात्र आर्थिक पिळवणूक करीत असत. वाढत्या महागाईच्या काळातही अहमदाबाद मधील गिरणी कामगारांचे पगार वाढले नव्हते. तुटपूंजा पगारावर निर्वाह चालवणे त्यांना कठीण जात होते. अशावेळी कामगारांनी आपल्या न्याय मागण्यांसाठी गांधीजींच्या सल्ल्याने संप पुकारला. संपाचा कालखंड वाढत गेला तसे कामगारांच्या मध्ये अस्वस्थता निर्माण झाली व आर्थिकदृष्ट्या त्यांना कठीण झाले. त्यावेळी गांधीजींनी संप मागे न घेण्याचे आवाहन केले व स्वतः उपोषणास बसले. गांधीजींचा हा पहिला उपोषण सत्याग्रह होता. उपोषणाच्या चौथ्या दिवशी गिरणी मालक वाटाघाटी करण्यास तयार झाले. त्यांनी माघार घेतली आणि कामगारांचा पगार ३५ टक्क्यांनी वाढवला. अशाप्रकारे कामगारांचा लढा यशस्वी झाला. हा गांधीजींच्या आयुष्यातील पहिला उपोषण सत्याग्रह होता या आंदोलनात अंबालाल साराभाई, भगिनी अनुसया बेन या गांधीसोबत उपोषणास बसल्या होत्या.

गांधीजींनी भारतात वरील तीन ठिकाणी सत्याग्रहाचे प्रयोग केले व त्यात यश मिळाले. त्यामुळे सत्याग्रह

हे अन्यविरुद्ध लढण्याचे एक साधन म्हणून त्यांची उपयुक्तता सिद्ध झाली आणि गांधीजींचे नेतृत्व प्रभावी व सर्वमान्य झाले.

### १.२.१ असहकार चळवळ (Non Co-operation Movement) (१९२०–१९२२) :

महात्मा गांधीजींचा ब्रिटिशांच्या न्यायव्यवस्थेवर विश्वास होता, त्याचा पूर्ण भ्रमनिरास झाला होता. या सरकारशी आपण कितीही सहकार्याची भूमिका घेतली तरी ब्रिटिशांची साम्राज्यवादी दडपशाही दिवसेंदिवस वाढत चाललेली होती. रौलेट कायदे, पंजाब मधील अत्याचार, जालियनवाला बाग हत्याकांड व खिलाफत चळवळ या सर्व घटनांनी ब्रिटिशांची अमानुष व पाशवी वृत्ती सिद्ध झाली होती. त्यामुळे या सरकारला आपल्या तत्त्वा आधारे असहकार चळवळ पुकारून जेरीस आणावे असे गांधीजींना वाटू लागले. त्यांनी सरकारविरुद्ध संघर्षाचा निर्णय घेतला. यातूनच गांधीजींनी असहकार चळवळ पुकारली.

**अ) असहकार चळवळीची कारणे :–**

**१) राष्ट्रवादाची प्रखर भावना :–**

पहिल्या महायुद्धानंतर अमेरिकन अध्यक्ष वुडरो विल्सन यांनी स्वयंनिर्णयाचे तत्त्व जाहीर केले. हे तत्त्व भारतालाही लागू करण्यात येईल असे भारतीयांना वाटत होते. भारतीयांच्या स्वराज्याबद्दल ब्रिटिशांनी दुटप्पी भूमिका घेतली. युद्धकाळात भारतीय सैनिकांचा पाश्चात्त्य देशाशी संबंध आला. त्यामुळे स्वातंत्र्यासाठी त्यांच्यामध्ये राष्ट्रवाद निर्माण झाला.

**२) बिकट अर्थव्यवस्था :–**

पहिल्या महायुद्धात कोट्यावधी रुपये खर्च झाले होते. युद्धाचा खर्च परस्पर भागवण्यासाठी भारतीयांवर भरमसाठ कर आकारण्यात आले. महागाई, दुष्काळ, प्लेग, आवश्यक वस्तूंचा तुटवडा इत्यादीमुळे लोकांच्यात असंतोष वाढू लागला आणि लोक ब्रिटिशांविरुद्ध लढा देण्यास प्रयत्न करू लागले.

**३) मॉंटफर्ड कायद्याने केलेली निराशा :–**

१९१९ सालच्या मॉन्टेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा कायद्याने भारतीयांना काही राजकीय सुधारणा दिल्या. मात्र त्या फारच जुजबी होत्या. या कायद्याने भारतीयांची घोर निराशा झाली. द्विदल राज्य पद्धती निर्माण करून जबाबदार राज्यपद्धती दिल्याचे घोषित होते. परंतु प्रत्यक्षात सुधारणा दिलेला नव्हत्या. तो फक्त देखावा होता.

**४) रौलेट कायदे :–**

देशामध्ये वाढत चाललेल्या राष्ट्रीय आंदोलनाला आळा घालण्यासाठी महायुद्ध काळात सरकारने 'भारत सुरक्षा कायदा' (Defence of India Act) मंजूर केला होता. हा कायदा महायुद्ध संपल्यानंतर रद्द करण्यात येणार होता. परंतु पहिले महायुद्ध संपले तरी हा कायदा रद्द झाला नाही. उलट भारतातील गुप्त क्रांतिकारी कारवाया, लोकांच्या राजद्रोही कारवाया तसेच राष्ट्रीय आंदोलन दडपून टाकण्यासाठी या कायद्याची मुदत वाढवण्याची किंवा त्या कायद्यासारखा नवा कायदा निर्माण करण्यासाठी सरकारला गरज वाटून सरकारने १० डिसेंबर,१९१८ रोजी सीडने रौलट या न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली व त्या समितीच्या

अहवालावरून १० फेब्रुवारी १९१९ मध्ये केंद्रीय विधिमंडळाकडे दोन विधेयके मांडले. या विधेयकांना 'रौलट कायदे' म्हणतात. या कायद्या नुसार कोणत्याही राजद्रोही विरुद्ध खटला चालवण्यासाठी तीन न्यायाधीशांचे एक न्यायापीठ स्थापन करण्यात येणार होते. कोणत्याही व्यक्तीला संशयावरून अटक करण्यात येणार होती. गुन्हेगाराला अपील करता येणार नव्हते. कोणत्याही ठिकाणांची सरकार झडती घेऊ शकत होते. आपले राहते ठिकाण परवानगीशिवाय सोडता येणार नाही, पोलीस कचेरीमध्ये रोज हजेरी लावणे इत्यादी व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे कायदे केले. यालाच रौलेट कायदे म्हणतात.थोडक्यात भारतातील राष्ट्रीय चळवळ दडपण्यासाठी या विधेयकाचा उपयोग होणार होता. या कायद्याला 'काळा कायदा' ही म्हटले जाते. या कायद्याविरुद्ध देशभर संतापाची लाट उसळली. या कायद्याच्या निषेधार्थ गांधीजींनी सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला आणि सरकारला इशारा दिला की, 'हे जुलमी कायदे मी पुस्तकात राहू देणार नाही.' ३० मार्च, १९१९ रोजी हरताळ पाळण्याचे जनतेला आव्हान केले. गांधीजींच्या आव्हानाला देशभर प्रचंड प्रतिसाद मिळाला.

**५. जालियनवाला बाग हत्याकांड (१३ एप्रिल १९१९) :-**

देशाच्या इतिहासातील एक अत्यंत क्रूर अमानवी व कटू घटना म्हणजे १९१९ चे जालियनवाला बाग हत्याकांड होय. त्याचे नावच हत्याकांड आहे यावरून ते किती भयानक असल्याची कल्पना येते. रौलेट ॲक्ट विरुद्ध सत्याग्रही लढ्याने पंजाब मध्ये प्रखर स्वरूप धारण केले. सरकारने दडपशाहीचे सत्र सुरू करून चळवळ दडपण्याचे सत्र सुरू केले. पंजाबचा गव्हर्नर मायकेल ओडवायरने पंजाबचे नेते डॉ. किचलू , डॉ. सत्यपाल, डॉ. सैफुद्दीन फैजल यांना अटक केली होती. त्यांच्या सुटकेसाठी पंजाबच्या लोकांनी मोर्चा काढला. त्या मोर्चावर सुद्धा सरकारने गोळीबार केला. त्यामध्ये १० लोक ठार झाले. त्यामुळे लोक आणखी खवळले. त्यांनी अनेक सरकारी कार्यालयास आगी लावल्या, फोनच्या तारा तोडल्या, अनेक इंग्रजांना ठार केले. त्यामुळे अमृतसर मध्ये लष्कराला पाचारण करण्यात आले. जनरल डायर या लष्करी अधिकाऱ्याने अमृतसरमध्ये सभाबंदीचा हुकूम जारी केला. त्याने १२ एप्रिल, १९१९ रोजी सार्वजनिक मोर्चे व सभा यांना बंदी घालणारे फर्मान काढले. याचवेळी सरकारच्या जुलमी कृत्याचा निषेध करण्यासाठी दिनांक १३ एप्रिल, १९१९ रोजी अमृतसर येथील जालियनवाला बाग येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आलेली होती. या सभेसाठी ९ ते १० हजार लोक जमा झाले होते. बागेच्या चारी बाजूला भिंती व एकच प्रवेशद्वार होते. बहुसंख्य लोकांना सभाबंदीच्या हुकमाची कल्पना नव्हती. जनरल डायरने लोकांना निघून जाण्याची पूर्वसूचना न देता त्याने सभेवर तुफान गोळीबार केला. ५० ब्रिटिश व १०० गुरखा हिंदी शिपाई घेऊन त्याने ३०३ प्रतीच्या १०५० गोळ्या झाडल्या. दारूगोळा संपेपर्यंत डायरने गोळीबार चालू ठेवला. त्यामुळे एकच गोंधळ उडाला. सरकारी नोंदणी प्रमाणे ४०० लोक मरण पावले व १००२ जखमी झाले तर लाला गिरीधर यांच्यामध्ये १००० लोक ठार झाले व १२०० लोक जखमी झाले. अनेक जखमी झालेले पुन्हा मरण पावले. ही घटना म्हणजे ब्रिटिशांच्या अत्याचाराचा कळस होता. भारताच्या इतिहासातील अत्यंत क्रूर घटना. या घटनेमुळे इंग्रजांच्या चरित्रालाच डाग लागला. जालियनवाला बाग हत्याकांडामुळे भारतभर संतापाची लाट उसळली. जनता पेटून गांधींजींनी सुरू केलेल्या सत्याग्रहाला हिंसक वळण लागले. गांधीजींना पंजाब मध्ये जाण्यास अटकाव करण्यात आला पण तो न जमल्यामुळे त्यांना अटक झाली. गांधीजींचा इंग्रजांच्या न्यायबुद्धीवरचा विश्वास उडाला. ब्रिटिश सरकारने मात्र जनरल डायरला बढतीचे बक्षीस दिले.

## ६. हंटर कमिशन :–

जालियनवाला बाग हत्याकांडामुळे साऱ्या भारतभर संतापाची लाट उसळली. या हत्याकांडाची चौकशी व्हावी अशी मागणी काँग्रेसने व जनतेने केली. या सरकारने या मागणीकडे दुर्लक्ष केले. सरकारचा निषेध करण्यासाठी सर्वत्र सभा घेतल्या गेल्या. तेव्हा रवींद्रनाथ टागोरांनी हत्याकांडाचा तीव्र शब्दात निषेध करून गव्हर्नर जनरलला निषेधाचे पत्र लिहिले व ब्रिटिश सरकारने त्यांना दिलेल्या 'सर' या पदवीचा त्याग केला. शंकर नायर यांनी गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल सभासद पदाचा राजीनामा दिला. अशा पद्धतीने दबाव वाढत गेल्याने सरकारने ऑक्टोबर १९१९ मध्ये लॉर्ड हंटर यांच्या नेतृत्वाखाली कमिशन नेमले. त्यात सहा सदस्य होते. त्यापैकी तीन भारतीय होते. काँग्रेसने सुद्धा चौकशीसाठी एक समिती नेमली त्यामध्ये मोतीलाल नेहरू, सी आर. दास, बॅरिस्टर जयकर, अब्बास तय्यबजी व गांधीजी हे सदस्य होते. काँग्रेसच्या सभासदांनी मार्च १९२० मध्ये अहवाल सादर केला. त्यात जनरल डायरला सर्वस्वी जबाबदार ठरवून त्याच्यावर खटला भरण्याची मागणी केली होती. पण सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले.

हंटर कमिशनने २६ मे १९२० रोजी आपला अहवाल दिला. हा अहवाल सादर होण्यापूर्वीच सरकारने 'माफीचा कायदा' पास करून जालियनवाला बाग प्रसंगाशी संबंधित असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांना माफी दिली.

मायकेल ओडवायरला कोणतीही शिक्षा झाली नाही. ज्या जनरल डायरने हे हत्याकांड घडवून आले त्याला फक्त कामावरून दूर केले, पण त्या अगोदर त्याचा सत्कार करण्यात आला. यावरून ब्रिटिशांची दडपशाही वृत्ती व साम्राज्यवादी अरेरावी दिसून आली. ब्रिटिश सरकारशी सहकार्याने मागून काहीच निष्पन्न होत नाही. म्हणूनच गांधीजींनी असहकाराचे धोरण राबवण्याचे ठरवले.

## ७. खिलाफत चळवळ (१९१९) :–

तुर्कस्तान जगातील तमाम मुस्लिमांचे श्रद्धास्थान होते. कारण तुर्कस्तानचा 'खलिफा' हा सर्व मुस्लिमांचा प्रमुख मानला जात असे. पहिल्या महायुद्धात तुर्कस्तानने जर्मनीच्या बाजूने इंग्लंड विरुद्ध भाग घेतला होता. भारतातील मुस्लिमांना मात्र इंग्लंडच्या बाजूने लढताना तुर्कस्तानचे विरुद्ध लढण्याची वेळ आली. तेव्हा इंग्लंड सरकारने भारतीय मुस्लिमांना आश्वासन दिले की युद्ध समाप्तीनंतर आम्ही तुर्की साम्राज्याचे विभाजन करणार नाही. परंतु प्रत्यक्षात युद्ध समाप्तीनंतर युरोपियन राष्ट्रांनी तुर्की साम्राज्याचे लचके तोडले. इंग्लंडमध्ये दिलेले आश्वासन पाळले नाही. त्यामुळे भारतातील मुस्लिमांनी खिलाफत चळवळ उभारली. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने या चळवळीला पूर्ण पाठिंबा दिला. यामुळे मुस्लिमांनी नोव्हेंबर, १९१९ साली दिल्ली येथे भरलेल्या अखिल भारतीय खिलाफत परिषदेचे अध्यक्षपद महात्मा गांधींना दिले. तुर्कस्तानचा प्रश्न सोडवला नाही तर आपण बहिष्कार व असहकार मार्गाचा अवलंब करू असा इशारा सरकारला देण्यात आला. १९१९ साली झालेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनातही खिलाफत चळवळ सुरू करण्याचे ठरले. यासाठी ब्रिटिश शासनाशी असहकार करण्याचे ठरले. परंतु पुढे ही चळवळ चालली नाही. कारण तुर्की लोकांनीच खलिफांची सत्ता उधळून टाकली व खिलाफत सत्ता नष्ट केली व लोकशाही प्रस्थापित केली. परंतु यातून असहकारचे तत्व पुढे आले व ती एक चळवळ बनली.

**(ब) असहकार चळवळीचे स्वरूप :–**

४ सप्टेंबर, १९२० रोजी कलकत्ता येथे काँग्रेसचे अधिवेशन लाला लजपत राय यांच्या अध्यक्षतेखाली भरले. या खास अधिवेशनात गांधीजींनी असहकाराचा ठराव मांडला. हा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला. असहकार आंदोलनाची सर्व सूत्रे महात्मा गांधींकडे सोपवण्यात आली. यावेळी गांधीजींनी सांगितले की हा ठराव प्रत्येकाने प्रामाणिकपणे राबवला तर एका वर्षात स्वराज्य मिळवून देऊ. नागपूर येथे २६ डिसेंबर १९२० रोजी काँग्रेसचे नियमित वार्षिक अधिवेशन भरले. अधिवेशनात १४ हजार प्रतिनिधी उपस्थित होते. या अधिवेशनात बॅरिस्टर जीना, मदन मोहन मालवीय, ऍनी बेझंट, बिपिन चंद्र पाल आणि मुंजे इत्यादी नेत्यांनी असहकार चळवळीला विरोध केला. तरीसुद्धा असहकार चळवळ सुरू करण्याबाबतचा ठराव या अधिवेशनात मंजूर झाला. त्यामुळे नागपूर अधिवेशन काँग्रेस चळवळीच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. आपण हिंदुस्तान ला एका वर्षात स्वराज्य देऊ अशी जी घोषणा गांधीजींनी केली होती त्यावर या अधिवेशनात शिक्कामोर्तब झाले. काँग्रेसच्या नेत्यांनी देशांच्या विविध भागात दौरा करून असहकार कार्यक्रमाचे महत्त्व स्पष्ट केले व ५० लक्ष स्वयंसेवकाची नोंदणी देशभरामध्ये झाली.

**(क) असहकार चळवळीचा कार्यक्रम :–**

१. स्वदेशी मालाचा वापर करणे व परदेशी मालावर बहिष्कार टाकणे.

२. सरकारी सभा, कार्यक्रम, समारंभ यांना हिंदी नागरिकांनी हजर न राहणे.

३. ब्रिटिश सरकारने दिलेल्या पदव्या, मानसन्मान व अधिकार पदे यांचा त्याग करणे.

४. सरकारी शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे यावर बहिष्कार आणि राष्ट्रीय शाळांमध्ये प्रवेश देणे.

५. ब्रिटिश न्यायालयावर बहिष्कार आणि न्याय पंचायती सुरू करणे.

६. कायदेमंडळाच्या निवडणुकांवर बहिष्कार टाकून न्यायनिवाड्यासाठी भारतीय व्यक्तींनी न्याय पंचायती स्थापन कराव्यात.

७. १९१९ च्या कायद्यानुसार अस्तित्वात येणाऱ्या प्रांतिक कायदेमंडळावर जनतेने बहिष्कार टाकावा व कोणतेही मतदान करू नये.

८. मेसोपोटेमियात कोणाही हिंदी माणसाने नोकरीवर जाऊ नये.

९. स्थानिक स्वराज्य संस्था, कायदेमंडळे यांचे त्याग पत्र देणे याप्रमाणे गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने देशव्यापी आक्रमक धोरण स्वीकारले व साम्राज्या अंतर्गत वसाहतीचे स्वराज्य हे ध्येय ठरवले.

**(ड) असहकार चळवळीची वाटचाल :–**

१ ऑगस्ट, १९२० रोजी असहकार चळवळीस प्रारंभ केला. संपूर्ण देशातून गांधीजींच्या असहकार चळवळीस पाठिंबा मिळाला. एक ऑगस्ट १९२० ते १२ फेब्रुवारी १९२२ पर्यंत जवळजवळ दीड वर्ष चळवळ चालू होती.

**१. मानसन्मान, पदव्यांचा त्याग :–**

सरकारने दिलेल्या मान-सन्मान पदव्यांचा त्याग करण्यात आला.गांधीजींनी 'कैसर-इ-हिंद' या

पदवीचा त्याग केला. रवींद्रनाथ टागोर यांनी 'सर' या पदवीचा तर नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी 'आय.सी.एस.' पदवीचा त्याग करून सरकारी नोकरीचा राजीनामा दिला. अनेकांनी सरकारी नोकऱ्या, वकिली सोडून दिली. सी. आर. दास, मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, लाला लजपत राय या नेत्यांनी वकीली सोडून दिली व न्यायालयावर बहिष्कार घातला. या काळात हिंदू मुस्लिम ऐक्य असल्यामुळे या चळवळीला मुस्लिमांनी सुद्धा पाठिंबा दिला.

**२. स्वदेशीचा पुरस्कार व बहिष्कारचा वापर :–**

या असहकार चळवळीत स्वदेशीचा जोरदार पुरस्कार, प्रचार आणि अंमलबजावणी केली. स्वदेश मालाचे उत्पादनासाठी उद्योगधंदेना प्रोत्साहन दिले. हात मागावर खादीचे कापड बनवण्यात देशभर प्रचंड प्रतिसाद मिळाला. खादी वापरणे हे देशभक्तीचे प्रतीक मानले गेले. महात्मा गांधींनी लोकमान्य टिळकांच्या स्मरणार्थ एक कोटीचा टिळक स्वदेशी फंड गोळा करण्याचा आदेश जनतेला दिला. या पैशातून वीस लाख चरखे खरेदी करून ते खेडोपाडी स्वयंसेवकांना वाटण्यात आले. त्यामुळे खादीचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. यामुळे हात मागाच्या व्यवसायाचे पुनरुज्जीवन होऊन ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध झाला.

**३. कौन्सिलच्या निवडणुकांवर बहिष्कार :–**

१९१९ च्या मॉटफर्ड पर सुधारणा कायद्यानंतर घेण्यात आलेल्या विधिमंडळाच्या निवडणुकांवर बहिष्कार घालण्यात आला. राजनिष्ठ, जातीवादी व संधीसाधू लोकांनी जरी निवडणुकात भाग घेतला असला तरी सर्वसामान्य जनतेने असहकार चळवळीस पाठिंबा दिला व मतदारांपैकी २/३ मतदारांनी मतदान केले नाही.

परदेशी मालावर आणि विशेषतः परदेशी कापडावर बहिष्कार घातला. दुकानदाराकडून परदेशी कापड विकत घेऊन त्याची होळी करण्यात आली. हजारो विद्यार्थ्यांनी शाळा कॉलेजवर बहिष्कार घालून राष्ट्रीय शिक्षण पसंत केले. या काळात राष्ट्रीय शाळा, महाविद्यालये उघडण्यात आली. काशी विद्यापीठ, गुजरात विद्यापीठ, पुणे येथे टिळक विद्यापीठ, अलीगड येथे जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ स्थापन झाले.

**४. प्रिन्स ऑफ वेल्स वर बहिष्कार :–**

१७ नोव्हेंबर १९२१ रोजी भारतात राजकीय असंतोष कमी करण्यासाठी व नव्याने आलेल्या विधिमंडळाच्या उद्घाटनासाठी ब्रिटिश राजपुत्र प्रिन्स ऑम वेल्स यांनी भारताला भेट दिली. त्याचे स्वागत जोरदारपणे व्हावे असे हिंदुस्थान सरकारला वाटत होते. पण प्रत्यक्षात तसे झाले नाही. काँग्रेसने त्यांच्या भेटीवर बहिष्कार टाकला. मुंबईला त्यांनी भेट दिली, तेव्हा लोकांनी हरताळ पाळून बहिष्कार टाकला. उलट त्या दिवशी चौपाटीवर महात्मा गांधीजींची सभा झाली. त्या दिवशी मुंबई दंगल, गोळीबार झाला. इतर शहरात हरताळ शांततेत पाळला गेला. या चळवळीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत व्हाईसरॉयने विलायतेला कळवले आणि कडक उपाय योजून चळवळ दडपून टाकली पाहिजे असे सुचवले.

**५. सी. आर. दास यांचे कार्य :–**

बंगालमध्ये सी. आर. दास त्यांच्या नेतृत्वाखाली असहकाराची चळवळ सुरू झाली होती. सी. आर. दास यांचे पुत्र चित्तरंजन दास व सून वासंती देवी यांनी स्वयंसेवक म्हणून प्रथम तुरुंगवास पत्करला. एवढेच नव्हे

तर दासांच्या पत्नीही चळवळीत सामील झाल्या. दास कुटुंबाचे देशप्रेम पाहून हजारो कार्यकर्ते चळवळीत सामील झाले. पोलिसांनी अटकसत्र अवलंबले. सर्व तुरुंग भरून गेले. तेव्हा नाईलाज होऊन कैदी सोडून देण्यात आले.

**६. ब्रिटिशांची दडपशाही :–**

गांधीजींच्या आदेशाप्रमाणे असहकार चळवळ उत्स्फूर्तपणे व शांततेत सुरू होती. मात्र ब्रिटिश सरकारने ही चळवळ मोडून काढण्यासाठी जनतेवर लाठीमार गोळीबार व नेत्यांची धरपकड सुरू करून दडपशाही मार्गाचा अवलंब केला. १९२२ पर्यंत वीस हजार स्वयंसेवक पकडण्यात आले १ फेब्रुवारी, १९२२ रोजी गांधीजींनी पत्र लिहून 'दडपशाही बंद करा नाहीतर बारडोली सत्याग्रहाला तोंड द्या' असे कळवले आणि त्यांनी बारडोली सत्याग्रहाची तयारी चालवली. ते आपल्या निवडक सहकाऱ्यांसह बारडोलीस गेले. तेथे साराबंदी चळवळ होणार होती. दरम्यान चौरीचौरा घटना घडली आणि असहकार चळवळ थांबवली गेली.

**(इ) असहकार चळवळीची स्थगिती :–**

असहकार चळवळ चालू असतानाच मुंबई, मद्रास, धारवाड, नागपूर इत्यादी ठिकाणी हिंसक दंगली झाल्या. ५ फेब्रुवारी, १९२२ रोजी उत्तर प्रदेशातील गोरखपुर जिल्ह्यातील 'चौरीचौरा' या गावी एका मिरवणुकीवर पोलिसांनी गोळीबार केला. त्यामुळे संतप्त जमावाने पोलीस कचेरीस आग लावली. त्यात २१ पोलीस व एक फौजदार मरण पावले. ही हिंसक घटना गांधीजींना आवडली नाही. त्यांनी चौरीचौरा येथील हिंसक घटना अत्यंत गांभीर्याने घेतली. त्यांना असे वाटले की राष्ट्रीय चळवळतील कार्यकर्त्यांना अहिंसेचे महत्त्व पुरेसे कळल्या शिवाय सविनय कायदेभंगाची चळवळ यशस्वी होणार नाही. शिवाय सरकार अशी हिंसक चळवळ त्याहून हिंसक मार्गाने दडपून टाकेल. म्हणून गांधीजींनी असहकार व कायदेभंग चळवळ समाप्त करण्याचा निर्णय जाहीर केला. १२ फेब्रुवारी, १९२२ रोजी काँग्रेस वर्किंग कमिटीने बारडोली येथे तातडीने बैठक बोलावली व या बैठकीत गांधीजींचा निर्णय मान्य केला. असहकार चळवळ अचानकपणे थांबवली हा निर्णय न आवडल्याने मोतीलाल नेहरू, लाला लजपत राय, मौलाना आझाद, सुभाष चंद्र बोस इत्यादी नेत्यांनी त्यांचा निषेध केला. पण गांधीजींचा निर्णय स्वीकारला. देशभर तीव्र निराशेचे वातावरण निर्माण झाले. यापरिस्थितीचा फायदा घेऊन सरकारने १० मार्च, १९२२ रोजी गांधीजींना अटक केली. त्यांच्यावर आरोप ठेवले गांधीजीनी ते मान्य केले. त्यांना सहा वर्षाची शिक्षा झाली. पुढे फेब्रुवारी १९२४ मध्ये प्रकृतीच्या कारणावरून त्यांची सुटका करण्यात आली.

**असहकार चळवळीचे मूल्यमापन :–**

महात्मा गांधींनी असहकार चळवळ पाठीमागे घेतली. असहकार चळवळीला पूर्णता यश मिळाले नाही. परंतु या चळवळीने मिळालेल्या यशाचे महत्त्वही नाकारता येत नाही.

**(ई) असहकार चळवळीच्या अपयशाची कारणे :–**

**१. गांधीजींनी ऐनवेळी चळवळ तहकूब केली :–**

एक वर्षात स्वराज्य प्राप्त करून देण्याचे मोठे स्वप्न गांधीजींनी त्या चळवळीत पाहिले होते. ते पूर्ण

होणे अशक्य होते. सुभाष चंद्र बोस यांनी त्यांच्या या आश्वासनाला, 'अविवेक पूर्ण व लहान मुलाच्या बोलण्यासारखे होते' असे म्हटले आहे. याशिवाय असहकार चळवळीला देशव्यापी स्वरूप प्राप्त झाले असताना गांधीजींनी चोरीचौरा या प्रकरणामुळे ऐनवेळी ही चळवळ तहकूब केली. गांधीजींना हिंसाचार मान्य नव्हता हे जरी खरे असले तरी तशा स्वरूपाचे प्रशिक्षण जनतेला नव्हते. शिवाय सरकारच्या दडपशाही विरुद्ध जनता प्रतिक्रिया देत होती. या सर्व गोष्टींचा तार्किक विचार न करता त्यांनी ही चळवळ तहकूब केल्यामुळे परिणामी असहकार चळवळीला अपयश आले.

**२. खिलाफत चळवळीला दिलेला पाठिंबा :-**

हे आंदोलन खिलाफत चळवळीशी जोडले गेले. ही फार मोठी चूक होती. खिलाफत प्रश्न हा धार्मिक होता तर स्वराज्याचा प्रश्न हा राजकीय होता. स्वराज्यासाठी जनता कोणत्याही आंदोलनास तयार होती. १९२२ मध्ये तुर्कस्तान मध्येच खलिफाच्या सत्ते विरुद्ध उठाव झाला आणि तेथे गणतंत्र स्थापन झाले. त्यामुळे हा धार्मिक प्रश्न राष्ट्रीय प्रश्नांशी जोडल्यामुळे असहकार चळवळीला अपयश आले.

**३. पदव्या मानसन्मानाचा त्याग सर्वांनीच केला नाही :-**

असहकार चळवळीतील महत्त्वाचा ठराव असा होता की शासनाने दिलेल्या पदव्या, मानसन्मान यांचा त्याग करावा, कायदेमंडळाच्या निवडणुकीवर बहिष्कार घालावा. पण सर्वांनीच या ठरावाची अंमलबजावणी केली नाही. भारतातील सर्व सुशिक्षितांनी सरकारशी असहकार पुकारला असता तर एका वर्षात स्वराज्य मिळाले असते. पण मोठ्या प्रमाणात लोकांनी सरकारी शाळेतून मुलांना बाहेर काढले नाही, वकीली सोडली नाही. काहीजणांनी तर कायदेमंडळाची निवडणूक लढवली. त्यामुळे असहकार चळवळीला अपयश आले.

**असहकार चळवळीचे यश :-**

असहकार चळवळीला अपयश जेवढे आले त्यापेक्षाही तिचे यश व महत्त्व फार मोठे आहे.

**१. असहकार चळवळ देशव्यापी झाली :-**

असहकार चळवळीमुळे लोकांच्या मध्ये राष्ट्रीय जागृती वाढली. ती केवळ आता शहरी किंवा मध्यमवर्गीय लोकांपुर तीच मर्यादित न राहता ती देशाच्या सामान्य लोकांपर्यंत जाऊन पोहोचली. खेड्यापाड्यातील जनता, अबाल- वृद्ध, स्त्रिया, मुले या चळवळीत सहभागी झाले. त्यामुळे ही चळवळ देशव्यापी बनली. एवढ्या व्यापक व मोठ्या प्रमाणात जन आंदोलन कधी झाले नव्हते.

**२. राष्ट्रीय आंदोलनाला नवे वळण :-**

या चळवळीने राष्ट्रीय आंदोलनाला एक नवे वळण दिले. सनदशीर चळवळीचे पर्व संपून सक्रिय जन आंदोलनाचे पर्व सुरू झाले. गांधीजींनी सामान्य जनतेला या चळवळीत ओढून घेतले. चर्चा वादविवाद व ठराव इत्यादींपर्यंत ही चळवळ सीमित न राहता राष्ट्रसभा कृतिशील बनली. गांधीजींच्या रूपाने देशाला नवीन नेतृत्व मिळाले. ही फार मौलिक गोष्ट होती. या आंदोलनाने काँग्रेस पक्ष सुसंघटीत बळकट झाला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे राष्ट्रवादात वाढ झाली.

**३. सरकारची भीती नष्ट झाली :–**

या चळवळीत सामान्य माणसाने भाग घेतल्यामुळे तुरुंगवासाची व बंदुकीच्या गोळीची भीती नाहीशी झाली. हजारो माणसे लाठ्या काट्या खात तुरुंगात जात होते. बंगालसारख्या प्रांतात तुरुंग भरून गेले म्हणून त्यांना सोडून देण्यात आले. सत्याग्रहींशी कसे वागावे हे सरकारला कळेनासे झाले. हा या चळवळीचा मोठा विजय होता.

**४. स्वराज्य हे ध्येय ठरले :–**

आपल्या सर्व दुःखांवर स्वराज्य हाच एक रामबाण उपाय आहे, असे अडाणी व खेडवळ लोकांनाही वाटू लागले. राष्ट्रीय चळवळीत भाग घेण्यात त्यांना स्वातंत्र्याची एक नवी जाणीव अनुभवाला आली, आणि ब्रिटिशांच्या बद्दलची दहशत त्यांच्यातून नाहीशी झाली. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. पंडित नेहरू म्हणतात, 'हिंदी राष्ट्रवादात या चळवळीने नव जीवन चैतन्य निर्माण केले.'

असहकार चळवळीचे मूल्यमापन करताना डॉ. अमलेश त्रिपाठी म्हणतात, 'असहकार चळवळ निष्फळ झाली असे म्हणणे चूक होईल.' जनतेमध्ये आर्थिक प्रश्नाबद्दल व त्यांचे राजकीय मूळ असलेल्या साम्राज्यशाही बद्दल जागृती करण्यासाठी उपयोग झाला.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक – १ :**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

१. जालियनवाला बाग हत्याकांड ................ या इंग्रज अधिकाऱ्याने केले.
   अ) रॅमसे मॅकडोनाल्ड ब) जनरल डायर क) लॉर्ड कर्झन ड) लॉर्ड स्मिथ

२. रवींद्रनाथ टागोर यांनी ................ या किताबाचा त्याग केला.
   अ) कैसर-इ- हिंद ब) सर क) आय.ए.एस. ड) आर.सी.एस.

३. असहकार चळवळीच्या वेळी लोकमान्य टिळकांच्या नावे ................ उभारला गेला.
   अ) स्वदेशी फंड ब) बहिष्कार फंड क) स्वातंत्र्य फंड ड) चरखा फंड

४. चौरीचौरा घटनेमुळे ................ ही चळवळ थांबवली गेली.
   अ) असहकार ब) कायदेभंग क) बहिष्कार ड) स्वदेशी

५. खलिफा हा ................ देशाचा असून तो इस्लाम धर्मियांचा धर्मप्रमुख होता.
   अ) राजस्थान ब) अफगाणिस्तान क) तुर्कस्तान ड) कझाकिस्तान

## १.२.२ सविनय कायदेभंग चळवळ (Civil Disobedience Movement) :

असहकार चळवळ मागे घेतल्यावर राष्ट्रीय चळवळ काही काळ मंदावली. १९२७ नंतर मात्र सायमन कमिशन वरील बहिष्करातून राष्ट्रीय चळवळीत नवा जोम व उत्साह संचारला आणि त्याचा अविष्कार सविनय

कायदेभंगाच्या चळवळीतून झाला. तत्पूर्वी दरम्यानच्या काळात स्वराज्य पक्ष, सायमन कमिशन, नेहरू रिपोर्ट, लाहोर अधिवेशन अशा राजकीय घटना घडल्या की ज्यामध्ये महात्मा गांधींचा सहभाग नव्हता किंवा त्यांचा पाठिंबाही नव्हता. परंतु या घटनेने देशात पुन्हा एकदा जागृती आली. त्यामुळे या घटनांचा उल्लेख न करता आपणास पुढे जाता येणार नाही.

### १. स्वराज्य पक्षाची कामगिरी :-

असहकार चळवळ स्थगित केल्यानंतर सरकारची अडवणूक करण्यासाठी निवडणुका लढून कायदेमंडळात प्रवेश करण्याची कल्पना चित्तरंजनदास व मोतीलाल नेहरू इत्यादी ज्येष्ठ नेत्यांच्या मनात आली. त्यासाठी सी. आर. दास व मोतीलाल नेहरू यांनी राष्ट्रीय सभेमध्ये १९२३ मध्ये स्वराज्य पक्षाची स्थापना केली केली. गांधीजींच्या अनुपस्थितीत राष्ट्रीय चळवळ चालवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी हिंदी कायदेमंडळाचे १९२३ साली निवडणुका लढवल्या. १४५ पैकी ४८ जागा जिंकल्या आणि लोकजागृती करून राज्यकर्त्यांवर अंकुश ठेवला. स्वराज्य या आपल्या मागणीची पूर्तता होण्यासाठी गोलमेज परिषदेची मागणी केली. चार-पाच वर्षे राजकीय लढा चालू ठेवण्याची कामगिरी स्वराज्य पक्षाने केली. राज्यकर्त्याकडून भारतीयांची आर्थिक पिळवणूक थांबवणे व औद्योगिक विकास साधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. अनेक अन्यायी कर रद्द करण्यास सरकारला भाग पाडले.

प्रांतिक कायदेमंडळ कार्पोरेशन लोकल बोर्ड येथे स्वराज्य पक्षाने प्रवेश करून लोकोपयोगी कामे केली. त्यांनी विधिमंडळात प्रवेश करून सरकारची अडवणूक करण्याचा प्रयत्न केला. परंतु या कार्यास स्वराज्य पक्षाला फारसे यश मिळाले नाही. दरम्यान प्रकृती बिघडल्याने ब्रिटिश सरकारने गांधीजींची सुटका केली आणि गांधीजींनी पुन्हा राष्ट्रीय सभेत सहभागी होऊन थंडावलेल्या राष्ट्रीय सभेस गती दिली. असहकार चळवळी नंतर ब्रिटिश सरकारविरुद्ध गांधीजींनी सुरू केलेली दुसरी चळवळ म्हणजे 'सविनय कायदेभंग चळवळ' होय.

### २. सायमन कमिशन (१९२८) :-

१९१९ च्या मॉन्टेगयू चेम्सफर्ड कायद्यामध्ये सुधारणा सुचविण्यासाठी सरकारने ८ नोव्हेंबर, १९२७ रोजी सर जॉन् सायमन यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यांचे एक कमिशन नेमले. या आयोगामध्ये एकही भारतीय सभासद नव्हता. म्हणून भारतातील प्रमुख राजकीय पक्षांनी सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला. सायमन कमिशनने भारतात ज्या ज्या ठिकाणी भेटी दिल्या त्या त्या ठिकाणी हरताळ पाळण्यात आला. निदर्शने करण्यात आली आणि काळे झेंडे दाखवून आयोगाचा निषेध करण्यात आला. 'सायमन परत जा' अशा घोषणा देण्यात आल्या. लाहोर मध्ये लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली असाच मोर्चा निघाला असता पोलिसांनी निदर्शकांवर भयंकर लाठीमार केला. त्यात जखमी झालेल्या देशभक्त वयोवृद्ध लाला लजपतराय लवकरच मरण पावले. क्रांतीकारकांनी त्याचा बदला घेतला. या कमिशनने दोन वेळा हिंदुस्थानला भेट दिली. दोन वर्षाच्या परिश्रमानंतर मे, १९३० मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला. त्यातील महत्त्वाच्या शिफारशी खालील प्रमाणे-

१. प्रांतातील द्विदल राज्यपद्धती रद्द करावी. सर्व खाती लोकप्रतिनिधींकडे द्यावीत. ते सर्व मंत्री कायदे मंडळाला जबाबदार असावेत.

२. गव्हर्नरला अनेक खास अधिकार असावेत.

३. लष्कराचे हिंदीकरण करावे पण संरक्षणाची पुरेशी व्यवस्था होईपर्यंत ब्रिटिश हिंदुस्थानात आणावी.

४. एकूण लोकसंख्येच्या १० ते १५ टक्के लोकांना मताधिकार मिळावा.

५. प्रांत व संस्थानांच्या प्रतिनिधीचे संघराज्य केंद्रात असावे. पण त्यात सामील होण्याची संस्थांना सक्ती नसावी.

६. प्रांतिय कायदेमंडळ सदस्य संख्या २०० ते २५० असावी.

याप्रमाणे महत्त्वाच्या शिफारशी होत्या. परंतु त्या ब्रिटिशांना अनुकूल अशा होत्या. या शिफारशींमुळेही भारतीयांच्यात संतापाची लाटच उसळली. ब्रिटिश सरकारने भारतीयांची एक प्रकारची क्रूर चेष्टा चालविली होती. त्यामुळे जनता स्वातंत्र्य चळवळीसाठी आणखी तयार झाली आणि त्याचाच परिणाम म्हणजे १९३० च्या लाहोर अधिवेशनात काँग्रेसने संपूर्ण स्वराज्याचा ठराव पास केला.

**३) नेहरू रिपोर्ट :–**

सायमन कमिशन वरील वाढता बहिष्कार लक्षात घेऊन भारतमंत्री लॉर्ड बर्कन हेड यांनी काँग्रेस, मुस्लिम लीग व हिंदू महासभा यांच्या नेत्यांना आवाहन केले की भारतीय घटना कशा स्वरूपाची हवी आहे. तिचा मसुदा एकमताने द्यावा व तो ब्रिटीश सरकारपुढे ठेवला जाईल. या आव्हानाला प्रतिसाद देऊन काँग्रेस, मुस्लिम लीग व हिंदू महासभा एकत्र आले आणि मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली १९ मे १९२८ रोजी समिती नेमली. भारताची भावी राज्यघटना कशा स्वरूपाची असावी हा या समितीचा मुख्य उद्देश होता. त्यामधील तरतुदी खालील प्रमाणे–

१. भारताला साम्राज्या अंतर्गत स्वराज्य तात्काळ द्यावे, त्यानंतर पूर्ण स्वराज्य मिळावे.

२. संसद सार्वभौम असावी व तिची दोन सभागृहे असावीत. एक सिनेट व दुसरी प्रतिनिधी सभा.

३. भारत एक निधर्मी राष्ट्र असेल. यामध्ये अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे संरक्षण केले जाईल. त्यांना स्वतंत्र मतदारसंघ ऐवजी राखीव जागा असतील.

४. भारतीय लोकांना मूलभूत हक्क असतील.

५. भारत संघराज्य असेल, प्रांतांना स्वायत्तता असेल, प्रांताचे एकग्रही कायदेमंडळ असेल, केंद्र व प्रांत यांच्यात विषम वाटणी होईल.

६. गव्हर्नर जनरलने प्रधानमंत्री यांची निवड करावी व त्यांच्या सल्ल्याने इतर मंत्री निवडावेत. मंत्रिमंडळ कायदेमंडळाला जबाबदार असेल.

७. प्रांताच्या गव्हर्नर यांची नेमणूक इंग्लंडच्या राजाने करावी. प्रांतिक कायदेमंडळाची मुदत पाच वर्षाची असेल.

८. गव्हर्नर जनरलने सर्वोच्च न्यायाधीशांची नेमणूक करावी. त्याला दूर करण्याचा हक्क पार्लमेंटला असेल.

संबंधित रिपोर्टची १९२९ अखेर अंमलबजावणी करावी असे कळवले. पण या रिपोर्टला मुस्लिम लीगचा विरोध होता. त्यामुळे बॅरिस्टर जीनांनी स्वतंत्र १४ मुद्दे मांडले पण सरकारने वेळ काढूपणा केला. यामुळे महात्मा गांधींनी सविनय कायदेभंग सुरू करण्याचा निर्णय घेतला.

**लाहोर अधिवेशन (३१ डिसेंबर १९२९) :–**

काँग्रेसच्या इतिहासात लाहोर अधिवेशनाला फार मोठे महत्त्व आहे. महात्मा गांधींनी आंदोलन तीव्र करण्याचे ठरवले. अशा परिस्थितीत हे अधिवेशन भरले होते. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या या अधिवेशनास १५००० लोक हजर होते. नेहरू स्वतः व सुभाष चंद्र बोस संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीचे ठाम पुरस्कर्ते होते. त्यांनी 'इंडियन इंडिपेंडन्स यूथ लीग' ही काँग्रेस अंतर्गत संघटना स्थापन करून स्वातंत्र्याचा प्रसार केला. या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावाचा स्वीकार केला. गांधीजींनी त्याला मान्यता दिली. साम्राज्यांतर्गत स्वराज्य हे नेहरू रिपोर्ट मधील ध्येय बाजूला केले.आता देशाला संपूर्ण स्वातंत्र्य हे ध्येय ठरवून त्यासाठी गांधीजींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्याचा काँग्रेसने निर्णय घेतला. तसा ठरावही पास केला. ३१ डिसेंबर, १९२९ रोजी रात्री बारा वाजता लाहोरच्या राष्ट्रीय काँग्रेसच्या व्यासपीठावरून पंडित नेहरूंनी संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा करून स्वातंत्र्य आंदोलनाचा पुरस्कार केला. २६ जानेवारी, १९३० हा दिवस भारताचा स्वातंत्र्य दिन म्हणून पाळण्याचे ठरवले. त्याच दिवशी स्वातंत्र्याची प्रतिज्ञा केली. गांधीजींनी पुन्हा लॉर्ड आयर्विन यांना पत्र पाठवून आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी आग्रह धरला. परंतु लॉर्ड आयर्विन यांनी मागण्या मान्य केल्या नाहीत. शेवटी साबरमती आश्रमात काँग्रेस कार्यकर्त्यांची बैठक झाली व त्यात राष्ट्रीय स्तरावर सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**४. सविनय कायदेभंग चळवळीचा कार्यक्रम :–**

१. मीठ व तत्सम अन्यायी कायद्याचा भंग करणे.

२. शेतसारा आणि अन्य सरकारी कर न भरणे.

३. न्यायालय, कौन्सिल, निवडणुका, सरकारी समारंभ, शाळा, महाविद्यालये यावर बहिष्कार घालणे.

४. परदेशी मालावर बहिष्कार.

५. दारू व इतर नशिल्या पदार्थांच्या विक्री दुकानासमोर निदर्शने करणे.

६. सरकारी नोकऱ्यांवर बहिष्कार.

७. जंगल कायद्याचा भंग करणे.

**मिठाचा सत्याग्रह (दांडी यात्रा) :–**

महात्मा गांधीजींनी कायदेभंग चळवळीचा एक कार्यक्रम म्हणून मिठाचा सत्याग्रह करण्याचे निश्चित केले. त्यासाठी त्यांनी गुजरात मधील दांडी हे समुद्रकिनाऱ्यावरील गाव निवडले. १२ मार्च, १९३० रोजी गांधीजी आपल्या ७८ अनुयायांसह साबरमती आश्रमातून पायी चालत निघाले. ३८५ किलोमीटरच्या या वाटचालीत असंख्य कार्यकर्ते सामील झाले. ५ एप्रिल,१९३० रोजी गांधीजी दांडी येथे पोहोचले आणि त्यांनी मिठाच्या कायद्याचा भंग करून मीठ विनापरवाना उचलले. इतर सत्याग्रहींनी सुद्धा त्यांचेच अनुकरण केले आणि सविनय कायदेभंग चळवळीचा प्रतीकात्मक शुभारंभ झाला. कायदेभंग केल्याबद्दल गांधीजींसह सर्व सत्याग्रहींवर ब्रिटिश सरकारने बेछूट लाठीमार केला. गांधीजींच्या या अभूतपूर्व लढयाकडे सर्व जगाचे लक्ष वेधले होते. महिला कार्यकर्त्यांच्या आग्रहावरून स्त्री प्रतिनिधी म्हणून सरोजिनी नायडू या सत्याग्रहात सामील झाल्या होत्या. दांडी येथे जवळजवळ ३००० लोक जमले होते.

महात्मा गांधीजींच्या या अभिनव चळवळीला देशातून अभूतपूर्व पाठिंबा मिळाला. मिठाचा कायदा मोडण्यासाठी देशातील सुमारे ५००० गावातील लोकांनी सत्याग्रह केला होता. एका वर्षामध्ये ६०,००० राहून अधिक आंदोलकांनी स्वतःला अटक करून घेतली. खान अब्दुल गफारखान (सरहद्द गांधी) हे आपल्या हजारो अनुयांसह या कायदेभंगाच्या चळवळीत सामील झाले. नागांची नेता असलेली राणी गैदीनलिऊ आणि तिच्या अनुयायांनी कायदेभंगाच्या चळवळीला सक्रिय पाठिंबा दिला. देशात जेथे मिठाचा कायदा मोडणे शक्य नव्हते तेथे इतर कायदे मोडले.

ब्रिटिश सरकारने ही चळवळ दडपून टाकण्यासाठी दडपशाही सुरू केली. सरकारने पंडित नेहरू, सरदार वल्लभाई पटेल अशा शेकडो नेत्यांना अटक केली. परंतु जनक्षोभाच्या भीतीने त्यांनी महात्मा गांधींवर कारवाही करण्याचे प्रारंभी टाळले. खास वटहुकूम  काढून सरकारने सभा, मिरवणुका, वृत्तपत्रे इत्यादीवर बंधने घातली, पण गांधीजींनी ही चळवळ नेटाने चालवली. एवढेच नव्हे तर सुरत जिल्ह्यात धारासना येथे जाऊन कायदेभंग करण्याचा आपला मनोदय जाहीर करून तसे लॉर्ड आयर्विनला कळवले. तेव्हा मात्र त्यांना लगेच अटक करण्यात आली.

**५. धारासना सत्याग्रह :–**

गांधीजींना अटक झाल्याने या सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडू यांच्याकडे देण्यात आले. ३००० सत्याग्रहींनी यात भाग घेतला. सरकारने धारासनाकडे जाणारे सर्व रस्ते रोखले. तरी २२ मे, १९३० रोजी धारासना येथे सत्याग्रह झाला. पोलिसांनी त्यांच्यावर लाठी हल्ला केला. तरी तुकड्यामधून तुकड्या पोलिसांचा मार खाण्यासाठी व स्वतःला अटक करून घेण्यासाठी एका मागून एक पुढे आल्या. सत्याग्रहींनी धैर्य, निर्भयता व संयम दाखवला. शेकडो सत्याग्रही जखमी झाले होते पण जनतेचा निर्धार कायम होता. युनायटेड प्रेस चे अमेरिकन वार्ताहर वेब मिलर हा  अभूतपूर्व लढा पाहण्यास उपस्थित होते.  ते लिहितात,माझ्या अठरा वर्षाच्या पत्रकारितेच्या काळात २२ देशातील जनआंदोलने मी पहिली. परंतु धारासनासारखी हृदय द्रावक व चित्तथरारक घटना मी कधी पाहिली नाही. गोरे अधिकारी निशस्त्र सत्याग्रहींवर करीत असलेला हल्ला पाहून शिसारी येत होती. शर्मेने माझी मान खाली जात होती.शेवटी एक वाजता सत्याग्रही मिठागरा जवळ पोहोचलेच. सरोजिनी नायडू सह इतर नेत्यांना व शेकडो लोकांना अटक करण्यात आली.धारासनाप्रमाणे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मिठाचा सत्याग्रह झाला. मुंबईत वडाळा तेथे सत्याग्रह करण्यात आला. या सत्याग्रहात १५ हजार सत्याग्रहींनी कायदा मोडला. रत्नागिरी जिल्ह्यातील शिरोडा येथे मिठाचा सत्याग्रह झाला. याप्रमाणे बंगाल, ओरिसा, गुजरात, मद्रास इत्यादी ठिकाणी मिठाचे सत्याग्रह झाले.

**कायदेभंगाच्या अन्य चळवळी :–**

मीठ सत्याग्रहाप्रमाणेच सविनय कायदेभंगाच्या चळवळीचे इतरही कार्यक्रम झाले. जेथे समुद्रकिनारा नव्हता तेथे अन्यायी कायद्यांचा भंग केला. उदा. उत्तर प्रदेश, कर्नाटक, गुजरात इत्यादी प्रांतातील शेतकऱ्यांनी चळवळीत भाग घेऊन सरकारला शेतसारा देण्याचे नाकारले. परदेशी मालावर बहिष्कार टाकण्यात आला. परदेशी कापडाची अनेक ठिकाणी होळी करण्यात आली. परदेशी कापडाची वाहतूक रोखण्याचे प्रयत्न झाले. यातूनच हुतात्मा बाबू गेनू घटना घडली. मुंबईत बाबू गेनू या कामगाराने परदेशी कपड्याच्या ट्रक समोर आडवे पडून बलिदान दिले. देशात काही ठिकाणी जंगल सत्याग्रह देखील झाले. ४ मे, १९३० रोजी गांधीजींना अटक

झाल्यावर लोकांच्या मध्ये असंतोष वाढला. सर्वत्र हरताळ पाळण्यात येऊन कामगारांनी अनेक ठिकाणी संप केले.

**६. सोलापूर सत्याग्रह :–**

सोलापूरमधील सत्याग्रहामध्ये गिरणी कामगार आघाडीवर होते.सोलापूर येथे ६ मे, १९३० रोजी हरताळ पाळण्यात आला. रेल्वे स्टेशन, न्यायालय, पोलीस स्टेशन, मुन्सिपल इमारती इत्यादींवर हल्ले करण्यात आले. सोलापूर मध्ये जनतेचे राज्य निर्माण झाले होते. सोलापूरच्या कलेक्टरने लष्करी कायदा पुकारला. परंतु जनतेने या कायद्याला जुमानले नाही. सरकारने ही चळवळ चिरडून टाकली.या लष्करी कायद्याविरुद्ध चळवळीत उतरणाऱ्यां पैकी मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे आणि कुर्बान हुसेन या चौघांना ब्रिटिश सरकारने फाशी दिली.

महात्मा गांधींनी सुरू केलेली ही चळवळ हिंदूंचे राज्य निर्माण करण्यासाठी सुरू केली असून असे स्वातंत्र्य म्हणजे मुस्लिमांचे पारतंत्र्य होय. असा प्रचार मुस्लिम लीगने आणि विशेषता बॅरिस्टर जीनांनी चालवला होता. खान अब्दुल गफार खान यांच्याशिवाय सर्व मुस्लिम नेत्यांनी महात्माजींशी असहकार पुकारला होता.

**सविनय कायदेभंग चळवळीची वैशिष्ट्ये :–**

१. मुंबई गिरणी मालकांनी, कारखानदारांनी या चळवळीला सढळ हाताने मदत केली.

२. या सत्याग्रहामध्ये फार मोठ्या प्रमाणात भारतीय महिलांनी सहभाग घेतला. दारूच्या व परदेशी मालाच्या दुकानांसमोर निदर्शने करण्यामध्ये महिला पुढे होत्या. शेकडो स्त्रीयांनी तुरुंगवास पत्करला. पोलिसांच्या अत्याचारांना त्या धैर्याने सामोरे गेल्या. कस्तुरबा गांधी, कमलादेवी चटोपाध्याय, अवंतिकाबाई गोखले, लीलावती मुळशी, हंसाबेन मेहता अशा कितीतरी स्त्रियांनी सत्याग्रहात पुढाकार घेतला होता. सामान्य कुटुंबातील महिलांपासून सुखवस्तू घरातील स्त्रियाही या चळवळीत सामील झाल्या. सत्याग्रहासाठी लागणारी जिद्द व सहनशक्ती स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात दाखवली. लढयातून स्त्रियांचा आत्मविश्वास वाढत गेला. सत्याग्रहासाठी लागणारे मनोधैर्य पुरुषांपेक्षा स्त्रियांकडे अधिक असते असे गांधीजींचे मत होते. गांधीजींच्या प्रेरणेमुळे राष्ट्रीय चळवळीत स्त्रियांचा सहभाग वाढत गेला.

३. वायव्य सरहद्द प्रांतातील पठाणांनी या चळवळीत सहभाग घेतला. लढाऊ व आक्रमक पठाणांनी अहिंसात्मक व सविनय कायदेभंग चळवळीत सहभागी व्हावे हे विशेष होते. खान अब्दुल गफार खान व त्यांची 'खुदा-ई-खिदमतगार' ही संघटना आघाडीवर होती.

४. या चळवळीत शेतकरी वर्ग सामील झाला होता. काँग्रेसने पुकारलेल्या शेतसारा विरोधी मोहिमेत शेतकरी सक्रिय झाला. मानवेंद्र रॉय यांनी खेडोपाडी समाजवादी विचारांचा प्रचार केला. बुलढाण्याच्या शेतकरी व शेतमजुराने एक शेतकरी संघ स्थापन केला व त्यांनी कर, शेतसारा व व्याज भरू नये असे शेतकऱ्यांना सुचवले. या शेतकरी खेडूतांच्या मनात राष्ट्रीय वृत्ती निर्माण करण्याचे कार्य या चळवळीने केले.

**७. सविनय कायदेभंग चळवळीचे महत्त्व व परिणाम :-**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत सविनय कायदेभंग चळवळीला फार मोठे महत्त्व आहे. देशाच्या आधुनिक इतिहासाबरोबर जगाच्या इतिहासातही योग्य स्थान आहे.

१. सविनय कायदेभंग चळवळीमुळे राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ ही शहरापूर्ती मर्यादित न राहता अगदी खेड्यांपर्यंत पोहोचली.

२. या चळवळीत एक विशिष्ट वर्ग असा नसून सर्व थरातील लोक सहभागी झाले होते. वकिलांपासून कामगार, शेतकरी, खेडूतापर्यंत सर्व लोक चळवळीत उतरले. स्त्रियांचा सुद्धा सहभाग महत्त्वाचा होता.

३. या चळवळीने राष्ट्रव्यापी स्वरूप प्राप्त केले होते. त्यामुळे भारतीय जनआंदोलनाची तीव्रता कमी करण्यासाठी राजकीय सुधारणांचा हप्ता देणे ब्रिटिशांना गरजेचे वाटू लागले. त्यामुळेच गोलमेज परिषदांचे आयोजन पुढील काळात झाले.

४. सरकारने किसान सभा, राष्ट्रीय विद्यालय, सेवादल, चरखा संघ, खुदा-इ- खिदमतगार अशा सर्व संघटना बेकायदेशीर ठरवून त्यांची कार्यालये व मालमत्ता जप्त केली.

५. या आंदोलनात सुमारे एक लक्ष लोकांना अटक झाली होती. स्वातंत्र्यासाठी लाठी हल्ला, जखमी होणे, तुरुंगात जाणे याची लोकांना आता भीती राहिली नाही. उलट त्या गोष्टी राष्ट्रभक्तीचे प्रतीक मानल्या जाऊ लागल्या.

अशा प्रकारे सविनय कायदेभंग चळवळ ही भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीचा एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

**८. पहिली गोलमेज परिषद (१९३० ते १९३१) :-**

कायदेभंगाची चळवळ चालू असताना सायमन कमिशनचा अहवाल जाहीर झाला व या अहवालावर चर्चा करण्यासाठी आणि भारतातील घटनात्मक प्रश्नांचा विचार करण्यासाठी लंडनमध्ये नोव्हेंबर, १९३० मध्ये पहिली गोलमेज परिषद भरली. काँग्रेसने या पहिल्या गोलमेज परिषदेवर बहिष्कार टाकला होता. मात्र मुस्लिम लीग, हिंदू महासभा, लिबरल पक्ष व संस्थानिक या परिषदेत उपस्थित राहिले होते. एकूण ८९ प्रतिनिधी हजर होते. त्यापैकी ५७ ब्रिटिश इंडियातून सरकारने नेमलेले असून संस्थानिकांचे १६ प्रतिनिधी होते. उरलेले काँग्रेस शिवाय अन्य राजकीय पक्षाचे प्रतिनिधी होते.काँग्रेस परिषदेत सहभागी नसल्याने परिषदेत घेतलेले निर्णय अर्थहीन ठरले. त्यामुळे या परिषदेत फारसे कामकाज झालेच नाही. शेवटी ब्रिटिश सरकारने काँग्रेसने परिषदेत सहभागी व्हावे म्हणून प्रयत्न केले व त्यातूनच 'गांधी- आयर्विन करार' झाला.

**९. गांधी- आयर्विन करार(५ मार्च १९३१) :-**

लॉर्ड आयर्विन यांनी गांधीजींशी बोलणी करता यावीत म्हणून गांधीजींची व इतर काँग्रेस नेत्यांची तुरुंगातून सुटका केली. जयकर, सप्रू इत्यादी नेत्यांनी गांधींना भेटून व्हाईसरॉय ची भेट घेऊन चर्चा करावी असे सुचवले होते. १६ फेब्रुवारी, १९३१ रोजी गांधीजीं-आयर्विन भेट होऊन बऱ्याच वेळा चर्चा होऊन गांधी-आयर्विन यांच्यात एक करार घडून आला. तोच गांधी-आयर्विन करार होय. त्या करारातील महत्त्वाची कलमे पुढीलप्रमाणे-

१. गांधीजींनी सविनय कायदेभंग ची चळवळ मागे घ्यावी.

२. सरकारने राजकीय कैद्यांची सुटका करावी व त्यांच्यावरील खटले मागे घ्यावेत.

३. मिठावरील कर काही प्रमाणात रद्द करावा.

४. काँग्रेसने गोलमेज परिषदेत सहभाग घ्यावा.

५. कायदेभंग चळवळीत जप्त केलेली मालमत्ता त्यांना परत करावी.

६. संरक्षण, परराष्ट्र, अल्पसंख्यांक ही खाती राखीव असावीत.

वरील करारानुसार गांधीजींनी कायदेभंग चळवळ काही काळ स्थगित केली.गांधीजींनी केलेला हा करार पंडित नेहरू, सुभाष चंद्र बोस यासारख्या तरुण नेत्यांना आवडला नाही. कारण त्यातील काही कलमे अनुकूल नव्हती उदा. सरकारला अधिक सवलती दिल्या. संभाव्य शासन व्यवस्थेत संरक्षण, परराष्ट्र अशी महत्त्वाची खाती राखीव ठेवली. भगतसिंग सारख्या देशभक्ताला गांधीजी वाचवू शकले नाहीत. त्यामुळे क्रांतिकारक संतप्त झाले. गांधीजी प्रमाणे इंग्रज सरकारला देखील तात्पुरती तडजोड हवी होती. म्हणून हा करार केला.

**१०. दुसरी गोलमेज परिषद (१९३१) :–**

वरील प्रमाणे करार झाला परंतु तो अमलात येण्यापूर्वीच लॉर्ड आयर्विन च्या जागी लॉर्ड वेलिंग्टन हे कट्टर साम्राज्यवादी व्हाईसरॉय आले. ते प्रतीगामी धोरणाचे असून स्वातंत्र्य चळवळ दडपून टाकण्याचे प्रयत्न त्यांनी सुरू केले. परंतु त्यांच्याकडून अनुकूल प्रतिसाद मिळाल्यानंतर गांधीजी लंडन येथे भरलेल्या दुसऱ्या गोलमेज परिषदेस ऑगस्ट, १९३१ मध्ये हजर राहिले. दरम्यान इंग्लंडमध्ये निवडणुका होऊन हुजूर पक्ष सत्तेवर आला त्यामुळे सरकारचा हिंदुस्तानकडे बघण्याचा दृष्टिकोन ताठर बनला. परंतु या परिषदेतही स्वातंत्र्याच्या दृष्टीने काहीच प्रगतीचे पाऊल पडले नाही. या परिषदेत हिंदुस्थानची भावी राज्यघटना कशी असावी यावर चर्चा आणि निर्णय अपेक्षीत होता. पण तो प्रश्न गौण ठरवून खरी चर्चा झाली ती 'जातीय प्रश्नावर'. मुस्लिम, अस्पृश्य, ख्रिश्चन, अँग्लो इंडियन लोकांच्या प्रतिनिधींनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. ते गांधीजींना आपले प्रतिनिधी मानत नव्हते. डॉ. बाबासाहेबांनी मागासवर्गीयांसाठी वेगळा मतदारसंघ ठेवण्याची मागणी केली. गांधीजींनी त्यास विरोध केला व गांधीजी २८ डिसेंबर, १९३१ रोजी भारतात परत आले. पुन्हा त्यांनी सविनय कायदेभंग सुरू करण्याचा निर्णय घेतला.

**११. कायदेभंग चळवळीचे दुसरे पर्व (१९३२ ते ३४) :–**

दुसऱ्या गोलमेज परिषदेमध्ये भारतीयांच्या मध्ये ऐक्य होऊ न देण्याचा प्रयत्न ब्रिटिश अप्रत्यक्षपणे करीत होते. त्याचवेळी भारतामध्ये १९३० च्या राष्ट्रव्यापी आंदोलनात प्राप्त झालेल्या जनतेचे प्रचंड समर्थन करण्यासाठी सरकारने दडपशाही सुरू केली होती. त्यामुळे विलायतेहून परतल्यानंतर गांधीजींनी जानेवारी, १९३२ मध्ये जनतेला पुन्हा एकदा सविनय कायदेभंगाच्या चळवळीसाठी सज्ज होण्यासाठी आव्हान केले. मात्र दुसऱ्या दिवशी म्हणजे ४ जानेवारी, १९३२ रोजी सरकारने गांधीजीं, सरदार पटेल व इतर अनेक नेत्यांना अटक केली. व्हाईसरॉयने देशभर दडपशाहीचा कहर केला. वटहुकूम काढले.लाठीमार,

गोळीबार, धरपकड देशभर सुरू होते. एक लाख वीस हजार लोकांना कैद केले. यामध्ये स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता. तुरूंग इतके गच्च भरले की बंदिना ठेवण्यासाठी सरकारने तात्पुरत्या बंदी छावण्या उभारल्या.

**१२. रॅमसे मॅकडॉनल्ड्चा जातीय निवाडा :–**

दुसऱ्या गोलमेज परिषदेतील निर्णयाप्रमाणे ब्रिटिश पंतप्रधान रॅमसे मेकडोनाल्ड यांनी १६ ऑगस्ट, १९३२ रोजी आपला निर्णय घोषित केला. तो निर्णय 'जातीय निवडा' या नावाने ओळखला जातो. यामध्ये अल्पसंख्यांकासाठी स्वतंत्र मतदारसंघाची व राखीव जागांची तरतूद करण्यात आली होती. या निवाडयानुसार अल्पसंख्य मुस्लिमांना प्रमाणा पेक्षा अधिक प्रतिनिधित्व दिले पण जेथे हिंदू अल्पसंख्या होते तेथे त्यांना मात्र तसा न्याय दिला नाही. शिवाय अस्पृश्यांना हिंदू समाजापासून वेगळे करण्याचा निर्णय घेतला. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ तर मिळालाच शिवाय सर्व सामान्य मतदार संघात मतदानाचा हक्कही मिळाला.

**१३. पुणे करार :–**

हिंदू समाजात फूट पाडून अस्पृश्यांना वेगळे करण्याचे 'फोडा व राज्य करा' हा इंग्रजांचा कुटील हेतू गांधीजींनी ओळखला. भविष्यातील राष्ट्राला त्याचा धोका ओळखून महात्मा गांधींनी या निवाड्याच्या विरोधामध्ये २० सप्टेंबर, १९३२ रोजी प्राणांतिक उपोषण करण्याचा निर्णय सरकारला कळविला. त्याप्रमाणे त्यांनी उपोषण सुरू केले. तर 'गांधीजींचे प्राणांतिक उपोषण हा एक राजकीय स्टंट आहे.' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पत्र काढले. देशभर अस्वस्थता निर्माण झाली. प्रमुख नेते मंडळींची धावपळ सुरू झाली. अस्पृश्यांचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मन वळविण्यात त्यांना यश आले. शेवटी गांधीजी व डॉ. आंबेडकर यांच्यात या विषयावर एक करार झाला. तोच २५ सप्टेंबर, १९३२ चा पुणे करार होय. त्यानुसार असे ठरले की अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ असू नयेत. त्याऐवजी त्यांना राखीव जागा असाव्यात. १४८ राखीव जागा ना काँग्रेसने मान्यता दिली. सरकारनेही या कराराला संमती दिली.

**१४. तिसरी गोलमेज परिषद (१९३२) :–**

डिसेंबर, १९३२ मध्ये तिसरी गोलमेज परिषद लंडन येथे भरली. पण सरकारला या परिषदेत रस नव्हता. कारण त्यांना हिंदुस्थानला भरीव राजकीय सुधारणा देण्याची इच्छा नव्हती. सरकारशी पूर्णपणे एकनिष्ठ असणाऱ्या ४६ लोकांना परिषदेला बोलावले होते. काँग्रेसने या परिषदेत भाग घेतला नाही. तसेच मजूर पक्षानेही सहभाग घेतला नाही. अशा  अशा परिस्थितीत ही परिषद केवळ औपचारिकता ठरली. यामध्ये एकूण तीन गोलमेज परिषदा वरती आधारित श्वेतपत्रिका  सरकारने प्रसिद्ध केली. ती प्रतिगामी स्वरूपाची होती. त्यामुळे तिच्यावर सर्वत्र कठोर टीका झाली.

अशाप्रकारे  ब्रिटिश सरकारने जातीय निवाडा जाहीर करून भारतातील निरनिराळ्या जातीमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न तर केलाच परंतु स्वातंत्र्य चळवळीलाही कमजोर करण्यासाठी त्याचा उपयोग करून घेतला. कारण गांधीजींना कायदेभंग चळवळीकडे दुर्लक्ष करून इंग्रजांच्या या कूटनीती विरुद्ध काही काळ लढावे लागले. त्यामुळे सामान्य लोक राष्ट्रीय चळवळीपासून दूर जाऊन चळवळीची गती मंदावली. १९३४ मध्ये

गांधीजींनी स्वतःला सक्रिय राजकारणापासून काही काळ माघार घेऊन सामाजिक कार्यासाठी वाहून घेतले.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक – २ :**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

१. ................ यांनी स्वराज्य पक्षाची स्थापना केली.

अ) चित्तरंजनदास ब) मोतीलाल नेहरू क) पंडित नेहरू ड) महात्मा गांधी

२. पहिली गोलमेज परिषद ................ येथे भरली.

अ) भारत ब) लंडन क) सिमला ड) धारासना

३. सविनय कायदेभंग चळवळीत प्रथम ................ कायदा मोडण्याचे ठरवले.

अ) जंगल ब) पाणी क) शेतसारा ड) मिठाचा

४. धारासना सत्याग्रहाचे नेतृत्व ................ यांनी केले.

अ) सरहद गांधी ब) पंडित नेहरू क) सरोजिनी नायडू ड) सरदार पटेल

५. ................ दिवस 'स्वातंत्र्य दिन' म्हणून जाहीर करण्यात आला.

अ) २६ जानेवारी, १९३० ब) २७ जानेवारी, १९३०

क) २८ जानेवारी, १९३० ड) २९ जानेवारी, १९३०

### १.२.३ चलेजाव चळवळ (१९४२) (Quit India movement) :

गांधीजींनी सुरू केलेली सविनय कायदेभंगाची चळवळ १९३४ साली संपुष्टात आली. १९३५ साली इंग्लंडच्या पार्लमेंटने भारतीयांना पूर्वीपेक्षा अधिक वैधानिक अधिकार देणारा कायदा पास केला. राष्ट्रीय सभेने केलेली पूर्ण स्वातंत्र्याची मागणी व त्यासाठी केलेले राष्ट्रव्यापी आंदोलन या पार्श्वभूमीवर १९३५ चा कायदा करण्यात आला. गांधी युगातील शेवटचे राष्ट्रवादी आंदोलन म्हणजे चलेजाव चळवळ (Quit India Movement) १९४२ च्या चळवळी दरम्यान भारताबरोबर जागतिक राजकारण अस्थिरतेचे होते. १९३५ च्या कायद्याप्रमाणे प्रांतांना स्वायतत्ता मिळाली. त्यानुसार १९३७ साली निवडणुका झाल्या. आठ प्रांतात काँग्रेसचे मंत्रिमंडळ आले. मात्र दोन वर्षातच म्हणजे १ सप्टेंबर १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले. तेव्हा चळवळी पूर्वीची राजकीय परिस्थिती व त्यातून घडलेल्या काही घटनांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

**१) दुसरे महायुद्ध व राष्ट्रीय चळवळ :–**

३ सप्टेंबर, १९३९ मध्ये युरोपमध्ये दुसरे महायुद्ध भडकले. इंग्लंड व फ्रान्स यांच्याविरुद्ध जर्मनी व इटली या युद्धाचे प्रारंभी स्वरूप होते. जर्मनी विरुद्ध इंग्लंडने युद्ध पुकारताच भारतीय इंग्लंडच्या बाजूने युद्धात सामील झाल्याची घोषणा त्या वेळचे व्हाइहरॉय लीनलिथगो यांनी केली. व्हाइसरॉयच्या या घोषणेचा राष्ट्रीय सभेने निषेध केला आणि काँग्रेसच्या सर्व मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. इंग्लंड जर स्वातंत्र्यासाठी युद्ध करीत

असेल तर इंग्लंडने प्रथम भारताला स्वातंत्र्य द्यावे. मात्र इंग्लंड तसे करणार नाही. कारण साम्राज्यवाद्यांचे युद्ध हे साम्राज्यवादासाठीच असणार. त्यामुळे या युद्धात भारत भाग घेणार नाही असे राष्ट्रीय सभेने कळवले. ब्रिटिशांनी मात्र काँग्रेसला बाजूला ठेवून मुस्लिम लीगला जवळ केले.

**२) ऑगस्ट घोषणा :–**

काँग्रेसच्या असहकारामुळे ब्रिटिशांच्या युद्ध प्रयत्नात अडथळे निर्माण होऊ लागले. महायुद्धाने तर गंभीर रुप धारण केले. प्रत्यक्ष इंग्लंड देश संकटात सापडला होता. त्यामुळे हिंदुस्थानची मदत व काँग्रेसची अनुकूलता ब्रिटिश सरकारला आवश्यक वाटू लागली. यातून मार्ग काढण्यासाठी ब्रिटिशांच्या भारतातील धोरणाबाबत ब्रिटिश संसदेच्या वतीने गव्हर्नर जनरल लिनलिथगो यांनी ८ ऑगस्ट, १९४० रोजी एक घोषणा केली. ही हिंदुस्थानच्या इतिहासातील 'ऑगस्ट घोषणा' अथवा 'ऑगस्ट ऑफर' या नावाने ओळखली जाते. त्यातील महत्त्वाची आश्वासने पुढील प्रमाणे –

१. हिंदुस्थानला वसाहतीचे स्वराज्य देणे इंग्लंडचे धोरण असेल.

२. युद्ध समाप्तीनंतर हिंदुस्थानची घटना तयार करण्यासाठी हिंदी प्रतिनिधींचीच एक परिषद बोलावली जाईल. अल्पसंख्यांकांच्या हिताचे रक्षण करणारी घटना असेल.

३. गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलमध्ये हिंदी नेत्यांचा समावेश केला जाईल.

अल्पसंख्यांकांच्या तरतुदीमुळे पाकिस्तानची मागणी करणाऱ्या मुस्लिम लीगच्या या घोषणेने समाधान झाले नाही तर काँग्रेसला ही घोषणा आवडली नाही. तसेच ब्रिटिशांच्या आश्वासनावर काँग्रेसचा विश्वास नव्हता. त्यामुळे काँग्रेसने ठराव करून ऑगस्ट घोषणा फेटाळून लावली.

**३) वैयक्तिक सत्याग्रह (१९४० ते १९४२) :–**

ऑगस्ट, १९४० मध्ये मुंबई येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले. गांधीजींनी त्यामध्ये सरकारशी असहकार म्हणून वैयक्तिक सत्याग्रह करण्याचा प्रस्ताव मान्य करून घेतला. वैयक्तिक सत्याग्रह म्हणजे व्यापक जन आंदोलन सुरू न करता एकेका व्यक्तीने कायदेभंग करावा असा निर्णय घेण्यात आला. गांधीजी सांगतील त्या स्वयंसेवकांनी एकट्यानेच इंग्रजांचा कायदा मोडावा व इंग्रज येथील ती शिक्षा स्वीकारावी असाही अर्थ वैयक्तिक सत्याग्रहाचा होता. पहिले सत्याग्रही आचार्य विनोबा भावे तर दुसरे पंडित जवाहरलाल नेहरू हे होते. १७ ऑक्टोबर, १९४० रोजी महात्मा गांधीजींच्या आदेशावरून प्रथम विनोबा भावे यांनी भाषण बंदीचा कायदा मोडला. त्यांना सहा महिन्याची शिक्षा झाली. तर पंडित नेहरू यांना सहा वर्षाची शिक्षा झाली. या पद्धतीने सर्व देशभर वैयक्तिक सत्याग्रह करून १९४२ पर्यंत सुमारे २५००० स्वयंसेवक तुरुंगात गेले. त्यामुळे ब्रिटिशांच्या युद्ध प्रयत्नात अडथळे निर्माण होत होते. या कोंडीतून मार्ग निगावा व भारतातील राजकीय पेच प्रसंग सोडविण्यासाठी ब्रिटिश सरकारने सर स्टॅफर्ड क्रिप्स या इंग्लंडच्या मंत्र्याला मार्च, १९४२ मध्ये भारतात पाठवले भारतात.

**४) क्रिप्स योजना :–**

काँग्रेसने पुकारलेला असहकार आणि सत्याग्रह, दुसऱ्या महायुद्धामुळे इंग्लंड समोर उभे राहिलेले

भीषण संकट, अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्ट, चीनचे सरसेनापती चँग- कै-शैक व ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्रमंत्री इव्हॅट यांनी हिंदुस्तानसाठी इंग्लंडवर आणलेले दडपण आणि जपान पासून हिंदुस्तान ला निर्माण झालेला धोका इत्यादी कारणामुळे ब्रिटिश सरकारने क्रिप्स मिशन २३ मार्च, १९४२ रोजी हिंदुस्तानात पाठवले.या मिशनने आठवड्याभरातच ३१ मार्चला भारताविषयीची एक योजना भारतीयांपुढे मांडली.

१. भारताला लवकरच वसाहतीच्या दर्जाचे पूर्ण स्वातंत्र्य दिले जाईल.

२. भारतात हिंदी संघ स्थापन व्हावा. त्याला मर्जीप्रमाणे ब्रिटिश राष्ट्रकूलातून बाहेर पडता येईल.

३. महायुद्ध संपताच घटना समितीची निर्मिती करण्यात येईल.

४. प्रांतीय कायदेमंडळातून घटना समितीचे सदस्य निवडले जातील. त्यांची निवड प्रमाणशील प्रतिनिधित्व या तत्त्वानुसार होईल.

५. घटना समितीत संस्थानिक आपले प्रतिनिधी पाठवू शकतील.

६. पण ज्या प्रांतांना किंवा संस्थानिकांना ही घटना मंजूर नसेल त्यांना स्वतंत्र घटना निर्माण करता येईल. त्यांना इंडियन युनियनचा दर्जा असेल आणि ते विलायत सरकारशी स्वतंत्र सन्मान ठेवू शकतील.

७. अल्पसंख्याकांच्या हक्क रक्षणासाठी ब्रिटिश सरकार घटना समितीशी करार करील.

८. महायुद्ध चालू असेपर्यंत भारताच्या संरक्षणाची जबाबदारी इंग्लंडची असेल.

या योजनेने भारतातील कोणत्याही राजकीय पक्षाचे समाधान झाले नाही. राष्ट्रीय सभेच्या पूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीचा त्यात स्पष्ट निर्देश नव्हता. म्हणून राष्ट्रीय सभेने ती योजना नामंजूर केली. पाकिस्तान निर्मितीचा समावेश नव्हता म्हणून लिगने ही योजना फेटाळली. संस्थानिकांना आपले स्वातंत्र्य घालवायचे नव्हते. म्हणून त्यांचा विरोध झाला. अस्पृश्यांना पुरेशे संरक्षण मिळाले नाही असे वाटल्याने त्यांचे नेते समाधानी नव्हते. महात्मा गांधीजींनी क्रिप्स योजना फेटाळून लावली. 'लोकशाहीचे विडंबन म्हणजे ही योजना असून दिवाळे निघालेल्या बँकेचा पुढील तारखेचा चेक' असे या योजनेचे वर्णन केले. काँग्रेस नेते डॉ. पट्टाभीसितारामय्या म्हणाले, ''मृतावस्थेत जन्माला आणलेले ब्रिटिश मंत्रिमंडळाचे अर्भक म्हणजे क्रिप्स योजना होय''. या योजनेच्या अपेक्षाला स्वतः क्रीप्सही जबाबदार होते. त्यांच्या वक्तव्यात सुसंगती नव्हती. त्यांच्यावर सरकारी दडपण होते. त्यामुळे त्यांना आपली आश्वासन परत घ्यावी लागत होती. एकूण परिस्थिती ओळखून क्रिप्स इंग्लंडला निघून गेले व त्यांची योजना असफल ठरली. ब्रिटिश सरकारचे दुराग्रही धोरण या अपयशाला कारणीभूत ठरले, असे अमेरिकेचे अध्यक्ष म्हणाले. महात्मा गांधीजींनी पुढील योजना आखण्यास सुरुवात केली. चले जाव चळवळीचा आदेश देऊन क्रांतिकारी चवळीस पुन्हा आरंभ केला.

**चलेजाव चळवळीची कारणे :-**

**१. क्रिप्स कमिशनचे अपयश :-**

भारतीयांच्या मागण्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी ब्रिटिश सरकारने क्रिप्स मिशन पाठवले पण या कमिशनला हिंदी प्रश्नार्थी समाधानकारक तोडगा काढता आला नाही. मात्र असे खापर क्रिप्सनी राष्ट्रसभेवरही फोडले. त्यामुळे चळवळीशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही याची खात्री हिंदी नेत्यांना झाली.

**२. साम्राज्यवादयांचे धोरण :-**

राष्ट्रीय कॉंग्रेसच्या असहकाराच्या धोरणामुळे आम्ही हिंदी प्रश्नावर समाधानकारक तोडगा काढू शकत नाही. राष्ट्रसभा ही देशव्यापी सर्वांची संघटना नसल्याने सत्ता कोणाकडे सोपवावी. हा प्रश्न आहे असे विरुद्ध धोरण ब्रिटिशांनी घेतले.

**३. सरकारची दडपशाही :-**

युद्धजन्य परिस्थितीमध्ये महागाईचा भडका उडाला होता. अशावेळी सरकारने जनतेला मदतीचा हात पुढे न करता अतिरेकी धडपशाहीचे धोरण स्वीकारले. उदाहरणार्थ बंगालमधील हजार एकर जमीन लष्करी तळासाठी शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने बळकावली होती. एकूणच जनतेत तीव्र असंतोष होता. यातून चळवळीला अनुकूलता निर्माण झाली.

**४. जपानच्या आक्रमणाची भिती :-**

दुसऱ्या महायुद्धांत जपानेने आक्रमक धोरण स्वीकारले. जपानची हिंदुस्तानच्या रोखाने घोडदौड चालू होती. सिंगापूर मलेशिया आणि रंगून इत्यादी ठिकाणी इंग्रजांचा पराभव करून जपानने हे प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणले. ब्रिटिशांचा प्रतिकार कमी पडत होता. जपानच्या मदतीस नेताजी सुभाषचंद्र यांची आझाद हिंद फौज होती. त्यांच्या 'चलो दिल्ली' या नाऱ्यामुळे ''ब्रिटिशांची अडचण हीच आमची संधी'' असे म्हणणारे जहालवादी नेताजींच्या व जपानच्या स्वागतास तयार होते. परंतु या ठिकाणी कॉंग्रेसची भूमिका वेगळी होती. ब्रिटिशांचा पराभव झाला व भारत जपानच्या ताब्यात गेला तर भारताचे भले होण्याची शक्यता नव्हती. जपानचे भारतावर आक्रमण हे ब्रिटिशांच्या साम्राज्यवादावर आक्रमण होते. त्यामुळे ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य द्यावे. भारत स्वतंत्र असता तर जपानने भारतावर आक्रमण करण्याचे काहीच कारण नव्हते. त्यामुळे ब्रिटिशांच्या लोकशाहीपेक्षा जपानची हुकूमशाही भारताला परवडणारी नव्हती. त्यामुळे हिंदी जनता नेताजींच्या लढ्याकडे आकर्षित होण्याऐवजी त्यांच्यापुढे चळवळीचा नवा कार्यक्रम ठेवणे गांधीजींना गरजेचे वाटले. वरील विविध कारणांमुळे चलेजाचे चळवळ सुरू झाली.

**५. जीवनावश्यक वस्तूंची टंचाई :-**

दुसऱ्या महायुद्धाला प्रारंभ होताच युद्धासाठी सरकारला प्रचंड पैसा हवा होता. पैशाची गरज भागवण्यासाठी सरकारने सर्वसामान्य जनतेवर मोठ्या प्रमाणात कर आकारले गेले. जीवनावश्यक वस्तूंची टंचाही, बेकारी, महागाई, शेतकऱ्यांचे हाल, चलन फुगवटा, या व या सदृश्य अनेक कारणामुळे जनतेत मोठ्या प्रमाणात असंतोष पसरला.

**६. ब्रिटिश सरकारचे भारताबाबतचे आडमुठे धोरण :-**

दुसऱ्या महायुद्धा संबंधी व्हाईसरॉयने घेतलेल्या एकतर्फी निर्णयाला कॉंग्रेसचे नेते ब्रिटिशांना सहकार्य करण्यास तयार होते. मात्र ब्रिटिशांनी भारताच्या घटनात्मक प्रश्नाबाबतचे पुढील काळातील आपले धोरण स्पष्ट करून भारताला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याची घोषणा करावी असा आग्रह धरला. परंतु ब्रिटिशांनी युद्ध समाप्तीनंतर

स्वातंत्र्याचा विचार केला जाईल असे सांगितले. सरकारच्या या आडमुठ्या धोरणामुळे ब्रिटिश सरकारला मार्गावर आणण्यासाठी चलेजाव आंदोलनाचा मार्ग भारतीयांनी स्वीकारला.

**७. ब्रिटिश सरकारची दुटप्पी राजनीती :-**

लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी व जगातील लोकशाहीच्या संरक्षणासाठी आपण दुसऱ्या जागतिक महायुद्धात भाग घेत असल्याचे ब्रिटनने जाहीर केले. युद्धाच्या काळात लोकशाहीच्या तत्त्वाचा उद्घोष करणाऱ्या इंग्लंडने मात्र भारतीयांना गुलाम बनवून त्यांच्या व्यक्ती स्वातंत्र्याचे हरण करून त्यांना पारतंत्र्यात टाकले होते. त्यांच्या या राजनीतीमुळे भारतीयांना ब्रिटिशांचे खरे स्वरूप कळून आले.

**८. नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या विचारांचा प्रभाव :-**

काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून महात्मा गांधीजी व सुभाष बाबू यांच्यात इ. स. १९३८ पासून मतभेद निर्माण झाले होते. इ. स. १९३८ व इ. स. १९३९ मध्ये अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत सुभाष बाबू यांनी महात्मा गांधी पुरस्कृत व्यक्तीचा पराभव केला होता. पुढे अध्यक्ष पदाचा त्याग करून सुभाषचंद्र बोस यांनी 'फॉरवर्ड ब्लॉक' या नावाचा पक्ष स्थापन केला व ब्रिटिशांविरुद्ध चळवळ सुरू केली. सरकारने त्यांना अटक केली. परंतु या कैदेतून ते आश्चर्यकारकरित्या सुटले आणि जपान व जर्मनी यांच्या साह्याने त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध आंदोलन सुरू केली. त्यामुळे ते भारतीय जनतेच्या गळ्यातील ताईत बनले. सुभाष बाबूंच्या प्रयत्नाला यश आले तर भारत जपानच्या ताब्यात जाईल व जपानची लष्करशाही ही भारताला परवडणार नाही. यासाठी जनतेला सुभाष बाबांच्या चळवळीपासून परावृत्त करून काँग्रेसकडे आकर्षित करण्यासाठी काँग्रेसने चलेजाव चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेतला. वरील विविध कारणांमुळे देशात वैफल्याची भावना निर्माण होऊन महात्मा गांधी व काँग्रेसच्या अन्य नेत्यांनी नवे आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेतला.

**चलेजावचा ठराव (८ ऑगस्ट १९४२) :-**

१४ जुलै, १९४२ मध्ये वर्धा या ठिकाणी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक झाली. कार्यकारणीने राष्ट्रीय आंदोलनाचे सर्व अधिकार महात्मा गांधीजींना दिले व गांधीजींचा छोडो भारत प्रस्ताव १४ जुलै, १९४२ रोजी पास केला. त्यानंतर ७ ऑगस्ट, १९४२ रोजी मुंबईच्या गवालिया टँक मैदानावर (आजचे क्रांती मैदान) राष्ट्रीय सभेचे अधिवेशन मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. त्या बैठकीत 'छोडो भारत'चा ऐतिहासिक ठराव प्रचंड बहूमताने मान्य झाला. यावेळी महासमितीच्या ३०० पैकी २५० सदस्य ८० हजार जनसमुदाय हजर होता. या सर्वांपुढे गांधीजींनी ७० मिनिटे भाषण केले. त्यात ते म्हणतात, मी स्वातंत्र्यासाठी आता अधिक काळ वाट पाहू शकत नाही. मी आणखी वेळ घालवला तर मला जगाचा अंत होईपर्यंत थांबावे लागणार आहे. त्यासाठी मी संघर्ष करण्याचा निर्णय घेतला आहे. माझ्या जीवनातील हा शेवटचा संघर्ष असेल. आम्ही आता अधिक काळ ब्रिटिशांच्या गुलामगिरी मध्ये राहू शकत नाही. त्यासाठी सर्व शक्तीनिशी सरकारशी लढा द्या.

ते पुढे म्हणतात, Here is a Mantra, a short one that I give you. You may imprint it in your hearts and let every breath of yours gives expression to it. The mantra is 'Do or Die', We shall either free India or die in that attempt.

गांधीजींनी जनतेला 'करा किंवा मरा' (Do or die) असा संदेश दिला व 'ब्रिटिशांनो भारत सोडून तत्काळ निघून जा' अशी घोषणा केली.

**८ ऑगस्ट क्रांती :–**

८ ऑगस्ट, १९४२ रोजी गांधीजींनी 'चले जाव' (Quit India) ची घोषणा केली व ९ तारखेपासून आंदोलनाला सुरुवात होणार होती. ब्रिटिश सरकारने हे आंदोलन दडकून टाकण्याचे ठरवले. ९ ऑगस्टला पहाटेच गांधीजींसह सरदार पटेल, पंडित नेहरू, आचार्य कृपलानी, मौलाना आजाद, गोविंद वल्लभ पंत, अरुणा असम अली अनेक काँग्रेसच्या नेत्यांना अटक करण्यात आली व त्यांना विविध तुरुंगात टाकण्यात आले. गांधीजींना पुणे येथील आगाखान पॅलेसमध्ये, डॉ. राजेंद्र प्रसाद यांना पाटणा येथे कैद केले तर इतर नेत्यांना अहमदनगरच्या तुरुंगात ठेवण्यात आले. हे सर्व नेते मंडळी २५ जून १९४५ अखेर कैदेत होती. काँग्रेसला बेकायदेशीर ठरवण्यात येऊन या संघटनेची बँकेतील खाती सरकार जमा केली. काँग्रेसशी संलग्न संघटनावरही ही बंदी घालण्यात आली.

**८ ऑगस्ट १९४२च्या ठरावातील मुद्दे पुढील प्रमाणे :–**

१. ब्रिटिश राजवट या देशाला असणे अपमानास्पद आहे.

२. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न म्हणजे ब्रिटन व संयुक्त राष्ट्रांची परीक्षा असून आशिया व आफ्रिकेतील जनतेत उत्साह निर्माण होईल.

३. स्वतंत्र हिंदुस्थान आपली सारी शक्ती स्वातंत्र्या करता खर्च करील.

४. स्वातंत्र्यानंतर हिंदुस्तान हंगामी सरकार स्थापन करील. ते दोस्त राष्ट्रांचे दोस्त असेल आणि दोस्तांच्या मदतीने शत्रू राष्ट्रांना प्रतिकार करेल.

५. ही कमिटी गांधीजींना नेतृत्व करण्याची व राष्ट्राला मार्ग दाखवण्याची विनंती करीत आहे.

६. राष्ट्रसभेला नव्हे तर देशाला सत्ता मिळावी म्हणून राष्ट्रीय सभा हे आंदोलन करत आहे.

**चळवळीची वाटचाल :–**

**१) जनतेने चळवळीचे नेतृत्व केले :–**

काँग्रेसच्या नेत्यांना तुरुंगात टाकल्यानंतर 'छोडो भारत' चळवळ थंड होईल असे सरकारला वाटले होते. परंतु सरकारचा अंदाज चुकला. जनतेने नेत्याच्या मार्गदर्शनाशिवाय उस्फुर्त आंदोलनास सुरुवात केली. 'करा किंवा मरा' एवढाच मंत्र त्यांना कळला होता. पण मरेपर्यंत संघर्ष कसा करावा हे कळेना. पण नेतृत्व नाही म्हणून जनता स्वस्थ बसली नाही. चळवळ आता जनतेची झाली. गांधीजींचे विचार, अहिंसा, तत्त्वज्ञान न कळलेलेही लोक त्यामध्ये होते. त्यामुळे हिंसात्मक मार्गही अवलंबिले गेले. शिवाय सरकारने दडपशाहीने सभा, मिरवणुका, मोर्चे, हरताळ असे शांततामय निदर्शनाचे सर्व मार्ग बंद केले होते. लाठी हल्ले, गोळीबार सुरू केल्याने जनता हिंसात्मक मार्गाकडे वळली. रेल्वे लुटणे, सरकारी तिजोऱ्या लुटणे, सरकारी मालमत्ता पेटवून देणे, रस्त्यात झाडे तोडून वाहतुकीची कोंडी करणे, टेलिफोनच्या तारा तोडणे, रेल्वेच्या फिश प्लेट काढणे, रेल्वे

वरती हल्ला करणे, रेल्वे स्टेशन, पोस्ट ऑफिस, तहसीलदार कचेऱ्या, सरकारी कार्यालय जाळणे, प्रतिसरकार स्थापन करणे, शस्त्रागारावरती हल्ला करून शस्त्रे लुटणे इत्यादी कामे जनतेनेच पुढाकाराने केली. विद्यार्थ्यांचा सहभाग हे एक चळवळीचे वैशिष्ट्य ठरू शकेल. देशभरातील शाळा, कॉलेजातील हजारो विद्यार्थ्यांनी आंदोलनात भाग घेतला. देशातील अनेक विद्यापीठे बंद पडली. बनारस विद्यापीठाचा लष्कराने ताबा घेतला होता. विद्यार्थ्यांप्रमाणे कामगारांनी देखील चळवळीला हातभार लावला. मुंबई, आमदाबाद येथील कापड गिरणी कामगारांनी संप पाळले. जमशेदपूर कारखान्यातील कामगारांनी याप्रमाणे चळवळीला मदत केली. अशाप्रकारे चलेजाव चळवळ देशभर पसरली होती. बिहार मध्ये प्रांत बंगाल, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र येथे ही चळवळ अधिक तीव्र झाली. ग्रामीण भागात जनतेने प्रतिसरकारे स्थापन केली. उदा. सातारा जिल्ह्यात क्रांतीसेना नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकार चालविले होते. तसाच प्रयत्न बंगालमधील मिदनापूर जिल्हा, मद्रास इलाख्यात बालिमा व बस्ती जिल्ह्यात देखील केला होता. अर्थात ब्रिटिश सत्तेपुढे या प्रतिसरकारांची शक्ती अगदी कमी पडत होती. त्यामुळे हा प्रयोग धाडसी असला तरी यशस्वी होणे शक्य नव्हते. पण अशा प्रति सरकारला जनतेची सहानभूती होती.

**२) सरकारची दडपशाही :–**

ही चळवळ दडपून टाकण्यासाठी सरकारने, क्रूरपणे सर्व मार्गाचा अवलंब केला. शांतपणे चाललेल्या सभांवर गोळीबार केले. विमानातून मशीनगन चालवून जमाव पांगवले. निशस्त्र लोकांवर, स्त्रियांवर अन्याय, अत्याचार केले. कैद्यांना उपाशी ठेवून छळवाद केला. पोलीस गोळीबारात १०२८ लोक मारले गेले. ३२०० जखमी झाले. पण ही आकडेवारी सरकारी होती. यापेक्षा कितीतरी पटीने लोक मारले गेले होते व जखमी झाले होते. जवळजवळ ६०,००० लोकांना करावास झाला होता. ६० ठिकाणी लष्कर बोलावले. ३१८ ठिकाणी रेल्वे स्टेशन जाळली. १३००० ठिकाणी टेलफोन तारा तोडल्या. शेकडो पोस्ट ऑफिस वरती हल्ले केले. ५९ रेल्वे गाड्या उलथून टाकल्या. ४४ लाख रुपयांची संपत्ती नष्ट करून टाकली.

या काळात ५०० पोस्ट ऑफिसेस, २५० रेल्वे स्टेशन, १५० चौक्या नष्ट केल्या. ३१ पोलीस वय ११ शिपाई ठार झाले. सरकारने ५८८ वेळा गोळीबार केला. त्यात ९३०९९९ लोक ठार व १६३० जखमी झाले.६०३२९ लोकांना तुरुंगात डांबण्यात आले तर २६००० लोकांना शिक्षा ठेवण्यात आल्या.

**३) महात्मा गांधीजींचे उपोषण :–**

चलेजाव आंदोलन हे देशव्यापी होते. ते अहिंसक मार्गाने चालावे असे गांधीजींना वाटत होते. परंतु अनेक ठिकाणी हिंसा घडून आली. त्यामुळे १९४३ साली सुरुवातीला सरकारने 'दंगलीतील राष्ट्रसभेची जबाबदारी' या नावाची पुस्तिका प्रसिद्ध केली व यामध्ये आंदोलनातील हिंसक घटना गांधी व काँग्रेसच्या नेत्यांना जबाबदार धरण्यात आले. या विरोधात गांधीजींनी १० फेब्रुवारी, १९४३ पासून २१ दिवसाचे उपोषण केले. या उपोषण काळात गांधीजींची प्रकृती चिंताजन असूनही सरकारने त्यांना सोडले नाही. सरकारचा निषेध म्हणून कार्यकारिणीच्या अनेक सदस्यांनी राजीनामे दिले. तरी सरकारने दखल घेतली नाही. शेवटी ३ मार्च, १९४३ रोजी गांधीजींनी २१ दिवसाचे उपोषण पूर्ण केले. गांधीजींचा हा उपवास शारीरिक दृष्ट्या एक चमत्कारच होता.

**चलेजाव आंदोलनाचे महत्त्व :-**

आधुनिक भारताच्या इतिहासात चलेजाव चळवळीला फार मोठे महत्त्व आहे. ९ ऑगस्ट, १९४२ ला सुरू झालेली चलेजव चळवळ हे भारतीय जनतेचे ब्रिटिशाविरुद्धचे अखेरचे आंदोलन होते. ही चळवळ पूर्णतः यशस्वी झाली नाही तरी तिचे महत्त्व कमी होत नाही. जय प्रकाश नारायण म्हणतात, १७८९ मध्ये फ्रान्समध्ये झालेल्या राज्यक्रांतीस आणि १९१७ मध्ये रशियात झालेल्या रशियन क्रांतीस जसे त्या त्या देशात महत्त्वाचे स्थान आहे तसेच महत्त्व भारताच्या इतिहासात १९४२ च्या चळवळीला आहे. जगातील कोणत्याही क्रांतीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर जनतेने भाग घेतलेला नाही. या चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे ही चळवळ जनतेने सुरू केली होती. चळवळ कशी करायची याबाबतची कोणतीही कल्पना नसताना जनतेने चळवळीचे नेतृत्व केले.

१९४२ ची चळवळ ही स्वातंत्र्य आंदोलनातील महत्त्वाचा टप्पा ठरली. यानंतर स्वातंत्र्य अवघ्या चार-पाच वर्षात मिळाले. १९४२ च्या आंदोलनामुळे राज्यकर्त्यांचा आत्मविश्वास ढळला. लाठी, बंदुका यांना जनता घाबरत नाही हे राज्यकर्त्यांच्या लक्षात आले. यामुळे भारतावर आता फार काळ राज्य करता येणार नाही याची जाणीव सरकारला झाली. हिंदुस्तान बाहेरील हिंदू लोकांना यातून प्रेरणा व स्फूर्ती मिळाली. मात्र काही मतभेदामुळे मुस्लिम लीगने इंग्रजांना सहकार्य केले. त्याचे परिणाम देशाच्या फाळणीत झाले. तुरुंगात असलेले महात्मा गांधीजी एप्रिल १९४४ मध्ये आजारी पडले. ते आता फार दिवस जगू शकणार नाहीत. तेव्हा त्यांच्या मृत्यूचा आक्षेप नको म्हणून व्हाईसर वेव्हेल यांनी ६ मे, १९४४ रोजी त्यांची कैदेतून मुक्तता केली.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक - ३ :**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

१. महात्मा गांधीजींच्या वैयक्तिक सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही ................ होते.

अ) सुभाष चंद्र बोस ब) आचार्य कृपलानीक) पंडित नेहरू ड) आचार्य विनोबा भावे

२. काँग्रेस वर्किंग कमिटीने ................ येथे झालेल्या बैठकीत 'चलेजाव'चा ठराव पास केला.

अ) वर्धा ब) मद्रास क) कलकत्ता ड) पुणे

३. 'करेंगे या मरेंगे' हा नारा ................ यांनी दिला.

अ) वि. दा. सावरकर ब) नेताजी सुभाषचंद्र बोस

क) जवाहरलाल नेहरू ड) महात्मा गांधी

४. नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी ................ हा पक्ष स्थापन केला.

अ) साम्यवादी पक्ष ब) आझाद पक्ष क) फॉरवर्ड ब्लॉक ड) समाजवादी पक्ष

५. ८ ऑगस्ट १९४० रोजीची ऑगस्ट घोषणा ................ या व्हाइसरॉयनी केली.

अ) चर्चिल ब) चेंबरलेन क) लॉर्ड लिनलिथगो ड) लॉर्ड कर्झन

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**रौलेट कायदे :** ब्रिटिशांनी राजद्रोही वृत्तीला आळा घालण्यासाठी मिस्टर रौलेट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली व या समितीने १९१९ साली दोन महत्त्वपूर्ण कायदे केले. त्यामध्ये राजद्रोही व्यक्तीवरील खटला उच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या विशेष न्यायालयात गुप्तपणे चालेल व दिलेल्या निकाला विरुद्ध अपील करता येणार नाही. जामीन मिळणार नाही. याशिवाय कोणत्याही व्यक्तीस फक्त संशयावरून अटक करणे, राहत्या घराची झडती घेणे यासारखे व्यक्ती स्वातंत्र्यावरती गदा आणणारे कायदे केले. यालाच रौलेट कायदे म्हणतात.

**सनदशीर :** ब्रिटिशांच्या न्याय बुद्धीवर विश्वास ठेवून अर्ज विनंती याद्वारे सवलती पदरी पाडून घेणे या मार्गाला सनदशीर मार्ग म्हणतात.

**खिलाफत :** तुर्कस्तानचा खलिफा हा सर्व मुसलमानांचा प्रमुख मानला जात होता. या खलिफा ने पहिल्या महायुद्धात जर्मनीच्या बाजूने इंग्लंडच्या विरुद्ध सहभाग घेतला तर भारतातील मुस्लिम खलिफाच्या विरुद्ध इंग्रजांच्या बाजूने लढण्यास तयार नव्हते. तेव्हा युद्धानंतर तुर्कस्तानचे विभाजन केले जाणार नाही असे वचन इंग्रजांनी मुस्लिमांना दिल्यानंतर भारतीय मुसलमानाने इंग्रजांना युद्धात सहकार्य केले. पण युद्ध समाप्त होताच युरोपियन राष्ट्रांनी तुर्की साम्राज्याची तुकडे केले. त्यामुळे भारतातील मुस्लिमांनी इंग्रजां विरुद्ध जी चळवळ उभी केली ती म्हणजे खिलामत चळवळ.

## १.४ सारांश :

आधुनिक भारताच्या इतिहासात महात्मा गांधीजींचे राजकीय योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली राबवलेली भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा आपण अभ्यास केला. यावरून आपल्या असे लक्षात येते की १९४७ अखेर महात्मा गांधींचा भारतीय राजकारण व समाजकारणावर पूर्ण प्रभाव व वर्चस्व होते. महात्मा गांधीजींच्या कार्याचे व नेतृत्वाचे महत्त्व अनेकांनी व्यक्त केले आहे. जनतेने त्यांना आदराने 'महात्मा' ही पदवी दिली. सुभाषचंद्र बोस व गांधीजी यांच्यात मतभेद असूनही सुभाष बाबूंनी गांधीजींना राष्ट्रपिता (Father of the Nation) असे म्हटले होते.

पंडित नेहरू गांधीजींबद्दल लिहितात, गांधीजींचा प्रभाव त्यांच्याशी संमत असणाऱ्या पुरता किंवा त्यांना राष्ट्रनेता मानणाऱ्या पुरता मर्यादित नाही तर त्यांच्याशी असहमत असणाऱ्यांवर व त्यांच्यावर टीका करण्यावरही दिसून येतो. भारतातील असंख्य लोक त्यांना स्वातंत्र्याच्या इच्छेचे व राष्ट्रवादाचे प्रतिक मानतात. कोणत्याही गर्विष्ठ सत्तेपुढे ते झुकत नाहीत किंवा देशाचा अपमान होईल असे आदेश पाळत नाहीत. भारतातील हजारो लोक त्यांच्याशी संबंध नसतील पण भारताच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नात मात्र सर्वजण त्यांच्याकडे पाहतात व त्यांना आपला नेता मानतात.

गांधीयुगापूर्वी भारतीय राजकारणामध्ये मवाळ व जहाल या विचारसरणीचा समन्वय त्यांनी घातला व एक नवीन गतिमान, नीतीमान, व्यवहारिक आणि अहिंसेवर आधारलेला स्वतःचा नवा मार्ग स्वातंत्र्य चळवळीसाठी वापरला. तो मार्ग अभिनव स्वरूपाचा होता. त्या दृष्टीने ते एक संत राजकारणी होते.

डॉ. राजेंद्र प्रसाद म्हणतात, "Mahatma Gandhi who has been over become like our guide

and philosopher during the last 30 years."

डॉ. द. न. गोखले म्हणतात, ''१९२०, १९३०, १९४२ हे तीन अखिल भारतीय सत्याग्रह स्वातंत्र्यासाठी गांधीजींनी लढवले. तिन्ही सत्याग्रहात मिळून देश स्वातंत्र्य मंदिराच्या पायऱ्या चढत चढत स्वातंत्र्य मूर्ती जवळ पोहोचला. केवळ गांधीजींच्या सत्याग्रहांनी स्वातंत्र्य मिळाले असे तटस्थ निरीक्षकाला म्हणता येणार नाही. पण इतर घटकांचा वाटा त्यात कितीही असला तरी गांधीजींच्या सत्याग्रहाचा वाटा सर्वांहून मोठा होता हे मान्य केलेच पाहिजे.''

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयंअध्ययन प्रश्न - १ :**

(अ) १. (ब) जनरल डायर २. (ब) 'सर' ३. (अ) स्वदेशी फंड
४.(अ) असहकार ५. (क) तुर्कस्तान

**स्वयंअध्ययन प्रश्न - २ :**

(अ) १. (अ) चित्तरंजन दास २. (ब) लंडन ३. (ड) मिठाचा
४. (क) सरोजिनी नायडू ५. (अ) २६ जानेवारी, १९३०

**स्वयंअध्ययन प्रश्न - ३ :**

(अ) १. (ड) आचार्य विनोबा भावे २. (अ) वर्धा ३. (ड) महात्मा गांधी
४. (क) फॉरवर्ड ब्लॉक ५. (क) लॉर्ड लिनलिथगो

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टीपा लिहा.**

१. गांधीजींचे आफ्रिकेतील कार्य
२. रौलेट कायदे
३. जालियनवाला बाग हत्याकांड
४. खिलाफत चळवळ
५. रॅमसे मॅकडोनाल्डचा जातीय निवडा व पुणे करार
६. मिठाचा सत्याग्रह- दांडी मार्च

**(ब) लघुत्तरी प्रश्न.**

१. महात्मा गांधीजींची भारतातील प्रारंभिक कामगिरी सांगा.
२. असहकार चळवळीची कारणे सांगा.
३. सविनय कायदेभंग चळवळीचा कार्यक्रम स्पष्ट करा.

४. चले जाव चळवळची कारणे सांगा

५. नेताजी सुभाष चंद्र बोस यांचे कार्य स्पष्ट करा.

**(क) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. असहकार चळवळीची कारणे व स्वरूप सांगून सविस्तर माहिती द्या

२. १९३० च्या महात्मा गांधीजींच्या सविनय कायदेभंग चळवळीची सविस्तर माहिती द्या

३. १९४२ च्या चलेजाव चळवळीची थोडक्यात चर्चा करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :


१. डॉ. वैद्य सुमन, डॉ. कोठेकर शांता : आधुनिक भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२. आचार्य जावडेकर शं. द. : आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

३. डॉ. सरदेसाई बी. एन. डॉ. नलवडे व्ही. एन. : आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४. गांधी मो. क. : सत्याचे प्रयोग, आत्मकथा, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद.

५. डॉ. काकडे, अकलूजकर. : आधुनिक भारताचा इतिहास, अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर.

६. कुलकर्णी अ. रा., देशपांडे प्र. न. : भारतीय स्वातंत्र्य आंदोलन, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे.

७. डॉ. गाठाळ एस. एस. : भारताचा इतिहास व संस्कृती कैलास पब्लिकेशन औरंगपुरा, औरंगाबाद.

घटक २

# शेतकरी आणि डाव्या चळवळी

## (Peasant and Leftist Movements)

---

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

- २.२.१ कारणे : शेतकरी आणि डाव्या चळवळी
- २.२.२ शेतकरी चळवळ
- २.२.३ डाव्या विचारसरणीच्या चळवळी

२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्टे :

सदर घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

१. शेतकरी व डाव्या विचारसरणीच्या चळवळीच्या उदयाची प्रमुख कारणे समजून घेता येतील.

२. शेतकरी चळवळीची सविस्तर माहिती समजेल.

३. डाव्या विचारसरणीच्या चळवळीची सविस्तर माहिती समजेल.

४. शेतकरी व डाव्या विचारसरणीच्या चळवळीचे परिणाम समजतील.

५. शेतकरी व डाव्या विचारसरणीच्या चळवळीतील विविध नेतृत्व याविषयी मिळेल.

## २.१ प्रास्ताविक :

भारतातील शेतकरी व डाव्या चळवळीचा उदय हा औद्योगिक क्रांती, ब्रिटिश शोषण, आणि कामगारांच्या दुर्दशेमुळे झाला. विशेषतः १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला, जेव्हा मिल, कारखाने आणि रेल्वे विकसित होऊ लागले, तेव्हा लाखो मजूर अत्यंत हलाखीच्या स्थितीत काम करू लागले ज्यातून कामगार संघटनांचा आणि आंदोलनेचा जन्म झाला. शेतकरी चळवळी आणि डाव्या विचारसरणीच्या चळवळी यांचा भारतीय समाजाच्या परिवर्तनात मोठा वाटा आहे. औपनिवेशिक शोषण, सामाजिक विषमता, आणि आर्थिक अन्यायाच्या विरोधात उभ्या राहिलेल्या या चळवळींनी शोषित, पीडित, वंचित वर्गाच्या हक्कांसाठी लढा उभारला. डाव्या विचारसरणीचा मुख्य गाभा म्हणजे समता, श्रमाचा सन्मान, आणि संपत्तीचे समानवितरण, तर शेतकरीच ळवळ ही त्या विचारांचे ग्रामीण रूपांतर मानली जाते.ब्रिटिश साम्राज्याच्या काळापासून ते आधुनिक काळापर्यंत या चळवळींनी सामाजिक क्रांतीसाठी संघर्षाचे आणि संघटनेचे शस्त्र वापरले आणि त्यामुळे भारताच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक प्रवाहावर खोल परिणाम झाला.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ कारणे : शेतकरी आणि डाव्या चळवळी :

शेतकरी चळवळ आणि डाव्या विचारसरणीच्या चळवळी या दोन्ही चळवळींनी भारतातील सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचा पाया घातला. शोषित, पीडित आणि वंचित घटकांना न्याय मिळावा, श्रमिक वर्गाला त्याचा हक्क मिळावा, आणि समाजात समता, बंधुता व न्यायनां दावा, यासाठी या चळवळींनी सातत्याने संघर्ष केला. डाव्या विचारसरणीने विचारांची दिशा दिली, तर शेतकरी चळवळीने ती कृतीत उतरवली. आजही देशातील विविध प्रश्नांवर विचार करताना या चळवळींचा वारसा मार्गदर्शक ठरतो. समाजपरिवर्तनासाठीची ही ऊर्जा पुढील पिढ्यांना ही प्रेरणा देणारी आहे. या चळवळी उदयास येण्याची प्रमख कारणे खालीलप्रमाणे होती.

**१. शेत जमिनीचा हक्क व असुरक्षितता :**

ब्रिटिश कालखंडात जमीनदारी पद्धत, महालवारी पद्धत अश्या वेगवेगळ्या अन्यायकारक जमीन महसूल पद्धतीचा अवलंब करण्यांत आला. महसूल वसुलीचे अन्यायकारक नियम लागू झाले. शेतकऱ्यांना अधिकचा

कर भरावा लागत असे, करन भरल्यास जमीन ताब्यातून जाण्याचा धोका निर्माण झाला होता. परिणामी शेतकऱ्यांच्यामध्ये असुरक्षित वातावरण निर्माण झाले होते.

**२. जमीनदार व सावकार कामगारांचे शोषण :**

ब्रिटिश कालखंडात शेतकऱ्यांना शेतीसाठी सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत असे. सावकारांचे कर्ज जास्त व्याजदर असल्याने शेतकरी कर्ज फेडू शकत नसत. शेतकऱ्यांना सावकारांकडून घेतलेले कर्ज मे डता न आल्यामुळे त्यांचे शेतीवरचे स्वातंत्र्य हरवत गेले. जमीनदार व सावकार शेतकऱ्यांचे शोषण करत असत. परिणामी शेतकऱ्यांकडे स्वतःची जमीन न राहता जमीनदारांच्या ताब्यात जाऊ लागली.

भारतामध्ये उद्योगधंद्यामध्ये, छोट्या मोठ्या कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना कमी मजुरी दिली जात असे. कामगारांना कामाचे तास अनिश्चित असत त्यांना १२-१४ तास काम करावे लागत असे. कामगारांना सुरक्षिततेचा अभाव होता, त्यांना विश्रांती मिळत नसे. त्यांना खूप हलाखीचे जीवन जगावे लागत असे मुंबईतील गिरणी कामगारांचे हाल मोठ्या प्रमाणात होत होते. त्यामुळे अन्यायविरुद्ध हे सर्व कामगार एकत्र आले.

**३. किमान समर्थन मूल्याचा अभाव :**

शेतकऱ्यांच्या शेतमलास बाजारात अनिश्चित दर मिळत असे. शेतमालास हमीभाव मिळत नव्हता. याकरिता सरकार धोरणांची अंमलबजावणी अपुरी होती. सरकारने यावर कायमस्वरूपी उपाय योजना योजने आवश्यक होते.

**४. कर्जबाजारीपणा व आत्महत्या :**

शेतीमधील वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतीत नफा कमी मिळत होता. बँक व सावकारांच्या कर्जाच्या गुंत्यात शेतकऱ्यांचे जीवन अडकलेले होते. शेतीसाठी घेतलेले कर्ज वसुलीच्या वेळेस फेडता येत नसे. कर्जबाजारीपणा व आर्थिक संकटे निर्माण झाली. परिणामी शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्विकारत असत. आत्महत्यांची संख्या वाढल्यामुळे संताप निर्माण झाला होता व या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटना आणि आंदोलने तयार झाली.

**५. निसर्गावर अवलंबित्व व हवामान बदल :**

भारतातील शेती हि प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे. पूर, दुष्काळ, गारपीट यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असे. सरकार कडून अशी नैसर्गिक आपत्तीसाठी कोणत्याही प्रकारची मदत मिळत नसे.

**६. औद्योगिकीकरण व जमिनीची जबरदस्तीने अधिग्रहण :**

भारतात वेगवेगळे उद्योग व कारखाने निर्माण होऊ लागले होते. या उद्योगाकरिता शेतकाऱ्यांच्या शेतजमीनी शेतकऱ्यांची इच्छा नसतानाही सरकार काढून घेत असे. शेतकऱ्यांच्या शेतजमिनींचं उद्योगासाठी अधिग्रहण केले जात होते. मात्र जमिनी गेलेल्या शेतकाऱ्याचे पुनर्वसन अपूर्ण किंवा अन्यायकारकरित्या केले जात होते.

**७. शेतीमाल वाहतुकीची अडचण व गोदामांची कमतरता :**

शेतकऱ्यांचा शेतमाल हा खेडोपाडी निर्माण होत होता. हा माल बाजारपेठे पर्यन्त येण्यासाठी पक्के रस्ते उपलब्ध नव्हते. शेतमाल जतन करून ठेवण्यासाठी कोल्ड स्टोरेज अथवा गोंदमे यांचा अभाव होता. परिणामी शेतमालाची नासाडी मोठ्या प्रमाणात होत असे.

**८. राजकीय उपेक्षा व धोरणात्मक अपयश :**

शेतीच्या विकासासाठी सरकारने लक्ष देणे गरजेचे होते. मात्र सरकारकडून शेतीसाठी पुरेसा निधी दिला जात नव्हता. शेतीविषयी धोरणात्मक निर्णय घेतला जात नव्हता. सरकारची धोरणे बहुतेक वेळा मोठ्या कंपन्यांना अनुकूल होती. शेतकऱ्यांना कोणीही वाली नसे. स्वातंत्र्याअगोदर व स्वातंत्र्यानंतरही भूमी सुधारणा कायदे करण्यात आले मात्र ते कागदावरच राहिले. परिणामी गरीब व भूमिहीन शेतकरी न्यायासाठी रस्त्यावर उतरले.

**९. शेतीतील अस्थिरता आणि बाजारपेठेतील असमानता :**

शेतीतील अस्थिरता आणि बाजारपेठेतील असमानता हे शेतकरी चळवळीस कारणीभूत ठरले. पीकपद्धती, उत्पादन खर्च आणि बाजारभाव यामध्ये योग्य संतुलन नव्हते. परिणामी बाजारात दलाल व व्यापाऱ्यांची मक्तेदारी निर्माण झाली होती. दलाल व व्यापारी शेतकऱ्यांची पिळवणूक करत असत.

**१०. राजकीय आणि डाव्या विचारांची प्रेरणा :**

डावे पक्ष, समाजवादी विचारसरणी आणि गांधीवादी कार्यकर्ते यांनी शेतकऱ्यांना संघटित केले. किसान सभा, सत्याग्रह, जमिनीच्या मागण्या यामुळे शेतकरी चळवळींस चालना मिळाली.

**११. स्थानिक आणि जागतिक घडामोडी :**

जागतिक बाजारपेठेतील बदल, उदारीकरण याचा थेट परिणाम भारतीय शेतकरी व कामगार यांच्यावर झाला. त्यामुळे आत्मनिर्भरतेची मागणी जोर धरू लागली. जागतिक स्तरावर अनेक कामगार चळवळींच्या उदय झाला. कामगारांच्या संघटना निर्माण झाल्या. या कामगारांच्या संघटना कामगारांच्या हिताच्या दृष्टीने प्रयत्नशील होत्या. रशियन क्रांती घडून आली. रशियातील बोल्शेविक क्रांतीमुळे जागतिक स्तरावर डाव्या विचारसरणीला गती मिळाली. भारतातील अनेक विचारवंत (जसे बी.टी. रणदिवे, पी. सुंदरय्या) प्रेरित झाले. तसेच इंग्लंडमध्ये ब्रिटिश ट्रेड युनियन चळवळ प्रभावी ठरली होती. या सर्वांचा प्रभाव भारतीय विचारवंतांवर पडला.

**१२. शोषण व आर्थिक असमानता :**

समाजामध्ये श्रीमंत व गरीब यांच्यात आर्थिकदृष्ट्या खूप मोठी दरी निर्माण झाली होती. जमिनीचे, संपत्तीचे व संसाधनांचे केंद्रीकरण काही मोजक्या लोकांच्या हाती होते. गरीब व कामगार, शेतकरी, आदिवासी यांना सतत दुर्लक्षित व शोषित ठेवले गेले.

**१३. जमिनीची विषमता :**

समाजामध्ये जमिनीची विभागणी विषम प्रमाणात होती. थोड्या जमिनदारांकडे मोठ्या प्रमाणात जमीन होती तर उरलेले भूमिहीन होते. जमिनीत राबणारा शेतकरी भूमिहीन बनला होता.

**१४. औद्योगिकीकरण आणि शहरीकरण :**

भारतामध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरणास  सुरुवात झाली. औद्योगिकीकरनामुळे कापड गिरण्या, लोखंड-कोळसा उद्योग सुरू झाले. उध्योगधंदे वाढल्यामुळे कामगार वर्ग वाढला. मुंबई, कोलकाता, मद्रास येथे कारखान्यांमध्ये मजूर वर्ग वाढला. नवीन शहरे विकसित होऊ लागली. वाढलेल्या मजूर वर्गास सोयी सुविधा कोणत्याही प्रकारच्या उपलब्ध नव्हत्या. हा  मजुर वर्ग आपल्या हक्कासाठी एकत्र आला व कामगार चळवळीचा उदय झाला.

**१५. दलित, आदिवासी, अल्पसंख्याकांच्या हक्कांसाठी लढा :**

डाव्या चळवळींनी जातीव्यवस्थेचा विरोध केला, सामाजिक समतेवर भर दिला. आदिवासींनी जंगल, जमीन व पाण्याच्या हक्कासाठी आंदोलने केली. परिणामी दलित आदिवासी अल्पसंख्यांक या कामगार चळवळीकडे आकर्षित झाले व चळवळीत त्यांनी सहभाग घेतला.

**१६. डाव्या चळवळी ही सामाजिक बदलाची एक प्रतिक्रिया होती :**

डाव्या व कामगार चळवळीने अन्याय, असमानता, वंचितत्व याविरुद्धची संघटित उभारणी  केली. त्यांनी भारतात आणि जगात अनेक ऐतिहासिक परिवर्तने घडवली.  परिणामी कामगार चळवळीला पाठिंबा वाढत गेला व चळवळ वाढीस लागली.

वरीलप्रमाणे शेतकरी आणि डाव्या विचारसरणीच्या चळवळी उदयास येण्याची करणे दिसून येतात. शेतकरी आणि डाव्या विचारसरणीच्या चळवळी या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अन्यायाच्या विरोधातून उदयास आल्या. त्यांचा उद्देश शोषित-वंचित वर्गासाठी समानता, न्याय आणि हक्क मिळवून देणे हा होता.

**स्वयं अध्ययन प्रश्न - १ :**

**योग्य पर्याय निवडा.**

१. भारतीय समाजामध्ये जमिनीची विभागणी ............... प्रमाणात होती.

अ) विषम          ब) सम

क) विषम व सम          ड) यापैकी नाही

२. ............... येथील बोल्शेविक क्रांतीमुळे जागतिक स्तरावर डाव्या विचारसरणीला गती मिळाली.

अ) फ्रांस          ब) रशिया

क) चीन          ड) अमेरिका

३. ............... शेतजमिनींचं उद्योगासाठी अधिग्रहण केले जात होते.

अ) शेतकऱ्यांच्या          ब) कारखानदारांच्या

क) संस्थानिकांच्या          ड) यापैकी नाही

४. भारतातील शेती हि प्रामुख्याने ............... अवलंबून आहे.

अ) सिंचनावर ब) पावसावर

क) कालव्यावर ड) यापैकी नाही

५. डाव्या चळवळींनी जातीव्यवस्थेचा विरोध केला व सामाजिक समतेस ............... दिला.

अ) पाठिंबा ब) विरोध

क) दुर्लक्ष केले. ड) यापैकी नाही

## २.२.२ शेतकरी चळवळ :

समाजामध्ये सामाजिक परिवर्तन नेहमीच घडून येत असते. या परिवर्तनामागे संघटित प्रयत्न व चळवळी याचे कार्य महत्वपूर्ण असते. वास्तविकत: सामाजिक जीवनाची नवी व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी करण्यात येणारा सामूहिक प्रयत्न म्हणजे चळवळ होय. भारतीय इतिहासामध्ये अनेक चळवळी घडून आल्या. यामधील शेतकरी चळवळ महत्त्वाची मानली जाते. भारतातील शेतकरी चळवळीचा इतिहास देशाइतकाच समृद्ध आणि वैविध्यपूर्ण आहे. कारण भारत हा शेती प्रधान देश आहे. मात्र शेतकऱ्यांची अवस्था बिकट होत चालली होती. शेतकऱ्यांनी दडपशाही आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. ज्याने देशाच्या सामाजिक-राजकीय जडणघडणीला आकार दिला गेला.

### १. शेतकरी चळवळीची वाटचाल :

शेतकरी चळवळीचा पहिला टप्पा १८वे व १९वे शतक हा संघर्षाचा टप्पा मानला जातो. या कालखंडात भारतात ब्रिटिश सत्ता होती. ब्रिटिश कालखंडात अन्यायकारक कृषी धोरणे व शेतमालावर जास्त कर आकारला जात होता. जमीनदारांकडून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे शोषण केले जात होते. यामुळे शेतकरी अस्वस्थ झाला होता. यातूनच बंगालमध्ये इंडिगो बंड, छोटा नागपूरमध्ये कोल बंड यासारख्या स्थानिक बंडांनी शेतकरी समुदायातील तीव्र असंतोष अधोरेखित केला.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून २० व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंतचा कालखंड हा संघटित चळवळीचा कालखंड मानला जातो. या कालखंडात भारतीय राष्ट्रीय चळवळ जोमात होती. शेतकरी संघटित स्वरूपात चळवळ चालवू लागले. राष्ट्रीय नेत्यांचा प्रभाव आणि राष्ट्रवादी विचारांचा प्रसार यामुळे सामूहिक कृतीची भावना जागृत झाली. या काळात चंपारण्य सत्याग्रह, खेडा सत्याग्रह, बारडोली सत्याग्रह सारख्या महत्त्वाच्या चळवळी झाल्या, ज्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना स्वातंत्र्याच्या व्यापक लढ्याशी जोडले.

२० व्या शतकाच्या मध्यान्नावर शेतकरी चळवळींच्या स्वरूपामध्ये आमूलाग्र बदल झाला. डाव्या विचारसरणीच्या प्रभावाखाली या चळवळी अधिक आक्रमक व लढाऊ बनल्या. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात, स्वातंत्र्योत्तर कालखंडात शेतकरी चळवळी मुख्यत्वे शेतीविषयक प्रश्न, जमीन सुधारणा बाबतचे धोरण, आणि मध्यस्थांकडून होणारे शोषण यावर केंद्रित होत्या. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २१ व्या शतकाच्या सुरुवातीला झालेल्या शेतकरी आंदोलनांसारख्या या चळवळींनी अनेकदा सरकारला त्यांच्या कृषी आणि आर्थिक धोरणांचा पुनर्विचार करण्यास आणि सुधारणा करण्यास भाग पाडले आहे.

भारतातील शेतकरी चळवळीची उत्क्रांती ही प्रतिकूल परिस्थितीत शेतकऱ्यांच्या दृढनिश्चयाचा पुरावा आहे. या चळवळींनी केवळ भारताच्या इतिहासालाच आकार दिला नाही तर त्याच्या वर्तमान आणि भविष्यावरही प्रभाव पाडला आहे.

**२. शेतकरी चळवळी :**

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याबरोबरच शेतकरी चळवळ हि महत्वाची मानली जाते. अन्यायाविरोधात शेतकरी चळवळ झाली त्याचा आढावा खालीलप्रमाणे -

**२.१ संथाळ बंड - १८५५-५६ :**

संथाळाचे बंड हे भारताच्या स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील संघटित आणि सशस्त्र आदिवासी उठाव होता. आर्थिक शोषणाविरोध झालेले हे बंड होते. झारखंडमधील भागलपूर, साहेबगंज, दुमका, गोड्डा, पाकुड़ आणि पश्चिम बंगालमधील काही भागात हे बंड घडून आले. संथाळ लोकाना त्यांचे जमिनीचे हक्क ब्रिटिशांनी दिले नाहीत. त्यांच्या जमिनीवर जमीनदार, सावकार, महाजन, आणि इंग्रज नोकरशहा यांचे वर्चस्व निर्माण झाले. त्यांनी संथाळ लोकांचे शोषण सुरू केले. संथाळ लोकांना शेतकरी न बनवता मजूर, नोकर बनवले गेले. त्यांचे धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक स्वातंत्र्य हिरावले गेले.सिधू व कान्हू हे संथाळ बंधू या बंडाचे नेतृत्व करत होते. त्यांनी हजारो संथाळांना एकत्र करून शोषणाविरुद्ध उठाव पुकारला. सरकारी कार्यालये, रेल्वे, टपाल यंत्रणा, जमींदारांची घरे उद्‌ध्वस्त केली. उठाव साहेबगंज ते भागलपूरपर्यंत पसरला. ब्रिटिशांनी सैन्य पाठवून हजारो संथाळाना ठार मारले. सिधू व कान्हू यांना फसवून पकडले आणि फाशी दिली व बंडचा बीमोड केला.

**२.२ १८५७ चा शेतकरी उठाव :**

१८५७ चा उठाव हा केवळ सैनिकांचा बंड नव्हता, तर त्यात शेतकरी, जमीनदार, कष्टकरी वर्ग यांचा देखील मोठा सहभाग होता. हा उठाव ब्रिटिश सत्तेविरोधातील पहिला व्यापक संघर्ष मानला जातो, आणि त्यात शेतकऱ्यांची भूमिका निर्णायक होती. ब्रिटिशांनी शेतकाऱ्याकडून मोठ्या प्रमाणात महसूल गोळा केला. परिणामी शेतकरी सावकारांच्या कर्जात अडकले. शतकऱ्यांना आपली जमीन विकावी लागली. उत्तर भारतातील अवध, कानपूर, मेरठ, झांसी, बिहार येथील शेतकऱ्यांनी जमिनीचे हक्क परत मिळवण्यासाठी लढा दिला. १८५७ चा शेतकरी उठाव हा शोषणाच्या विरुद्ध उभा राहिलेला संघर्ष होता. या उठावामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात एकत्र येण्यास सुरुवातझाली. पुढे यातूनच स्वातंत्र्य चळवळ, किसान सभा, सत्याग्रह या विचारधारेचा उदय झाला.

**२.३ निळीचा उठाव - १८५९-६० :**

बंगालमध्ये १९ व्या शतकात नडिया, चंपारण, पूर्णिया या भागांमध्ये निळीचा उठाव हा ऐतिहासिक शेतकरी उठाव झाला. इंग्रजांनी शेतकऱ्यांवर लादलेल्या निळ पिकाच्या सक्तीविरोधात हा उठाव झाला होता. या उठावाचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे हा उठाव संपूर्णतः शेतकऱ्यांचा उठाव होता. यामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाचा सहभाग नव्हता. बंगालमधील बुद्धिजीवी वर्ग, पत्रकार, लेखकांनी शेतकऱ्यांची बाजू घेतली. लेखक दिनबंदू मित्रा यांनी नीलदर्पण हे नाटक लिहून इंग्रजांचे शोषण उघड केले. एप्रिल १८६० मध्ये नडिया

जिल्ह्यातील कृष्णनगर येथील गोविंदपूर व चौगणा या गावातील शेतकऱ्यांनी उठाव केला. याचे नेतृत्व बिष्णूचरण व दिगंबर बिश्वास यांनी केले. त्यानंतर पबणा जिल्ह्यातील शेतकर्यांकनी नीळ उत्पादन करण्यास विरोध केला. पुढे हा उठाव बंगालच्या इतर भागांत वेगाने पसरला. निळीचा उठाव हा भारतातील पहिला मोठा संघटित शेतकरी विरोध होता, ज्यामध्ये शोषणाविरुद्ध सामान्य शेतकऱ्यांनी प्रभावी लढा दिला.

### २.४ पाबना शेतकरी उठाव : १८७२–७३ :

पाबना शेतकरी उठाव जमीनदारांच्या विरोधात लढला गेला. केश्वचन्द्र राय व शंभूलाल पाल हे पाबना उठावाचे प्रमुख नेते होते. पाबना शेतकरी उठाव हा मुख्यतः शांततेच्या मार्गाने, कायदेशीर मार्गाचा वापर करून लढलेला उठाव होता. हा उठाव जमींदारांच्या अन्यायकारक शोषणाच्या विरोधात शेतकऱ्यांनी सुरू केला होता जमीनदारांचे अत्याचार, शेतसारा कमी करणे हे या उठावाचे मुख्य ध्येय होते. पाबना, बोगरा, ढाका, मिदनापूर याभागात हा उठाव घडून आला. पाबना शेतकरी उठावामुळे शेतकऱ्यावर होणारे अन्याय १८८५ च्या कायद्याने बंद झाले.

### २.५ बिरसा मुंडा याचे बंड – १८९९–१९०० :

बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली झारखंडमधील रांची, खूँटी, सिंगभूम, चाईबासा आणि आसपासचे आदिवासी भागात हे बंड घडून आले. ब्रिटिशांनी जमीन मालकी हक्क व्यवस्था मोडीत काढून रयतवारी व जमीनदारी महसूल व्यवस्था लागू केली. त्यामुळे नवीन जमीनदार, महाजन, सावकार, मिशनरी लोक आदिवासी भागात आले. आदिवाशी समाजातील अनेक लोक स्वतःची जमीन गमावून भटके मजूर व गुलाम झाले. लोकांचे शोषण वाढले, उत्पन्न कमी झाले, आणि आदिवासींना उपासमारीचा सामना करावा लागला. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर धर्मांतर सुरू केले. पारंपरिक आदिवासी जीवनशैली व श्रद्धांमध्ये हस्तक्षेप झाला. डिसेबर १८९९ मध्ये रांची परिसरात बंड सुरू झाले. आदिवासी लोकांनी जमीनदार, मिशनरी, पोलीस ठाणे, सरकारी इमारती यांच्यावर हल्ले सुरू झाले. ब्रिटिशांनी बंड मोडून काढण्याकरिता आदिवाशी लोकावर अत्याचार केले. जानेवारी १९०० मध्ये बिरसा मुंडा यांना अटक करण्यात आली. अल्पावधीतच बिरसा मुंडा यांचा तुरुंगातच मृत्यू झाला आणि ब्रिटिशांनी बंड मोडून काढले. बिरसा मुंडा हे आजही आदिवासी समाजासाठी देवतासमान, आणि संपूर्ण भारतासाठी संघर्षाचे प्रेरणास्थान मानले जातात.

### २.६ चंपारण्य सत्याग्रह १९१७ :

भारतातील बिहार मधील चंपारण्य भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी महात्मा गांधी यांनी चंपारण्य येथे जाऊन सत्याग्रह केला. चंपारण्यमधील शेतकऱ्यांची यूरोपियन मळेवाल्यांकडून खूप पिळवणूक होत होती. शेतकाऱ्याना आपल्या जमिनीमध्ये सक्तीने निळ पिकाची लागवड करावी लागत असे. याकरिता 'तीन काठीया' ही अनिष्ट प्रथा तेथे चालू होती. महात्मा गांधींना बिहारमधील राजीव शुक्ला यांनी शेतकऱ्यावर होणाऱ्या या अन्यायाची माहिती सांगितली. ब्रिटिश सरकारने म. गांधींना चंपारण्य भागात जाण्यास बंदी केली. म. गांधींनी बंदीचा आदेश पाळला नाही. म. गांधींनी १९१७ मध्ये शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी चंपारण्यास भेट दिली व आंदोलन केले. याचा परिणाम म्हणजे ब्रिटिश सरकारला चौकशी समिती नेमून १९१८ ला चंपारण्य कृषी कायदा करावा लागला. या सत्याग्रहामुळे जमीनदार अजिंक्य नाहीत, त्यांना विरोध करता येतो, माघार घ्यायला लावता येते, याची जाणीव शेतकऱ्यांना झाली.

### २.७ खेडा सत्याग्रह : १९१८ :

महात्मा गांधी व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली गुजरात मधील खेडा जिल्ह्यात शेतकऱ्यांचे आंदोलन झाले. खेडा जिल्ह्यात १९१८ मध्ये अतिवृष्टी झाली होती. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होऊन पिके वाया गेली होती. इंग्रज सरकारने नैसर्गिक आप्पातिचा कोणताही विचार न करता सारावसुली सुरू केली. त्यामुळे शेतकऱ्यापुढे मोठे संकट उभे राहिले. सरकारकडून सारावसुलीस मुदतवाढ मिळावी अथवा सूट मिळावी म्हणून शेतकऱ्यानी ब्रिटिश सरकारकडे मागणी केली. मात्र इंग्रज सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले व जबरदस्तीने सारावसुली सुरूच ठेवली. महात्मा गांधी व सरदार वल्लभभाई पटेल यांनी शेतकऱ्यांच्या या अडचणीवर मार्ग काढण्यासाठी पुढाकार घेतला. प्रत्यक्ष शेतजमिनीस भेटी देऊन पिकांची पाहणी केली आणि वस्तुस्थिती सरकारच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर महात्मा गांधी यांनी २२ मार्च १९१८ रोजी खेडा सत्याग्रहाची घोषणा केली. सरदार पटेल यांनी 'सारा भरू नका.' असे शेतकाऱ्यांना आवाहन केले. हजारो शेतकऱ्यांनी इंग्रज प्रशासनाचा निषेध केला व सारावसुलीस विरोध केला. शेवटी इंग्रजाना जनतेपुढे माघार घ्यावी लागली. शेतकाऱ्यांना शेतसाऱ्यामध्ये सूट दयावी लागली.

### २.८ मुळशी सत्याग्रह : १९२० :

मुळशी सत्याग्रह हा भारतातील शेतकऱ्यांचा जमीनदारशाही व उद्योगपतींच्या विरोधात झालेला एक महत्त्वाचा सत्याग्रह होता. हा सत्याग्रह मुख्यतः पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील शेतकऱ्यांनी १९२० च्या दशकात टाटा कंपनी विरोधात केला. टाटा कंपनीने मुळशी खोऱ्यात धरण बांधण्यासाठी जमीन ताब्यात घेतली. सरकारने शेतकऱ्यांची जमीन संपादित करून फारच कमी मोबदला दिला. शेतकऱ्यांचे घर, शेत गेल्यामुळे ते निराधार झाले. सेनापती बापट यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. मुळशी सत्याग्रह हा शेतकऱ्यांनी औद्योगिक धोरणाविरुद्ध दिलेला व्यापक लढा होता.

### २.९ मोपला उठाव : १९२१ :

मोपला उठाव, ज्याला मलबार बंड (Malabar Rebellion) असेही म्हणतात. मोपला उठाव शेतकरी आणि धार्मिक उठाव होता, जो १९२१ मध्ये ब्रिटिश राजवट आणि जमीनदारी प्रथेविरोधात केरळच्या मलबार प्रदेशात घडला. यामध्ये मुस्लिम मोपला शेतकऱ्यांनी हिंदू जमींदारांविरुद्ध आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठाव केला. या उठावाने धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक संघर्षाचे मिश्र रूप घेतले होते. मलबारमध्ये जमीनदार आणि शेतकऱ्यांमधील संबंध अत्यंत अन्यायकारक होते. हिंदू जमींदार वर्ग (ज्यांना जन्मीम्हणत) हे बहुतेक जमीनमालक होते, तर मोपला मुस्लिम समाज हा गरीब शेतकरी वर्ग होता. या शोषणा विरोधात रोष तयार झाला होता. त्याचवेळी देशात खिलाफत आंदोलन आणि गांधीजींचे असहकार आंदोलन सुरू होते. मोपला समाजात या राजकीय व धार्मिक भावनांनी एकत्रित होऊन उठावाला उग्र स्वरूप दिले. ऑगस्ट १९२१ मध्ये, एरनाड आणि वल्लुवानाड तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांनी जमीनदारांचे घर जाळले, ब्रिटिश पोलिसांवर हल्ले केले. ब्रिटिश सरकारने याचे दमन मोठ्या क्रौर्याने केले. मोठ्या प्रमाणावर अटक, गोळीबार आणि फाशीची शिक्षा देण्यात आली. या उठावामुळे हिंदू-मुस्लिम तणाव वाढला आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील धर्मनिरपेक्षतेला धक्का बसला.

## २.१० बारडोली सत्याग्रह (१९२८) :

बारडोली सत्याग्रह हा स्वातंत्र्यलढ्याचा एक टप्पा असून, शेतकऱ्यांचा एकता, अहिंसक संघर्ष, आणि नेतृत्वशैली याचे उत्तम उदाहरण आहे. त्यातून भारतीय स्वातंत्र्य चळवळीला अधिक व्यापक आधार मिळाला. सूरत जिल्हामधील बारडोली येथे हे आंदोलन घडून आले. १९२७ –२८ मध्ये दुष्काळ, पीक नुकसान आणि महागाईमुळे शेतकरी अडचणीत होते. तरीही ब्रिटिश सरकारने २२% ने महसूल कर वाढवला. शेतकऱ्यांनी याला विरोध केला, परंतु सरकारने निर्णय मागे घेतला नाही. स्थानिक लोकांनी एकत्र येऊन करवाढ नाकारण्याचा निर्णय घेतला. महात्मा गांधींनी सरदार पटेल यांना आंदोलनाचे नेतृत्व करण्यास सांगितले.सरदार वल्लभभाई पटेल यांनी या चळवळीचे नेतृत्व केले. त्यांनी शेतकऱ्यांना संघटित केलं व गांधी विचारांवर आधारित अहिंसात्मक सत्याग्रह केला. सत्याग्रहात महिलांचाही मोठा सहभाग होता. शेतकऱ्यांनी कर भरण्यास नकार दिला महसूल अधिकारी, जमिनदार, दलाल यांना गावात येऊ दिलं नाही. सरकारी लिलाव, जप्ती, अटकयांचा अहिंसक पद्धतीने प्रतिकार केला. सरकारने हजारो एकर जमीन जप्त केली. शेतकऱ्यांची जनावरं, घरं, अन्नसाठा, शेतीसामान लिलावात काढले. आंदोलन कर्त्यांना धमक्या, अटक झाली. मात्र संपूर्ण देशातून बारडोली आंदोलनाला समर्थन मिळालं. पत्रकार, लेखक, वकील यांनी आंदोलनाची माहिती देशभर पोहोचवली. याचा परिणाम म्हणजे सर्व जप्त मालमत्ता शेतकऱ्यांना परत करण्यात आली. देशभरातील शेतकरी आंदोलकांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. बारडोलीतील महिलांनी सरदार वल्लभभाई पटेल यांना 'सरदार' ही पदवी बहाल केली.

## २.११ अखिल भारतीय किसान सभा १९३६ :

अखिल भारतीय किसान सभा १९३६मध्ये लखनऊ काँग्रेस अधिवेशनमध्ये स्थापन झाली. स्वामी सहजानंद सरस्वती आणि एन जी रंगा यांनी या सभेची स्थापना केली. भारतातील शेतकऱ्यांचे संघटन करून त्यांचे हक्क, अधिकार आणि न्यायासाठी लढा उभारणे, जमीनदारी व्यवस्था आणि सरंजामशाही नष्ट करणे. भूमिहीन आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना मदत करणे. जमीन महसूल आणि कृषी उत्पादनावरील कर कमी करणे हा प्रमुख उद्देश होता. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढायला प्रोत्साहन दिले. अखिल भारतीय किसान सभा ही शेतकऱ्यांच्या संघटनासाठीचा पहिला राष्ट्रीय स्तरावरील गंभीर प्रयत्न होता. त्यातून भारतात शेतकरी चळवळीला सुसूत्र रूप मिळाले आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी दबाव गट निर्माण झाला. शेतकरी चळवळींना एक मजबूत आधार दिला. किसान सभा चळवळ ही भारतातील शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढलेली एक महत्त्वपूर्ण चळवळ होती. ही चळवळ जमीनदारी व्यवस्थेविरोधात आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्यांविरुद्ध लढण्यासाठी उदयास आली.

## २.१२ महात्मा जोतिराव फुले आणि शेतकरी चळवळ :

महात्मा फुले हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते शेतकरी, मागासवर्गीय व श्रमिक वर्गाच्या हक्कांचे पुरस्कर्ते होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवून शेतकरी चळवळीचा वैचारिक पाया घातला. शेतकरी हा खऱ्या अर्थाने अन्नदाता असून, तो आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सशक्त असावा. कर्जबाजारीपणातून शेतकरी मुक्त झाला पाहिजे. शेतकऱ्यांना धार्मिक कर्मकांडातून मुक्त करून आत्मभान देणे गरजेचे आहे. शेतकरी

व त्यांच्या मुलांना शिक्षण मिळाले तरच शोषण थांबेल असे त्यांचे मत होते. शेतकऱ्याचा असूड या ग्रंथातून त्यांनी शेतकऱ्याच्या जीवनातील दुःख, दारिद्र्य, अज्ञान, धार्मिक शोषण यांचं वर्णन केलं आहे. शेतकरी हा उपेक्षित आणि गरीब वर्ग आहे. धर्म, जात, शिक्षण यांच्या नावाखालीत्याचं मानसिक आणि आर्थिक शोषण होत आहे. शेतकरी हाच खरा राजा आहे, पण त्याला गुलाम बनवलं गेलंय असे विचार मांडले. महात्मा मु ले यांचे कार्य हे शेतकरी चळवळीचे 'सामाजिक आणि वैचारिक अधिष्ठान' होते. त्यांनी केवळ समस्यांचा पर्दाम ाश केला नाही, तर समाधानाचे मार्गही सुचवले.

### २.१३ विठ्ठल रामजी शिंदे आणि शेतकरी चळवळ :

विठ्ठल रामजी शिंदे हे महाराष्ट्रातील एक प्रभावशाली समाजसुधारक, धर्मसुधारक आणि अस्पृश्यतेविरुद्ध लढणारे कार्यकर्ते होते. जरी त्यांचे कार्य मुख्यतः अस्पृश्यता निर्मूलन, सामाजिक समता आणि धर्मसुधारणा या भोवती केंद्रित होते, तरी त्यांचा विचारसरणीचा प्रभाव शेतकरी चळवळीवर आणि ग्रामीण समाजाच्या जागृतीवर मोठ्या प्रमाणात पडला. शेतकरी हा बहुतेक वेळा मागासवर्गीय समाजातूनच असतो, त्यासाठी शिंदेंनी शिक्षण, स्वाभिमान व आत्मसन्मानाचे विचार रुजवले शेतकऱ्यांवर धार्मिक कर्मकांड व जातपातीचे बंधन लादले जात होते, त्याचा त्यांनी निषेध केला. खेड्यांमध्ये प्रचार-प्रसार करून शेतकऱ्यांना स्वाभिमान, संघटन आणि जागरूकतेकडे नेलं शिक्षणाच्या अभावामुळे शेतकरी अंधश्रद्धा आणि सावकाराच्या विळख्यात अडकतो, हे त्यांनी स्पष्ट केलं. समाजातील धार्मिक कर्मकांड व चुकीच्या प्रथा यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

### २.१४ शेतकरी कामगार पक्ष आणि शेतकरी चळवळ :

शेतकरी कामगार पक्षास सत्यशोधक समाजाचा वैचारिक वारसा, तसेच महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाची प्रदीर्घ परंपरा लाभली आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस अंतर्गत शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मतभेद होते. दुष्काळ व सावकारी यामुळे शेतकरी व शेतीची अतोनात हानी झालेली असून, इंग्रज राजवट बदलली तरी शेतकरी-कष्टकरी यांच्यापेक्षा व्यापाऱ्यांकडे व जमीनदारांकडेच राज्यकर्त्यांचे लक्ष आहे. तसेच काँग्रेस पक्षाने जनतेला वेळोवेळी दिलेली आश्वासने आणि जाहीरनाम्यातील वचन पाळलेले नाही. काँग्रेस सरकार हे भांडवलदारांचे हित पाहणारे आहे. असे मत शंकरराव मोरे यांनी व्यक्त केले.

इ. स. १९४६ मध्ये केशवराव जेधे, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत, के.डी. पाटील, नाना पाटील, दत्ता देशमुख, यशवंतराव चव्हाण, पी. के. सावंत, आचार्य प्र. के. अत्रे, रामभाऊ नलवडे, तुळशीदास जाधव, डॉ. केशवराव शंकरराव धागेंडे व गुरुनाथराव कुरुडे यांनी काँग्रेस अंतर्गत शेतकरी कामगार संघ स्थापन केला. पण अशाप्रकारचा काँग्रेस अंतर्गत उपपक्ष असू नये अशी भूमिका अखील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कार्यकारीणीने घेतल्यामुळे वरील मंडळीनी २६ एप्रील १९४८ रोजी 'शेतकरी कामगार पक्ष' स्थापन केला. शेतकरी कामगार पक्षाने शेतकरी आणि कामगारांच्या प्रश्नांना वैचारिक व संघटित आधार दिला. जरी त्यांच्या चळवळीचा भौगोलिक प्रभाव रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर, सोलापूर व मराठवाडा आणि मुंबईतील कामगार पट्टा मर्यादित असला तरी शेतकरी व कामगार वर्गासाठी या पक्षाने मोठे कार्य केले आहे.

### २.१५ शरद जोशींची शेतकरी चळवळ :

शरद अनंतराव जोशी हे शेतकरी संघटनेचे संस्थापक होते.शेतकरी प्रश्नांवर त्यांनी संसदेत आवाज उठवला. स्वावलंबी आणि न्याय्य आर्थिक हक्क यावर भर दिला. शेतकऱ्यांना मुक्त बाजारपेठ, किफायतशीर हमीभाव, खुला व्यापार आणि सरकारी हस्तक्षेपाशिवाय शेती यासाठी संघर्ष केला. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बाजारभाव मिळत नसल्यामुळे महिलांनी सरकारविरोधात बांगड्या पाठवल्या व बांगड्या आंदोलन (बुलढाणा जिल्हा) केले. ऊसाच्या हमीभावाच्या मागणीसाठी संघर्ष केला व त्यासाठी खानदेश ऊस आंदोलन केले. शेतमालाला किम ायतशीर बाजारभाव मिळावा. सरकारी अनुदाने, हमीभाव व हस्तक्षेप कमी करावेत. खुला व्यापार व जागतिक स्पर्धेत प्रवेश मिळावा (WTO समर्थन), शेतकरी म्हणजे उद्योजक आहे त्याचे हित जपले पाहिजे यासाठी अहिंसक मार्गाने आंदोलन केले.

### २.१६ राजू शेट्टी यांची शेतकरी चळवळ :

राजू शेट्टी हे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा शिरोळ तालुक्यातील ज्येष्ठ शेतकरी नेते, राजकारणी, वस्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक आहेत. २००४ साली त्यांनी शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेतून बाहेर पडून 'स्वाभिमानी शेतकरी संघटना' स्थापन केली. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर या भागांतील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे विविध प्रश्न त्यांनी प्रभावीपणे मांडले. उत्पादन खर्च व नफा या सूत्रानुसार सरकारने शेतमालाचे भाव निश्चित करावेत यासाठी आंदोलन केले. ऊस दर योग्य मिळावा यासाठी त्यांनी संघर्ष केला. खासगी व सहकारी साखर कारखान्यांवर दबाव आणून योग्य एफ आर पी (FRP) मिळवा यासाठी व्यापक स्वरूपात आंदोलन केले. दूध दर वाढवणे आणि अनुदान मिळवणे यासाठी त्यांनी दूध उत्पादक शेतकरी यांना बरोबत घेऊन आंदोलन केले व दुधाला योग्य दर मिळवून दिला. संपूर्ण शेतकरी कर्जमाफीसाठी सरकारवर दबाव आणला. विजदर कपात व सौरऊर्जा शेतीसाठी वीज सवलत व सौरऊर्जेचा वापर वाढवण्याची मागणी सरकारकडे केली.

राजू शेट्टी यांनी प्रामुख्याने प्रत्यक्ष कृतीतून आंदोलन, जसे की रास्ता रोको, रेल रोको, दूध ओतणे, ऊस टाकणे अश्या स्वरूपात यशस्वी आंदोलन केली. राजकीय प्रभावाचा उपयोग करून सरकारवर दबाव आणला. महाराष्ट्र सरकारशी सातत्याने वाटाघाटीकरून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवले. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी राष्ट्रीय पातळीवर आवाज उठवला. राजू शेट्टींची चळवळ ही 'लढाऊ आणि तडजोडक्षम' अशा दोन्ही गुणांनी युक्त आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न, ऊस-दूध दर, कर्जबाजारीपणा यावर त्यांनी संघटीत, परिणामकारक लढा उभारला.

### २.१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शेतकरी चळवळ :

शेती ही केवळ धंदा नसून ती जीवन जगण्याचा हक्क आहे. शेतीत सुधारणा केल्याशिवाय भारतातील श्रमिक व ग्रामीण जनता उन्नत होणार नाही, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित आणि सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते होते त्याचबरोबर ते शेतकरी, मजूर, वंचित वर्ग यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणारे नेते होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांकडे सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून पाहिले आणि शेतकऱ्यांचे हित जपणारे अनेक उपाय सुचवले. त्यांनी जमींदारी व वतनदारी व्यवस्था रद्द करण्यासाठी जोरदार मागणी केली, कारण ही पद्धत शेतकऱ्यांचे शोषण करत होती. डॉ. आंबेडकरांनी संविधानात

शेतकऱ्यांसाठी आर्थिक आणि सामाजिक न्यायाचे तत्त्व समाविष्ट केले. भूदान, पुनर्वसन, कृषी सहकारी संस्था यांचा विचार त्यांनी मांडला.

**३. शेतकरी चळवळीचे परिणाम :**

शेतकरी चळवळींनी भारतात (विशेषतः महाराष्ट्रात) सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पातळीवर मोठे परिणाम घडवून आणले. काही परिणाम तात्काळ होते, तर काही दूरगामी होते. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे–

**३.१. शेतकऱ्यामध्ये जागृती झाली :** शेतकरी चळवळींमुळे शेतकऱ्यांमध्ये त्यांच्या हक्कांची जाणीव झाली. आपल्या हक्कासाठी आपण संघर्ष केला पाहिजे हे शेतकऱ्याना समजले. विविध संघटना व मोर्चांच्या माध्यमातून शेतकरी अधिक सजग व आक्रमक झाले.

**३.२. जमीन सुधारणा घडून आल्या :** शेतकरी चळवळीमुळे शासनाला जमीन सुधारणा करणे भाग पडले. शेतकरी चळवळींमुळे जमीनदारी व्यवस्था रद्द करावी लागली व महत्त्वाच्या जमीन सुधारणा घडून आल्या.

**३.३. विविध शेतकरी संघटनांची स्थापना :** शेतकऱ्यांची विविध प्रश्न घेऊन अनेक संघटना काम करू लागल्या. लहान मोठ्या विविध शेतकरी संघटनांचे एकत्रीकरण करण्याची गरज भासू लागली. किसान सभा आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष यासारख्या विविध शेतकरी संघटना आणि पक्ष शेतकरी संघटनांचे एकत्रीकरण करण्यासाठी एक शक्तिशाली व्यासपीठ म्हणून उदयास आले. व्यापक स्वरूपात मोठ्या संघटना उदयास आल्या व त्याचा दबाव शासनावर राहिला.

**३.४. राष्ट्रवाद वाढीस लागला :** शेतकरी चळवळी व आंदोलनामुळे जनतेत राष्ट्रवाद वाढीस लागला. राष्ट्रीय चळवळीवर प्रभाव शेतकरी चळवळीच्या प्रभाव पडला. काँग्रेस पक्षाने शेतकऱ्यांच्या मागण्यांना त्यांच्या अजेंड्यामध्ये समाविष्ट करण्यास सुरुवात केली.

**३.५. कृषी आणि आर्थिक धोरणांमध्ये सुधारणा :** शेतकरी चळवळीमुळे सरकारी धोरणांमध्ये बदल विविध बदल घडून आले. सततच्या शेतकरी आंदोलनांमुळे सरकारला कृषी आणि आर्थिक धोरणांमध्ये सुधारणा करून त्यांची अंमलबजावणी करण्यास भाग पाडले. नवीन धोरणामध्ये शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केला गेला.

**३.६. शेतकरी वर्गाचे संघटन व राजकीय जागृती :** शेतकऱ्यांनी केवळ निवडणुकांमध्ये मत देणारे नव्हे तर राजकीय शक्ती म्हणून उदय झाला. शरद जोशी (शेतकरी संघटना), चौधरी महेंद्रसिंह टिकैत, –खघड सारख्या नेतृत्वाखाली चळवळींना राजकीय स्वरूप मिळाले. शेतकरी वर्गाचे हित लक्षात घेऊन स्वाभिमानी पक्ष, किसान पार्टी यासारख्या विविध राजकीय पक्षांचा उदय झाला.

**३.७ कर्जमाफी योजना राबवल्या गेल्या :** शेतकरी चळवळीचा महत्त्वपूर्ण परिणाम म्हणजे शेतकरी हिताच्या कर्जमाफीसाठी विविध योजना राबवल्या गेल्या. २००८, २०१७ व २०२० मध्ये केंद्र व राज्य सरकारांनी मोठ्या प्रमाणावर कर्जमाफ्या जाहीर केल्या. हे सर्व श्रेय शेतकरी चळवळीचे होय.

**३.८. हमीभाव प्रणाली अस्तित्वात आली :** शेतकरी आंदोलनांमुळे सरकारने हमीभाव प्रणाली अधिक

व्यापक केली. काही पिकांसाठी निश्चित हमीभाव जाहीर करण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्याच्या मालास योग्य दर मिळू लागला.

**३.९. शेतकऱ्यांमध्ये आत्मभान व आत्मसन्मान वाढला :** शेतकरी म्हणजे फक्त मागणारा नव्हे, तर देशाचा पोशिंदा ही भावना जनमानसात रुजली. शेतकऱ्यांना सन्मान मिळू लागला हे सर्व श्रेय शेतकऱ्यांच्या व्यापक झालेल्या चळवळीचे होते. शेतकरी हा देशाचा आधारस्तंभ आहे. हे ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागातील लोकांनाही पटू लागले. २०१८ च्या मुंबई लाँग मार्चसारख्या आंदोलनांनी शहरी लोकांनाही शेतकऱ्यांचे प्रश्न समजावले. परिणामी शहरी भागातील लोकही शेतकऱ्यांच्या बाजूने आपले मत नोंदवू लागले.

**३.१०. जमीन सुधारणा व वनहक्क कायदे लागू :** शेतकरी चळवळीचा परिणाम म्हणजे अनेक राज्यांनी जमिनीसंदर्भातील कायदे सुधारले. आदिवासींच्या वनजमिनीवर हक्काचे कायदे अस्तित्वात आले.

**३.११. सरकारी योजनांमध्ये शेतीकडे लक्ष :** प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, कृषी विमा योजना, रब्बी/खरीप सल्लागार योजनांमध्ये वाढ. शेतकरी चळवळींनी शेतकरी वर्गाचा आवाज राजकीय आणि सामाजिक पटलावर दृढपणे उभा केला. या चळवळींमुळे सरकारवर दबाव वाढला आणि शेतीविषयक धोरणांमध्ये दृष्टीकोनाचा बदल झाला.

**स्वयं अध्ययन प्रश्न – २ :**

**योग्य पर्याय निवडा.**

१. सेनापती बापट यांनी ............... या आंदोलनाचे नेतृत्व केले.

अ) मुळशी सत्याग्रह ब) बारडोली सत्याग्रह

क) चंपारण्या सत्याग्रह ड) खेडा सत्याग्रह

२. बारडोली येथील महिलांनी ............... यांना 'सरदार' ही पदवी बहाल केली.

अ) पंडित नेहरू ब) वल्लभभाई पटेल

क) म. गांधी ड) शरद जोशी

३. अखिल भारतीय किसान सभा ............... मध्ये लखनऊ काँग्रेस अधिवेशनमध्ये स्थापन झाली.

अ) १९३३ ब) १९३१

क) १९३६ ड) १९३०

४. शेतकऱ्याचा असूड हा ग्रंथ ............... यांनी लिहला आहे.

अ) महात्मा फुले ब) नारायण लोखंडे

क) पंडित नेहरू ड) विठ्ठल रामजी शिंदे

५. 'स्वाभिमानी शेतकरी संघटना' ............... यांनी स्थापन केली.

अ) शरद जोशी ब) राजू शेट्टी

क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ड) केशवराव जेधे

### २.२.३ डाव्या विचारसरणीच्या चळवळी :

समाजात आर्थिक, सामाजिक आणि राजकीय विषमतेमुळे अनेक प्रकारच्या चळवळी उदयास आल्या आहेत. त्यापैकी डाव्या विचारसरणीच्या चळवळी या विशेष महत्त्वाच्या मानल्या जातात. या चळवळींचा उद्देश सर्व सामान्य जनतेचे शोषण थांबवून सामाजिक समता प्रस्थापित करणे हा आहे. कामगार, शेतकरी, दलित, आदिवासी, महिला अशा वंचित घटकांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या या चळवळी आजही भारताच्या सामाजिक आणि राजकीय रचनेत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. भांडवलशाही, सामाजिक अन्याय आणि शोषणाच्या विरोधात उभ्या राहिलेल्या या चळवळी आजही लोकशाही व्यवस्थेत महत्वाच्या आहेत.

**१. डाव्या विचारसरणीचे तत्त्वज्ञान :**

डाव्या विचारसरणीचा मुख्य आधार कार्लमार्क्स, लेनिन, रूसो, ग्रामची व इतर समाजवादी विचारवंतांच्या तत्वांवर आधारित आहे. या विचारानुसार समाजात वर्ग संघर्ष आहे. एकीकडे संपत्ती व सत्तेवर पकड असलेला भांडवलदार वर्ग आणि दुसरीकडे श्रम करणारा पण शोषित वर्ग अश्या दोन गटात समाज विभागला आहे. डाव्या विचारसरणीचे तत्त्वज्ञान हे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समतेवर आधारित आहे. श्रमिक, शेतकरी, दलित, आदिवासी आणि सर्व वंचित घटकांच्या हक्कांसाठी उभं राहणं हे या विचारधारेचं मूळ तत्त्व आहे.

**१.१. वर्गसंघर्ष :** समाजात मुख्यत: दोन वर्ग असतात एक भांडवलदार हा शोषक आणि दुसरा श्रमिक हा शोषित वर्ग असतो. या दोघांमध्ये सतत संघर्ष असतो. मात्र समाजाची खरी प्रगती ही शोषित वर्गाच्या सत्तेनेच होऊ शकते.

**१.२. सामाजिक व आर्थिक समता :** डाव्या विचारांनुसार समाजात सर्वांना समान संधी, साधने व सन्मान मिळायला हवा. संपत्ती काही मोजक्या लोकांकडे साचून न राहता सर्व सामान्यांना तिचा लाभ मिळावा असे मानले जाते.

**१.३. श्रमाचे महत्त्व :** समाजाचा खरा पाया हा काम करणाऱ्या श्रमिक वर्गावर आधारित असतो. त्यामुळे श्रमाला सर्वोच्च स्थान दिले पाहिजे.

**१.४. सार्वजनिक मालकी व योजनाबद्ध अर्थव्यवस्था :** महत्वाच्या उत्पादन व सेवाक्षेत्रांवर खाजगी नव्हे, तर सरकारी किंवा सामूहिक नियंत्रण असावे. पाणी, वीज, शिक्षण, आरोग्य या सुविधा सार्वजनिक असणे आवश्यक आहे.

**१.५. धर्मनिरपेक्षता व जातीय समतेचा आग्रह :** धर्म, जात, लिंग या आधारावर होणाऱ्या भेदभावाला डाव्या चळवळीचा विरोध आहे. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या हक्कांसाठी उभं राहण्याची समान संधी असणे गरजेचे आहे.

**१.६. सर्वांना समान सुविधा :** कामगार समान सुविधा, स्त्रियांना समान अधिकार, दलित-आदिवासींचे सशक्तीकरण यामध्ये डाव्या विचारसरणीने मोठे योगदान दिले आहे. शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रात सर्वांना समान सुविधा मिळाव्यात यासाठी आग्रह धरला.

डाव्या विचारसरणीचे तत्त्वज्ञान हे सामाजिक न्याय, समता आणि सहकार्य यावर आधारलेले आहे. या विचारसरणीने वंचित आणि दुर्लक्षित घटकांना आवाज दिला, त्यांची प्रतिष्ठा आणि हक्कांसाठी लढा दिला.

**२. भारतातील डाव्या चळवळींचा इतिहास :**

**२.१. भारतीय कम्युनिस्ट पक्ष** (CPI) **:**

कम्युनिस्ट चळवळ ही डाव्या विचारसरणीची एक प्रभावशाली चळवळ आहे. आर्थिक व सामाजिक समतेच्या तत्त्वांवर आधारलेली हि चळवळ आहे. ही चळवळ श्रमिक, शेतकरी आणि सर्व वंचित वर्गाचे शोषण संपवून त्यांच्या सत्ता स्थापनेचे स्वप्न बाळगते. या चळवळीची मुळे कार्लमार्क्स व फ्रेडरिक एंगल्स यांच्या विचारांमध्ये सापडतात, ज्यांनी भांडवलशाही व्यवस्थेच्या विरोधात समाजवादी क्रांतीचा मार्ग मांडला.

भारतीय कम्युनिस्ट चळवळ ही लोकशाही मार्गाने समाज बदलण्यासाठी कार्य करणारी चळवळ आहे. निवडणूक, आंदोलने, कामगार संघटनांद्वारे जनतेशी संपर्क राखणे हे याचे प्रमुख साधन आहेत. १७ ऑक्टोबर १९२५ रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्ष (CPI) स्थापनेने भारतातील कम्युनिस्ट चळवळ सुरू झाली. या पक्षाची स्थापना एम. एन. रॉय यांनी केली. पुढे कॉम्रेड डांगे उर्फ श्रीपाद अमृत डांगे हे पक्षाचे अध्यक्ष बनले. या पक्षाचे विचार पूर्णपणे मार्क्सवादी आहेत. कार्ल मार्क्सने प्रतिपादन केलेल्या साम्यवादी अर्थव्यवस्थेचा या पक्षावर संपूर्ण प्रभाव आहे. यापक्षाने ब्रिटिश राजवटीच्या विरोधात आणि कामगारांचे हक्क मिळवण्यासाठी कार्य केले. स्वातंत्र्यानंतर भाकपने श्रमिक, शेतकरी, महिलांचे अधिकार, किमान वेतन, जमीन सुधारणा अशा प्रश्नांवर आंदोलन केले. केरळ, पश्चिम बंगाल, त्रिपुरा येथे कम्युनिस्ट सरकारांनी सत्ता स्थापली आणि जनतेसाठी अनेक योजना राबवल्या. १९६४ मध्ये विचार धारात्मक मतभेदांमुळे भाकपचे समन्वयवादी धोरण घेणारा व मार्क्सवादी, अधिक क्रांतिकारी विचारसरणी असणारा असे दोन भाग झाले. या पक्षाचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे सामाजिक आणि आर्थिक समतेवर भर, भांडवलशाही आणि शोषणाविरोधात संघर्ष, कामगार व शेतकरी संघटनांमधून जनतेचा सहभाग, जात, धर्म, लिंग भेदाविरुद्ध भूमिका हे होते.

कम्युनिस्ट चळवळ ही भारतीय लोकशाहीचा एक महत्त्वाचा भाग आहे. तिने कामगार हक्क, सामाजिक न्याय, वंचितांचे सशक्तीकरण यासाठी मोलाचे कार्य केले आहे. जरी आजच्या काळात तिचा प्रभाव काहीसा कमी झालेला असला, तरी ही समाजात समतेसाठी व न्यायासाठी चालणाऱ्या संघर्षात याचे योगदान अजूनही आवश्यक आहे.

**२.२. भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) –** CPI ($M^2$) **:**

भारतीय राजकारणात डाव्या विचारसरणीचे पक्ष एक महत्त्वाची भूमिका बजावत आले आहेत. त्यात भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) किंवा CPI($M^2$) हा पक्ष सर्वात प्रभावशाली डावा पक्ष मानला जातो. सामाजिक न्याय, गरीब व श्रमिक वर्गाचे हक्क आणि आर्थिक समतेसाठी चालढा हे या पक्षाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सन १९६४ मध्ये भाकपमधून फूट होऊन CPI ($M^2$) ची स्थापना झाली. भाकप पक्ष चीन-रशियावादात रशियाच्या बाजूने झुकला, तर CPI($M^2$) चिनी मार्गावर विश्वास ठेवणाऱ्या सदस्यांनी वेगळा पक्ष स्थापन केला. या पक्षाची प्रमुख विचारसरणी मार्क्सवाद-लेनिनवादावर आधारित समाजवादी होती. भांडवलशाही, साम्राज्यवाद, जातीय व सामाजिक शोषणा विरोधात संघर्ष व लोकशाही पद्धतीने क्रांतिकारी बदल घडवण्यावर भर होता.

पश्चिम बंगाल, केरळ, त्रिपुरा येथे या पक्षाचे वर्चस्व आहे. CPI ($M^2$) हा पक्ष अनेक वर्षे सामाजिक न्याय, गरिबांचे हक्क, शेतकरी, मजूर, भूसुधारणा, कर्जमाफी, हमीभाव, शिक्षण, आरोग्य, महिला, विद्यार्थी आणि श्रमिक वर्गाच्या कल्याणासाठी काम करत आहे. आजही CPI ($M^2$) हे डाव्या चळवळींचे नेतृत्व करणारा महत्त्वाचा पक्ष आहे.

### २.३. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (लेनिनवादी) – CPI (ML) :

डाव्या पक्षांपैकी एक प्रभावशाली पक्ष म्हणजे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (लेनिनवादी) किंवा CPI (ML). हा पक्ष मुख्यतः शोषित, पीडित, भूमिहीन आणि आदिवासी वर्गाच्या हक्कांसाठी लढतो. CPI (ML) ही एकक्रांतिकारी चळवळ असून, तिने भारतीय राजकारणात सामाजिक अन्यायाविरुद्ध लढ्याचे एक वेगळे रूप उभे केले. CPI (ML) ची स्थापना चारू मजूमदार आणि कनुसान्याल यांनी केली. या पक्षाचा उगम पश्चिम बंगालमधील नक्षलबाडी चळवळीपासून झाला. ही चळवळ जमीनदारांच्या शोषणाविरोधात भूमिहीन शेतकऱ्यांनी केली होती. CPI (ML) चा विश्वास होता की, राजकीय सत्तेचा खराब दल फक्त सशस्त्र क्रांतीनेच होऊ शकतो. CPI (ML) च्या विचारधारेचा पाया मार्क्स, लेनिन आणि माओच्या तत्त्वज्ञानावर आधारित आहे. हा पक्ष साम्यवादी समाजव्यवस्था, वर्गहीन समाज निर्माण करण्याच्या दिशेने कार्य करतो. लोकशाही प्रक्रियेपेक्षा जनतेच्या थेट लढ्यांवर विश्वास ठेवतो. CPI (ML) ही एकसंध राहिली नाही. त्यातून पुढे अनेक गट निर्माण झाले. काही गटांनी सशस्त्र संघर्ष (नक्षलवाद) स्वीकारल्यामुळे या पक्षाला अनेकवेळा अतिरेकी संघटना म्हणून घोषित करण्यात आले आहे. सरकारने CPI (ML)–शी संबंधित सशस्त्र गटांविरुद्ध कडक कारवाया केल्या आहेत. अनेक ठिकाणी ऑपरेशन ग्रीनहंट सारख्या मोहिमा राबवून नक्षलवादी भागांमध्ये हस्तक्षेप केला आहे. दुसरीकडे, राजकीय वाटचाल करणाऱ्या CPI (ML) गटांना निवडणुकांमध्ये सहभागी होण्याची मुभा आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (लेनिनवादी) – CPI (ML) ही चळवळ भारतातील सामाजिक अन्यायाविरुद्धचा एक तीव्र आवाज आहे. पक्षाची मार्गदर्शक तत्वे आणि कार्यपद्धतीवर मतभेद असू शकतात. मात्र त्यांनी समाजातील दुर्बल घटकांच्या प्रश्नांना प्रकाशात आणण्याचे कार्य निश्चितच केले आहे.

### २.४. रिव्होल्युशनरी सोशलिस्ट पार्टी (RSP) :

रिव्होल्युशनरी सोशलिस्ट पार्टी (RSP) ची स्थापना १९४० मध्ये झाली. या पक्षाची स्थापना फणींद्रनाथ गोस्वामी, कृष्णकांत मलिक, मणिरत्नम आणि इतर नेत्यांनी केली. RSP चा उगम भारतीय समाजवाद आणि मार्क्सवाद्यांच्यावर आधारित होता. पार्टीचा मुख्य उद्देश्य सामाजिक आणि आर्थिक न्याय सुनिश्चित करणे, कामगार वर्गाच्या अधिकारांनुसार नवी दिशा देणे हा आहे. RSP हा पक्ष मुख्यतः सामाजिक समता, जनतेचे अधिकार आणि साम्राज्यवादास विरोध या तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवतो. पक्षाच्या विचारधारेत मुख्यतः समाजवाद, मार्क्सवाद, आणि लोकशाहीतून क्रांतिकारी बदल घडवण्याची वचनबद्धता आहे. RSP च्या सदस्यांना विश्वास आहे की, भारतातील सामाजिक आणि आर्थिक शोषणामुळे गरीब, शेतकरी आणि कामगार वर्ग संकटात आहे. यासाठी त्यांनी लोकशाही मार्गाने संघर्ष करून शोषण थांबवण्यासाठी वचनबद्धता घेतली आहे. RSP हा पक्ष मुख्यतः शेतकरी, कामगार, आणि आदिवासींच्या हक्कासाठी लढतो. त्याने आपल्या स्थापनेपासूनच आर्थिक असमानता, शोषण आणि भ्रष्टाचार विरोधात आपल्या संघर्षाचे स्वरूप ठेवले आहे. RSP मुख्यतः पश्चिम बंगाल, केरळ, त्रिपुरा आणि आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये सक्रिय आहे. आजही हा पक्ष त्याच्या समाजवादीमध्ये

याच्या दिशेने कार्यरत आहे, परंतु त्याची लोकप्रियता इतर प्रमुख डाव्या पक्षांच्या तुलनेत कमी आहे.

**२.५. ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक (AIFB) :**

ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक (AIFB) या पक्षाची स्थापना १९३९ मध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली झाली. हा पक्ष मुख्यतः स्वातंत्र्य संग्रामातील संघर्ष आणि देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठीच्या लढ्यात भाग घेत असलेल्या कार्यकर्त्यांनी बनवला. फॉरवड ब्लॉकचे प्रमुख उद्दिष्ट भारतीय राजकारणात क्रांतिकारी विचारसरणीचा अवलंब करणे, सामाजिक समता, आर्थिक स्वावलंबन आणि स्वराज्याचा अवलंब करणे हे होते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या विचारधारेवर आधारित असलेला हा पक्ष भारतीय लोकशाहीत साम्यवादी आणि समाजवादी सिद्धांतांचा स्वीकार कारत होता. या पक्षाचे प्रमुख तत्त्वे भांडवलशाहीस विरोध, शोषण मुक्त समाज, प्रत्येक व्यक्तीसाठी समान अधिकार आणि समान संधी, मूलभूत गरजा (अन्न, शिक्षण, आरोग्य) सुलभ करणे हे होते. फॉरवर्ड ब्लॉकने भारतीय स्वातंत्र्य संग्रामात मोठे योगदान दिले. पश्चिम बंगाल, बिहार आणि ओडिशा या राज्यांत हा पक्ष सक्रीय आहे.

**२.६. भारतीय बोल्सेविक पक्ष :**

भारतीय बोल्सेविक पक्ष (Indian Bolshevik Party) या डाव्या पक्षाची स्थापना १९२० च्या दशकात झाली आणि तो मुख्यतः मार्क्सवाद आणि लेनिनवाद याच्या सिद्धांतांवर आधारित होता. भारतीय बोल्सेविक पक्षाने रशियन क्रांतीनंतरच्या काळात भारतामध्ये बोलसेविक तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी काम केले. रशियन बोलसेविक क्रांती (१९१७) नंतर, भारतीय कॉम्युनिस्ट चळवळीला एक नवा आकार देण्यासाठी आणि प्रस्थापित करण्यासाठी हा पक्ष कार्यरत झाला. भारतीय समाजातील शोषण आणि असमानतेला समाप्त करण्यासाठी क्रांतिकारी विचारांचा प्रचार करणे, कामगार आणि शेतकऱ्यांचे हक्क सुनिश्चित करणे, तसेच त्यांना जागरूक करणे. भांडवलशाही आणि सामंतशाही व्यवस्थेविरुद्ध लढा देऊन एक समाजवादी राज्य निर्माण करणे हे या पक्षाचे प्रमुख ध्येय होते. भारतीय बोलसेविक पक्षाने मुख्यतः कामगारांच्या हक्कांसाठी आणि शेतकरी संघर्षासाठी अनेक आंदोलने केली. त्याला रशियन क्रांतीची प्रेरणा मिळालेली होती. विशेषतः, भारतातील शहरी कामगार वर्ग आणि आदिवासी भागात या पक्षाने क्रांतिकारी लढ्यांना अधिक बल देण्याचा प्रयत्न केला. भारतीय बोलसेविक पक्षपुढे भारतीय कम्युनिस्ट पक्ष (CPI) मध्ये विलीन झाला.

**२.७. जहाल लोकशाही पक्ष :**

जहाल लोकशाही पक्ष (Radical Democratic Party) चा उगम १९४० मध्ये झाला. या पक्षाची स्थापना भारतीय समाजवाद्यांनी केली. लोकशाही आणि समाजवाद यांच्यातील संतुलन साधने हे प्रमुख ध्येय होते. या पक्षाचे संस्थापक नेते श्यामाप्रसाद मुखर्जी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानले जाते. या पक्षाचा उद्देश भारतीय समाजामधील दलित, शेतकरी आणि कामगार वर्गाचे प्रतिनिधित्व करणे हे होते. जहाल लोकशाही पक्ष हा एक लोकशाही आणि प्रबोधनवादी विचारधारा असलेला पक्ष आहे. या पक्षाचे मुख्य विचारधारात्मक तत्त्व सामाजिक समता आणि आर्थिक समानतेचा प्रचार करणे, समाजाच्या शोषित आणि वंचित घटकांच्या हक्कांचे संरक्षण करणे. लोकशाही प्रणालीला अधिक सशक्त, समान, आणि न्यायपूर्ण बनवण्यासाठी विविध शास्त्रज्ञ, विचारवंत आणि समाजसुधारक यांच्या कार्याचा स्वीकार करणे हे होते. पक्षाचा

प्रभाव पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश या सारख्या राज्यांत होता. हा पक्ष सशक्त कामगार चळवळी, शेतकरी आंदोलने, आणि दलित अधिकारांचे रक्षण यामध्ये भाग घेत होता. तथापि, कालांतराने इतर डाव्या पक्षांच्या तुलनेत त्याचा प्रभाव कमी झाला.

**२.८. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (AITUC) :**

'ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस' (AITUC) ही भारतातील प्रमुख कामगार संघटना आहे. तिची स्थापना ३१ ऑक्टोबर १९२० रोजी एम्पएर थिएटर मुंबई येथे झाली. कम्युनिस्ट व काँग्रेस नेत्यानी कामगारांची हि अखिल भारतीय संघटना स्थापन केली. या संघटनेच्या स्थापनेत लाल बहादूर शास्त्री, एन. एम. जोशी, बिपिनचंद्र पाल, लाला लाजपतराय यांचा मोलाचा वाटा होता. लाला लाजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली या संघटनेचे अधिवेशन भरले. या अधिवेशनास देशाच्या प्रत्येक भागातून एकूण ८०० कामगार प्रतिनिधी हजर होते. श्रीपाद डांगे, निमकर हे अधिवेशनास विद्यार्थी नेते म्हणून हजर होते. मुंबई शहरात अशा प्रकारे पहिली मध्यवर्ती कामगार संघटना स्थापन झाली. AITUC चा उद्देश भारतातील कामगारांचे हक्क आणि कल्याण यासाठी संघर्ष करणे हा आहे. कामगारांसाठी योग्य वेतन, आठ तासांचा कामाचा दिवस, कामाच्या सुरक्षित अटी यासाठी यूनियन मार्फत अनेक आंदोलने केली. ही संघटना अनेक वेळा संप, मोर्चा आणि निवेदने यांद्वारे सरकारकडे आपली मागणी मांडते. आजही AITUC ही एक सक्रिय आणि प्रभावी संघटना असून ती कामगारांचे आवाज आणि हक्क रक्षण करणारी प्रमुख संघटना म्हणून ओळखली जाते.

**२.९. स्टूडन्ट लीग :**

स्टूडन्ट लीग ही एक कम्युनिस्ट विचारधारेवर आधारित विद्यार्थी संघटना आहे, ज्याचे उद्दिष्ट शिक्षण, समता, आणि सामाजिक न्याययासाठी विद्यार्थ्यांमध्ये राजकीय जागरूकता निर्माण करणे हे आहे. ही संघटना विशेषतः डाव्या पक्षांशी संलग्न आहे. भारतात ऑल इंडिया स्टूडन्ट्स फेडरेशन (AISF) आणि ऑल इंडिया स्टूडंट्स असोसिएशन (AISA) या कम्युनिस्ट विचारांशी संबंधित विद्यार्थी संघटना आहेत. मार्क्सवादी-लेनिनवादी तत्त्वज्ञानाचा स्वीकार, वर्ग संघर्ष, शोषणमुक्त समाज, समतेवर आधारित शिक्षण व्यवस्था, शिक्षण फीवाढीस विरोध, शिक्षणाचे व्यापारीकरण थांबविण्यासाठी स्टूडन्ट लीगने लढा दिला.

डाव्या विचारसरणीच्या चळवळी जरी नेहमीच वादग्रस्त ठरल्या, तरी त्यांचे समाजातील योगदान नाकारता येणार नाही. या चळवळींनी समाजात समतेचा विचार रुजवला आणि वंचितांचा आवाज बनल्या. आजच्या बदलत्या तंत्रज्ञानाधारित युगातही, गरिबी, बेरोजगारी, विषमता असताना अशा विचारसरणीची गरज भासत राहील, मात्र ती अहिंसक, लोकशाही मार्गाने पुढे नेणं हेच योग्य ठरेल.

**३. डाव्या चळवळीचे मूल्यमापन :**

**३.१. सकारात्मक बाजू (योगदान) :**

**३.१. १. सामाजिक समतेचा आग्रह :**

डाव्या चळवळींनी जाती, वर्ग, लिंग आणि धर्म यांच्या आधारावर होणाऱ्या शोषणाविरुद्ध आवाज उठवला. सामाजिक समतेचा आग्रह धरला.

**३.१.२. शेतकरी–कामगारांचे हक्क :** शेतकरी आणि कामगारांसाठी वेतन, जमीन हक्क, कामाच्या अटी, सामाजिक सुरक्षा यांसाठी मोठे आंदोलन उभे केले. शेतकरी व कामगार यांना ते मिळवून दिले.

**३.१.३. शिक्षण आणि आरोग्यावर भर :** सर्वांसाठी मोफत व सर्वसमावेशक शिक्षण–आरोग्यसेवा मिळावी यासाठी लढा दिला.

**३.१.४. आंदोलने आणि जनजागृती :** जनतेमध्ये अन्यायाविरुद्ध लढण्याची मानसिकता निर्माण केली.

**३.१.५. भांडवलशाहीचा विरोध :** बहुराष्ट्रीय कंपन्या, बाजारपेठा आणि खाजगीकरणामुळे होणाऱ्या सामाजिक विषमतेविरुद्ध उभे राहिले.

**३.२. मर्यादा (उणिवा) :**

**३.२.१. अतिक्रांतीवादी भूमिका :** काही डाव्या संघटनांनी लोकशाही मार्गाऐवजी सशस्त्र संघर्षाची वाट धरली, ज्यामुळे जनाधार घटला.

**३.२.२. अंतर्गत फूट आणि मतभेद :** विचारांतील फरकांमुळे अनेक डावे गट फुटले, परिणामी संघटित नेतृत्वाचा अभाव राहिला.

**३.२.३. शहरी–ग्रामीण दरी :** डावे चळवळी शहरी भागात अधिक केंद्रित झाल्या. ग्रामीण भागात त्यांचा प्रभाव कमी होता. ग्रामीण भागातील व्यापक प्रश्न विसरले गेले.

**३.२.४. व्यवहार्य पर्यायांचा अभाव :** फक्त विरोध करण्यात वेळ गेला, पण व्यवस्थेला प्रभावी पर्याय देण्यात अपयश.

**३.२.५. राजकीय सत्तेत सीमित प्रभाव :** राजकीय क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर त्याचे स्वरूप व्यापक होणे गरजेचे होते. मात्र स्थायी राजकीय सत्ता टिकवणे कठीण गेले. काही राज्यांपुरतेच मर्यादित प्रभाव राहीला.

थोडक्यात डाव्या चळवळींनी सामाजिक न्यायासाठी अतिशय महत्त्वाचे योगदान दिले. त्यांनी समानता, स्वातंत्र्य आणि हक्कांची जाणीव निर्माण केली. काही मर्यादा असूनही या चळवळी आजही शोषित–वंचित वर्गासाठी प्रेरणादायी आहेत.

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३ :**

**योग्य पर्याय निवडा.**

१. १९२५ रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना ............... यांनी केली.

अ) एम. एन. रॉय ब) श्रीपाद अमृत डांगे

क) नारायण मेघाजी लोखंडे ड) फणींद्रनाथ गोस्वामी

२. रिव्होल्युशनरी सोशलिस्ट पार्टी (RSP) ची स्थापना ............... मध्ये झाली.

अ) १९३९ ब) १९४२

क) १९४० ड) १९४३

३. ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक (AIFB) या पक्षाची स्थापना १९३९ मध्ये ............... यांच्या नेतृत्वाखाली झाली.

अ) नेताजी सुभाषचंद्र बोस ब) श्रीपाद अमृत डांगे

क) नारायण मेघाजी लोखंडे ड) फणींद्रनाथ गोस्वामी

४. भारतीय बोलसेविक पक्ष (Indian Bolshevik Party) या डाव्या पक्षाची स्थापना ............... रोजी झाली.

अ) १९१९ ब) १९२२

क) १९२१ ड) १९२०

५. 'ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस' (AITUC) या कामगार संघटनेची स्थापना ३१ ऑक्टोबर १९२० रोजी ............... येथे झाली.

अ) मुंबई ब) मद्रास

क) नागपूर ड) पुणे

## २.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**कामगार चळवळ :** विविध उद्योगधंद्यात काम करणाऱ्या कुशल-अकुशल कामगारांच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी निर्माण झालेली चळवळ.

**फॅक्टरी ॲक्ट :** कामगारांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी केलेले कायदे.

**शेतकरी चळवळ :** शेतकरी चळवळ म्हणजे शेतकरी वर्गाने त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय हक्कांसाठी केलेला संघटित संघर्ष होय. या चळवळींमध्ये शेतकऱ्यांनी भूसंपत्तीचे वितरण, कर्जमाफी, योग्य हमीभाव, सिंचन सुविधा, करसवलत आणि शोषण विरोध यांसारख्या मागण्यांसाठी आंदोलने केली. ही चळवळ केवळ आर्थिक प्रश्नांपुरती मर्यादित नसून ती सामाजिक न्याय, हक्कांची जाणीव आणि राजकीय सहभाग वाढवण्याचे माध्यमही ठरली आहे.

**डावी चळवळ :** डावी चळवळ ही अशी सामाजिक आणि राजकीय चळवळ आहे जी समता, सामाजिक न्याय, श्रमिक हक्क, संपत्तीचे पुनर्वाटप आणि शोषणमुक्त समाजव्यवस्थेसाठी लढा देते. या चळवळीचा आधार मार्क्सवादी, लेनिनवादी आणि समाजवादी विचारसरणीवर आधारित असतो. डावी चळवळ शोषित, वंचित, कामगार, शेतकरी आणि दलित वर्गाच्या बाजूने उभी राहते आणि भांडवलशाही, जातिव्यवस्था आणि आर्थिक असमानते विरोधात संघर्ष करते.

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

**योग्य पर्याय निवडा.**

१. अ) विषम

२. ब) रशिया

३. अ) शेतकऱ्यांच्या

४. ब) पावसावर

५. अ) पाठिंबा

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

**योग्य पर्याय निवडा.**

१. अ) मुळशी सत्याग्रह

२. ब) वल्लभभाई पटेल

३. क) १९३६

४. अ) महात्मा मु ले

५. ब) राजू शेट्टी

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३**

**योग्य पर्याय निवडा.**

१. अ) एम. एन. रॉय

२. क) १९४०

३. अ) नेताजीसुभाषचंद्रबोस

४. ड) १९२०

५. अ) मुंबई

## २.५ सारांश :

भारतीय समाजात शेतकरी आणि श्रमिक वर्गाचे शोषण दीर्घकाळ चालू राहिले. याच्या विरोधात उभारलेली शेतकरी चळवळ आणि डाव्या विचारसरणीची चळवळ या दोन प्रभावी चळवळी समाजाच्या परिवर्तनासाठी महत्त्वपूर्ण ठरल्या. या चळवळींनी अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ सामान्य जनतेला दिले.

शेतकरी चळवळीचा उगम ब्रिटिश काळातील जमीनदार आणि करप्रणाली विरोधात झाला. चंपारण्य सत्याग्रह, खेडा सत्याग्रह, पाबना उठाव, तेलंगणा चळवळ, मोपला उठाव हे सारेच शेतकऱ्यांच्या अन्यायाविरुद्ध लढ्याची उदाहरणे आहेत. स्वातंत्र्यानंतरही शेतमालाचे कमी दर, कर्जबाजारीपणा, जमीन पिढ्यांपिढ्यांची मालकी यामुळे ही चळवळ अधिक तीव्र झाली. शरद जोशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राममनोहर लोहिया यांसारख्या विचारवंतांनी या लढ्याला वैचारिक पाठबळ दिले.

डाव्या विचारसरणीचा पाया कार्लमार्क्स, लेनिन, एंगेल्स यांच्या तत्त्वज्ञानावर आधारित आहे. यामध्ये श्रमिक वर्गाचे शोषण, संपत्तीची असमानता आणि भांडवलशाही विरुद्ध संघर्षयावर भर दिला जातो. भारतात

डाव्या विचारांची मांडणी भारतीय कम्युनिस्ट पक्ष (CPI), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (CPI-M[2]), मार्क्सवादी लेनिनवादी पक्ष (CPI-ML) आणि इतर पक्षांद्वारे झाली. त्यांनी शेतकरी, कामगार, दलित व वंचित घटकांसाठी संघर्ष, संघटन व सशक्तीकरणाचे कार्य केले.

डाव्या चळवळी आणि शेतकरी चळवळी यांचा उद्देश एकच होता – सामाजिक व आर्थिक न्याय. दोघांनीही संघटन, एकजूट आणि जनआंदोलन यांच्या माध्यमातून शोषणा विरुद्ध लढा दिला. अनेक वेळा शेतकरी चळवळींमध्ये डाव्या पक्षांची सक्रिय भूमिका दिसून आली. शेतकरी चळवळ आणि डाव्या विचारसरणीच्या चळवळी या भारतीय लोकशाहीच्या मुळाशी असलेल्या चळवळी आहेत. या चळवळींनी केवळ सरकारच्या धोरणांवर परिणाम केला नाही, तर सामान्य जनतेला हक्क आणि आत्मसन्मानाने जगण्याची प्रेरणा दिली. आजही या चळवळी नव्या रूपात टिकून आहेत आणि समाजाची अधिक समतेकडे वाटचाल घडवत आहेत.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टीपा लिहा.**

१. शेतकरी चळवळीचे परिणाम

२. बारडोली सत्याग्रह

३. राजू शेट्टी यांची शेतकरी चळवळ

४. डाव्या विचारसरणीचे तत्त्वज्ञान

५. भारतीय कम्युनिस्ट पक्ष

६. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (AITUC)

**ब) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. शेतकरी चळवळीच्या उदयाची कारणे लिहा.

२. शेतकरी चळवळीची वाटचाल स्पष्ट करा.

३. डाव्या चळवळीचे मूल्यमापन करा.

४. भारतीय कम्युनिस्ट पक्षाविषयी माहिती लिहा.

**क) खालील प्रश्नाची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. शेतकरी आणि डाव्या विचारसरणीच्या चळवळीच्या उदयाची कारणे स्पष्ट करा.

२. शेतकरी चळवळी विषयी सविस्तर माहिती लिहा.

३. डाव्या विचारसरणीच्या चळवळीची सविस्तर माहिती लिहा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :

१. Desai R., : Peasants Struggle in India after Independence, Bombay, Oxford University Press, 1979

२. Panjabi, Kewal L. The Indomitable Sardar, Bombay, 1962.

३. Patel, P. U. Sardar Patel : India's Man of Destiny, Bombay, 1964

४. Omvedt Gail, Reinverting Revolution, New Social Movement and the socialist Tradition in India, Londan, England, 1993

५. काळे, व्ही. एम. अनु., आधुनिक भारत, पुणे, २०१५.

६. काळे भानू, कामगार संघटना : काही निरीक्षणे, डायमंड प्रकाशन, पुणे.

७. जावडेकर, शं. द. आधुनिक भारत, पुणे, २००१.

८. डोभाल, सुशीला अनु., आधुनिक भारत १८८५ –१९४७, नवी दिल्ली, २००४.

९. तळवलकर, गोविंद, सत्तांतर : १९४७, खंड – ३, मुंबई, १९९७.

१०. बेल्हेकर, एन. के. अनु., आधुनिक भारताचा इतिहास, दिल्ली, २००३ मराठी विश्वकोश, खंड १० ते १२

११. वैद्य सुमन, शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपूर, १९८२

१२. फडणीस जगन, शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, १९७८

१३. जोशी शरद, शेतकरी संघटना, विचार व कार्यप्रणाली, शेतकरी प्रकाशन, अलिबाग

१४. एस. एम. जोशी, संयुक्त महाराष्ट्र : स्वप्न आणि वास्तव, संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, संपा. प्रा. भगवान काळे, संकेत प्रकाशन जालना, १९८५.

○○○

घटक ३

# सशस्त्र क्रांतिकारी चळवळ

## (Armed Revolutionary Movement)

---

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ पंजाब (Punjab)
- ३.२.२ बंगाल (Bengal )
- ३.२.३ महाराष्ट्र (Maharashtra)

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## ३.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर पुढील घटकांचे आकलन होण्यास मदत होईल.

१. सशस्त्र क्रांतिकारी चळवळ ही संकल्पना समजून घेता येईल.

२. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील सशस्त्र क्रांतिकारकांचे योगदान स्पष्ट होईल.

३. पंजाब मधील सशस्त्र क्रांतिकारी चळवळीवर प्रकाश टाकता येईल.

४. बंगालमधील सशस्त्र क्रांतिकारी चळवळीची माहिती होईल.

५. महाराष्ट्रातील सशस्त्र क्रांतिकारी चळवळ समजून घेता येईल.

## ३.१ प्रास्ताविक :

भारताच्या स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात सशस्त्र क्रांतिकारी चळवळींना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. सर्वसाधारणपणे सशस्त्र क्रांती म्हणजे शस्त्राच्या बळावर क्रांतीच्या मार्गाने मातृभूमीच्या स्वातंत्र्याचे ध्येय प्राप्त करणे होय. भारताच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांच्या विरोधात आपापल्या परीने योगदान देणाऱ्या मवाळ, जहाल आणि गांधीवादी विचारसरणीवर विश्वास नसणारा, समाधानी नसणारा जहाल विचारांचा एक गट उदयास आला होता. त्यातूनच पुढे स्वातंत्र्यप्राप्तीच्या उदात्त ध्येयाने पेटून उठलेल्या तरुण क्रांतिकारकांचा उदय होऊन त्यांनी जी चळवळ सुरू केली ती चळवळ म्हणजेच सशस्त्र क्रांतिकारी चळवळ होय. विशेष म्हणजे संघर्ष, सशस्त्र लढा, त्याग, बलिदान आणि हिंसा यासारख्या क्रांती मार्गांचा अवलंब केल्याशिवाय आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळणार नाही अशी त्यांची ठाम धारणा होती. ब्रिटिशांच्या दहशतीच्या व शस्त्राच्या मार्गाने चालवलेल्या जुलमी कारभारास शस्त्रानेच जशास तसे उत्तर दिले पाहिजे तरच स्वातंत्र्य मिळेल असे क्रांतिकारकांना मनोमन वाटत होते. अर्थात बंगालची फाळणी, दुष्काळ, प्लेग यासारख्या आपत्तींच्या कालखंडातही ब्रिटिशांच्या अत्याचाराला उत आला होता. त्यामुळेच देशाच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांती करण्याशिवाय आता तारणोपाय नाही अशी धरणा निर्माण होऊन त्यातूनच सशस्त्र क्रांतीचे युग निर्माण झाले. राष्ट्र ही आपली माता तथा मातृदेवता असून तिची परकीय सत्तेच्या जोखडामधून सुटका करणे हेच आपले आद्य कर्तव्य आहे असे त्यांचे मत होते. तेव्हा आपल्या या ध्येयपूर्तीसाठी अर्ज व विनंत्या करण्यापेक्षा गुप्त क्रांतिकारी संघटना उभारणे, शस्त्रास्त्रे तयार करून त्याचे क्रांतिकारकांना प्रशिक्षण देणे, सरकारी कार्यालयातील तिजोऱ्या लुटणे, दळणवळणांच्या साधनांवर सशस्त्र हल्ले करणे, इंग्रज अधिकाऱ्यांचे खून करून त्यांच्यात दहशत बसविणे, इंग्रजांचे प्रशासन चालवणे अशक्य करणे आणि वेळ आलीच तर हसतमुखाने देशासाठी मरण स्वीकारणे हा क्रांती मार्ग त्यांनी आपल्या ध्येयपूर्तीसाठी स्वीकारला. खरे पाहता क्रांतिकारकांचे जीवन म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूशी खेळच होता. कारण इंग्रजांच्या कडून पकडले गेले असता ते हसतमुखाने फासावर चढत आणि पुन्हा एकदा हिंदुस्थानात जन्म घ्यावा व मातृभूमीसाठी जीवन समर्पण करण्याची संधी मिळावी ही प्रार्थना त्यांच्या ओठावर असे. हिंदुस्तानात अशा ज्या क्रांतिकारी चळवळी झाल्या त्यामध्ये अनेक क्रांतीकारकांनी अगदी हसत हसत मृत्यूला आलिंगन देऊन हौतात्म्य पत्करले, देशासाठी शहीद झाले म्हणूनच त्यांचे जीवन कार्य हजारो तरुणांसाठी प्रेरणादायी ठरले. अशा या सशस्त्र क्रांतिकारी चळवळीमध्ये पंजाब, बंगाल आणि महाराष्ट्र यांचे योगदान अनन्य साधारण महत्त्वाचे

ठरले. म्हणूनच सदरच्या प्रकरणात आपण पंजाब, बंगाल आणि महाराष्ट्रातील सशस्त्र क्रांतिकारी चळवळीचा आढावा घेणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन :

**सशस्त्र क्रांतिकारी चळवळीच्या उदयाची कारणे :**

सशस्त्र क्रांतिकारी चळवळ हा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्यातील एक महत्त्वाचा प्रवाह होता. या चळवळीची व्याप्ती देशात आणि देशाबाहेर ही वाढली होती. विशेषत: पंजाब, बंगाल आणि महाराष्ट्र या प्रांतात क्रांतिकारी चळवळींचा जोर फार मोठा होता. ही सशस्त्र क्रांतिकारी चळवळ अचानक उदयास आलेली नसून तीला पुढील कारणे कारणीभूत ठरली होती.

१) १८५७ च्या उठावामधून मिळालेली प्रेरणा

२) जहाल नेत्यांचा प्रखर राष्ट्रवाद

३) ब्रिटिशांचे वर्ण भेदाचे धोरण

४) इंग्रजी शिक्षणाचा परिणाम

५) ब्रिटिश राज्यकर्त्यांचे अन्यायी धोरण

६) समाज सुधारणा चळवळीमधून मिळालेली प्रेरणा

७) ब्रिटिशांनी भारताचे केलेले आर्थिक शोषण

८) बंगालच्या फाळणीचा परिणाम

९) राष्ट्रभक्ती निर्माण करणारे साहित्य

१०) लॉर्ड लिटनचे प्रतिगामी धोरण

११) जागतिक क्रांतिकारी घटनांमधून मिळालेली प्रेरणा

वरील महत्वाच्या कारणांचा एकत्रित परिपाक म्हणून भारतात सशस्त्र क्रांतिकारी चळवळींचा उदय झाल्याचे दिसून येते.

**सशस्त्र क्रांतिकारी चळवळीचे मार्ग :**

मातृभूमीच्या सुटकेसाठी क्रांतिकारकांनी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचा अवलंब केला. १९०६ रोजी च्या 'युगांतर' या बंगाली साप्ताहिकामध्ये अरविंद घोष यांचे बंधू वीरेंद्र घोष यांनी क्रांतिकारकासाठी तपशीलवार कार्यक्रम सुचविला होता. त्यानुसार सर्वसाधारणपणे क्रांतिकारकांनी पुढील महत्वाच्या प्रमुख मार्गांचा अवलंब केल्याचे दिसून येते.

१) ब्रिटिश राजवटीविषयी जनतेच्या मनात द्वेषाची भावना निर्माण करणे.

२) सरकारी खजिने व सरकारी शस्त्रसाठा लुटणे.

३) बंदूका, शस्त्रास्त्रे, बॉम्ब इत्यादी साहित्य निर्मिती करण्याचे तरुणांना प्रशिक्षण देणे.

४) पोस्ट ऑफिस, पोलीस ठाणे, रेल्वे मार्ग, तहसील, असेंब्ली इत्यादी शासकीय स्थाने उध्वस्त करणे

५) ब्रिटिशांच्या अन्यायाविरुद्ध वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके इत्यादी मधून प्रखर लिखाण करणे

६) जुलमी,अन्यायी व उद्धट ब्रिटिश अधिकाऱ्यांचे खून करून त्यांच्यावर दहशत बसवणे

७) दळणवळणाच्या साधनांवर हल्ले करणे

८) तरुणांना गुप्त संघटनांचे सभासद करून शस्त्रास्त्रे वापरण्याचे प्रशिक्षण देणे

९) देशभक्तीपर गीते व शूरांच्या पराक्रमाची माहिती देऊन हिंदी जनमानसात स्वाभिमान निर्माण करणे

१०) इंग्रजांनी पकडले तर हसतमुखाने देशासाठी मरण स्वीकारणे.

इत्यादी कठोर मार्गांचा अवलंब करून सशस्त्र क्रांतिकारकांनी ब्रिटिश सत्तेचे साकळदंड तोडण्याचे प्रयत्न केले. या मार्गांचा अवलंब करताना आपणास प्राणही गमवावे लागतील याची जाणीव असूनही क्रतीकाराकांनी वरील मार्गांचा अवलंब केला हे विशेष.

### ३.२.१ अ. पंजाबमधील शसस्त्र क्रांतिकारी चळवळ :

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील सशस्त्र क्रांतिकारी चळवळीत पंजाब प्रांताने महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. पंजाब मधील क्रांतिकारकांमध्ये मुख्यत: अजितसिंग, रामसिंग कुका, चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, रामप्रसाद बिस्मिल्ला, बटुकेश्वर दत्त इत्यादींचा समावेश होता. या क्रांतिकारकांचे कार्य व चळवळी पुढील प्रमाणे सांगता येतील.

#### १) गुरु रामसिंग व कुका चळवळ :

पंजाबचे राज्य इंग्रजांनी आपल्या साम्राज्यात विलीन केल्यानंतर ब्रिटिशांची गुलामगिरी सुरू झाली. त्यामुळे गुरु रामसिंग यांनी ब्रिटिशांना आव्हान देणारी कुका चळवळ उभारली. पुढे कुका व ब्रिटिश सरकार यांच्यात सशस्त्र संघर्ष सुरू झाला. गोवध करणाऱ्या कसाबांना निपटून काढणाऱ्या कुकीविरुद्ध इंग्रजांनी सैन्य पाठवून अनेकांना नष्ट केले. एवढेच नव्हे तर तोफेच्या तोंडीही दिले. पुढे १८७८ साली कुकांनी झारशी संगनमत केले आहे असा आरोप करून ब्रिटिशांनी गुरु रामसिंग यांना कैद करून त्यांना ब्रह्मदेशात ठेवण्यात आले. तेथेच त्यांचा मृत्यू झाला. पण त्यांनी ब्रिटिशांना केलेला सशस्त्र विरोध हिंदी तरुणांना स्फूर्तीदायक ठरला.

#### २) क्रांतिकारक लाला हरदयाळ – अजितसिंग आंबाप्रसाद व दिल्लीचा गुप्त कट :

पंजाबमध्ये क्रांतिकारक चळवळ सुरू करण्यात लाला हरदयाल यांचा प्रमुख वाटा होता. सहरानपुर येथे एक गुप्त क्रांतिकारी संघटना १९०४ साली स्थापन झाली होती. या संघटनेत लाला हरदयाल, अजितसिंग आणि आंबाप्रसाद ही मंडळी सामील झाली. लाला लजपतराय यांच्या जहाल विचारांची प्रेरणा त्यांना मिळाली होती. १९०७ साली ब्रिटिश सरकारने कोणताही खटला न भरता लाला लजपतराय व अजितसिंग यांना हद्दपार केल्यामुळे पंजाबमधील तरुण भडकले. दिल्लीच्या गुप्त संघटनेतील तरुणांना बॉम्बचे शिक्षण देण्यात पंजाबी क्रांतिकारकांनी पुढाकार घेतला. ब्रिटिशांना धडा शिकवण्यासाठी २३ डिसेंबर १९१३ रोजी व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंग्जवर दिल्ली शहरात प्रवेश करीत असताना बॉम्ब टाकण्यात आला. सरकारने कटवाल्यांची माहिती मिळवून

चौकशी केली. यामध्ये मास्टर अमीरचंद, वसंत कुमार विश्वास व बालमुकुंद यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. तर लाला हरदयाल व रासबिहारी घोष यांचीही नावे दिल्ली गटात गोवली गेली.

**३) काकोरी कट :**

क्रांतीच्या मार्गाने इंग्रजी सत्ता उलटून टाकण्यासाठी शस्त्रास्त्रे लागणार होती. त्यासाठी पैशाची आवश्यकता होती म्हणून हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनच्या कार्यकर्त्यांनी सरकारी खजिन्यावर धाड घालून पैसा उभा करण्याचे ठरविले त्यानुसार त्यांनी रेल्वेगाडी अडवून सरकारी खजिन्याची लूट करण्याची योजना आखली. ९ ऑगस्ट १९२५ रोजी चंद्रशेखर आझाद, रामप्रसाद बिस्मिल्ल, राजेंद्रनाथ लाहोरी, रोशनसिंग आणि अशफाकउल्ला खान इत्यादी क्रांतिकारकांनी उत्तर प्रदेशातील काकोरी रेल्वे स्टेशन जवळ गाडी अडवून सरकारी खजिन्याची लूट केली. त्यानंतर सरकारने अनेक क्रांतिकारकांना पकडून त्यांच्यावर खटला भरला यालाच काकोरी कट खटला म्हणून ओळखले जाते. पुढे या खटल्यातील रामप्रसाद बिस्मिल्ल, राजेंद्रनाथ लाहोरी, रोशनसिंग, अशफाकउल्ला खान या चौघांना फाशीची शिक्षा देण्यात आली.

**४) सरदार भगतसिंग :**

भगतसिंग हे क्रांतिकारी चळवळीतील थोर सशस्त्र क्रांतिकारक होते. त्यांचा जन्म पंजाबमधील बंग या गावी झाला. आई विद्यावती व वडील किशनसिंग हे लाला लजपतराय यांच्याबरोबर मंडालेच्या तुरुंगात होते. क्रांतिकारी विचारांच्या आई वडिलांचा हा मुलगा आपल्या भारतभूमीसाठी संपूर्ण आयुष्य समीर्पित करीत राहिला. विद्यार्थी दशेमध्ये जयचंद विद्यालंकार व भाई परमानंद या शिक्षकांचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला होता. डी. ए. व्ही कॉलेजमध्ये असतानाच त्यांनी विद्यार्थ्यांची संघटना उभारण्यात पुढाकार घेतला आणि आजन्म अविवाहित राहून स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याची शपथ घेतली. ते १९२३ मध्ये हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन या संस्थेत दाखल झाले. सुखदेव, चंद्रशेखर आझाद, बटुकेश्वर दत्त, भगवती चरण, जतींद्रनाथ दास इत्यादी मंडळी संघटित रित्या क्रांतिकार्य करत होती. भगतसिंगांनी त्यांचे सहकार्य घेऊन कट्टर देशभक्त युवकांची नवजवान भारत सभा ही संघटना स्थापन केली.चंद्रशेखर आझाद व कुंदनलाल या सहकाऱ्यांच्या मदतीने कानपूरच्या तुरुंगातून संन्याल व जोगेश्वरी चटर्जी यांची सुटका करण्याची योजना आखली होती. परंतु तत्पूर्वीच लाहोर मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणात भगतसिंगांना पकडण्यात आले. चंद्रशेखर आझाद यांच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन या संस्थेने पंजाब मधील सर्व कार्याचे नेतृत्व भगतसिंगांकडे दिले. ३ फेब्रुवारी १९२८ रोजी सायमन आयोगाच्या पुढे लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली उग्र निदर्शने झाली त्यावेळी झालेल्या लाटीहल्ल्यात लालाजी घायाळ झाले आणि त्यातच त्यांचे निधन झाले. तेव्हा लालाजींच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी या हल्ल्याचा मुख्य सूत्रधार पोलीस अधीक्षक स्कॉट याचा खून करण्याचा निर्धार भगतसिंग व त्यांचे साथीदार चंद्रशेखर आझाद व शिवराम राजगुरू यांनी केला. पण स्कॉट ऐवजी दुसराच पोलीस अधिकारी सॅन्डर्स मारला गेला. अशाप्रकारे लालाजींच्या खुनाचा सूड घेण्यात आला.

भगतसिंगांनी आग्रा व लाहोर येथे बॉम्ब कारखाने सुरू केले. पुढे त्यांच्या क्रांतिकारक पक्षाने दोन अन्यायकारक विधेयके ट्रेंड डिस्प्युट बिल व पब्लिक सेफ्टी बिल यांचा निषेध म्हणून बटुकेश्वर दत्त व भगतसिंग

यांच्याकडे दिल्लीच्या केंद्रीय विधानसभेत ब्रिटिशांच्या हुकूमशाही वृत्तीचा निषेध करण्यासाठी बॉम्ब टाकण्याचे काम विश्वासपूर्वक सोपविले. त्यानुसार ८ एप्रिल १९२९ रोजी ही बिले पास होणार होती. याचवेळी बटुकेश्वर दत्त व भगतसिंग यांनी सभागृहात बॉम्ब फेकले, हवेत गोळ्या झाडल्या व निषेधपत्रके फेकली व दोघेही ''इन्कलाबऽ... जिंदाबादऽऽ...'' अशा घोषणा देत सरकारच्या स्वाधीन झाले. कामगार व जनतेच्या हक्कांवर गदा आणणारी ही बीले होती. या घटनेमध्ये त्यांना प्रथम काळ्या पाण्याची शिक्षा झाली होती. मात्र पुढे खास न्यायाधिकरणाने त्यांना फाशीची शिक्षा सुनावली. या शिक्षेची अंमलबजावणी राजगुरू व सुखदेव यांना दिलेल्या फाशीच्या शिक्षेबरोबरच लाहोर मधील मध्यवर्ती तुरुंगात २३ मार्च १९३१ रोजी करण्यात आली.

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात असंख्य हुतात्मे झाले. सशस्त्र क्रांतीचे ही अनेक प्रयत्न झाले. परंतु आपल्या कर्तव्यनिष्ठेने त्यागाणे, नेतृत्वाने, धाडसाने आणि अत्युच्च आहुती तथा बलिदानाने ऐन तारुण्यात सबंध देशात चैतन्य निर्माण करणारे भगतसिंग हे अद्वितीय सशस्त्र क्रांतिकारक होते. त्यांची प्रेरणा स्वातंत्र्य प्राप्तीची, समाजवादी क्रांतीची आणि शोषणरहित मानव समाज निर्मितीची होती. म्हणूनच भारतीय क्रांतिकारकांचे मेरुमणी अशा शब्दात सरदार भगतसिंग यांच्या कार्याचा यथार्थ गौरव केला जातो.

**५) चंद्रशेखर आझाद :**

चंद्रशेखर आझाद हे सरदार भगतसिंगांचे सहकारी होते. विलक्षण धाडसी क्रांतिकारक म्हणून त्यांना ओळखले जाते. असहकाराच्या आंदोलनात त्यांनी भाग घेतल्याबद्दल त्यांना वेतांच्या फटक्यांची शिक्षा झाली होती. कारण भर कोर्टात न्यायाधीशांनी नाव विचारले असता त्यांनी आपले नाव आझाद असे निधड्या छातीने सांगितले होते. तर राहण्याचे ठिकाण काय या प्रश्नाचे उत्तर जेल असे देताच त्यांना शिक्षा सुनावण्यात आली. यावेळी त्यांच्या मुखातून वंदे मातरम हे उद्‌गार बाहेर पडले होते. वयाच्या सोळाव्या वर्षापासूनच त्यांनी क्रांतिकार्यात भाग घेतला होता. काकोरी कटात ते सहभागी झाले होते.

१९२८ मध्ये दिल्ली येथे बैठक घेऊन त्यांनी हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी नावाची संघटना स्थापन केली. या संघटनेचे सशस्त्र दल तयार करून त्याचे नेतृत्व चंद्रशेखर आझाद यांच्याकडे देण्यात आले. भगतसिंगांना तुरुंगातून सोडवणे व त्यांची फाशीची शिक्षा रद्द व्हावी यासाठी आझादांनी बरेच प्रयत्न केले. पण ते प्रयत्न वाया गेल्यामुळे त्यांनी २३ डिसेंबर १९२९ रोजी व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन रेल्वेमधून दिल्लीकडे येत असताना दिल्ली रेल्वे स्टेशन जवळ रेल्वे उलथून पाडली. पण लॉर्ड आयर्विन त्यातून बचावले. यावेळी आझाद यांना पकडून देण्यासाठी सरकारकडून दहा हजार रुपयांचे बक्षीस घोषित केले होते. पुढे २७ फेब्रुवारी १९३१ रोजी चंद्रशेखर आझाद, यशपालसिंग अलाहाबाद मध्ये एकत्र आले. रशियातून शस्त्रास्त्रे आणून आपला लढा जारी ठेवण्याचा त्यांचा बेत होता. ते अलाहाबाद येथील बागेत जमले होते. आझादांना तेथेच थांबावयास सांगून यशपालसिंग व सुरेंद्र पांडे आणखी एका क्रांतिकारकाच्या भेटीस गेले. पण दरम्यानच पोलिसांना या क्रांतिकारकांच्या अस्तित्वाची माहिती मिळाली. त्यांनी बागेतील आझादांना सर्व बाजूंनी घेरले. तेव्हा आता आपण सुटू शकत नाही हे लक्षात आल्यावर दोन्ही हातात पिस्तुले घेऊन आझाद पोलिसांशी लढू लागले आणि शेवटी गोळ्या संपत आल्यावर त्या शूर वीराने शेवटची गोळी स्वतःवर झाडली व मातृभूमीच्या चरणी आपला देह आनंदाने अर्पण केला.

**६) रासबिहारी घोष :**

लाला हरदयाळ १९११ साली अमेरिकेला गेल्यानंतर पंजाब मधील क्रांतिकारी चळवळीची जबाबदारी रासबिहारी घोष यांनी स्वीकारली. १९१२ साली ब्रिटिशांनी आपली राजधानी कलकत्ताहुन दिल्लीला नेली. गव्हर्नर जनरल हार्डिंग्जने थाटामाटात हत्तीवरून दिल्लीत प्रवेश करताना चांदणी चौकात हार्डिंग्ज वर रासबिहारी घोष यांनी बॉम्ब टाकला. या स्फोटात हार्डिंग्ज वाचला पण त्याचा ए. डी. सी ठार झाला. सरकारने रासबिहारी यांना पकडण्यासाठी ७५०० रुपयांचे बक्षीस जाहीर केले पण ते सापडले नाहीत. पुढे १९१५ मध्ये त्यांनी सरकार विरुद्ध एकाच वेळी उठाव करण्याचे निश्चित केले व गदर पक्षाच्या चळवळीत सहभागी झाले. या उठावात विष्णू पिंगळे, सचिंद्र संन्याल, अमीरचंद व रासबिहारी इत्यादींचा समावेश होता. पण पुढे कट फुटल्याने सरकारकडून अनेकांना पकडण्यात आले पण यामधून रासबिहारी निसटले व बनावट नाव सांगून रवींद्रनाथ टागोर यांच्याबरोबर ते जपानला गेले. तेथूनच त्यांनी क्रांतिकार्य सुरू केले. त्यांनी इंडियन नॅशनल आर्मी ची स्थापना करून त्याचे प्रमुख पद सुभाषचंद्र बोस यांच्याकडे दिले.पुढे १९४५ मध्ये रासबिहारी यांचा मृत्यू झाला.

**७) मदनलाल धिंग्रा व उधमसिंग :**

वि. दा. सावरकर यांच्या क्रांतिकारी विचाराप्रमाणेच त्यांच्या संबंधातील एक क्रांतिकारी तरुण म्हणजेच मदनलाल धिंग्रा होय. त्यांनी १९०९ मध्ये भारत मंत्र्याच्या कार्यालयातील अधिकारी कर्झन वायली याची गोळ्या घालून हत्या केली. तेव्हा धिंग्रा यांच्या जवळ जे निवेदन सापडले होते त्यात असे म्हटले होते की, माझ्यासारखा सामान्य तरून मातृभूमीच्या मुक्तीसाठी फक्त रक्त सांडू शकतो. तिच्या मुक्तीसाठी मला पुन्हा जन्म मिळावा व तिच्यासाठी पुन्हा प्राण अर्पण करावेत अशी माझी इच्छा आहे. धिंग्रा यांनी केलेल्या या हत्तेमुळे भारतीय क्रांतिकारक इंग्लंडमध्ये जाऊन ब्रिटिश अधिकाऱ्यांची हत्या करू शकतात हे सिद्ध झाले.

इ. स. १९१९ मध्ये जालियनवाला बागेत पंजाबचा लेफ्टनंट गव्हर्नर ओडवायर यानेच जनरल डायरला जनतेवर गोळीबार करण्याचे आदेश दिले होते. त्याचाच बदला घेण्यासाठी म्हणून उधमसिंग इंग्लंडला गेले व वीस वर्षे ते ओडवायरच्या हत्तेसाठी अनुकूल संधीची वाट पाहत होते. शेवटी त्यांनी १३ मार्च १९४० रोजी ओडवायरची हत्या करून बदला घेतला.

**८) बालमुकुंद व यशपालसिंग :**

पंजाबचे प्रख्यात देशभक्त भाई परमानंद यांचे बालमुकुंद हे चुलत बंधू होते. लॉर्ड हार्डिंग्ज ची दिल्ली शहरातून जेव्हा मिरवणूक निघाली होती तेव्हा त्यांच्यावर त्यांनी बॉम्ब टाकला. पण हार्डिंग्ज जखमी झाला व त्याचा माहुत ठार झाला. बॉम्ब फेकीच्या या अपराधाबद्दल ब्रिटिश सरकारने त्यांना फाशी दिली. चंद्रशेखर आझाद यांच्या आत्मसमर्पणानंतर हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मीचे नेतृत्व यशपालसिंग यांच्याकडे आले होते. त्यांनी सशस्त्र लढ्याचा आदेश काढून संघटना अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला. पण १९३२ साली त्यांना पकडण्यात आले व अकरा वर्षे तुरुंगवासाची शिक्षा देण्यात आली.

अशाप्रकारे पंजाबमधील क्रांतिकारकांनी भारतीय स्वातंत्र्याची चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. अत्यंत धाडसी कृत्ये करून ब्रिटीश राजवटीवर एक प्रकारची दहशत बसविली.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

**अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. कुका चळवळ ............ यांनी उभारली.

अ) गुरु रामसिंग ब) गुरु गोविंद सिंग

क) रामप्रसाद बिस्मिल्ला ड) अजितसिंग

२. ९ ऑगस्ट १९२५ रोजी उत्तर प्रदेशातील ......... रेल्वे स्टेशन जवळ क्रांतिकारकांनी गाडी अडवून खजिण्याची लूट केली.

अ) मिरत ब) ग्वाल्हेर

क) काकोरी ड) अलिगड

३. पब्लिक सेफ्टी बिलाच्या विरोधात दिल्लीच्या कायदेमंडळात ......... यांनी बॉम्बस्फोट घडवून आणला.

अ) राजगुरू व सुखदेव ब) चंद्रशेखर आझाद व राजगुरू

क) यशपालसिंग व सुखदेव ड) भगतसिंग व बटुकेश्वरदत्त

४. ............ यांनी नव जवान भारत सभा ही संघटना स्थापन केली.

अ) भगतसिंग ब) किशनसिंग

क) भाई परमानंद ड) यापैकी नाही

५. ........... यांनी इंडियन नॅशनल आर्मीची स्थापना केली.

अ) सुभाषचंद्र बोस ब) रासबिहारी घोष

क) लाला हरदयाळ ड) मदनलाल धिंग्रा

### ३.२.२ ब. बंगालमधील सशस्त्र क्रांतिकारी चळवळ :

बंगाल प्रांत क्रांतिकारी चळवळीमध्ये प्रथमपासूनच आघाडीवर राहिला होता. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात बंगालमधील क्रांतिकारकांची कामगिरी सुवर्ण अक्षरांनी नोंद करून ठेवावी अशीच आहे. विशेषतः बंगालच्या फाळणी नंतर तर बंगाल प्रांतात क्रांतिकारी घटनांची मालिकाच सुरू झाली होती. एवढेच नव्हे तर बंगाल प्रांतातील सशस्त्र क्रांतिकारकांनी युगांतर, संध्या, वंदे मातरम्, न्यू इंडिया यासारख्या विविध वर्तमानपत्रातून ब्रिटिश सरकार विरोधी प्रचाराची आघाडी उघडली आणि सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचा उघड उघड पुरस्कार केला होता. त्यामध्ये अनुशिलन समिती, युगांतर समिती, वीरेंद्रकुमार घोष, अरविंद घोष, भूपेन्द्रनाथ दत्त, खुदिराम बोस, प्रफुल्लकुमार चाकी, सूर्यसेन, तारकेश्वर दत्त यांच्यासह कल्पना दत्त, प्रीतीलता वड्डेदार, सुनती चौधरी, अंबिका चक्रवर्ती आणि बिना दास या क्रांतिकारक तरुणींचाही समावेश होता. त्यांच्या क्रांतिकारी संघटना व कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**१) अनुशीलन समिती :**

बंगालमध्ये क्रांतिकारी चळवळीची मुहूर्तमेढ भद्रलोक समाजाने रोवली. अनुशीलन समिती नावाच्या गुप्त क्रांतिकारी संघटनेची स्थापना पी. मित्रा यांनी केली. या समितीत जतिंद्रनाथ बॅनर्जी, हेमचंद्र दास, भूपेंद्र दत्त, पुलिनदास मुखर्जी, नरेंद्र भट्टाचार्य इत्यादी मंडळी होती. तर बंगाली तरुणांच्या हृदयात स्वातंत्र प्रेम जागृत करून त्यांना संघटित करणे, तरुणांना शस्त्रांचा वापर करण्याचे प्रशिक्षण देणे आणि जुलमी ब्रिटिश अधिकाऱ्यांचे खून करणे ही या समितीची उद्दिष्टे होती. या समितीच्या बंगालमध्ये सुमारे ५०० शाखा होत्या. समितीच्या वतीने बंगाली तरुणांना शक्ती देवता कालीमाता हिच्या उपासनेचे व तिच्यासाठी इंग्रजांचे रक्त सांडण्याचे आवाहन करण्यात आले होते .तर या समितीत १५ ते २५ वयोगटातील तरुणांची संख्या अधिक होती. या समितीने धनिकांच्या घरावर छापे घातले, अनेक जुलमी ब्रिटिश अधिकाऱ्यांना ठार केले, बॉम्बहल्ले केले, रेल्वे गाडी उडवण्याचा प्रयत्न केला शिवाय बाहेरच्या देशातून गुप्तपणे शस्त्रास्त्रे आपल्या देशात आणण्याचे धाडसी कार्य केले.

**२) युगांतर समिती :**

बंगालमधील क्रांतिकारकांचे अग्रणी म्हणून योगी अरविंद यांचे बंधू वीरेंद्र कुमार घोष आणि स्वामी विवेकानंद यांचे बंधू भूपेंद्रनाथ दत्त यांना ओळखले जाते. सन १९०६ मध्ये या दोन क्रांतिकारकांनी युगांतर हे क्रांतीचा प्रचार करणारे वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्रातून त्यांनी सरकार विरुद्ध सशस्त्र प्रतिकार करण्यावर भर दिला. संघर्ष तीव्र स्वरूपात ठेवणे आणि स्वातंत्र्यासाठी आत्मबलिदान देणे अशी क्रांतिकारी विचारसरणी त्यांनी बंगालमध्ये फैलावली. पुढे अरविंद घोष, भूपेंद्रनाथ दत्त आणि अश्विनी दत्त यांनी १९०६ मध्ये युगांतर समितीची स्थापना केली. तर लवकरच पॅरिस मधून स्फोटक द्रव्याचे शिक्षण घेतलेले हेमचंद्र दास समितीला मिळाले. त्यांनी कलकत्ता येथे बॉम्ब बनवण्याचा कारखाना सुरू केला. ब्रिटिशांना धडा शिकवणे, सरकारी कामात अडथळा आणणे यासारखे काम सुरू झाले. अलीपूर च्या गुप्त कट खटल्यात युगांतरचे प्रमुख वीरेंद्रकुमार घोष व सहकार्यांना हद्दपारीची शिक्षा झाली. पूर्व बंगालचे लेफ्टनंट गव्हर्नर फुल्लर यांना रेल्वेत मारण्याचा प्रयत्न, खुदीराम बोस यांना पकडणारा अधिकारी नंदलाल बॅनर्जी याला ठार करणे, ब्रिटिशांना फितूर असणाऱ्यांना ठार करणे यांत युगांतर समितीचा मोठा सहभाग होता.

**३) खुदीराम बोस व प्रफुल्लकुमार चाकी :**

क्रांतिकारी विचाराने भारावून गेलेल्या बंगालमधील क्रांतिकारकांना दडपण्यासाठी ब्रिटिशांनी दहशतवादाचा मार्ग अवलंबिला होता. परिणामी क्रांतिकारक अधिकच संतप्त झाले होते. त्यामुळे त्यांनी अन्यायी शिक्षा करणाऱ्या ब्रिटिश अधिकाऱ्यांना ठार मारण्याचे सत्र सुरू केले. कलकत्त्याचा न्यायाधीश किंग्जफोर्ड यांने अनेक क्रांतिकारकांना फाशीच्या व जन्मठेपेच्या शिक्षा दिलेल्या होत्या. त्यामुळे खुदीराम बोस व प्रफुल्ल चाकी संतप्त होऊन त्यांनी या न्यायाधीशाची हत्या करण्याची जबाबदारी स्वीकारली. ३० एप्रिल १९०८ रोजी रात्री साडे आठ वाजता त्यांनी किंग्जफोर्डची गाडी समजून त्या गाडीवर बॉम्ब टाकला पण सुदैवाने किंग्जफोर्ड त्या गाडीत नसल्यामुळे बचावला. परंतु सरकारी वकील केनेडीची पत्नी व मुलगी या दोन इंग्रज स्त्रिया ठार झाल्या. या घटनेत चाकी व बोस यांना पकडण्यात आले. पैकी प्रफुल्ल कुमार यांनी स्वतःवर गोळ्या चालवून आत्मसमर्पण केले

तर खुदीराम बोस यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. तेव्हा खुदीराम बोस यांचे वय केवळ पंधरा वर्षांचे होते. त्यामुळेच खुदीराम बोस हे तरुण क्रांतिकारकांचे प्रेरणा स्त्रोत बनले.

**४) चितगाव गट किंवा इंडियन रिपब्लिकन आर्मी :**

बंगाल प्रांतात ज्या क्रांतिकारी संघटना कार्यरत होत्या त्यापैकी एक संघटना चितगाव येथे स्थापन करण्यात आली होती. तिलाच इंडियन रिपब्लिकन आर्मी तथा चितगाव गट म्हणून ही ओळखले जाते. सूर्यसेन हे चितगाव गटाचे प्रमुख नेते होते. ते चितगाव येथील शाळेत शिक्षक म्हणून काम करत होते. पुढे त्यांनी काँग्रेसचे कार्यकर्ते म्हणून सार्वजनिक कार्याला सुरुवात केली. महात्मा गांधींनी सुरू केलेल्या असहकार चळवळीत त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला होता. क्रांतिकारी कारवायांत सहभागी झाल्याबद्दल त्यांना दोन वर्षे कारावासही झाला होता. पुढे तुरुंगातून सुटका झाल्यानंतर त्यांनी आपल्या तरुण सहकाऱ्यांच्या मदतीने चितगाव गट संघटित केला होता.

चितगाव गटाच्या क्रांतिकारकांची सर्वात गाजलेली कृती म्हणजे चितगावच्या सरकारी शस्त्रागारावर हल्ला करून तेथील शस्त्रे व दारुगोळा यांची केलेली लूट होय. या योजनेत सूर्यसेन, अजय घोष, तारकेश्वर इत्यादी ६५ क्रांतिकारकांनी भाग घेतला होता. १८ एप्रिल १९३० रोजी त्यांनी कडेकोट बंदोबस्तात असलेल्या चितगाव येथील शस्त्रागारावर चाल करून तेथील शस्त्रे ताब्यात घेतली आणि चितगाव जवळच्या टेकड्यांच्या रांगांमध्ये आश्रय घेतला. यावेळी सूर्यसेन यांनी क्रांतिकारी सरकार स्थापन केल्याची घोषणा केली. पुढे या क्रांतिकारकांविरुद्ध सरकारने सैनिकी कारवाई केली.

ऐतिहासिक चितगाव कटाची योजना अनेक वर्षे तयार होत होती. त्यासाठी चितगावच्या क्रांतिकारकांनी पोलिसांचे खाकी गणवेश तयार केले, शस्त्रास्त्रे वापरण्याचे प्रशिक्षण घेतले, पोलीस शस्त्रागार व दारूगोळ्यावर हल्ला केला, टेलिफोन एक्सचेंज उद्ध्वस्त केले, दळणवळण बंद पाडले. त्यात ब्रिटिश लष्कराशी मोठी चकमक होऊन अनेक क्रांतिकारक ठार झाले. चितगाव शस्त्रागारवरील हल्लयात सहभागी झालेल्या क्रांतिकारकांची सरकारने पुढे धरपकड केली आणि त्यांच्यावर खटला दाखल केला हाच खटला चितगाव गट खटला म्हणून प्रसिद्ध आहे. या खटल्यातील १५ क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा देण्यात आली. त्यामध्ये सूर्यसेन, अंबिका चक्रवर्ती, तारकेश्वर दत्त यांना फाशीची शिक्षा तर कल्पना दत्त, गणेश घोष, अनंतसिंग यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली.

**५) अलीपुर खटला :**

न्यायाधीश किंग्जफोर्ड च्या हत्तेचा प्रयत्न झाल्यानंतर सरकारने बेकायदेशीर शस्त्रसाठा शोधून काढण्यासाठी कलकत्ता येथे विविध ठिकाणी छापे टाकले. त्यात काही कागदपत्रे सापडवून त्यात अनेक क्रांतिकारकांची यादी सरकारला मिळाली. त्यानुसार एकूण ३६ व्यक्तींना पकडण्यात आले. त्यात अरविंद घोष व वीरेंद्र घोष हे बंधू ही होते. त्यांच्यावर खटला भरण्यात आला हाच खटला अलीपुर कटाचा खटला म्हणून प्रसिद्ध आहे. खटल्यादरम्यान फितूर होऊन सरकारी साक्षीदार बनलेल्या नरेंद्र गोस्वामीला तुरुंगातच ठार करण्यात आले, तर २४ फेब्रुवारी १९१० मध्ये न्यायालयातून बाहेर पडताना पोलीस अधीक्षकाला मारण्यात आले. अलीपूरचा खटला अलिपुर येथे सेशन जज्ज बीचक्रॉप्ट यांच्यापुढे चालला. या कटातून अरविंद बाबूंची निर्दोष मुक्तता झाली

तर वीरेंद्र घोष व उल्हासकर दत्त यांना फाशीची शिक्षा झाली तर पुढे अपिलात फाशीची शिक्षा रद्द होऊन जन्मठेपेची शिक्षा झाली.

**६) क्रांतिकारक तरुणींचा सहभाग :**

बंगालमधील क्रांतिकारी चळवळीचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणून चळवळीमधील क्रांतिकारक तरुणींच्या सहभागाचा विशेष उल्लेख करावा लागतो. कारण बंगालमध्ये पुरुष क्रांतिकारकांच्या खांद्याला खांदा लावून क्रांतिकारक तरुणींनीही सशस्त्र क्रांती चळवळीमध्ये सहभाग घेतल्याचे दिसून येते. कल्पना दत्त, प्रीतीलता वड्डेदार, शांती घोष, सुनीती चौधरी, अंबिका चक्रवर्ती, बिना दास अशा अनेक तरुणींनी शस्त्र हाती घेऊन अनेक साहसी कारवायांत भाग घेतला होता. पैकी शांती घोष व सुनीती चौधरी यांनी कोमितलाच्या जिल्हा मॅजिस्ट्रेटवर गोळ्या झाडून त्याची हत्या केली. तर बिना दास या तरुणीने कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात गव्हर्नर कडून पदवी प्रमाणपत्र घेत असताना त्याच्यावर जवळून गोळ्या झाडल्या. शिवाय प्रीतीलता वड्डेदार हीने चितगावच्या रेल्वे इन्स्टिटट्यूटवरील हल्ल्यात प्रत्यक्ष भाग घेतला होता. त्याप्रसंगी झालेल्या चकमकीत तिचा मृत्यू झाला. बंगालमधील अशा अनेक तरुणींनी शौर्याची व पराक्रमाची शर्त करून भारतीय स्त्रिया ही सशस्त्र क्रांति कार्यात मागे नाहीत हे प्रत्यक्ष कृतीनेच दाखवून दिले.

अशाप्रकारे बंगालमधील क्रांतिकारक व त्यांच्या विविध क्रांतिकारी संघटनांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने मोलाची कामगिरी बजावली आहे.बंगालमधील क्रांतिकारकांनी अन्याय व अत्त्याचार करणाऱ्या ब्रिटीश अधिकाऱ्यांचे स्वत:च्या प्राणांची पर्वा न करता खून करून, घोषणा देऊन, दहशत माजवून ब्रिटीशांच्या मनात धडकी भरवणारे कार्य केले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

**अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. बंगालमधील क्रांतिकारकांचे अग्रणी म्हणून ............... यांना ओळखले जाते

अ) वीरेंद्रकुमार घोष व भूपेंद्रनाथ दत्त ब) नरेंद्र भट्टाचार्य व जतिंद्रनाथ बॅनर्जी

क) अश्विनी दत्त व अरविंद घोष ड) यापैकी नाही

२. युगांतर हे वृत्तपत्र ............... प्रांतामधून निघत होते

अ) पंजाब ब) बंगाल

क) मद्रास ड) महाराष्ट्र

३. ............... हे चितगाव गटाचे प्रमुख नेते होते

अ) खुदीराम बोस ब) प्रफुल्ल कुमार चाकी

क) भूपेंद्रदत्त ड) सूर्यसेन

४. ............... या तरुणीने कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात पदवी प्रमाणपत्र घेत असताना गव्हर्नरवर गोळ्या झाडल्या.

अ) सुनीती चौधरी　　　　ब) कल्पना दत्त

क) शांती घोष　　　　ड) बिना दास

५. ........... यांनी न्यायाधीश किंग्जफोर्ड याची हत्या करण्याची जबाबदारी स्वीकारली.

अ) अंबिका चक्रवर्ती　　　　ब) अजय घोष

क) खुदीराम बोस व प्रफुल्ल चाकी　ड) तारकेश्वर दत्त

## ३.२.३ क. महाराष्ट्रातील सशस्त्र क्रांतिकारी चळवळ :

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील सशस्त्र क्रांतिकारी चळवळीमध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागतो. कारण महाराष्ट्राची भूमी ही जशी संतांची भूमी म्हणून ओळखली जाते तसी ती सशस्त्र क्रांतिकारकांची भूमी म्हणूनही ओळखली जाते. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने व पराक्रमाने पावन झालेल्या याच महाराष्ट्राच्या भूमीत त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन अनेक सशस्त्र क्रांतिकारक अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी पुढे आलेले दिसतात. इंग्रजी राजवटीच्या काळात आपल्या मातृभूमीला परकीय सत्तेच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी महाराष्ट्रातील क्रांतिकारक नेहमीच आघाडीवर राहिलेले होते. त्यामुळे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासूनच महाराष्ट्र हे सशस्त्र क्रांतिकारक चळवळीचे महत्त्वाचे केंद्र बनून राहिल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे भारतातील सशस्त्र क्रांतिकारी चळवळीचा प्रारंभ महाराष्ट्रामधूनच झाला असल्याचेही म्हटले जाते. महाराष्ट्रातील अनेक सशस्त्र क्रांतिकारकांनी विविध क्रांती मार्गाचा अवलंब करून ब्रिटिश सत्तेला हादरा देऊन भारताचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. यामध्ये वासुदेव बळवंत फडके, सेनापती बापट, विष्णू गणेश पिंगळे, चाफेकर बंधू, वि. दा. सावरकर, अनंत लक्ष्मण कान्होरे, राजगुरू शिवराम हरी यांचा समावेश होतो. अशा या सशस्त्र क्रांतिकारक व त्यांच्या क्रांतिकारी चळवळीचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

### १) वासुदेव बळवंत फडके :

वासुदेव बळवंत फडके यांना आद्य क्रांतिकारक किंवा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सशस्त्र क्रांतीचे आद्य प्रवर्तक म्हणून ओळखले जाते. त्यांचे मूळ घराणे रत्नागिरी जिल्ह्यातील केळशी या ठिकाणचे होय तर पुढील काळात हे घराणे कुलाबा जिल्ह्यातील शिरढोण या गावी वास्तव्यास आल्याचे दिसते. त्यांचा जन्म १८४५ साली झाला. पुढे त्यांनी पाचवी नंतर शिक्षण सोडले आणि नोकरीला प्रारंभ केला. पहील्यांदा रेल्वे खात्यात कारकून म्हणून, त्यानंतर ग्रँड मेडिकल कॉलेज मधील लेखनिकाची नोकरी केल्यानंतर लष्कराच्या हिशोबी खात्यात नोकरी केली. विविध ठिकाणी नोकरी करत असतानाच त्यांची १८६५ साली पुणे येथे बदली झाली. तेथे ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून मिळणाऱ्या अपमानकारक वागणूकीमुळे त्यांच्यात राष्ट्रीय भावना जागृत झाली. ब्रिटिश राजवटीने चालवलेल्या भारताच्या आर्थिक शोषणाच्या विवेचनामुळे प्रभावित होऊन त्यांनी हातमागाची कपडे वापरण्याचा निर्णय घेतला आणि स्वदेशीचा प्रचार चालू केला. ब्रिटिशांच्या अमानुष व अन्यायी वागणुकीमुळे ते सतत संतप्त होत असत. अशातच १८७१ साली त्यांची आई आजारी पडली असल्याने त्यांनी रजा मागितली परंतु ती सरकारकडून नाकारण्यात आली. तेव्हा त्यांनी नोकरीची पर्वा न करता घरी जाण्याचा निर्णय घेतला. पण ते घरी पोहोचण्यापूर्वीच त्यांची आई कालवश झाली होती. या घटनेचा

त्यांच्या मनावर प्रचंड आघात झाला आणि त्यांनी नोकरीचा त्याग करून परकीय सत्तेच्या विरोधात बंडाचा निर्णय घेतला. बालपणीच त्यांनी १८५७ च्या उठावाच्या हकीकती वाचल्या होत्या. तात्या टोपे व झाशीची राणी लक्ष्मीबाई ही त्यांची स्फूर्तीस्थाने होती. याशिवाय चिपळूणकरांच्या धारदार लेखनाचाही त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला होता.

ब्रिटिशांनी चालवलेल्या राजकीय, आर्थिक शोषणाची त्यांना जाणीव होतीच पण तशातच रोगांच्या साथी व दुष्काळामुळे लोकांचे होत असलेले हाल पाहून ते अधिक बेचैन झाले होते. रामोशी मंडळींमध्ये ब्रिटिशांच्या विरोधात मोठा असंतोष आहे. त्याशिवाय त्यांच्यामध्ये शौर्य, निष्ठा आणि स्वातंत्र्यप्रियत आहे. याचा उपयोग ब्रिटिशांच्या विरोधात उठाव करण्यासाठी करून घेण्याचा त्यांनी निर्णय घेतला. त्यानुसार रामोशांना शस्त्र पुरवण्यासाठी लागणारा निधी गोळा करणे, त्यांनी बहुजन समाजाला लुबाडणाऱ्या धनिकांच्या घरी दरोडे घातले. वेगवेगळ्या जिल्ह्यांमधून आपले सहकारी पाठवून समस्त क्रांतिकारकांचे लहान लहान गट आयोजित केले. एकाच वेळी अनेक ठिकाणी उठाव व्हावेत अशी त्यांची इच्छा होती परंतु तसे साथीदार त्यांना मिळाले नाहीत. शहराशहरांतून ब्रिटिश राज्यकर्त्यांविरुद्ध भाषणे देऊन त्यांनी सुशिक्षितांना कृतिशील बनवण्याचा प्रयत्न केला . काही योजना आखल्या परंतु पांढऱ्यापेशा सुशिक्षित वर्गाकडून त्यांना म्हणावा तसा पाठिंबा मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी रामोशी, धनगर या लोकांना संघटित केले आणि स्वतःच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांच्या विरोधात मोहीम हाती घेतली. पुण्याजवळील लोणीकंद येथे बंडवाल्यांचे मुख्य कार्यालय स्थापन करण्यात आले. सरकारी खजिने, सावकार, व्यापारी यांच्यावर धाडी घालण्याच्या योजना आखण्यात आल्या. शासनाची नाकेबंदी करण्यासाठी रेल्वे, तुरुंग, तार, आणि टपाल कचेऱ्या उध्वस्त करण्याचे ठरवण्यात आले. २२ फेब्रुवारी १८७९ रोजी रामोशांच्या मोठ्या जमावाला जेवण घालण्यात येऊन कोणास चांदीचे कडे, तर कोणाला शेला पागोटे, कोणाच्या हातावर पाच दहा रुपये ठेवण्यात आले व ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंड पुकारल्याचे जाहीर करण्यात आले. आता अन्यायी इंग्रज अधिकाऱ्यांचे वध करण्यासाठी त्यांना शस्त्रास्त्रे हवी होती. त्यासाठी त्यांनी सेठ, सावकारांच्या घरावर दरोडे घालण्यास सुरू केले. त्यामधून संपत्ती जमा केली. शस्त्राचे साठे केले. त्यानुसार बंडखोरांनी धामारी, दावडी, व्हावे, हर्णे, सोनापूर, चांदखेड इत्यादी सह्याद्रीच्या कुशीतील गावे लुटली. शस्त्रास्त्रे गोळा करून आणि रामोशा सारख्या जमातींना हाताशी धरून त्यांनी महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यात मोठी खळबळ माजवून टाकली. इंग्रजी कारभार कोलमडून टाकला की इंग्रजांना राज्य करता येणार नाही असे त्यांना मनोमन वाटत होते. त्यातूनच त्यांनी इंग्रजी सत्तेपुढे मोठे आव्हान निर्माण केले. तेव्हा सरकारने त्यांना पकडण्यासाठी बक्षीस जाहीर केले व या मोहिमेसाठी मेजर डॅनिएलची नियुक्ती केली. वासुदेव बळवंत फडके हे गाणगापूरला आहेत असे समजताच मेजर डॅनिएलने गावाला वेडा दिला. परंतु फडके यांनी तेथून पालायन केले. त्यांचा पाठलाग सुरू झाला. २१ जुलै १८७९ रोजी निद्रित अवस्थेत वासुदेव बळवंत फडके असताना त्यांच्या अनुयायांसह पकडले गेले. कोर्टात त्यांना जन्मठेपेची काळ्या पाण्याची शिक्षा झाली. पुढे त्यांची रवानगी १८८० च्या जानेवारीत एडनच्या तुरुंगात झाली. तेथून आत्महत्या करण्याचा व पळून जाण्याचा त्यांचा प्रयत्न फसला. तुरुंगातील हाल, एडनची उष्ण हवा यामुळे त्यांची प्रकृती बिघडली आणि क्षयरोगाने त्यांना पछाडले. त्यातच अखेरीस त्यांनी अन्नग्रहण करणे सोडले त्यामुळे ते एडन येथील कारावासातच मरण पावले.

वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिश सरकारविरुद्ध स्वातंत्र्यासाठी जो सशस्त्र लढा पुकारला तो एकाकी

होता, त्यांना अनुयायी लाभले नाहीत व शस्त्रसामग्रीही मिळाली नाही. तथापि भारतात त्यांनी पहिल्यांदाच अशा प्रकारच्या सशस्त्र लढ्याची मुहूर्तमेढ रोवली. ही सशस्त्र उठावाची चळवळ विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात देशभर पसरली. म्हणूनच त्यांना लढाऊ राष्ट्रवादाचे जनक म्हटले जाते. त्यांच्या कार्याचा उचित गौरव शिरढोण येथे त्यांचा स्मारक स्तंभ उभारून करण्यात आला. तर अमृतबजार पत्रिकेने १८७९ मध्ये वासुदेव बळवंत फडके यांच्या संबंधित लिहिलेल्या लेखात, देशप्रेमाने ओतंबलेल्या हिमाचलासारखा उत्तुंग महापुरुष असे म्हटले आहे. यावरून त्यांच्या सशस्त्र क्रांति कार्याची महती लक्षात येते.

**२) सेनापती बापट :**

क्रांतिकारकांच्या स्वातंत्र्यलढ्यात सेनापती बापट यांनीही अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावली. त्यांचा जन्म नगर जिल्ह्यामध्ये १८८० साली झाला. त्यांचे नाव पांडुरंग महादेव बापट असे होते तर गांधीयुगात त्यांना सेनापती म्हणून ओळखले जायचे. पुढे ते सेनापती बापट म्हणूनच परिचित झाले. पुण्यात शिक्षण घेत असताना चाफेकरांचे मित्र भिडे दामोदर बळवंत उर्म भटजी यांची ओळख झाली. त्यांच्याजवळ म. शी. रणदिवे आणि अण्णासाहेब दास्ताने यांच्या उपस्थितीत त्यांनी क्रांतिकार्याची शपथ घेतली. मातृभूमीसाठी सर्वस्वाचा त्याग त्यांनी केला. राष्ट्रवादाने भारावून गेलेला हा तरुण इंजिनिअरिंगचे शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेले होते तेव्हा त्यांचा क्रांतिकारकांशी जवळून संबंध आला. अभिनव भारत या संघटनेशी त्यांचा अतिशय जवळून संबंध होता. याच संघटनेमार्फत बॉम्ब तयार करण्यासंबंधीची आवश्यक ती माहिती मिळावी म्हणून त्यांना पॅरिसला पाठवण्यात आले होते. तेथे त्यांनी हेमचंद्र दास व मिर्झा अब्बास या भारतीय क्रांतिकारकांबरोबर राहून बॉम्ब तयार करण्याच्या पद्धतीची संपूर्ण माहिती देणारे एक रशियन पत्रक इंग्रजीत अनुवादित करून घेतले व त्याच्या अनेक प्रती काढून त्या विविध भागातील निरनिराळ्या क्रांतिकारी कैद्यांना पाठवण्यासाठी भारतात आणल्या. देशभर सशस्त्र उठाव घडवून आणण्याच्या दृष्टीने सुसंघटित व सुसज्ज प्रयत्न करून देशव्यापी संघटना तयार करावी असे ते नेहमी म्हणत असतात.

**३) चाफेकर बंधू व रँडची हत्या :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात दामोदर, वासुदेव व बाळकृष्ण हे तीन बंधू चाफेकर बंधू म्हणून ओळखले जातात. प्रखर राष्ट्रवादी व क्रांतिकारी विचाराने ते भारावलेले होते. ब्रिटिशांच्या अन्यायी जुलमी व अत्याचारी कारभाराच्या विरोधात ते पेटून उठले होते. दामोदर चापेकर यांनी १६ ऑक्टोबर १८९६ रोजी व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्याला डांबर पासून चपलांची माळ घालण्याचे क्रांतिकार्य केले होते. धर्मांतर करून इंग्रज राजवटीची तारीफ करणाऱ्या मुंबईच्या प्रो. बोलीनकरांना दामोदर चापेकर यांनी भर रस्त्यात मारहाण करण्याचे धाडस केले होते. तर पुढे १८९६ मध्ये पुणे येथे सावत्र मामा लोंढे यांच्या मालिकीच्या जागेत चाफेकर क्लबची सुरुवात केली. तसेच व्यायाम मंडळाची स्थापना केली. दामोदर चाफेकर हे प्रखर राष्ट्रवादी तर होतेच पण त्याशिवाय समाज जागृती करण्यासाठी ते सर्व महाराष्ट्रभर कीर्तन करीत फिरत असत. केवळ छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन चालणार नाही तर कृतीमध्ये त्याचे अनुकरण केले पाहिजे, असे आवाहन ते करत होते

नेहमी संघर्षासाठी सज्ज राहा, त्यासाठी शस्त्रास्त्रे तयार केली पाहिजेत, जुलमी ब्रिटिशांची हकालपट्टी

करण्यासाठी सशस्त्र क्रांती लढा उभा करण्यावर त्यांनी नेहमीच भर दिला. गणपती व शिवजयंती उत्सवांमुळे महाराष्ट्रातील तरुण पिढीत नवचैतन्य निर्माण झाले होते. यातच १८९६ मध्ये महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला. लोक अन्न अन्न करून तडफडू लागले. पण सरकारने त्यावर कोणतीच उपाययोजना केली नाही. त्यातच भर म्हणून १८९७ मध्ये पुण्यात प्लेगची भयंकर साथ आली. या साथीमध्ये ताप येऊन काखेत अगर गुडघ्याच्या सांध्यात लिंबाएवढा गोळा उठला म्हणजे लोकांच्या पोटात भीतीचा गोळा उठत होता. कारण काही काळ रोग्याला वेदना होऊन रोग्याचा मृत्यू होत होता. तेव्हा प्लेगच्या साथीचे निर्मूलन करण्यासाठी सरकारने सातारा जिल्ह्याचे असिस्टंट कलेक्टर मिस्टर रँड यांची नियुक्ती केली. परंतु त्याने पुण्यामध्ये जुलूमशाही सुरू केली. लष्कराच्या साह्याने जबरदस्तीने लोकांना घराबाहेर काढले, सैनिक बूट घालून देवघरांमध्ये घुसू लागले, त्यांनी देवघरांचेही विटंबना केले. प्लेग निवारणाचे काम करणाऱ्या गोऱ्या शिपयांकडून सामान्य जनतेवर होत असलेल्या अत्याचाराच्या बातम्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नजरेस आणून देण्यासाठी शेकडो अर्ज व निवेदने पुण्याच्या नेत्यांनी सरकारकडे पाठवली होती. परंतु त्याला दाद मिळत नव्हती. पुण्यामध्ये रँड शाहीने थैमान घातले होते. त्यातूनच रँडच्या हत्तेचा गट शिजला.

२२ जून १८९७ रोजी व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाच्या हीरक महोत्सवाच्या समारंभाहून परत जात असताना बग्गीतून जाणाऱ्या मिस्टर रँड व आयस्टर्न यांच्यावर दामोदर व बाळकृष्ण चाफेकर या बंधूंनी गणेशखिंडी नजीक गोळ्या झाडल्या. त्यात हे अधिकारी मारले गेले. रँडच्या हत्तेमुळे सारा देश हादरून गेला. घरोघरी झडत्या सुरू झाल्या. शेवटी पंचमस्तंभी द्रविड बंधूंनी कटाची बातमी देऊन दामोदर व बालकृष्ण हे कटाचे सूत्रधार असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांना पकडण्यात आले. सरकारने १८ एप्रिल १८९८ रोजी दामोदर चाफेकर यांना फाशी दिली. ८ फेब्रुवारी १८९९ रोजी वासुदेव चाफेकर व महादेव विनायक रानडे यांनी गणेश शंकर व रामचंद्र शंकर द्रविड यांना गोळ्या घालून ठार मारले. रँडच्या वधानंतर ब्रिटिशांची दडपशाही सुरू होती. त्यानंतर सरकारने वासुदेव, महादेव रानडे व बाळकृष्ण चाफेकर यांना फासावर चढविले. सरकारने जी दडपशाही अवलंबली होती त्याचा जाहीर निषेध म्हणून टिळकांनी, सरकारचे डोके ठिकाणावर आहे का, राज्य करणे म्हणजे सूड घेणे नव्हे, या शीर्षकाचे लेख केसरीत प्रसिद्ध केले. चाफेकरांच्या मृत्यूच्या बातमीने त्यांची आई मृत्यू पावली व थोड्याच कालावधीत वडिलांचेही निधन झाले. चाफेकर बंधूंच्या या हौतात्म्याने महाराष्ट्रच नव्हे तर सारा देशच हादरला होता; पण असे असले तरी त्यातून अनेक तरुणांना स्फूर्ती मिळाली होती.

**४) वि. दा. सावरकर : अभिनव भारत सोसायटी :**

स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारी चळवळीमध्ये वि. दा. सावरकर यांचे कार्य अनन्यसाधारण महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील क्रांतिकारकांमध्ये वि. दा. सावरकर हे राष्ट्रीय भावनेने प्रेरित होऊन पारतंत्र्याच्या बेड्या तोडण्यासाठी आयुष्यभर प्रयत्नशील राहिले. ते एक तत्त्वज्ञ, विचारवंत, समाजसुधारक म्हणून ओळखले जातात. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावी झाला. विद्यार्थी दशेपासूनच सावरकर हे राष्ट्रवादी विचारसरणीचे होते. रँडच्या खूणाबद्दल दामोदर चाफेकर यांना फाशी दिलेल्या घटनेचा त्यांच्यावर खूपच परिणाम झाला होता. त्यांनी राष्ट्रीय कार्यास प्रभावित होऊन भगूर येथील देवी समोर शपथ घेतली की, देशाचे स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठी चाफेकर व फडके यांचे अपूर्ण कार्य पूर्ण करण्यासाठी मी सशस्त्र क्रांती करून मरेपर्यंत झुंजेन. चाफेकर बंधूंच्या आत्मबलिदानामुळे ते क्रांतिकार्याकडे

आकर्षित झाले. १८९९ मध्ये त्यांनी नाशिक येथे राष्ट्रभक्त समूह व १९०० मध्ये मित्रमेळा संघटना स्थापन केल्या. त्यांना या कामी त्र्यंबकराव म्हसकर व रावजी कृष्ण यांची मदत झाली. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सशस्त्र प्रतिकाराचा मार्ग अवलंबने, समविचारी तरुणांना मंडळात एकत्र आणणे आणि त्यांना आत्मयज्ञासाठी तयार करणे हा त्यांचा उद्देश होता. तर मातृभूमीच्या सेवेसाठी प्राणार्पण करणे हे एक महान पुण्याईचे कार्य आहे अशी त्यांची शिकवण होती. त्यांनी राष्ट्रभक्त तरुणांची निवड करून १९०४ साली अभिनव भारत सोसायटी ही सशस्त्र क्रांतिकारी संघटना स्थापन केली. या संघटनेत बाबाराव सावरकर, त्र्यंबक रघुनाथ, वामन केशव, रामचंद्र केशव, दातार बंधू आणि नाना वर्तक व त्यांचे बंधू इत्यादी मंडळी होती.

देशाला संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त करणे हे अभिनव भारत संघटनेचे ध्येय होते. तर सशस्त्र क्रांती हे तिचे साधन होते. मित्र मेळ्याचे कार्य उघडपणे चालू होते तर अभिनव भारतचे कार्य गुप्तपणे चालू होते. अभिनव भारत संस्थेमार्फत तरुणांना राष्ट्र प्रेमाचे धडे दिले जाऊ लागले. गुप्त पत्रके काढून सभा व प्रचार करून प्रेरणा दिली जाऊ लागली. सावरकरांनी टिळकांच्या छायेत परदेशी मालाच्या अनेक ठिकाणी होळ्या केल्या. स्वदेशीचा पुरस्कार व प्रचार केला. ते कायद्याच्या शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. इंग्लंडमधील हिंदी तरुणांच्या मनात क्रांतीचे बीजारोपण करूनच मी हिंदुस्थानात परत येईल असे मित्रांना सांगून ते इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी हिंदी तरुणांना प्रेरणा दिली. सावरकर इंग्लंडला गेल्यानंतर अभिनव भारत सोसायटीचे कार्य त्यांचे बंधू गणेश दामोदर यांनी पुढे चालवले. त्यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रात अनेक ठिकाणी या संघटनेच्या शाखा स्थापन करण्यात आल्या. मुख्यतः मुंबई, ठाणे, पुणे, सोलापूर, नाशिक, खानदेशात एकूण ३९ शाखा होत्या. स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची शपथ या संघटनेच्या सभासदांना घ्यावी लागत होती. पंडित श्यामजी कृष्ण वर्मा यांनी शिष्यवृत्ती दिल्यामुळे स्वातंत्र्यवीर सावरकर १९०६ साली बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला गेले. त्यांनी इंग्लंडहून पिस्तुले व काडतुसे नाशिकला पाठवली. तसेच सेनापती बापट व हेमचंद्र दास यांना बॉम्ब बनवण्याचे शिक्षण घेण्यासाठी पॅरिसला पाठवले. भारतात अभिनव भारतच्या सभासदांनी बॉम्ब बनवण्याचे कारखाने नाशिक, पुणे, मुंबई आणि पनवेल इत्यादी ठिकाणी काढले.

१९०७ मध्ये इंग्रज सरकारने १८५७ साली मिळालेल्या विजयाचा महोत्सव करण्याचे ठरविले. त्यास उत्तर म्हणून सावरकरांनी १९०८ रोजी इंडिया हाऊस मध्ये भारताच्या स्वातंत्र्याचे पहिले युद्ध म्हणून या घटनेचा महोत्सव साजरा केला. '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ लिहिला. आणि हिंदी लोकांनी दिलेला हा लढा शिपायांचे बंड नसून तो स्वातंत्र्यलढा होता असे ठाम प्रतिपादन केले. सावरकरांच्या लंडन येथील क्रांतिकार्यावर व नाशिक येथील त्यांच्या बंधुंवर गुप्तहेरांची नजर होती. जून १९०८ मध्ये त्यांच्या घराच्या झडतीत आक्षेपार्ह कागदपत्रे सापडली. म्हणून त्यांच्यावर खटला भरला जाऊन त्यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. विशेष म्हणजे गणेश दामोदर यांना शिक्षा झाल्यानंतर लंडनहून त्यांच्या बंधूनी पाठवलेली पिस्तुले नाशिकला पोहोचली. या पिस्तुलाचा पहिला प्रयोग गणेश दामोदर यांना दंड देणाऱ्या नाशिकच्या न्यायाधीश जॅक्सनवर करण्यात आला. अनंत लक्ष्मण कान्हेरे नावाच्या १७ वर्षाच्या मुलाने २१ डिसेंबर १९०९ रोजी जॅक्सनवर एकापाठोपाठ एक अशा सात गोळ्या झाडून त्याची हत्या केली. या प्रकरणात ३८ जणांना अटक झाली. पैकी तिघांना फाशीची, तिघांना जन्मठेपेची व इतरांना कारावासाची शिक्षा ठोठावली गेली. हा खटला नाशिक खटला म्हणून प्रसिद्ध आहे. सावरकरांच्या सहकाऱ्यांना कठोर शिक्षा झाल्याने ते अस्वस्थ झाले. पॅरिसमधून

लंडनला परत आल्यावर त्यांनी क्रांतिकारी हालचाली पुन्हा चालू ठेवल्या. परंतु विलायची सरकारने जॅक्सनच्या खुणाला जबाबदार ठरवून सावरकरांना कैद केले. त्यांच्यावर खटला चालवण्यासाठी त्यांना हिंदुस्तानमध्ये आणण्यात आले. मार्गात त्यांनी बोटीवरून समुद्रात उडी मारून सुटून जाण्याचा विलक्षण धाडसी प्रयत्न केला पण दुर्दैवाने तो फसला. नाशिकमध्ये शेषन कोर्टसमोर त्यांच्यावरचा खटला चालविला गेला. १२ मार्च १९११ रोजी त्यांना पन्नास वर्षांची सजा फर्मावण्यात आली. यावेळी त्यांचे वय फक्त २८ वर्षांचे होते. त्यांची रवानगी अंदमानच्या तुरुंगात करण्यात आली. १९२४ साली त्यांना हिंदुस्थानात आणून रत्नागिरीच्या तुरुंगात डांबून ठेवण्यात आले. पुढे १९३७ साली प्रांतात काँग्रेस सरकार सत्तेवर आल्यावर त्यांची सुटका करण्यात आली. मातृभूमीवर अनन्यसाधारण प्रेम व स्वातंत्र्याविषयी भक्ती बाळगणारे स्वातंत्र्यवीर सावरकर हे क्रांतिकारकांच्या इतिहासातील श्रेष्ठ व्यक्तिमत्व होते. त्यामुळेच लाखो हिंदी तरुणांना त्यांच्या नि:स्वार्थी देशप्रेमाने व धाडसी कृत्यांनी प्रेरणा मिळाली.

**५) विष्णू गणेश पिंगळे :**

महाराष्ट्रात जे अनेक सशस्त्र क्रांतिकारक झाले त्यामध्ये विष्णू गणेश पिंगळे यांचा समावेश होता. महाराष्ट्रातील या क्रांतिकारकाचा जन्म पुणे जिल्ह्यात झाला. त्यांनी समर्थ विद्यालयात शिक्षण घेतले होते. तर पुढे मेकॅनिकल इंजिनियर होण्यासाठी ते १९११ मध्ये अमेरिकेत गेले होते. पंजाबचे महान क्रांतिकारक लाला हरदयाळ यांच्या संपर्कात आल्यानंतर ते क्रांतिकार्याकडे ओढले गेले. पुणे जिल्ह्यातील गदर पक्षाचे एक प्रमुख कार्यकर्ते म्हणून त्यांना ओळखले जात होते. त्यांनी इतर सहकाऱ्यांच्या सहकार्याने हिंदी सैनिकी छावणीतून सशस्त्र उठाव करण्याची योजना आखली होती. पण मीरतच्या सैनिकी छावणीत उठावाचा प्रसार करताना विष्णू गणेश पिंगळे हे ब्रिटिशांच्या हाती सापडले. पंजाब व बंगालमध्येही एकाच वेळी उठाव करण्याची त्यांची योजना होती तर लाहोर कटाच्या खटल्यात पिंगळे यांना ब्रिटिश सरकारकडून फाशीची शिक्षा देण्यात आली.

**६) अनंत लक्ष्मण कान्हेरे :**

हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामातील हुतात्म्यांचा अग्रणी ठरलेला महाराष्ट्रातील क्रांतिकारक म्हणजेच अनंत लक्ष्मण कान्हेरे होय. हा क्रांतिकारक युवक रत्नागिरी जिल्ह्यातील आईचे मेटे येथील राहणारा होता. त्यांचे शिक्षण इंदूर व नंतर औरंगाबाद येथे मामांकडे झाले. पण त्यांचे विचार अतिशय क्रांतिकारी होते. त्यांनी आपल्या मित्रांच्या मदतीने औरंगाबाद येथे एक गुप्त मंडळ स्थापन केले. दरम्यानच नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याचे अन्यायी धोरण व क्रांतिकारकांच्या विरोधातील त्याची कृती अनंत लक्ष्मण कान्होरे यांना सहन झाली नाही. परिणामी त्यांनी २१ डिसेंबर १९९० रोजी जॅक्सनवर गोळ्या झाडून त्याला ठार केले. पुढे ब्रिटिश सरकारने कान्होरे व त्यांच्या साथीदारांना पकडले आणि १९ एप्रिल १९१० रोजी अनंत लक्ष्मण कान्हेरे, कृष्णाजी गोपाळ कर्वे आणि विनायक नारायण देशपांडे यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. हैदराबाद स्वातंत्र्य चळवळीत तसेच महाराष्ट्र व राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्यात हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे व त्यांच्या साथीदारांचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण असल्याने त्यांना गौरवाचे स्थान मिळाले आहे.

**७) राजगुरू शिवराम हरी :**

राजगुरू शिवराम हरी हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक सशस्त्र क्रांतिकारक होते. त्यांचा जन्म एका

मध्यमवर्गीय कुटुंबात खेड येथे झाला. प्राथमिक शिक्षणानंतर ते पुण्याला गेले होते. तेथेच हनुमान व्यायाम शाळेच्या वातावरणात त्यांनी देशभक्तीची दीक्षा घेतली. संस्कृत, मराठी, इंग्रजी, कन्नड, मल्याळम, उर्दू, हिंदी इत्यादी भाषा त्यांनी उत्तमरीत्या अवगत केल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे गनिमी कावा युद्धतंत्र यावर त्यांचा आढळ विश्वास होता. हिंदुस्तान रिपब्लिकन आर्मी मध्ये ते दाखल झाल्यानंतर क्रांतिकारक बनले. त्यांचा बंदुकीचा नेम अतिशय अचूक होता. क्रांति कार्यातूनच त्यांचे शहीद भगतसिंग, जतिनदास, सुखदेव इत्यादी क्रांतिकारक नेत्यांशी मैत्री झाली. सायमन कमिशनच्या विरोधात झालेल्या पोलिस हल्ल्यात लाला लजपतराय जखमी होऊन त्यातच त्यांचा मृत्यू झाला. तेव्हा त्यांच्या मृत्यूचा बदला घेण्याचे पंजाबमधील क्रांतिकारकांनी ठरवले. त्यासाठी चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरू, जय गोपाल इत्यादींची नेमणूक करण्यात आली. लालाजीं वर हल्ला करणारा पोलीस अधिकारी सॅन्डर्स याचेवर लाहोर येथे १७ डिसेंबर १९२८ रोजी राजगुरूंनी पहिल्या दोन गोळ्या झाडल्या. सॅन्डर्सच्या वधानंतर २२ महिन्यांनी म्हणजेच ३० सप्टेंबर १९२९ रोजी राजगुरू यांना पुणे येथे अटक करण्यात आली आणि भगतसिंग, सुखदेव यांच्याबरोबर २३ मार्च १९३१ रोजी फाशी देण्यात आली. पण असे असले तरी ही घटना तरुण क्रांतिकारकांना स्फूर्ती देणारी अशीच ठरली.

अशाप्रकारे महाराष्ट्राच्या सशस्त्र क्रांतिकारकांच्या कार्याचा भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात मोलाचा वाटा आहे. महारास्त्रातील अनेक क्रांतिकारकांनी सशस्त्र क्रांतीच्या मार्गांचा अवलंब करून ब्रिटिशांना सळो कि पळो करून सोडले आणि आपल्या क्रांती कार्याचा एक सुवर्ण अध्याय घडविला.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

**अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. ......... यांना आद्यक्रांतिकारक म्हणून ओळखले जाते.

अ) वासुदेव बळवंत फडके ब) चंद्रशेखर आझाद

क) नेताजी सुभाषचंद्र बोस ड) वि. दा. सावरकर

२. ........... यांनी मित्रमेळा नावाची संघटना (मंडळ) स्थापन केले.

अ) पांडुरंग महादेव बापट ब) नारायणराव सावरकर

क) विनायक दामोदर सावरकर ड) आनंत लक्ष्मण कान्हेरे

३. नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याला ठार मारण्याचे काम ............. या क्रांतिकारकाने केले.

अ) मदनलाल धिंग्रा ब) अनंत लक्ष्मण कान्होरे

क) विनायक नारायण देशपांडे ड) विष्णू गणेश पिंगळे

४. ............ यांनी रॅन्डची गोळ्या झाडून हत्या केली.

अ) सावरकर बंधू ब) दातार बंधू

क) घोष बंधू ड) चाफेकर बंधू

५. पोलीस अधिकारी सॅन्डर्सवर १९२८ रोजी .......... यांनी गोळ्या झाडल्या.

अ) राजगुरू ब) विष्णू गणेश पिंगळे

क) लाला हरदयाळ ड) सेनापती बापट

## ३.३ सारांश :

जाज्वल्य देशभक्तीचा दृश्य अविष्कार म्हणजेच क्रांतिकारकांची चळवळ होय. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जहाल तरुणांनी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने चळवळ केली. परकीय सत्तेच्या गुलामगिरी मधून मातृभूमीची सुटका करण्यासाठी राष्ट्रभक्तीने भारावून गेलेल्या क्रांतिकारकांचे राष्ट्रप्रेम, त्याग, निष्ठा, साहस व आत्मसमर्पण करण्याची वृत्ती याला खरोखरच इतिहासात तोड नाही. विशेषतः पंजाब, बंगाल व महाराष्ट्रामधील सशस्त्र क्रांतिकारकांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याची चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. त्याचा परिणाम भारताच्या इतर प्रांतात ही घडून आला. कारण इतर प्रांतात ही क्रांतिकारकांचा उदय होऊन त्यांनी सशस्त्र क्रांतिकारी चळवळी घडवून आणल्या. खरंतर एकाच कालखंडात देशाच्या स्वातंत्र्यासाठी नेमस्त, जहाल आणि क्रांतिकारक कार्य करताना आढळून येतात. त्यांचे ध्येय एकच होते पण मार्ग मात्र भिन्न होते. हिंसेने, पाशवी बलाने आणि अन्यायी प्रवृत्तीने निर्माण झालेले ब्रिटीश साम्राज्य त्याच मार्गाने उकडून फेकणे शक्य आहे नव्हे तर तोच मार्ग योग्य आहे अशी क्रांतिकारकांची धारणा होती. एखाद्या ब्रिटिश अधिकाऱ्याला ठार मारून मूळ प्रश्न सुटणार नाही हे त्यांना मान्य होते. पण निर्माल्यवत बनलेल्या देशाला खडबडून जागे करण्यासाठी व स्वातंत्र्याची चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी असे वध उपयुक्त ठरतील अशी त्यांची श्रद्धा होती. म्हणूनच देशासाठी प्राणार्पण करणे, हौतात्म पत्करणे, आनंदाने फासावर जाणे, कठोर शिक्षा सहन करणे यासारख्या गोष्टी क्रांतिकारकांना नेहमीच अभिमानास्पद वाटत होत्या.

या क्रांतिकारी चळवळीत काही उणीवाही होत्या. कारण ही चळवळ भावनाविवश तरुणांपुरती मर्यादित राहिली. मध्यमवर्गीय व सामान्य जनतेचा सहभाग राहिला नाही. त्यामुळे ब्रिटिशांना ती चिरडून टाकणे सोपे गेले. या क्रांतिकारी चळवळींचे मूल्यमापन करताना डॉ अमलेश त्रिपाठी म्हणतात कि, ''क्रांतिकारकांनी भारताच्या स्वातंत्र्य इतिहासाचे एक रंगतदार व स्फूर्तीदायक प्रकरण घडविले आहे. त्यांच्या योजनातील व कृत्यांतील निकराई, धाडस, अविचलीतपणा, व मृत्यूविषयी बेपर्वाई या गुणांनी त्यांना देशाच्या स्मृतीत आढळ स्थान मिळवून दिले आहे. परंतु त्यांचे धाडस व त्याग कितीही मोठे आसले तरी अपयश हीच त्यांची नियती होती.'' पण असे असले तरी त्यांनी फारशी साधनसामग्री हाताशी नसतानाही केवळ आपल्या असाधारण इच्छाशक्तीच्या, अतूट निर्धाराच्या आणि अतुलनीय धाडस व पराक्रमाच्या बळावर महाबलाढ्य इंग्रजी सत्तेपुढे अल्पकाळासाठी का असेना पण एक जबरदस्त आव्हान उभे केले होते. इंग्रजांच्या जुलमी सरकारवर एक दहशत बसवली होती. त्यांनी आपल्या पराक्रमाने भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात नवचैतन्य निर्माण केले आणि सामान्य जनतेमध्ये क्षात्रतेज जागृत करून तिला राष्ट्रकार्यात सहभागी होण्याची प्रेरणा दिली हे कदापि नाकारता येणार नाही. म्हणूनच भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात सशस्त्र क्रांतिकारी चळवळींचे योगदान अतिशय महत्त्वाचे व प्रेरणादायी असल्याचे दिसून येते.''

**३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :**

**१) सशस्त्र :** शस्त्राच्या सहाय्याने

**२) आत्मसमर्पण :** देशासाठी बलिदान देणे

**३) उखडून टाकने :** उध्वस्त करणे, नामशेष करणे

**४) स्वदेशी :** आपल्याच देशातील

**५) आद्य :** प्रथम

**३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

१. अ- गुरु रामसिंग २. क- काकोरी

३. ड- भगतसिंग व बटुकेश्वर दत्त

४. अ- भगतसिंग ५. ब- रासबिहारी घोष

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

१. अ- वीरेंद्र कुमार घोष व भूपेंद्रनाथ दत्त २. ब- बंगाल

३. ड- सूर्यसेन ४. ड- बिना दास

५. क - खुदीराम बोस व प्रफुल्ल चाकी

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३**

१. अ- वासुदेव बळवंत फडके २. क- विनायक दामोदर सावरकर

३. ब- अनंत लक्ष्मण कान्हेरे ४. ड- चाफेकर बंधू

५. अ- राजगुरू

**३.६ सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) टीपा लिहा.**

१) चाफेकर बंधू २) काकोरी कट

३) रासबिहारी घोष ४) चंद्रशेखर आझाद

५) चितगाव कट

**ब) पुढील लघुत्तरी प्रश्न सोडवा.**

१) सरदार भगतसिंग यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील क्रांती कार्याची चर्चा करा.

२) स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांचे क्रांतीलढ्यातील कार्य स्पष्ट करा.

३) वासुदेव बळवंत फडके यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील कार्याची माहिती द्या.

४) भारतातील क्रांतिकारी चळवळींच्या उदयाची करणे सांगा

**क) पुढील दीर्घोत्तरी प्रश्न सोडवा.**

१) पंजाबमधील सशस्त्र क्रांतिकारी चळवळीची माहिती लिहा.

२) महाराष्ट्रातील क्रांतिकारकांच्या कार्याचा आढावा घ्या.

३) बंगालमधील सशस्त्र क्रांतिकारी चळवळ स्पष्ट करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :


१. Bhattacharjee -run, History of modern India (1907 to 1947) Ashish Publishing house, New Delhi, 1976

२. Bipin Chandra, India‘s struggle for Independence (1857 to 1947) Ksagar Publication, Pune, 2010

३. Sarkar Sumit, modern India, 1855 to 1947, Macmillan India Ltd, Madras, 1986

४. Tara Chand, history of freedom movement in India, vol 1 to 4, Publication division, Government of India, New Delhi ,1961 to 1972

५. Sumit Sarkar, Modern India, Macmillan Publication ltd, Madras, 1989

६. वाळिंबे व्ही. एस, सत्तावन्न ते सत्तेचाळीस स्वतंत्र्यलढ्याची संस्मरणीय कहाणी, राजहंस पब्लिकेशन, पुणे.

७. ग्रोवर बी.एल, वेल्हेकर एन. के, आधुनिक भारताचा इतिहास, एस चंद्र पब्लिकेशन, नई दिल्ली.

८. वैद्य सुमन, कोटेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१९२० ते १९४७)

९. सरकार सुमित, आधुनिक भारत का इतिहास, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली.

१०. चंद्र व इतर (अनुवाद मा. कृ. पारधी), स्वतंत्र्याचा लढा, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली.


❍❍❍

घटक ४

# फाळणी आणि स्वातंत्र्य

---

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ जातीयवाद आणि फाळणी
- ४.२.२ संस्थानांचे विलीनीकरण (जुनागड, हैद्राबाद, काश्मीर)
- ४.२.३ राज्यघटना : उद्देशिका, मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्य आणि जबाबदारी

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला पुढील घटकांचे आकलन होईल,

१) जातीयवाद संकल्पना स्पष्ट होईल.

२) जातीयवादाचे स्वरूप समजून घेता येईल.

३) फळणीची कारणे माहिती होतील.

४) फाळणीचे परिणाम समजून घेता येतील.

५) राज्यघटनेची उद्देशिका समजेल.

६) मूलभूत हक्क, कर्तव्य व जबाबदाऱ्या समजून घेण्यास मदत होईल.

## ४.१ प्रास्ताविक :

ब्रिटिशांची भारतात हळूहळू सत्ता स्थिर झाल्यानंतर इथे राष्ट्रीयत्वाची भावना प्रबळ होत गेली. यापुढे भारतीय स्वातंत्र्य चळवळ दिवसेंदिवस तीव्र होत जाणार, हे अचूकपणे ब्रिटिशांनी हेरले. Divide and Rule या तत्त्वानुसार त्यांनी वाटचाल केली. काँग्रेसच्या प्रारंभीच्या काळात हिंदू व मुसलमान या भारतातील प्रमुख दोन जमाती खांद्याला खांदा लावून कार्य करीत होत्या. १९ व्या शतकात मुस्लिमांच्यात जातीयवादाचा उदय झाला. जागतिकीक राजकारणात मुरलेल्या ब्रिटिशांनी सर सय्यद अहमदखान यांना हाताशी धरून हिंदू व मुसलमान यांच्यात फूट पडण्याचा उद्योग सुरू केला. त्यांनी मुस्लिमांची तुष्टीकरण्याच्या धोरणाचा अवलंब केला. १९०५ मधील बंगालच्या फाळणीद्वारा मुस्लिमबहुल असा पूर्वबंगाल हा स्वतंत्र प्रांत निर्माण करण्यामागे मुसलमानांचा अनुनय करण्याचे ब्रिटिशांचे धोरण उघडपणे स्पष्ट झाले. त्याचा त्वरित परिणाम झाला तो म्हणजे १९०६ मध्ये मुस्लिमांनी स्वतःचा मुस्लिम लीग हा स्वतंत्र पक्ष निर्माण केला. भारतात मुसलमानांनी सवतासुभा स्थापन करण्याच्या प्रक्रियेचा तो प्रारंभ होता. पुढे ब्रिटिशांनी १९०९ च्या कायद्यानुसार त्यांना स्वतंत्र मतदार संघ दिले.

विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापर्यंत हिंदू व मुसलमानांचे संबंध काहीसे बरे होते, मात्र तिसऱ्या दशकाच्या शेवटी शेवटी हे संबंध बिघडू लागले. १९३० च्या अलाहाबाद अधिवेशनाने लीगने स्वतंत्र राष्ट्राचा पुरस्कार केला. दिवसेंदिवस त्यांच्या मागणीने उग्र, हिंसक रूप धारण केले. परिणामी भारताची फाळणी करून मुसलमानांना पाकिस्तान द्यावा लागला, ही घटना भारताच्याच नव्हे तर आशिया खंडाच्या राजकारणावर भावीकाळात परिणाम करणारी ठरली आहे. भारतातील या जातीयवादाच्या विकासाला केवळ हिंदू-मुस्लिम दोन धर्मातील विरोध एवढेच धार्मिक कारण होते असे म्हणता येणार नाही तर त्यापेक्षा या देशात ब्रिटिशांच्या पाठिंब्याने खेळले गेलेले जातीय राजकारण जबाबदार आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात जातीयवाद आणि फाळणी हे दोन्ही घटक परस्पराशी संबंधित असून जातीयवादाची फलश्रुती फाळणी ठरली. स्वातंत्र्योत्तर काळात संस्थानांच्या विलीनीकरणाची समस्या अवघड होती. भारताच्या ऐक्याला मारक होती, कारण विलीनीकरणाबाबत काही संस्थानांनी आडमुठी व राष्ट्रविरोधी भूमिका घेतली होती. जुनागड, काश्मीर, हैदराबाद वगळता बहुसंख्य संस्थाने ऑगस्ट १९४७ पर्यंत भारतीय संघराज्यात विलीन करण्यात आली होती. इतक्या मोठ्या संख्येने

असलेली जवळ जवळ स्वतंत्र अशी संस्थाने इतक्या अल्पकाळात व नाममात्र शस्त्रबळाचा वापर करून एका राष्ट्रात विलीन करून घेतल्याचे उदाहरण जगाच्या इतिहासात क्वचितच आढळेल.

याच काळात स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्याचे काम सुरू होते. स्वतंत्र भारताची राज्यघटना २६ नोव्हेंबर १९४९ ला तयार झाली व २६ जानेवारी १९५० पासून लागू करण्यात आली. क्रिप्स योजनेत ब्रिटिश सरकारने भारतासाठी घटना समिती स्थापन करण्याचे मान्य केले होते. भारतीय राज्यघटनेची प्रास्ताविका किंवा सरनामा हा अत्यंत मौल्यवान भाग आहे. मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्य आणि जबाबदाऱ्या राज्य घटनेत विस्तृतपणे दिले आहेत. जगातील ही सर्वात मोठी व विस्तृत घटना मानली जाते. प्रस्तुत प्रकरणात आपण त्याचाच आढावा घेणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ जातीयवाद आणि फाळणी :

धर्मनिरपेक्षता व जमातवादातून परस्परविरोधी संकल्पनांच्या बाबतचे वादविवाद राजकीय भाषणे प्रसारमाध्यमे, वृत्तपत्रे यांच्यावर मोठ्या प्रमाणात झडत असतात. या वादविवादांच्या परिणामस्वरूप जमातवाद हा शब्द आपल्या चर्चा विश्वात खूपच रूढ झाला. त्याचप्रमाणे जमातवादी अथवा जातीयवादी विचारसरणी हा शब्द देखील आपल्या जीवनात गेल्या कित्येक दशकांच्या पासून अस्तित्वात असल्यामुळे जातीयवाद ही संकल्पना अत्यंत स्पष्ट असल्याचे वाटते, मात्र वास्तवात जातीयवाद किंवा जमातवाद ही संकल्पना अत्यंत जटिल असून कित्येक वर्षाच्या प्रक्रियेतून निर्माण झाली आहे. बिपिनचंद्र यांच्या मते, जमातवाद ही एक विचारसरणी आहे. या विचारसरणीचा विश्वास आहे की, भारतीय समाज धार्मिक समूहामध्ये विभाजित असून या समूहाचे आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक हितसंबंध हे फक्त भिन्न भिन्न नसून परस्परविरोधी आहेत. यामुळे जातीयवाद ही मुलतः जी विचारसरणी आहे, जिच्या आधारावर जमातवादी राजकारण उभे राहते. हिंदू, मुस्लिम, शीख अथवा ख्रिश्चन जमातवादी एकमेकापेक्षा वेगळे नसून ते एकाच वृक्षाच्या वेगवेगळ्या फांद्या आहेत. एखादी व्यक्ती स्वतःच्या धर्माचे पालन करत असेल किंवा त्याची स्तुती करत असेल अथवा अभिमान बाळगत असेल तर त्याला जमातवादी म्हणणे योग्य ठरणार नाही, त्यामुळे जमातवाद व्यवस्थितपणे समजून घेणे आवश्यक आहे.

१९ व्या शतकात भारतात सांप्रदायिकता किंवा जातीयवादाचा झालेला उद्भव, ही भारतीय इतिहासातील दुरगामी परिणाम करणारी घटना ठरली. कारण जातीयवाद ही आधुनिक भारतातील प्रमुख समस्या बनली आहे. २१ व्या शतकात ही तिने उग्र स्वरूप धारण केले आहे. जातीयवादाच्या समस्येला केवळ हिंदू-मुस्लिम प्रश्न किंवा त्या दोन धर्मामधील विरोध परस्परपूरक ठरले असे म्हणणे योग्य नाही. या समस्येचा धार्मिक कमी आणि राजकीय जास्त असा आधार आहे. याशिवाय इंग्रज व त्यांचे धोरण मोठ्या प्रमाणात परस्परपूरक ठरले. भारतीय समाजात विविध धर्म, पंथ, जातींचे लोक आहेत, त्यांचे हितसंबंध वेगवेगळे असतात. काही वेळा हेच संबंध परस्परविरोधी असताना आपल्या जाती-धर्मातील लोकांचे संघटन करणे, त्यांचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक हितसंबंध जोपासण्याकरता सर्वतोपरी प्रयत्न करणे, इतर धर्मियांना कमी लेखणे, त्यांचा द्वेष करणे, स्वतःचा धर्म तत्वे श्रेष्ठ मानने, याला जातीयवाद किंवा सांप्रदायिक वाद असे म्हटले जाते. याबाबत ए. आर.

देसाई म्हणतात की, ''धर्म व संस्कृतीला श्रेष्ठ मानून राजकीय हेतू साध्य करणाऱ्या विचारास सांप्रदायिकता म्हणतात.'' तर आर. सी. मुजुमदार यांच्या मते, ''सांप्रदायिकता म्हणजे धर्म व राजकारणांचा वापर स्वतःच्या स्वार्थाकरिता करणे होय.''

मुस्लिम जातीयवाद किंवा संप्रदायिकता भारतातील हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन सांप्रदायिकता या एकमेकापासून फारसा वेगळ्या नाहीत. त्यांना एकाच विष वृक्षाच्या फांद्या आहेत असे म्हणता येईल. १९ व्या शतकाच्या शेवटी मुस्लिम अलगता वादाचा उदय झाला. मुस्लिम राजवटीत राजकीय, मुलकी, लष्करी इत्यादी क्षेत्रात अग्रेसर असनारा मुस्लिम समाज ब्रिटिश राजवटीत प्रारंभीच्या काळात हिंदूंच्या तुलनेने मागे राहिला. पाश्चिमात्य शिक्षण पद्धती, विचार संस्कृती इत्यादीचे आकलन न झाल्याने हा समाज मागास राहिला. मुस्लिम विचारवंतांनी सांप्रदायिक विचारसरणी मांडण्यास सुरुवात केली. यामध्ये सर सय्यद अहमदखान, प्राचार्य बेक, महंमद इकबाल, रेहमत अली, बॅरिस्टर मोहम्मद अली जिना यांचा उल्लेख करावा लागेल. १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्या वेळी मुस्लिमांनी हिंदूंच्या बरोबरीने ब्रिटिशांशी लढा दिला. बेगम हजरत महल, मौलवी अहमदुल्ला इत्यादींनी नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई यांना ब्रिटिशांच्या विरोधात मोठ्या इर्षेने साथ दिली. कंपनी सरकारच्या राजवटीत मुस्लिमांचा प्रखर विरोध होता, हे मान्य करावे लागेल. ब्रिटिशपूर्व काळात उत्तर भारतातील अनेक प्रांतातून मुस्लिम जमात राज्यकर्ती होती, पण कंपनी सरकारच्या राजवटीत त्यांची संस्थाने गेली, अधिकारपदे गेली. इंग्रजी भाषा शिकण्याकडे त्यांचा कल नसल्याने शासकीय नोकऱ्यांची संधी गेली, त्यामुळे त्यांनी १८५७ च्या उठावात कंपनी राजवटीला विरोध केला. १८५८ च्या कायद्यानंतर भारतात सत्तांतर झाले. पार्लमेंटची सत्ता स्थापन झाली, परंतु ब्रिटिश राज्यात त्यांना वाटणाऱ्या अविश्वासामुळे मुस्लिम समाज राज्यकारभारापासून अलिप्त व इंग्रजी भाषेविषयी अज्ञानी राहिला.

**सर सय्यद अहमदखान :**

मुस्लिम समाजाला इंग्रजी भाषेचे महत्व पटवून देऊन या वैफल्यग्रस्त जमातीला राजकीय दृष्टीने जागृत करण्याचे काम सर सय्यद अहमदखान यांनी सर्व प्रथम केले. त्यांचा जन्म १८१७ मध्ये दिल्लीतील सधन कुटुंबामध्ये झाला. वडील विद्वान उलेमा होते, त्यामुळे त्यांनी उर्दू, फारशी, अरबी या भाषांचा अभ्यास केला. पाश्चिमात्य शिक्षण घेतले. विद्या अभ्यास पूर्ण झाल्यानंतर त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीत नोकरी केली. आधुनिक शिक्षणाचा व इंग्रजी भाषेचा स्वीकार केल्याशिवाय मुस्लिम समाजाची प्रगती होणार नाही हे त्यांनी ओळखले. शैक्षणिक प्रगतीबरोबर त्यांची आर्थिक उन्नती आवश्यक आहे, यासाठी त्यांना व्यापार व उद्योग धंद्यात प्रवेश करावा असे वाटत होते. १८६४ मध्ये त्यांनी सायंटिफिक सोसायटी स्थापन केली. ब्रिटिश इंडियन असोसिएशनची स्थापना करण्यामध्ये त्यांनी पुढाकार घेतला. मुस्लिम समाजाच्या उत्कर्षासाठी ते प्रयत्नशील होते. १८७५ मध्ये त्यांनी 'अँग्लो मोहमेडन ओरिएंटल स्कूल'ची स्थापना अलीगड येथे केली. १८७८ मध्ये या स्कूलचे रूपांतर कॉलेजमध्ये झाले. १९२० मध्ये याचे रूपांतर अलीगड मुस्लिम विद्यापीठात झाले. पुढे हे विद्यापीठ भारतातील मुस्लिम राजकारणाचे केंद्र बनले. सर सय्यद अहमदखान हे मुळात हिंदू मुस्लिम ऐक्याचे समर्थक होते. परंतु त्यांच्या विचारात डॉ. अलेक्झांडर बेक यांच्या प्रभावाने बदल होऊन ते हिंदू विरोधी झाले. मुस्लिम जमातीच्या प्रगतीसाठी ब्रिटिशांशी राजनिष्ठ राहणे त्यांना आवश्यक वाटले. म्हणून त्यांनी काँग्रेसच्या राजकीय चळवळीमध्ये मुस्लिमांनी सहभागी होऊ नये अशा मतांचा प्रसार केला. मुस्लिम समाजात अलगतावादाचे बीजारोपण केले.

मुस्लिमांनी हिंदूंच्या राजकीय संकटापासून अलिप्त राहून आपल्या हितसंबंधांचे रक्षण करावे असे विचार डॉ. बेक यांनी सय्यद यांच्या मनावर बिंबवल्याने त्यांनी मुस्लिमांना राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. प्रिन्सिपल बेक यांच्या मार्गदर्शनाखाली १८९३ मध्ये मोहमेडन डिफेन्स असोसिएशन नावाची संस्था स्थापन झाली. मुस्लिमांचे हितसंबंध सुरक्षित राखणे हे त्याचे ध्येय होते.

**मुस्लिम लीगची स्थापना :**

लॉर्ड कर्झन याने १९०५ मध्ये बंगालची फाळणी करून मुस्लिम जातीयवादाला खतपाणी घातले. हिंदू-मुस्लीमांमध्ये फूट पाडणे व मुस्लिमांना खुश करून आपल्या मर्जीत ठेवणे हा फाळणीच्या निर्णयाचा हेतू होता. काँग्रेसच्या वंगभंग आंदोलनामुळे नियोजित फाळणी रद्द झाली, तरी परंतु मुस्लिम बांधवांमध्ये वेगळेपणाची भावना अधिक दृढ झाली. १९०६ मध्ये मुस्लिम शिष्टमंडळाने सिमला येथे व्हाईसरॉय लॉर्ड मिंटोची भेट घेतली व निवेदन दिले. अल्पसंख्यांक मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदार संघ असावेत अशी मागणी केली. मिंटोने याचे स्वागत केले. ३० डिसेंबर १९०६ रोजी 'मुस्लिम लीग' या राजकीय संघटनेची स्थापना झाली. तिचा उद्देश पुढीलप्रमाणे होता.

१) मुस्लिमांच्या हितसंबंधांचे, अधिकारांचे रक्षण करावे.

२) ब्रिटिश सरकारशी एकनिष्ठ राहावे.

३) भारतातील इतर धर्मियांशी सलोख्याचे संबंध ठेवावेत.

लीगने संप्रदायास बळकटी निर्माण केली. अशा प्रकारे मुस्लिम लीगच्या स्थापनेपासून या संघटनेने मुस्लिम जातीयवाद व ब्रिटिशांशी एकनिष्ठता स्वीकारली होती. अंतिमतः ती भारताच्या अखंडतेला घातक ठरली.

**भारतातील जातीयवादाचा उदय व विकासाची कारणे :**

**१) ब्रिटिशांचे फोडा व राज्य करा धोरण :**

ब्रिटिशांनी प्रथमत: हिंदूंना जवळ केले. विरोध लक्षात घेऊन मुस्लिमांना जवळ केले. हिंदू, मुस्लिम, शीख इत्यादीमध्ये ऐक्य होऊ दिले नाही. १९०६ मध्ये मुस्लिम जातीयवाद्यांच्या मागण्या व १९३२ च्या न्याय निवाड्यात सर्व जातीय वाद्यांच्या मागण्या मान्य केल्या. त्यांच्या फोडा व राज्य करा या धोरणामुळे जातीवादाचा उदय व विकास झाला.

**२) मुस्लिम नेत्यांची जातीयवादी विचार प्रणाली :**

ब्रिटिश हेच मुस्लिमांचे रक्षण कर्ते आहेत. हे जाहीर करून मुस्लिमांना काँग्रेस व राष्ट्रवादी चळवळीपासून दूर ठेवले. काँग्रेस ही हिंदू लोकांची संस्था असून तिचे मुद्दे मुस्लिमविरोधी आहेत असे स्पष्ट केले. महंमद इकबाल, रहमत अली, बॅरिस्टर जिना यांनी प्रखर जातीयवादाची विचार प्रणाली मांडली.

**३) हिंदू जातीयवाद्यांनी जातीयवादात घातलेली भर :**

हिंदू जातीयवाद्यांनी संपूर्ण भारतात गोरक्षण व गोहत्या बंदीची चळवळ सुरू केल्याने मुस्लिमांच्यात असंतोष निर्माण झाला. हिंदू महासभेची स्थापना, तसेच जातीयवादाची संकल्पना पुढील काळात वि. दा.

सावरकर, हेडगेवार व गोळवलकर गुरुजी यांनी हिंदु राष्ट्र निर्मितीवर दिलेला भर, तसेच हिंदूधर्म श्रद्धा व संस्कृती धोक्यात आहे असा चालवलेला प्रचार जातीयवादास बळकटी आणणारा ठरला.

**४) भारतीय इतिहास लेखनामधील जातीयवाद :**

भारतीय इतिहासाच्या काही इंग्रज लेखकांनी हिंदू-मुस्लिम प्रश्न डोळ्यांसमोर ठेवून भारतीय संस्कृतीचा इतिहास मांडला. जेम्स मिलने ऐतिहासिक कालखंडाचा आधार धर्म ठरविला. सत्ताधारी धर्माचा दुसऱ्या धर्माशी संघर्ष होत असल्याचे त्यांनी दाखवले. हिंदू जातीयवाद्यांनी ब्रिटिशांचा इतिहास विषयक दृष्टिकोन मान्य करून मध्ययुगीन राज्यकर्ते हे हिंदूविरोधी असल्याचे मत दिले. उलट मुस्लिम जातीय वाद्यांनी मध्ययुगीन काळास भारताचा सुवर्णकाळ असे संबोधले. परिणामी हिंदू-मुस्लिमांचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन परस्परविरोधी झाला.

**५) धर्मसुधारणा चळवळीचा जातीयवादावर अप्रत्यक्ष परिणाम :**

१९ व्या शतकात हिंदू व मुस्लिमांमध्ये धार्मिक सुधारणा चळवळी उदयास आल्या. स्वामी दयानंद सरस्वतींनी शुद्धीकरण चळवळ हाती घेतली. वहाबींनी सर्व बिगर मुस्लिम जनतेप्रति जिहाद पुकारला. विवेकानंदांनी ही प्राचीन भारताच्या गौरवशाली परंपरेचा उल्लेख केला यामुळे काही मुस्लिम नाराज झाले.

**६) नवीन वीरगाथा व जातीयवाद :**

हिंदी राष्ट्रवाद्यांनी प्रतापसिंह, छत्रपती शिवाजी महाराज, गुरु गोविंद सिंग इत्यादी राष्ट्र पुरुष मानून त्यांच्या वीरगाथा समाजात पोहोचविल्या तर अकबर, जहांगीर, शहाजहान, औरंगजेब यांना परकीय म्हटले होते. लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, अरविंद घोष इत्यादींनी हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी प्रयत्न केले, तरी त्यांची भाषणे, लिखाण हिंदू संस्कृतीशी निगडित होते. परंतु मुस्लिम नेत्यांनी याला जातीयवादाचा रंग दिला त्यामुळे जातीयवादाचा प्रसार झाला.

**फाळणी :**

देशाच्या फाळणीला आणि पाकिस्तानच्या उदयाला मुस्लिम लीगचा फुटीरतावाद व जीनांचे अडवणुकीचे धोरण जसे काणीभूत होते, तसे ब्रिटिश राज्यकर्त्यांची फोडा व झोडा आणि राजकारण ही नीतीसुद्धा जातीय दंगली भडकवण्यास व अल्पसंख्यांक मुस्लिमांच्या मनात बहुसंख्य हिंदूंच्या वर्चस्वाविषयी भय निर्माण करण्यास कारणीभूत ठरली होती. आधुनिक भारताच्या किंबहुना विसाव्या शतकातील जगाच्या इतिहासात भारताची फाळणी अत्यंत महत्त्वाची आणि दूरगामी परिणाम करणारी घटना आहे. विविध जातीधर्माचे लोक शतकानुशतके एकत्र राहत असलेल्या देशाचे हिंदू-मुसलमान जमातवादामुळे दोन भाग झाले. फाळणीची कारणे पुढीलप्रमाणे-

**१) जमातवादी जाणिवा आणि ओळख :**

हिंदूमधील आर्य समाज चळवळ, मुस्लिमांमधील तबलीग, तन्जिम इत्यादी धार्मिक चळवळींनी आपापल्या धर्माचे पुनरुत्थान करण्याचा प्रयत्न केला. हे करताना त्यांनी धार्मिक शुद्धतेचा आग्रह धरला. विशिष्ट धर्मीयांनी कसे राहावे, कसे राहू नये, कसा पेहराव करावा, कसा करू नये इत्यादीचा आग्रह धरला. त्यामुळे धार्मिक ओळखी तीक्ष्ण झाल्या. वसाहतीक सत्तेने जनगणना करीत असताना १८७२ पासून त्यात धर्माचा देखील

समावेश केला, त्यामुळे धार्मिक समुदाय म्हणून आपल्या जनसंख्येचा अंदाज विभिन्न धर्मातील राजकीय नेत्यांना आला. आपल्या धर्मातील लोकांखेरीज इतर लोकांना वेगळे लोक म्हणून ओळखण्याची आणि वागविण्याची प्रक्रिया तीव्र झाली. यातून आपल्या धर्माव्यतिरिक्त इतर धर्माच्या लोकांबद्दल इतरे करण होण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यामुळे हिंदू आणि मुस्लिमातील दुही मोठ्या प्रमाणात वाढीस लागली व फळणीस कारण मिळाले.

**२) वासाहतीक आणि जमातवादी इतिहास लेखन :**

प्राचीन भारतीय संस्कृती ही संपन्न होती आणि मुस्लिम आक्रमणामुळे ती लयास गेली, अशी मांडणी जेम्स मिल आणि त्याच्या उत्तराधिकारी असलेल्या साम्राज्यवादी इतिहासकारांनी केली. भारताचा इतिहास हा हिंदू-मुस्लिम संघर्षाचा असल्याची मांडणी केली गेली. हिंदू आणि मुस्लिम या दोन भिन्न आणि परस्परविरोधी संस्कृती असल्याचे चित्र ब्रिटिश इतिहासकारांनी रंगविले. अशा प्रकारची मांडणी काही राष्ट्रवादी इतिहासकार आणि जमातवादी इतिहासलेखनात देखील मुसलमानांच्या शौर्याची व संस्कृतीची वारेमाप स्तुती केली. अशा प्रकारची हिंदू-मुस्लिम संघर्षाचा चुकीचा इतिहास शिकवला गेल्यामुळे त्यांच्यातील दुही वाढीस गेली व ही जमातवादी मांडणी द्विराष्ट्र सिद्धांताला पोषक ठरली.

**३) मुसलमानांचे मागासलेपण आणि १८५७ चा उठाव :**

इंग्रजांनी मुसलमानांना हरवून भारत जिंकून घेतला ही धारणा वासाहतीक शासकांच्या मनात देखील असल्यामुळे इंग्रज अधिकाऱ्यांना मुसलमानापेक्षा हिंदू जवळचे वाटत. या कारणामुळे मुसलमानांचे मागासलेपण वाढीस लागले होते. मुसलमान देखील इंग्रजांशी अंतर ठेवून होते. याच दरम्यान १८५७ च्या उठावात मुस्लिम जमीनदारांचा मोठा सहभाग होता. इंग्रजांशी त्यांचे संबंध बिघडले, मात्र १८७० नंतर भारतात राष्ट्रीय जागृती होऊ लागली, तसे इंग्रजांनी मुस्लिमांशी जुळवून घ्यायला सुरुवात केली. हिंदू व मुस्लिमांचे ऐक्य जसे १८५७ च्या उठावादरम्यान होते तसे पुन्हा होऊ नये असा वासाहतीक शासकांचा प्रयत्न होता. त्यांनी मुस्लिमांच्यात मागासपणाची हिंदूंच्या पुढारलेपणाशी तुलना करून दाखवल्याने हिंदू आणि मुस्लिम यांच्यात दुही निर्माण झाली.

**४) सर सय्यद अहमदखान आणि अलिगड चळवळ :**

सर सय्यद अहमदखान हे इंग्रजांच्या प्रशासकीय सेवेतील एक अधिकारी १८५७ च्या उठावात इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले होते. त्यांनी मुस्लिमांचा मागासलेपणा दूर करण्यासाठी आणि त्यांना वासाहतीक शासनातील नव्या नोकऱ्या मिळवण्यासाठी आवश्यक असणारे आधुनिक शिक्षण देण्याचा पुरस्कार केला. १८७५ ला त्यासाठी मोहमेडन ॲग्लो ओरिएंटल कॉलेजची स्थापना केली. याचेच अलीगड विद्यापीठात पुढे रूपांतर झाले. खान यांनी चालवलेल्या चळवळीस अलिगड चळवळ म्हटले गेले. १८८५ ला राष्ट्रसभा स्थापन झाल्यावर त्यांनी मुस्लिमांनी राष्ट्रीय सभेपासून दूर राहावे आणि इंग्रजांशी एकनिष्ठ राहावे असे आवाहन केले. खान यांनी सतत राष्ट्रीय सभेला विरोध केला. मुसलमानातील विभक्तवादाची सुरुवात सर सय्यद यांच्या काळापासून झाली.

**५) ब्रिटिशांचे 'फोडा व जोडा धोरण' आणि बंगाल फाळणी (१९०५) :**

नवशिक्षित हिंदूमध्ये वाढत्या राष्ट्रवादाचा आणि राष्ट्रीय सभेचा प्रभाव कमी करण्यासाठी आणि सुशिक्षित

मुस्लिमांना या प्रक्रियेपासून दूर ठेवण्यासाठी इंग्रजांनी मुस्लिमांना सवलती देऊन त्यांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न केला. कर्झनने प्रशासकीय कारण देऊन बंगालची फाळणी केली. विभाजित नव्या प्रांतात मुस्लिम बहुसंख्य असल्यामुळे मुस्लिमांना मोठ्या प्रमाणात अधिकारपदे मिळावित आणि मुस्लिमाच्या इंग्रजाप्रती राजनिष्ठा दृढ होतील असा लॉर्ड कर्झनचा कयास होता.

**६) मुस्लिम लीगची स्थापना :**

ढाक्याचे नवाब सलिमूल्ला खान यांच्या पुढाकाराने ३० डिसेंबर १९०६ रोजी मुस्लिम लीगची स्थापना झाली. आगाखान हे अध्यक्ष झाले. मुस्लिमांच्या राजकीय हितसंबंधांचे रक्षण करणे हा हेतू होता. मुस्लिम लीगला सहकार्य करून राष्ट्रसभेपासून तिला दूर ठेवून हिंदू आणि मुसलमान यांच्यात दुही निर्माण करण्याचा इंग्रजांचा प्रयत्न होता.

**७) लखनऊ करार आणि मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदार संघ :**

मोर्लेमींटो कायद्याअंतर्गत मुस्लिमांना कायदेमंडळात स्वतंत्र जागा देण्यात आल्या. १९११ ला इंग्रजांनी बंगालची फाळणी रद्द केल्याने मुस्लिम लीगच्या नेतृत्वाला धक्का बसला. राष्ट्रसभेच्या प्रभावामुळे त्यांच्या सहकार्याने स्वराज्य मिळवता येईल असे मुस्लिमांना वाटले. त्यांच्यात १९१६ मध्ये लखनऊ येथे करार झाला. ब्रिटिशांनी १९१९ व १९३५ च्या कायद्यानुसार मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची व्यवस्था कायम ठेवल्याने विभक्ततावाद वाढत गेला.

**८) हिंदू महासभेची स्थापना (१९१५) :**

ब्रिटिशांच्या कूटनीतीमुळे जमातवादाचा प्रसार हिंदू आणि मुस्लिमात मोठ्या प्रमाणात झाला. हिंदूंचे संघटन आणि मुस्लिमाबद्दल परकेपणाची भावना वाढीस गेली. पंजाब हिंदू सभेची स्थापना झाली होती. त्याचप्रमाणे मध्यप्रांत, संयुक्तप्रांत, बंगालप्रांत आणि बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्ये हिंदू सभांची स्थापना झाली. १९१० मध्ये अलाहाबाद येथे प्रमुख हिंदू नेत्यांनी हिंदू महासभेची स्थापना केली. परिणामी पुढे स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राची मागणी वाढत गेली.

**१०) द्विराष्ट्र सिद्धांत :**

हिंदू आणि मुस्लिम हे दोन वेगवेगळे समाज असून त्यातून मुसलमानांसाठी मुस्लिम बहुल प्रदेश असलेले वेगळे राष्ट्र पाकिस्तान निर्मिले जावे अशी मागणी १९३० नंतर मुस्लिम लीगच्या माध्यमातून झाली. रहमत अली आणि महमद इकबाल यांनी पाकिस्तानची कल्पना मांडली, तर बॅ. जिना यांनी ही मागणी आक्रमकपणे पुढे नेली. १९४० च्या लीगच्या लाहोर अधिवेशनात मुस्लिमांसाठी स्वतंत्र राष्ट्र म्हणून पाकिस्तानच्या मागणीचा ठराव संमत झाला.

**११) प्रत्यक्ष कृती दिन :**

बॅरिस्टर जिना यांनी १६ ऑगस्ट १९४६ हा दिवस प्रत्यक्ष कृती दिन म्हणून पाळला जाईल असे जाहीर केले. या दिवशी हिंदू आणि मुस्लिम यांच्या धार्मिक दंगली भडकल्या. असंख्य लोक मारले गेले. दंगलीमुळे हिंदू-मुस्लिम दुही अधिकच वाढली.

### १२) माउंटबॅटन योजना (प्लॅन) आणि भारताची फाळणी :

राष्ट्रसभा व मुस्लिम लीग नेत्यांशी चर्चा करून माउंटबॅटन यांनी त्यांना रुचेल अशी योजना तयार केली. बंगाल व पंजाब यांचे विभाजन करून मुस्लिम बहुसंख्य प्रदेशाचा पाकिस्तान आणि हिंदू बहुसंख्य प्रदेशाचा हिंदुस्तान अशा प्रकारच्या फाळणीला मान्यता दिली. ३ जून १९४७ ला योजना जाहीर झाली त्यास माउंटबॅटन योजना (प्लॅन) म्हणतात.

**फाळणीचे परिणाम :**

**१) हिंदू – मुस्लिम दंगे :** हिंदू-मुस्लिम जमातवादामुळे मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला, जीवित आणि वित्तहानी झाली. अनेकांच्या कत्तली झाल्या. स्त्रियांचे अपहरण, बलात्कार इत्यादी गोष्टी होत होत्या. नौखाली प्रदेशात हिंसेचा भडका उडाला. म. गांधींनी शांततेसाठी मोर्चा काढला, पदयात्रा केली. अशा प्रकारे जातीय दंगलींना भारताला तोंड द्यावे लागले.

**२) विस्थापितांचा प्रश्न :** या फाळणीने दीड कोटी लोक स्थलांतरित झाले. स्वतःचे घरदार सोडून नेसत्या कपड्यानिशी आलेल्या विस्थापितांची संख्या मोठी होती. त्यांना अन्न, वस्त्र, निवारा देणे ही बिकट समस्या होती. दिल्लीत येणाऱ्या विस्थापितांची संख्या दहा लाख होती. १५ ऑगस्ट ते नोव्हेंबर १९४७ या काळात भारतीय रेल्वेने २३ लाख लोकांची ने-आण केली

**३) निर्वासितांचे पुनर्वसन :** पाकिस्तानातून भारतात आलेल्या निर्वासितांना निवास, कपडे, अन्नपुरवणे तसेच त्यांच्या आरोग्याचा प्रश्न होता. निर्वासित शेतकऱ्यांचा प्रश्न मोठा होता. त्यांची गुरे, शेतीची उपकरणे, बी-बियाणे पुरवणे अवघड होते. निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी समिती स्थापन केली गेली.

**४) सीमाप्रश्न :** फाळणी होत असलेल्या दोन्ही देशांच्या सीमांचा मोठा प्रश्न होता. रेडक्लिम यांच्या अध्यक्षतेखाली सीमा आयोग नेमला होता. ज्या प्रदेशात मुस्लिम किंवा हिंदू जास्त आहेत याचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक होते. त्या प्रदेशात नद्या, कालवे, रेल्वे इत्यादीविषयी आयोगाला फारसी माहिती नव्हती, त्यामुळे काही घटकांवर अन्याय झाला. सीमा निर्धारित करणे अवघड होते. सीमा प्रश्नावरून १९४८, १९६५, १९७१ व १९९९ मध्ये संघर्ष झाला, तरी अद्याप वाद मिटलेला नाही.

**५) संपत्तीची वाटणी :** फाळणीनंतर दोन्ही देशात संपत्तीची वाटणी हा मोठा प्रश्न होता. भारताच्या खजिन्यातील रोख शिल्लक व सार्वजनिक कर्जे या प्रश्नावर मतभेद झाले. भारताने पाकिस्तानला ५५ कोटी द्यायचे होते. महात्मा गांधींच्या उपोषणामुळे भारताला ते द्यावे लागले.

**६) संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न :** फाळणी होताच संस्थाने भारतीय संघराज्यात कशी विलीन करावी हा मोठा प्रश्न होता. ५६२ संस्थानांना स्वतंत्र राहण्याचा किंवा भारत अगर पाकिस्तानमध्ये सामील होण्याचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिलेले होते. प्रादेशिक संलग्नता व ऐक्य टिकवणे ही मोठी समस्या होती. सरदार वल्लभाई पटेल यांच्या कौशल्याने संस्थाने विलीनीकरणाचा प्रश्न सोडवण्यात आला.

**७) काश्मिरीसाठी पाकिस्तानचे आक्रमण :** आजही काश्मीरचा प्रश्न गंभीर होत आहे. बहुसंख्य प्रजा मुस्लिम व राजा हरिसिंग हिंदू असल्याने काश्मीरचे भारतात विलीनीकरण ही मोठी समस्या होती. सरदार पटेल

यांनी भारतीय सेना हवाई मार्गे पाठवून श्रीनगर वाचवले. परंतु काश्मीरचा १/३ प्रदेश अद्यापही घुसखोरांच्या ताब्यात होता, या प्रश्नावरून दोन्ही देशांमध्येच धमकी, आरोप प्रत्यारोप चालूच आहेत.

**८) महात्मा गांधींची हत्या :** गांधीजींच्या इच्छेविरुद्ध फाळणी झाली. मुस्लिमेतरांना आपल्या जबाबदाऱ्याची जाणीव व्हावी यासाठी प्रार्थना सभेचे आयोजन केले. पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्यास भाग पडले, यामुळे कट्टर हिंदुत्ववादी संघटनांनी त्यांच्यावर पक्षपातीपणाचे आरोप करून ३० जानेवारी १९४८ रोजी नथुराम गोडसे यांच्याकरवी त्यांची हत्या घडवून आणली.

भारताच्या फाळणीमुळे वरीलप्रमाणे अनेक समस्या निर्माण झाल्या. याशिवाय जातीय हिंसाचार, राष्ट्रीय संपत्तीचे विभाजन, लोहमार्ग समस्या, व्यापार अशा अनेक प्रश्नांना फाळणीने जन्म दिला.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. सायंटिफिक सोसायटीची स्थापना १८६४ मध्ये ............ यांनी केली.
   अ) महात्मा गांधी    ब) सर सय्यद अहमदखान
   क) मौलाना आझाद    ड) यापैकी नाही

२. मुस्लिम लीगची स्थापना ............ साली झाली.
   अ) १९०४    ब) १९०५
   क) १९०६    ड) १९०८

३) बंगालची फाळणी ............ साली झाली.
   अ) १९००    ब) १९०१
   क) १९०३    ड) १९०५

४. भारत व पाकिस्तान यांच्यातील सीमांचा प्रश्न सोडवण्यासाठी ............ यांच्या अध्यक्षतेखाली सीमा आयोग नेमला होता.
   अ) रेडक्लिप    ब) क्रिप्स
   क) पंडित नेहरू    ड) यापैकी नाही

५. फाळणीनंतर सर्वात जास्त विस्थापित ............ शहरात आले.
   अ) पुणे    ब) अमृतसर
   क) दिल्ली    ड) यापैकी नाही

## ४.२.२ संस्थानांचे विलीनीकरण (जुनागड, हैद्राबाद, काश्मीर) :

स्वतंत्र भारतापुढे संस्थानांचे विलीनीकरण ही मोठी समस्या होती. देशाचा सुमारे २/५ प्रदेश व्यापणाऱ्या व देशाच्या लोकसंख्येच्या १/४ लोकसंख्या असलेल्या छोट्या-मोठ्या अशा ५६२ संस्थानांचे विलीनीकरण

करून घेणे हे एक मोठे आव्हान होते. कारण त्यातील काही संस्थांने सहजासहजी विलीन होण्यास तयार होण्याची शक्यता कमी होती. समस्येचे खरे कारण ब्रिटिश राजनीतीत दडलेले दिसते. ब्रिटिश भारत सोडून गेले की भारतीय संस्थानावरील ब्रिटिश सार्वभौमत्व आपोआप संपुष्टात येईल त्या संस्थानांचे ब्रिटनप्रति किंवा भारत सरकारप्रति कोणतेही उत्तरदायित्व किंवा बंधन राहणार नाही आणि भारताचे सरकार अस्तित्वात येईल त्यांच्याशी वाटाघाटी करण्याचे भारत अगर पाकिस्तान यापैकी कोणात विलीन व्हायचे की स्वतंत्र रहावयाचे हे ठरवण्याचे पूर्ण स्वातंत्र्य संस्थानिकांना राहील असे ब्रिटिश सरकारने जाहीर केले होते. याबद्दल विलीनीकरण कार्यवाहीतील सरदार पटेल यांचे प्रमुख मदतनीस व्ही. पी. मेनन म्हणतात की भारताची व संस्थानांची ही सर्वाधिक हानी करणारी कोणती एक गोष्ट ब्रिटिशांनी केली असेल तर त्यांनी संस्थानिकांना स्वयंनिर्णयाचे दिलेले स्वातंत्र्य होय. संस्थानांच्या विलीनीकरणाची समस्या खरोखर अवघड होती व भारताच्या ऐक्याला बाधक होती. कारण विलीनीकरणाबाबत काही संस्थांनांनी आडमुठी व राष्ट्रविरोध भूमिका घेतली होती. बऱ्याच समस्यांचे निराकरण करून जुनागड, हैदराबाद व काश्मीर वगळता बहुसंख्य संस्थाने ऑगस्ट १९४७ पर्यंत भारतीय संघराज्यात विलीन करण्यात आली होती. या महान कार्याचे शिल्पकार सरदार पटेल होते व त्यांचे सचिव मेनन यांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले. पटेल यांच्या नेतृत्वाखाली संस्थान मंत्रालय स्थापन करून सर्व संस्थानिकांना मान्य होईल असा करार करण्यात आला. विलीनीकरणाच्या प्रक्रियेत पंडित नेहरूंची भूमिका महत्वपूर्ण होती. त्यांनी स्वातंत्र्यलढ्याच्या काळात संस्थानातील प्रजा परिषदेस स्वातंत्र्य चळवळीसाठी प्रेरणा दिली. संस्थानी प्रजेत स्वातंत्र्याची व लोकशाहीची भावना रुजवण्याचे महत्त्वाचे कार्य अनेक वर्ष केले. त्यामुळे विलीनीकरणाबाबत निर्णय घेताना जनतेच्या इच्छे विरुद्ध जाणे संस्थानिकांना अशक्य झाले. लोकांनी उत्स्फूर्तपणे भारतातील विलीनीकरणास पाठिंबा दिला तो केवळ भारतावरील स्वातंत्र्य प्रेमामुळे. या काळात सरदार पटेल यांनी केलेल्या प्रयत्नांना व कष्टाला चांगली फळे आली व त्याचा परिणाम म्हणूनच जुनागड, हैदराबाद व काश्मीर यांचा अपवाद वगळता सर्व संस्थाने विनासंघर्षाची भारतात विलीन झाली.

सरदार पटेल यांनी विलीनीकरणाचे मसुदे तयार करून घेतले. त्यावर निरनिराळ्या संस्थानांच्या सह्या घेतल्या होत्या, परंतु या संस्थानांचे एकीकरण, लोकशाहीकरण अजून व्हायचे होते. ही प्रक्रिया २६ जानेवारी १९५१ पर्यंत पार पाडली. ओरिसा व छत्तीसगड यातील संस्थाने शेजारच्या राज्यात विलीन झाली. अशा संस्थानांची संख्या ३९ होती. एकूण लोकसंख्या ७० लाख व क्षेत्रफळ ५६ हजार चौरस मैल होते. ती संस्थांने लहान व मागासलेली असल्याने तेथे आधुनिक प्रशासन पद्धती प्रस्थापित होऊ शकली नसती. १ जानेवारी १९४८ रोजी ही संस्थांने ओरिसा व मध्य प्रांतात विलीन केली. त्यानंतरचे विलिनीकरण हे दक्षिण संस्थानात घडून आले. अशी १७ संस्थाने होती. अशा प्रकारे संस्थानांच्या विलिनीकरण्याची समस्या बहुतांशी सामोपचाराच्या मार्गाने सोडवण्यात सरदार पटेल यांनी यश मिळवले. फक्त जुनागड, हैदराबाद व काश्मीर या तीन संस्थानाबाबत वेगळ्या मार्गाचा अवलंब करावा लागला. बहुतेक संस्थानी राज्यकर्त्यांची मने सरदार पटेल यांनी वळवली, जवळपास २१६ संस्थानांचे सामीलीकरण करारावर स्वाक्षऱ्या होऊन त्यांचे १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत भारतात विलीनीकरण झाले, त्यानंतर दोनच वर्षात उर्वरित संस्थाने भारतात सामील झाली.

**जुनागड :**

जुनागड हे काठीयावाडमधील एक मुस्लिम राज्यकर्ता असलेले संस्थान होते. तेथील नवाबाचे नाव

महाबत खान असे होते. जुनागडच्या सीमा भारताशी संलग्न होत्या. जुनागडच्या पूर्व पश्चिम उत्तर बाजूला भारतात सामील झालेली संस्थांनी होती तर दक्षिणेला अरबी समुद्र होता. तेथील ८० टक्के प्रजा हिंदू होती तर २०% प्रजा मुस्लिम होती. जुनागडचे क्षेत्रफळ ३०३३७ चौरस मैल होते, तर लोकसंख्या ६,७०,७१९ होती. नवाब मुस्लिम असल्याने तो पाकिस्तानकडे झुकणार असे दिसत होते. बहुसंख्य प्रजा मागासलेली होती. नवाबाने सर शहानवाज भुट्टो या लीगच्या नेत्यास मे १९४७ मध्ये दिवाण नेमले होते. भारत सरकारने जुनागडच्या नवाबास विलीनीकरणाच्या कराराचा मसुदा पाठवला होता. शहानवाज खान या दिवाणने या प्रश्नावर नवाब विचार करीत असल्याचे कळविले होते. इकडे पाकिस्तानचे अध्यक्ष जीना यांनी जुनागडच्या नवाबाशी गुप्त पत्रव्यवहार करून पाकिस्तानच्या बाजूने त्यांना वळविले होते. परिणामी जुनागड संस्थान पाकिस्तानात १५ ऑगस्ट १९४७ रोजी विलीन होत आहे, असा निर्णय नवाबाने घेतला. पण तो निर्णय भारत सरकारला कळविला नव्हता. इकडे पाकिस्तान सरकारने १३ सप्टेंबर १९४७ रोजी जुनागड पाकिस्तानात विलीन होत आहे असे भारत सरकारला कळवले व त्याबाबत आम्ही जुनागडशी स्टॅन्डस्टील करारावर सह्या केल्या आहेत असे कळविले. यावेळी काठीयावाडमधील नवानगरचे जामसाहेब, भावनगर, पोरबंदर इत्यादी संस्थानांच्या नवाबांनी जुनागडच्या नवाबच्या निर्णयाचा निषेध केला व काठीयावाडच्या प्रदेशाचे संरक्षण करण्याचा सल्ला भारत सरकारला दिला. यावेळी जुनागडच्या नवाबाने हिंदू प्रजेवर अन्याय अत्याचार चालू केले होते. लाखो हिंदू जुनागड सोडून शेजारच्या संस्थानात गेले. तेथील अंतर्गत परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत गेली. काठीयावाडच्या काँग्रेसने त्यांनी मुंबईत बैठका घेऊन श्री. शामलदास गांधी यांच्या नेतृत्वात हंगामी सरकारची स्थापना केली व जुनागडच्या सरकारची सूत्रे त्यांच्याकडे सुपूर्त केली. त्याचे कार्यालय राजकोट येथे ठेवण्यात आले. शेवटी जुनागडच्या आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी लष्कर पाठवण्याचा निर्णय घेतला गेला. भारताने लष्कर पाठवून २२ ऑक्टोबरला दोन्ही संस्थाने जिंकून घेतली. यावेळी भुट्टोंनी तातडीने पाकिस्तानकडे लष्करी मदतीची याचना केली, परंतु अपेक्षित मदत आली नाही. संतप्त जनता व भारतीय लष्कराला तोंड देणे अवघड आहे हे ओळखून जुनागडच्या नवाबाने जमेल तेवढी संपत्ती घेऊन कराचीला पलायन केले. परिस्थिती गंभीर आहे हे पाहून शहानवाज भुट्टोने शामलतास गांधी यांच्याशी वाटाघाटीचा प्रयत्न केला व गांधींनी राज्याची सूत्रे घेऊन शांतता प्रस्थापित करावी असे सुचवले. पण जुनागडच्या मुसलमानांनी श्रीबुच, प्रादेशिक कमिशनर यांच्याकडे सोपवण्याची विनंती केली. त्याप्रमाणे भूट्टो यांनी बूचकडे सत्ता सूत्रे सोपवून ८ नोव्हेंबरला कराचीला पलायन केले. ९ नोव्हेंबर १९४७ रोजी बुच यांनी जुनागडचा कारभार हाती घेतला. जुनागडमध्ये शांतता प्रस्थापित झाल्यावर भारत सरकारने सार्वमत घेण्याकरीता सी. बी. नगरकर या ICS अधिकाऱ्याला पाठवले. २० फेब्रुवारी १९४८ रोजी सार्वमत घेतले तेव्हा १,९०,८७० लोकांनी हिंदुस्थानच्या बाजूने मत दिले, तर फक्त ९१ मते पाकिस्तानच्या बाजूने पडली. त्यानंतर भारत सरकारने जुनागडचे भारतात विलीनीकरण केले.

**हैदराबाद :**

ब्रिटिश सरकारच्या कुटील राजनीतीमुळे संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न जटिल झाला होता. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी क्रिप्स मिशन तसेच कॅबिनेट मिशनच्या शिफारशी स्वीकारल्या होत्या. भारताचे जास्तीत जास्त विघटन व्हावे अशी इंग्रजांची इच्छा होती. संस्थांनाना दिलेले स्वातंत्र्य भारताच्या दृष्टीने घातक होते, त्यामुळे प्रश्न गंभीर बनला होता. भारतातील तीन-चार मोठ्या संस्थांनापैकी हैदराबाद संस्थान होते. मुघल साम्राज्याच्या

विघटनाच्या काळात उदयास आलेले हैदराबाद संस्थान भारताच्या मध्यभागी वसले होते. मुघल सुभेदार निजाम उल मुल्क असफ जहा फिरोजंग चिंन किलीज खान याने १७२४ मध्ये हैदराबादच्या निजामाची सत्ता स्थापन केली. या राज्यावर एकूण ७निजामानी राज्य केले. या संस्थानचे क्षेत्रफळ ८२३१३ चौ. मैल व लोकसंख्या १, ६३,३८,५३४ होती. काळाच्या ओघात यातील खानदेश स्थानिक सुलतानानी काबीज केला तर वऱ्हाड ब्रिटिशांना देणे भाग पडले. हैदराबाद संस्थांनचे मराठवाडा, तेलंगणा व कर्नाटक असे तीन विभाग होते. इतिहासकार सेतूमाधव पगडी यांनी १९५६ साली हैदराबाद येथील स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास हा ग्रंथ लिहिला व त्यात १८०० ते १९१० या काळातील हैदराबाद राज्यातील स्वातंत्र्य संपादनाचा इतिहास दिला आहे. या काळात अनेक बंडे झाली पण इंग्रजांनी ती मोडून काढली.

हिंदूप्रजा आपली गुलाम आहे असे निजामाचे धोरण होते. ही प्रजा सुमारे ९०% होती. निजामाकडे प्रत्यक्षात ४२००० लष्कर होते. शिवाय रझाकारांची संख्या दोन लाख असून निजामाचे धर्मांध धोरण राबवण्याचे काम रझाकार करत होते. राज्यकारभार तसेच शिक्षणाचे माध्यम उर्दूभाषा होती. निजाम एक स्वतंत्र अधिपतीसारखा वागत असे. त्याने हिंदू प्रजेवर अन्याय करून पक्षपाती धोरण राबवले. मुलकी शासनात ७५% तर, लष्कर व पोलीस दलात ९० टक्के भरती मुसलमानांची होती. जमीन, व्यापार उद्दीम मुसलमानांच्या हाती असल्यामुळे आर्थिक व्यवहाराच्या नाड्या मुस्लिमांकडे होत्या. हिंदू प्रजा बहुतांशी शेती करणारी व नेहमीच कर्जाखाली, दारिद्र्यात होती. निजामाने मात्र अमाप संपत्ती जमा केली होती. रझाकार ही सर्वाधिक जुलमी संघटना निजामाला मदत करीत होती. कासिम रझवी हा तिचा नेता होता. तो मूळचा लातूरचा कायद्याचा पदवीधर, अविवेकी, धर्मवेढा व उत्तम वक्ता होता. लोक त्याला बॅरिस्टरसाहेब म्हणत. रझाकार म्हणजे स्वेच्छेने कार्य करणारे सेवक असा अर्थ होता. अनेक हिंदूंना त्याने रझाकार बनवले. संस्थानात प्रचंड दहशत बसविली. निष्पाप लोकांना ठार केले. असे हे हैदराबाद संस्थान त्यांचा जुलमी शासक आणि पीडित प्रजा होती. जनतेमध्ये निजामाविरुद्ध मोठा असंतोष होता. यातूनच स्वातंत्र्य चळवळीचा उगम झाला. हैदराबादमध्ये जनजागृती झाली. राजकीय चळवळी घडून आल्या. १९२० नंतर आर्य समाज मंडळींनी हिंदू प्रजेच्या प्रबोधनाचे कार्य केले. सार्वजनिक गणेश मंडळाची स्थापना होऊन सांस्कृतिक कार्यक्रमातून प्रबोधन केले. हैदराबादमध्ये दक्षिण साहित्य संघ स्थापन झाला. राजकीय अधिकार मिळवून घेण्यासाठी संघटित लढा देण्याच्या हेतूने १९३८ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेस ही संघटना स्थापली. गोविंदराव नानल हे अध्यक्ष होते. स्वामी रामानंदतीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, अनंत भालेराव, शामराव बोधनकर इत्यादी अनेक नेत्यांनी हैदराबाद संस्थानात स्वातंत्र्य लढा चालविला होता. काँग्रेस हा शब्द ही निजामाला आवडत नव्हता. ७ सप्टेंबर १९३८ रोजी निजामने काँग्रेसवर बंदी घातली.

हैदराबादने भारतात सामील व्हावे ही मागणी हैदराबाद स्टेट काँग्रेसने केली. बहुसंख्य प्रजा विलीनिकरणाच्या बाजूने होती मात्र लोकमताचा कौल निजामाला मान्य नव्हता. निजामाला भारतीय संघराज्यात विलीन होण्याचा सल्ला माऊंटबॅटन यांनी दिला, पण कासिम रझवी यांनी निजामास भारतात विलीन होऊ नये असा सल्ला देऊन तलवारीच्या भाषेची शिकवण दिली. त्यामुळे परिस्थिती चिघळली. बॅरिस्टर जीनांचे हैदराबादमधील घडामोडीवर बारीक लक्ष होते. रिझविने सैन्य वाढवून त्यास लष्करी प्रशिक्षण दिले. बहुसंख्य हिंदूंवर हल्ले केले. एका भाषणात तो म्हणतो, ''जोपर्यंत हैदराबाद स्वतंत्र व सार्वभौम मुस्लिम राज्य होत नाही, तोपर्यंत तलवार मॅन

करू नका, एका हातात तलवार व एका हातात कुराण घेऊन शत्रूवर तुटून पडा.'' त्याने जाळपोळ, लुटालूट, बलात्कार असे अत्याचार केले. तेव्हा मदतीसाठी भारतीय लष्कराला सिकंदराबादमध्ये प्रवेश करण्यास अनुमती द्यावी, असे भारत सरकारने निजामाला सांगून पाहिले. पण निजामाने न ऐकल्याने पोलीस कार्यवाहीचा निर्णय झाला. मेजर जनरल चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली १५ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय सैनिकांनी सोलापूर-हैदराबाद, मनमाड-हैदराबाद, बेजवाडा-हैदराबाद या मार्गाने संस्थानी प्रदेशात प्रवेश केला. केवळ पाच दिवसांच्या लष्करी कारवाईनंतर रझाकार सैन्याची वाताहात झाली व हैदराबादचा ताबा मेजर जनरल चौधरी यांच्या हाती आला. लायक अली, कासिम रझवी इत्यादींना कैद करून तुरुंगात ठेवले व निजामाने भारत सरकारशी १ नोव्हेंबर १९४८ रोजी सामीलनामा करारावर सही करून हैदराबाद संस्थांनाचे भारतीय संघराज्यात सामीलीकरण केले. १९५२ मध्ये सार्वत्रिक निवडणुका होऊन काँग्रेस बहुमताने सत्तेवर आली.

**काश्मीर :**

काश्मीर संस्थानचे विलीनीकरण हा स्वतंत्र भारतापुढील सर्वात मोठा जटिल प्रश्न ठरला किंबहुना आजही त्या प्रश्नाची चर्चा चालू आहे. भारत-पाकिस्तानमधील तो गुंतागुंतीचा प्रश्न आहे. पाकिस्तान तो प्रश्न जगापुढे मांडण्याचा सतत प्रयत्न करीत असतो. काश्मीर भारताचा अविभाज्य भाग असल्याचा भारताचा ठाम दावा आहे. यावरून दोन्ही देशांत अनेक वेळा युद्धे झाली आहेत, जीवित, वित्तहानी झाली आहे. काश्मीरचे क्षेत्रफळ २,२२,२३६ चौ. किलोमीटर असून १९७१ च्या जनगणनेनुसार भारताच्या ताब्यातील काश्मीरची लोकसंख्या ४६,१६,६१२ असून त्यापैकी ३० लाख मुस्लिम, १४ लाख हिंदू व इतरांमध्ये बौद्ध, शीख, जैन, ख्रिश्चन इत्यादी धर्माचे लोक आहेत. राज्याचा सुमारे १४ टक्के भाग जंगलव्याप्त आहे. भौगोलिक व लष्करी दृष्टिकोनातून हा प्रदेश अत्यंत मोक्याचा व महत्त्वाचा आहे. या संस्थानाला नैसर्गिक सौंदर्याचे वरदान लाभलेले असून ते जागतिक पर्यटनस्थळ आहे. संस्थानाचे लडाख, गिलगिट, काश्मीर, जम्मू अशा विभागात विभागले गेले आहे. काश्मीरमध्ये ८० टक्के प्रजा मुस्लिम तर राजा हिंदू होता. मुस्लिम कॉन्फरन्स व नॅशनल कॉन्फरन्स असे दोन पक्ष संस्थानात होते, त्यापैकी पहिला पाकिस्तान धार्जिना तर दुसरा पाकिस्तान विरोधी होता. शेख अब्दुल्ला त्या पक्षाचा नेता होता. राजा हरिसिंग हा हिंदू शासक, त्याला काश्मीर स्वतंत्र हवे होते. बॅरिस्टर जिना हटवादी असल्याने काश्मीर पाकिस्तानमध्ये विलीन व्हावे असे त्यांचे मत होते. ३ जून १९४७ ला माउंटबॅटन यांनी काश्मीरला भेट दिली आणि दोन्ही पैकी एका देशात विलिन व्हावे असे सुचवले. हरीसिंगशी विलीनीकरन करण्याबाबत चर्चा केली. त्यादृष्टिकोनातून लोकमताचा विचार करावा असे सुचवले. हरीसिंगला आपले संस्थान स्वतंत्र ठेवायचे होते. त्याचा भारताने विरोध केला तर पाकिस्तानने संमती दिली. मुस्लिम जनतेला राजाविरुद्ध उठाव करण्यासाठी पाकिस्तानने चिथावणी दिली. जैसे थे कराराचा भंग आहे, अशी काश्मीरचे पंतप्रधान मेहरचंद महाजन यांनी पाकिस्तान व इंग्लंडमध्ये तक्रार केली, पण त्याचा उपयोग झाला नाही.

पाकिस्तानने आक्रमक धोरण स्वीकारून २२ ऑक्टोबर १९४७ रोजी आपल्या सैन्याच्या नेतृत्वाखाली काश्मीरवर आक्रमण केले व काही भाग ताब्यात घेतला. त्यामुळे या आक्रमांकाना थोपवून धरण्यासाठी कश्मीरसेनेचे प्रमुख ब्रिगेडियर राजेंद्रसिंग आपल्या १५० सैनिकासह उरी येथे गेले असता त्या सर्वांना ठार केले, अशा परिस्थितीत धक्का बसलेल्या राजा हरिसिंगाने २४ ऑक्टोबर १९४७ रोजी भारताला मदतीची विनंती केली. पण सामीलीकरणाच्या करारपत्रावर स्वाक्षरी केल्याखेरीज लष्करी मदत पाठवणे बेकादेशीर होईल असे

माउंटबॅट यांनी सुचवून लष्कर पाठवण्यास विरोध केला. शेवटी वाटाघाटी होऊन कश्मीरच्या नरेशने सह्या केल्या व भारताने २७ ऑक्टोबर १९४७ रोजी काश्मीरकडे लष्करी मदत पाठवली. घुसखोरांची आगेकूच रोखली. या घटनेने बॅ. जीना संतप्त झाले व त्यांनी पाकिस्तान काश्मीरच्या भारतातील विलीनीकरणास मान्यता देणार नाही असे जाहीर केले. यावेळी काश्मीरचा काही भाग पाकिस्तान प्रणित घुसखोरांकडे राहिला, तर बाकीचा काश्मीर भारतात विलीन झाला. नेहरूंनी माउंटबॅटनशी विचारविनिमय करून पाकिस्तानच्या आक्रमणाचा प्रश्न युनोच्या सुरक्षा समितीपुढे ठेवला. युनोच्या मध्यस्थीने युद्ध बंदीबाबत तडजोड झाली. काश्मीरचा प्रश्न दीर्घकाळ अनुत्तीरीत राहिला असून भारत व पाकिस्तान या दोन शेजारी देशातील संबंध तणावपूर्ण राहिले आहेत. लष्करी आक्रमण करून पाकिस्तानने अनेकवेळा काश्मीरवर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, परंतु भारताने त्यास चोख प्रत्युत्तर दिले आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. देशाला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी ............. संस्थाने भारतात होती.

अ) ५०० ब) ५६२

क) ५७० ड) ५७५

२. ............. यांच्या नेतृत्वाखाली संस्थान मंत्रालय स्थापन केले होते.

अ) सरदार पटेल ब) डॉ. आंबेडकर

क) पं. नेहरू ड) म. गांधी

३. संस्थानाच्या विलीनीकरनावेळी सरदार पटेल यांचे सचिव ............. यांनी महत्वपूर्ण सहकार्य केले.

अ) विनोबा भावे ब) व्ही. पी. मेनन

क) स. प. सिन्हा ड) यांपैकी नाही

४. ............. हे कठियावडमधील मुस्लीम राज्यकर्ता असलेले राज्य होते.

अ) जुनागड ब) हैदराबाद

क) काश्मीर ड) यापैकीनाही

५. ............. या काश्मीर नरेशाला काश्मीर स्वतंत्र ठेवायचे होते.

अ) मेहेरचंद ब) बॅरिस्टर जिना

क) हरिसिंग ड) यापैकी नाही

### ४.२.३ राज्यघटना : उद्देशिका, मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्य आणि जबाबदारी :

कोणत्याही देशाची राज्यघटना हा त्या देशाचा मूलभूत कायदा असतो. राज्याच्या सार्वभौम सत्तेचा वापर

शासन संस्थेच्या विविध अंगाकडून कशा प्रकारे केला जावा, त्यांची कार्यकक्षा, अधिकार, मर्यादा कशा निश्चित कराव्या, त्याचप्रमाणे शासन संस्था आणि देशातील जनता यांचे परस्पर संबंध कसे असावेत, हे स्पष्टपणे निश्चित करण्याचे काम त्या मूलभूत कायद्याला करावे लागते. आज भारताच्या राज्यघटनेचा नीट विचार केला तर ही राज्यघटना म्हणजे ब्रिटिशांनी भारतात वेळोवेळीच्या सुधारणा केल्या, पश्चिमेकडून आणलेली जीवनमूल्ये इथे रुजवण्याचा जो प्रयत्न केला, त्यासाठी आवश्यक काही कठोर कायदेही केले, त्या सर्वातून विकसित पावलेल्या व विसाव्या शतकाच्या मध्यानी भारतातील प्रमुख विचारवंतांनी स्वीकारलेला तो एक विचार आहे हे स्पष्ट होईल.

राज्यघटना म्हणजे असा दस्तऐवज की ज्यामध्ये शासनाचे स्वरूप तसेच नागरिक आणि शासन यांच्यातील संबंधाची निश्चिती आणि वर्णन करणाऱ्या कायद्याचा आणि नियमांचा समावेश असतो. राज्यघटना ही शासन संस्थेचा मूलभूत कायदा असते.

**घटना निर्मिती :**

साधारणता एखाद्या सार्वभौम लोकशाही देशाची घटना तयार करण्याचे काम लोकांच्या प्रतिनिधिक संस्थेमार्फत पार पाडले जाते. या घटनेवर चर्चा करून ती स्वीकृत करण्याच्या उद्देशाने लोकांनी निवडून दिलेल्या अशा संस्थेला संविधान सभा संबोधले जाते. स्वातंत्र्य पूर्वकाळात भारतासाठी संविधान सभेची मागणी करण्यात आली. १९३४ मध्ये प्रथम ही कल्पना मानवेंद्रनाथ रॉय यांनी मांडली. डिसेंबर १९३४ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने पहिल्यांदा भारताची घटना तयार करण्यासाठी संविधान सभेची औपचारिक मागणी केली. १९३८ मध्ये नेहरुंनी काँग्रेसच्या वतीने मागणी केली की स्वतंत्र भारताची घटना प्रौढ मतदानाद्वारे निवडण्यात आलेल्या संविधान सभेद्वारे कोणत्याही बाह्य प्रभावाविना तयार करण्यात यावी. १९४० च्या लॉर्ड लीनलिथगो यांच्या ऑगस्ट ऑफरद्वारे ब्रिटिश सरकारने पहिल्यांदा भारताची घटना मुख्यत: भारतीयांनी तयार करावी हे तत्व मान्य केले. १९४२ च्या क्रिप्स यांच्या तरतुदीमध्ये भारताची घटना पूर्णत: भारतीयांनीच तयार करावी हे मान्य केले गेले. मे १९४६ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या कॅबिनेट मिशन योजनेत संविधान सभेच्या निर्मितीची तरतूद करण्यात आली.

९ डिसेंबर १९४६ ला संविधान सभेची पहिली बैठक भरली. डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांची तात्पुरते अध्यक्ष म्हणून निवड केली गेली. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची कायमस्वरूपी अध्यक्ष म्हणून निवड झाली. संविधान सभेचे कायदेशीर घटनात्मक सल्लागार म्हणून सर बी. एन. राव यांची नेमणूक झाली. १३ डिसेंबर १९४६ रोजी पंडित नेहरूंनी उद्देश पत्रिका मांडली. ती घटना निर्मितीच्या पुढील सर्व टप्प्यावर मार्गदर्शक ठरली. भारतीय घटनेचा सरनामा उद्देशपत्रिकेवरूनच तयार करण्यात आला आहे. १८ जुलै १९४७ रोजी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा पास झाला आणि संविधानसभेला पूर्णपणे सार्वभौम बनवले, त्यामुळे तिला आपल्या मर्जीने कोणत्याही प्रकारची घटना करण्याचा अधिकार प्राप्त झाला. संविधान सभेने घटना निर्मितीची वेगवेगळी कामे पूर्ण करण्यासाठी विविध समित्यांची निर्मिती केली. मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. मसुदा समितीकडे घटनेचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ४ नोव्हेंबर १९४८ रोजी घटनेचा मसुदा संविधान सभेत मांडला. चर्चेदरम्यान संविधान सभेत एकूण ७३६५ सुधारणा पटलावर ठेवण्यात आल्या. त्यापैकी २४७३ सुधारणा चर्चेसाठी घेण्यात येऊन

निकाली काढण्यात आल्या. ही चर्चा १४४ दिवस चालली. घटनेचा सुधारित मसुदा २५ नोव्हेंबर ला सादर केला, याच दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समारोपाचे भाषण झाले होते. २६ नोव्हेंबर रोजी घटना समितीने या सुधारित मसुद्याला मान्यता दिली व तो स्वीकारला गेला.

घटनेचा अंमल २६ जानेवारी १९५० पासून सुरू झाला. हा दिवस निवडण्याचे कारण म्हणजे डिसेंबर १९२९ च्या काँग्रेसच्या लाहोर अधिवेशनातील पूर्ण स्वराज्य ठरावानुसार २६ जानेवारी १९३० हा दिवस भारताचा प्रथम स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करण्यात आला. २६ जानेवारी १९५० हा दिवस घटनेच्या प्रारंभाचा दिन म्हणून ओळखण्यात येतो व गणराज्य दिन म्हणूनही साजरा केला जातो. मूळ घटनेत प्रास्ताविका २२ भाग ३९५ कलमे व ८ अनुसूचिचा समावेश होता. अशा रीतीने ६४ लाख रुपये खर्चून २ वर्ष ११ महिने १८ दिवसांच्या काळात घटना तयार झाली. घटनाकर्त्यांनी जगातील सुमारे ६० देशांच्या घटनांचा विचार केला .

**घटनेचे हस्तलिखित :**

२४ जानेवारी १९५० रोजी संविधान सभेच्या २८४ उपस्थित सदस्यांनी घटनेच्या तीन प्रतीवर सह्या केल्या. इंग्रजीतील छापील प्रत, इंग्रजीतील हस्तलिखित प्रत आणि हिंदीतील हस्तलिखित प्रत. इंग्रजी हस्तलिखित प्रतीचे सुंदर हस्ताक्षरात लिखाण करण्याचे काम पंडित नेहरूंनी प्रेमबिहारी नारायणराय जादा यांच्याकडे सोपविले. घटनेचे मूळ हस्तलिखित १६ इंचक्ष X २२ इंच आकाराच्या कागदावर लिहिण्यात आले असून त्यामध्ये २५१ पाने आहेत व त्याचे वजन ३.७५ किलोग्रॅम आहे. या लिखाणासाठी प्रेमबिहारी यांना सहा महिने लागले. घटनेचे हिंदी भाषेतील हस्तलिखित संत कृष्ण वैद्य यांनी तयार केले. या हस्तलिखिताच्या प्रत्येक पानाचे चित्ररूप सजावट करण्याचे काम शांतिनिकेतनच्या नंदलाल बोस यांना देण्यात आले. बोस यांच्या समवेत व्योहार राममनोहर सिन्हा होते. त्यांनी अनेक पानावरील चित्रांबरोबरच घटनेची प्रस्ताविका आपल्या हाताने लिहून त्या पानाची संपूर्ण सजावट केली. मूळची हस्तलिखित घटना सध्या संसदेच्या लायब्ररीमध्ये हेलियमने भरलेल्या काचेच्या डब्यात ठेवली आहे.

**राज्य घटनेची वैशिष्ट्ये :**

**१) लिखित व विस्तृत राज्यघटना :** भारताची घटना ही प्रामुख्याने एक लिखित व विस्तृत घटना आहे. ब्रिटनची घटना अलिखित घटना आहे. आपली घटना सर्व समावेशक व तपशीलवार दस्तऐवज आहे. १९५१ नंतर अनेक घटना दुरुस्त्या झाल्या.

**२) लवचिक व अलवचिक यातील सुवर्णमध्य :** एखाद्या घटनेमध्ये बदल करण्याच्या पद्धतीवरून घटनेचे स्वरूप लवचिक की अलवचित ठरते. घटनेमध्ये काही भागात विशेष बहुमताने दुरुस्ती करावी लागते, तर काही ठिकाणी साध्या संसदेच्या बहुमताने घटना दुरुस्ती शक्य आहे.

**३) संघ राज्यात्मक स्वरूप :** भारत हे एक संघराज्य आहे, मात्र कलम एक नुसार तो राज्यांचा संघ आहे. संघराज्य पद्धतीद्वारे केंद्र व राज्य अशा दोन पातळ्या निर्माण करून त्यांच्यात अधिकारांचे वाटप केले आहे.

**४) सार्वत्रिक मताधिकार :** घटनेमध्ये सार्वत्रिक प्रौढ मताधिकार हे तत्व आहे. १९८८ साली ६१ वी घटना दुरुस्ती करून मतदाराचे वय २१ वरून १८ निश्चित करण्यात आले.

**५) स्वतंत्र न्याय व्यवस्था :** भारतीय न्यायव्यवस्था ही स्वायत्त व एकेरी आहे. नागरी हक्काचे संरक्षण व भिन्न प्रकारचे तंटेनिवारण करण्यासाठी कोणत्याही दबावापासून मुक्त न्यायव्यवस्था घटनाकारांनी निर्माण केली आहे.

**६) राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे :** घटनेच्या चौथ्या भागात कलम ३६ ते ५१ मध्ये या तत्त्वांचा उल्लेख आहे. ती न्याय प्रविष्ट नाहीत. डॉ. आंबेडकर यांच्या मते राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे म्हणजे राज्यघटनेचे उदात्त वैशिष्ट्य आहे.

**७) एकेरी नागरिकत्व :** भारतीय घटनेने एकेरी नागरिकत्व स्वीकारले आहे. सर्व घटकराज्यांच्या व्यक्तीला नागरिक या नात्याने समान अधिकार मिळतात व समान नागरी हक्क उपभोगता येतात. नागरिकांमध्ये राष्ट्रवादाची भावना वाढीस लावणे हा एकेरी नागरिकत्वामागील उद्देश आहे.

**८) आणीबाणी विषयाची तरतूद :** असामान्य व अनपेक्षित परिस्थिती हाताळता यावी यासाठी राष्ट्रपतींना आणीबाणी विषयक अधिकार दिले आहेत. राष्ट्रीय आणीबाणी - कलम ३५२, राष्ट्रपती राजवट कलम - ३५६, वित्तीय आणीबाणी - कलम ३६० इत्यादी.

**९) त्रिस्तरीय शासन :** घटनेने लोकशाहीचे विकेंद्रीकरण करण्यासाठी आणि भौगोलिक समतोल विकास करण्यासाठी, संसद, राज्यविधिमंडळ व स्थानिक स्वराज्य संस्था अशी त्रिस्तरीय शासन व्यवस्था स्वीकारली आहे. ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेला घटनात्मक दर्जा देण्यात आला आहे.

**१०) संसदीय शासन पद्धती :** भारताने ब्रिटनप्रमाणेच संसदीय शासन व्यवस्थेचा स्वीकार केला आहे. राष्ट्रपती हा नामधारी प्रमुख तर पंतप्रधान वास्तव प्रमुख असतो. मंत्री कायदेमंडळाचे सदस्य असतात. मंत्रिमंडळाची लोकसभेप्रति सामुदायिक जबाबदारी असते.

**११) धर्मनिरपेक्ष राज्य :** घटनेने धर्मनिरपेक्ष राज्याची निर्मिती केली आहे. भारताचा कोणताही राज्य धर्म नाही, मात्र राज्यसंस्थेमार्फत सर्व धर्मांना समान वर्तणूक दिली जाते. सर्वधर्मसमभाव सांगितला आहे.

वरील वैशिष्ट्यांशिवाय मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्य ही देखील राज्यघटनेची वैशिष्ट्ये आहेत, याविषयी सविस्तर माहिती पुढे दिलेली आहे.

**उद्देशिका :**

सरनामा हा राज्यघटनेची उद्दिष्टे व ध्येय स्पष्ट करणारी प्रस्तावना वा उद्देशिका असते, त्यामुळे घटनेचा गर्भितार्थ व्यक्त होतो. सरनाम्याला राज्यघटनेचा आत्मा असेही म्हणतात. त्यातून घटनेचे सामाजिक, आर्थिक, राजकीय तत्त्वज्ञान स्पष्ट होते. भारतीय राज्यघटनेच्या सुरुवातीला प्रास्ताविका / उद्देशिका (Preamble) देण्यात आले आहे. भारतीय राज्यघटनेत प्रस्तावनेलाच उद्देशिका असे म्हणतात. ही संकल्पना अमेरिकेच्या राज्यघटनेपासून घेण्यात आली असून याची भाषा ऑस्ट्रेलियन संविधानाच्या प्रस्तावनेतून घेण्यात आली आहे. प्रथम अमेरिकन घटनेमध्ये प्रस्ताविका देण्यात आली होती, नंतर इतर देशांनी या पद्धतीचा स्वीकार केला. घटनेची प्रास्ताविका पं. नेहरू यांनी तयार केलेल्या व संविधान सभेत मांडलेल्या उद्देश पत्र यावर आधारित आहे. संविधान सभेने २२ जानेवारी १९४७ रोजी उद्देशपत्र स्वीकृत केले.

**घटनेची उद्देशपत्रिका पुढीलप्रमाणे :**

आम्ही भारतीय जनता भारताचे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक, गणराज्य निर्माण करण्याचे आणि भारतीय सर्व नागरिकास सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता, निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा गांभीर्यपूर्वक निर्धार करून, आमच्या घटना समितीत आज नोव्हेंबर १९४९ रोजी हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत: प्रत अर्पण करीत आहोत.

समाजवादी धर्मनिरपेक्ष आणि अखंडता हे उद्देशपत्रिकेच्या मुळात नसलेले शब्द १९७६ च्या घटना दुरुस्तीने टाकण्यात आले आहेत.

**उद्देश पत्रिकेचे घटक :**

उद्देशिकातून चार घटक स्पष्ट होतात.

**१) घटनेच्या प्राधिकराचा स्त्रोत :** प्रस्ताविका स्पष्ट करते की घटना आपले प्राधिकार भारतीय जनतेकडून प्राप्त करते.

**२) भारतीय राज्याचे स्वरूप :** उद्देशिका भारताचे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही व गणराज्य असल्याचे घोषित करते, हेच भारतीय जनतेने स्वत:साठी स्वीकारलेले आदर्श आहेत.

**३) घटनेचे उद्देश :** न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता ही घटनेचे उद्देश आहेत. ते भारतीय जनतेच्या आकांक्षा स्पष्ट करतात.

**४) घटनेची स्वीकृती :** घटनेची स्वीकृती २६ नोव्हेंबर १९४९ रोजी करण्यात आली आहे, हे उद्देशिकेत नमूद केले आहे.

घटना समितीच्या पहिल्या बैठकीत पंडित नेहरू यांनी उद्दिष्ट संबंधित ठराव मांडून ज्या भावना व्यक्त केल्या होत्या त्या उद्देश पत्रिकेत दिल्या आहेत. नेहरुंचा हा ठराव गांधीजींच्या विचारांनी पूर्णत: प्रभावित झाला होता. १९३१ साली गांधीजी गोलमेज परिषदेला गेले असता, भारताकरता तुम्ही कशा प्रकारच्या संविधानाची अपेक्षा करता, असा पत्रकाराने प्रश्न विचारला. तेव्हा गांधीजींनी उत्तर दिले होते की, ''भारताला सर्वप्रकारच्या गुलामगिरीतून आणि दैन्यावस्थेतून मुक्त करणारे आणि आवश्यकता पडल्यास पाप करण्याचाही अधिकार मिळवून देणारे संविधान प्राप्त करण्याचा मी आटोकाठ प्रयत्न करीन. अत्यंत दरिद्री माणसाला देखील हा माझा देश आहे आणि त्याचे भवितव्य ठरविण्यात माझ्या शब्दालाही किंमत आहे, असे वाटू शकेल अशा भारताची मला रचना करायची आहे. भारतात अस्पृश्यतेचा शाप मुळीच टिकू शकणार नाही, स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान अधिकार राहतील, कोणाचेही शोषण आम्ही करणार नाही व कोणाकडून आम्ही आपले शोषण होऊ देणार नाही, माझ्या स्वप्नांचा भारत हा असा आहे.'' भारतासंबंधी गांधीजींचे हे स्वप्न घटनेच्या उद्देशपत्रिकेतच नव्हे तर संपूर्ण घटनेच्या अंतरंगात देखील शब्दश: विखुरलेले आढळते.

**महत्व :**

उद्देशपत्रिकेत निव्वळ उद्दिष्टांचा समावेश करण्यात आला असल्यामुळे कायद्याच्या काटेकोर दृष्टिकोनातून तिचे महत्त्व सीमित असे आहे. घटनेच्या एखाद्या कलमाचा अर्थ स्पष्ट न झाल्यास व त्यासंबंधी विवाद उत्पन्न झाल्यास घटनाकारांना कोणता अर्थ अभिप्रेत होता, हे जाणून घेण्यास या उद्देशपत्रिकेची फार मोठी मदत होत असते. ही उद्देशिका पाहिल्यानंतर भारतीय जनतेच्या ध्येयाचे प्रतिबिंब त्यात स्पष्टपणे पडलेले दिसते. या सरनाम्याच्या सुरुवातीला स्पष्ट केले आहे की, भारतीय राज्यघटना ही कुणी देणगी म्हणून दिलेली नसून ती भारतीय जनतेने निर्माण केली आहे. तसेच भारतीय जनता सार्वभौम आहे. घटना भारतीय जनतेने तयार केली आणि ती स्वेच्छेने स्वीकारली म्हणूनच ही घटना अमलात आणण्याची व तिचे रक्षण करण्याची अंतिम सत्ता जनतेची आहे हे स्पष्ट होते. भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरूप कसे राहील, याविषयी स्पष्ट उल्लेख दुसऱ्या भागात दिसतो. भारत सार्वभौम राष्ट्र होईल, म्हणजे इथून पुढे भारतावर कोणत्याही राज्याचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष नियंत्रण राहणार नाही. अंतर्गत व परदेशीय संबंध प्रस्थापित करण्यास भारत आता पूर्ण स्वतंत्र झाला आहे. भारतामध्ये प्रजासत्ताक स्थापन केले जाईल. प्रजासत्ताक राज्यात अंतिम सत्ता लोकांकडे असते. राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेच्या तिसऱ्या भागांमध्ये राज्यव्यवस्थेचा उद्देश स्पष्ट केला आहे. भारतातील सर्व नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य व समता प्राप्त करून देणे, तसेच बंधुत्वाची शाश्वती देणे, हे शासनाचे ध्येय असेल त्यामध्ये यांची पूर्तता शासनाने केली पाहिजे या उद्देशपत्रिके विषयी अनेक ग्रंथकारांनी घटनेतील श्रेष्ठ विचारसरणीचा व आदर्श तत्वांचा विशेष गौरव केलेला दिसतो.

घटनेचा सरनामा म्हणजे भारतीय घटना जाणून घेण्यासाठी आवश्यक असलेली एक राजकीय दृष्टी पुरवतो, असे के. एम. मुन्शी यांचे मत आहे. सर अरनेस्ट बारकर यांनी आपल्या राजकीय सिद्धांतावरील सामाजिक आणि राजकीय सिद्धांताची मूलतत्वे, या अभिजात ग्रंथाच्या प्रारंभी हा सरनामा समाविष्ट केला आहे . त्यांच्या मते, भारतीय घटनेचा सरनामा ही एक महत्त्वपूर्ण बाब आहे. सरनाम्याला राज्यघटनेचा आत्मा असेही म्हटले जाते, यातून घटनेचे सामाजिक, आर्थिक, राजकीय तत्वज्ञान स्पष्ट होते. उद्देशिका आपली घटना ज्या मूलभूत तत्त्वज्ञानावर आणि मूल्यावर आधारित आहे त्याचे प्रदर्शन करते. ती भारतीय जनतेने स्वीकारलेले आदर्श प्रदर्शित करते. तिचा वापर मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्वांची व्याप्ती निश्चित करण्यासाठी केला जाऊ शकतो. थोडक्यात उद्देश पत्रिका हा राज्यघटनेचा सार किंवा अंश मानली जाते. उद्देशिका हा संविधानाचा महत्त्वाचा भाग आहे. उद्देशिकेतील प्रत्यक्ष शब्द, त्याचा अर्थ, विविध छटा शब्दातून प्रतीत होणारा अर्थ, याबाबत संविधान सभेत काळजीपूर्वक मांडणी करण्यात आली होती.

मूलभूत हक्क अमेरिकेच्या घटनातज्ञांनी त्यांच्या राज्यघटनेत बिल ऑफ राइट्सचा समावेश करून या कल्पनेला मूर्त स्वरूप दिले होते, त्यामुळेच पहिल्या महायुद्धानंतर अनेक युरोपीय देशांनी त्यांच्या राज्यघटनेत मूलभूत हक्कांचा समावेश केला. लोकशाही देशांमधील व्यक्तींना काही मूलभूत हक्क प्रदान केले जातात. ज्यांचे संरक्षण देशातील न्यायव्यवस्थेमार्फत केले जाते. भारतीय राज्यघटनेच्या भाग ३, कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्क समाविष्ट करण्यात आले आहेत त्यामुळे भाग तीनला 'मॅग्नाचार्टा' असे म्हणतात. घटनाकर्त्यांनी हे मूलभूत हक्क अमेरिकेच्या घटनेवरून घेतले आहेत. काँग्रेसने १९२८ साली भारतीय राज्यघटना तयार करण्यासाठी मोतीलाल नेहरूंचे अध्यक्षतेखाली जी एक समिती स्थापन केली होती, त्या समितीने मूलभूत

हक्कांची कल्पना मांडली होती. कॅबिनेट मिशनने आपल्या अहवालात मूलभूत हक्कांचा स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत स्वीकार करण्याच्या दृष्टीने विचार करण्यासाठी सल्लागार समिती नेमावी असे सुचविले होते. शेवटी घटनाकारांनी आपल्या घटनेमध्ये मूलभूत हक्कांचा समावेश केला. आपल्या घटनेतील हक्क जगातील इतर कोणत्याही घटनेतील हक्कापेक्षा अधिक विस्तृत आहेत.

**मूलभूत हक्कांचा अर्थ :** देशाच्या घटनेत समाविष्ट करण्यात आलेल्या हक्कांना मूलभूत हक्क म्हणतात. म्हणजे घटनेतील मूलभूत हक्कांचा या यादीमध्ये नसलेल्या इतर कोणत्याही हक्काला मूलभूत हक्काचा दर्जा प्राप्त होत नाही. सर्वच हक्क न्यायप्रविष्ठ करणे शासनाला शक्य नसते. त्यामुळे मूलभूत हक्कात असे हक्क समाविष्ट केले की ज्या हक्कावीना मनुष्य चांगले जीवन जगू शकत नाही. त्या हक्कांनाच आपण मूलभूत हक्क म्हणतो. ते अमर्यादित आहेत, मात्र मूलभूत हक्क मर्यादित आहेत.

**मूलभूत हक्कांची वैशिष्ट्ये :**

१) मूलभूत हक्क घटनेचा अविभाजक असून ते साधारण कायद्याद्वारे बदलता किंवा रद्द करता येत नाहीत.

२) घटनेचा भाग तीन हा जगातील कोणत्याही घटनेतील मूलभूत हक्कापेक्षा अधिक विस्तृत व विश्लेषणात्मक आहे.

३) काही हक्क केवळ देशाच्या नागरिकांनाच उपलब्ध आहेत, उदा. कलम १५, १६, १९, २९ व ३० मधील मूलभूत हक्क म्हणजे हे हक्क परकीयांना उपलब्ध नाहीत, मात्र कलम १४, २० ते २८ मधील हक्क परकीयांनाही उपलब्ध आहेत.

४) काही हक्क नकारात्मक स्वरूपाचे आहेत म्हणजे ते राज्यसंस्थेला एखादी कृती करण्यास प्रतिबंध करतात, उदा. पदव्या रद्द करणे उलट काही सकारात्मक स्वरूपाचे हक्क असतात म्हणजे ते जनतेला काही हक्क मिळवून देतात, स्वातंत्र्य व समानतेचा हक्क.

५) मूलभूत हक्क अमर्यादित नसून गुणात्मक आहेत, म्हणजे राज्यसंस्था त्यावर मर्यादा घालू शकते. मूलभूत हक्क व्यक्तींचे हक्क व संपूर्ण समाजाचे हक्क यामध्ये आणि पर्यायाने वैयक्तिक स्वातंत्र्य व सामाजिक नियंत्रण यामध्ये संतुलन निर्माण करते.

६) मूलभूत हक्क न्यायप्रविष्ठ आहेत, म्हणजे त्यांचे उल्लंघन झालेले असते सर्वोच्च न्यायालयाकडून किंवा उच्च न्यायालयाकडून पुन्हा प्राप्त करून घेता येतात.

७) संसदेस मूलभूत हक्कांमध्ये दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे, मात्र ते कायद्याने करता येते. असे करताना मात्र घटनेच्या मूलभूत संरचनेत बदल करता येत नाही.

८) राष्ट्रीय आणीबाणी काळात राष्ट्रपती कलम २० व २१ मधील हक्क वगळता इतर सर्व हक्क स्थगित करू शकतात.

**मूलभूत हक्क :**

हे हक्क भाग ३ मध्ये समाविष्ट केले आहेत. १९७८ मध्ये संपत्तीचा हक्क ४४ व्या घटना दुरुस्तीनुसार

मूलभूत हक्काच्या यादीतुन वगळण्यात आला आहे आणि तो भाग ii मधील प्रकरण iv मधील कलाम ३००- मध्ये टाकून एक कायदेशीर हक्क म्हणून घोषित केले, त्यामुळे घटनेत सध्या मूलभूत हक्काचे ६ गट आहेत.

१) समानतेचा हक्क (कलाम १४ ते १८)

२) स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९ ते २२)

३) शोषणाविरुद्ध हक्क (कलम २३ व २४)

४) धर्म स्वातंत्र्याचा हक्क (कलाम २५ ते २८)

५) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (कलम २९ ते ३१)

६) घटनात्मक उपाययोजना हक्क (कलम ३२)

**महत्त्व :**

मूलभूत अधिकार हे सर्व नागरिकांचा संपूर्ण शारीरिक, मानसिक, नैतिक व आध्यात्मिक विकास सुनिश्चित करतात. यामध्ये अशा मूलभूत स्वातंत्र्याचा समावेश असतो ज्यामुळे जीवन जगण्यायोग्य बनते. अधिकार बहुसंख्यांकाच्या राज्यकारभारासाठी लोकशाहीजन्य निती मान्यतेचा आराखडा निर्माण करतात. मात्र त्याच बरोबर देशातील अल्पसंख्याकामध्ये सुरक्षिततेची भावनाही निर्माण करतात. कोणतीही लोकशाही भाषण व अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यासारख्या हक्काविना अस्तित्वात राहू शकत नाही. मूलभूत अधिकार देशात राजकीय लोकशाहीचा आदर्श प्रस्थापित करतात. ते माणसांचे नव्हे तर कायद्याचे शासन प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात.

**मूलभूत कर्तव्य आणि जबाबदारी :**

**पार्श्वभूमी :** मूलभूत हक्क व मूलभूत कर्तव्य, ही काही राज्यघटना विश्लेषकांच्या मते एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. समाजाचा घटक या नात्याने व्यक्तीस जसे हक्क प्राप्त होतात, त्याचप्रमाणे व्यक्तींनी समाजासाठी काही जबाबदाऱ्या पारपडणे अपेक्षित असते. लोकशाहीत लोकांनी केवळ हक्कांची मागणी करू नये, तर कर्तव्याप्रती त्यांनी दक्ष असावे लागते. भारताच्या मूळ घटनेत कर्तव्याचा समावेश करण्यात आला नव्हता. पुढे १९७६ मध्ये ४२ व्या घटना दुरुस्तीने घटनेत १० मूलभूत कर्तव्यांची यादी समाविष्ट करण्यात आली. २००२ मध्ये ८६ व्या घटना दुरुस्तीने ११ वे मूलभूत कर्तव्य टाकण्यात आले. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्ये तत्कालीन सोवियत रशियाच्या घटनेवरून घेण्यात आली आहेत. अमेरिका, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी यासारख्या प्रमुख देशांच्या घटनेमध्ये मूलभूत कर्तव्ये, जबाबदाऱ्या आढळून येतात येत नाहीत, केवळ जपानची घटना त्यात अपवाद आहे. याउलट समाजवादी देशांनी नागरिकांच्या मूलभूत हक्क व कर्तव्यांना सारखेच महत्त्व प्रदान केले आहे.

आणीबाणीच्या काळात निर्माण झालेल्या गरजेमुळे भारत सरकारने १९७६ मध्ये मूलभूत कर्तव्याबाबत सरदार सुवर्णसिंह यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीने मूलभूत कर्तव्यांचे एक स्वतंत्र प्रकरण घटनेत समाविष्ट करण्याची शिफारस केली. समितीने आठ मूलभूत कर्तव्य सांगितली होती. तत्कालीन काँग्रेस सरकारने या समितीच्या काही शिफारसी स्वीकारल्या. त्यानुसार ४२ व्या घटनादुरुस्ती अन्वये १९७६

मध्ये घटनेत भाग चार ए समाविष्ट करण्यात आला. या नवीन भागात कलम ५१ हे केवळ एकच कलम टाकण्यात आले. या कलमात १० मूलभूत कर्तव्यांची यादी दिली आहे यामध्ये सुवर्णसिंह समितीने दिलेल्या शिफारशीपैकी सहा कर्तव्य काही बदलासहित व इतर चार कर्तव्य त्यांचा समावेश करण्यात आला. मूलभूत कर्तव्यांची यादी पुढीलप्रमाणे -

१) घटनेचे पालन करणे आणि तिचे आदर्श व संस्था राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.

२) ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यास स्मृती मिळाली, त्या उदात्त आदर्शाची जोपासना करून त्याचे अनुसरण करणे.

३) भारताचे सार्वभौमत्व, एकता व एकात्मता उन्नत ठेवणे व त्याचे संरक्षण करणे.

४) देशाचे संरक्षण करणे व आव्हान केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे.

५) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढिस लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रश्नांचा त्याग करणे.

६) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वर्षांचे मोल जाणून तो जतन करणे.

७) वने, सरोवरे, नद्या व वन्यजीवसृष्टी यासह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे आणि प्राणीमात्राबद्दल दयाबुद्धी बाळगणे.

८) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद्यांचा विकास करणे.

९) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

१०) राष्ट्र सतत उपक्रमसिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल, अशा प्रकारे व्यक्तिगत व सामुदायिक कार्याच्या सर्व क्षेत्रांमध्ये उत्तमता संपादन करण्यासाठी झटणे.

**मूलभूत कर्तव्यांची वैशिष्ट्ये :**

१) त्यापैकी काही नैतिक कर्तव्य आहेत तर काही नागरिक कर्तव्य आहेत, उदा. स्वातंत्र्य लढ्याच्या उदात्त आदर्शाची जोपासना हे एक नैतिक कर्तव्य आहे, तर घटना, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा सन्मान करणे हे नागरी कर्तव्य आहे.

२) यामध्ये भारतीय परंपरा, धर्म आणि पद्धतींचा विचार करण्यात आला आहे. दुसऱ्या भाषेत ही कर्तव्ये भारतीय जीवनपद्धतीचा अविभाज्य घटक असलेल्या मूल्यांचे प्रतीक आहेत.

३) मूलभूत हक्क नागरिकांना तसेच परक्यांना उपलब्ध होतात. मात्र मूलभूत कर्तव्य केवळ नागरिकांना लागू होतात.

४) मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे मूलभूत कर्तव्यसुद्धा न्यायप्रविष्ठ नाहीत. घटनेत न्यायालयाच्या माध्यमातून त्यांच्या अंमलबजावणीची तरतूद नाही. तसेच त्यांच्या उल्लंघणा विरुद्ध न्यायिक अनुज्ञा उपलब्ध नाही, मात्र संसद एखाद्या कायद्याद्वारे त्याची अंमलबजावणी करू शकते.

६) मूलभूत कर्तव्य ही प्रत्येक भारतीय नागरिकांची नैतिक जबाबदारी आहे.

**मूलभूत कर्तव्यावरील टीका :**

१) मूलभूत कर्तव्यविषयी उदात्त आदर्श, संमिश्र संस्कृती, वैज्ञानिक दृष्टिकोन, शोधकबुद्धी, यासारख्या संकल्पना या अस्पष्ट आहेत, प्रत्येक जण याचा अर्थ आपल्या सोयीने काढतो.

२) मूलभूत कर्तव्याची यादी ही अशी आहे, की ज्यामध्ये कुटुंब नियोजन, कर भरणे, मतदान करणे यासारख्या कर्तव्याचा समावेश नाही. मात्र कर भरणे या मूलभूत कर्तव्याची शिफारस स्वर्णसिंह समितीने केली होती.

३) मूलभूत कर्तव्य ही न्याय प्रविष्ट नाहीत, त्यामुळे या बाबीचे महत्त्व न्यायप्रविष्ठ ठरत नसल्याने फक्त नैतिक ठरते.

४) भारतीय कायद्याद्वारे व्यक्तीचे जीवन नियंत्रित होते, त्यामुळे अकारण मूलभूत कर्तव्याचा समावेश घटनेत करून दुराग्रह निर्माण करण्यात आला आहे.

**महत्व :**

थोडक्यात मूलभूत कर्तव्यावर जरी काही टीका झाली असली तरी त्याचे महत्त्व कमी होत नाही .

१) प्रत्येक नागरिकालाच आपल्या कर्तव्याची जाणीव करून देतात की हक्काचा उपभोग घेत असताना देशा प्रती आपली जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे.

२) राष्ट्रध्वज जाळणे, सार्वजनिक मालमत्तेची नासधुस करणे, यासारख्या राष्ट्रविरोधी व समाजविरोधी कृती करण्याविरुद्ध ही कर्तव्ये ताकीद देतात.

३) ही कर्तव्ये नागरिकांसाठी स्फूर्तीचा स्रोत असून त्याच्यामध्ये शिस्त व जबाबदारीच्या भावनेस प्रोत्साहन देतात. राष्ट्रीय उद्दिष्टांच्या पूर्ततेच्या प्रक्रियेत नागरिकांची सक्रिय भूमिका आहे हे या कर्तव्यातून प्रतीत होते.

४) एखाद्या कायद्याची घटनात्मक वैधता तपासण्यासाठी न्यायालयास मूलभूत कर्तव्याचा आधार घेता येऊ शकतो. मूलभूत कर्तव्याची अंमलबजावणी करणारा कायदा कलम १४ व कलम १९ मधील मूलभूत हक्कावर पर्याप्त बंधने घालू शकतो.

५) मूलभूत कर्तव्य कायद्याद्वारे अंमलात आणता येऊ शकतात, त्यामुळे संसद कायद्याद्वारे त्यांचे पालन न झाल्यास शिक्षित तरतूद करू शकते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. कॅबिनेट मिशन योजना ............. साली जाहीर करण्यात आली.

अ) १९४४ ब) १९४५

क) १९४६ ड) यापैकी नाही

२. संविधान सभेचे कायदेशीर घटनात्मक सल्लागार म्हणून ............. यांची निवड झाली.

अ) बी. एन. राव ब) मेहेरचंद

क) डॉ. राजेंद्र प्रसाद ड) यापैकी नाही

३. मसुदा समितीचे अध्यक्ष ............. हे होते.

अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब) व्ही. पी. मेनन

क) डॉ. राजेंद्र प्रसाद ड) यापैकी नाही

४. ............. कलमानुसार अस्पृश्यता पाळणे गुन्हा आहे.

अ) कलम १२ ब) कलम १३

क) कलम १७ ड) यापैकी नाही

५. ............. समितीच्या शिफारशीनुसार १९७६ साली ४२ व्या घटना दुरुस्तीने मूलभूत कर्तव्यांचा घटनेत समावेश करण्यात आला.

अ) मेहता ब) स्वर्णसिंह

क) भावे ड) यापैकी नाही

## ४.३ सारांश :

देशाच्या फाळणीला मुस्लिम लीगचा फुटीरतावाद व बॅ. जिनांचे अडवणुकीचे धोरण जसे कारणीभूत होते, तसेच ब्रिटिश राज्यकर्त्यांची फोडा – झोडा व राज्य करा ही नीतीसुद्धा जातीय दंगली भडकवण्यास व अल्पसंख्यांक मुस्लिमांच्या मनात बहुसंख्य हिंदूंच्या वर्चस्वाविषयी भय निर्माण करण्यास कारणीभूत ठरली होती. त्यामुळे राष्ट्रसभा (काँग्रेस) ही हिंदूंची राजकीय संघटना असून मुस्लिम जमातीच्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी मुस्लिम लीगची स्थापना ब्रिटिशांच्या चिथावणीने झाली आणि त्या पुढील काळात मुस्लिम लीगच्या माध्यमातून राष्ट्रसभेच्या आंदोलनाला शह देण्याचे राजकारण करण्यात येत असतानाच मुस्लिम जमातीला ब्रिटिश सत्तेशी राजनिष्ठ बनवण्याचे यशस्वी प्रयत्न झाले. लाहोर अधिवेशनात द्विराष्ट्रवादाच्या तत्वाचा पुरस्कार होऊन, पाकिस्तान मागणीचा ठराव संमत झाल्यावर पाकिस्तान निर्मितीसाठी सतत पाठपुरावा होऊ लागला. देशाची फाळणी झाली, ज्याचे अत्यंत घातक परिणाम घडून आले. दोन्ही देशांना जातीय दंगलीची झळ पोहाचली. निराधार लोकांच्या पुनर्वसनाची समस्या सोडवावी लागली. ब्रिटिशांच्या कूटनीतीमुळे संस्थानी राज्यांचे संघराज्यात सामिलीकरण ही मोठी समस्या पुढे आली. शेकडो संस्थानांचे भारतात विलीनीकरण हे मोठे आव्हान होते. जुनागड, हैदराबाद व काश्मीर ही संस्थाने भारतात सामील करून घेण्यासाठी भारत सरकारला मोठे प्रयत्न करावे लागले. प्रसंगी कठोर भूमिका घ्यावी लागली. सरदार पटेल यांनी याबाबत मोठ्या कौशल्याने

परिस्थिती हाताळली. पंडित नेहरूंनी देशांतर्गत शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करीत असतानाच प्रजासत्ताक गणराज्याच्या राज्यघटनेच्या निर्मितीला चालना दिली. घटनेचा प्रत्यक्ष अंमल २६ जानेवारी १९५० रोजी सुरू झाला. घटनेच्या सुरुवातीलाच उद्देशिका दिली आहे . मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्य इत्यादीचा घटनेत समावेश असून न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता हे घटनेचे उद्देश आहेत. ते भारतीय जनतेची आकांक्षा स्पष्ट करतात.

## ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**फोडा व झोडा नीती :** साम्राज्य संवर्धनासाठी ब्रिटिश मुसद्यांची फुटीरता पदाला प्रोत्साहन देण्याची राजनीती.

**रझाकार :** हैदराबाद संस्थानातील कासिम रझवी या मुस्लिमने त्याच्या नेतृत्वाखाली फॅसिस्ट प्रवृत्तीच्या दहशतवादी व हिंसाचारी सैनिकांना मिळालेली संज्ञा.

**सरनामा :** राज्यघटनेच्या निर्मितीचे उद्दिष्ट स्पष्ट करतो व विषयाचे विवेचन करतो.

**सार्वभौम :** स्वतंत्र, स्वयंशासित व कोणत्याही अंतर्गत व बाह्यसत्तेच्या दबावापासून पूर्णत: मुक्त व स्वायत्त असलेले राज्य.

**धर्मनिरपेक्ष :** सर्वधर्मसमभाव, कोणत्याही एका अथवा विशिष्ट धर्माला अधिकृत राजाश्रय न देणे.

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

१. ब – सर सय्यद अहमदखान २. क – १९०६
३. ड – १९०५ ४. अ – रेडक्लिप
५. क – दिल्ली

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

१. ब – ५६२ २. अ – सरदार पटेल
३. ब – व्ही .पी. मेनन ४. अ – जुनागड
५. क – हरिसिंग

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३**

१. क– १९४६ २. अ – बी. एन.राव
३. अ – डॉ.बाबासाहेब आंबेडकर ४. क – कलम १७
५. ब – स्वर्णसिंह

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टीपा लिहा.**

१) मुस्लिम जमातवाद २) मुस्लिम लीग

३) काश्मीर संस्थानचे विलीनीकरण ४) घटनेची रचना प्रक्रिया

५) घटनेची उद्देशिका

**ब) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) सर सय्यद अहमदखान यांचे कार्य स्पष्ट करा.

२) संस्थानांच्या विलीनीकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका थोडक्यात लिहा.

३) भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये सांगा.

४) संविधान सभेची माहिती थोडक्यात स्पष्ट करा.

**क) खालील प्रश्नांची विस्तृत उत्तरे लिहा.**

१) मुस्लिम जातीयवादाचा विकास कसा झाला हे सविस्तर लिहा.

२) भारताच्या फाळणीची कारणे सांगून परिणाम स्पष्ट करा.

३) जुनागड व हैदराबाद संस्थानांचे भारतात झालेले विलीनीकरण यावर सविस्तर चर्चा करा.

४) भारतीय राज्यघटनेची उद्देशिका सांगून मूलभूत हक्कांचे महत्व सांगा.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :


१. ग्रोव्हर बी. एल. – आधुनिक भारताचा इतिहास, १८५८–१९२०, एस. चांद आणि कंपनी, नवी दिल्ली, २००३.

२. गाठाळ एस. एच. – आधुनिक भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००४ .

३. आचार्य जावडेकर शं. द. – आधुनिक भारत, सुलभ राष्ट्रीय ग्रंथालय, पुणे, १९५३.

४. सरदेसाई, नलावडे – आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००४ .

५. डॉ. कोलारकर श. गो. – आधुनिक भारताचा इतिहास श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९८७ .

६. दीक्षित नी. सी. – भारताचा इतिहास, पिंपळापुरे प्रकाशन, २००५.

७. डॉ. कसबे रावसाहेब – डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन, पुणे, २००१.

८. कीर धनंजय, – डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६६.

९. डॉ. जोशी प. ल. – भारतीय संविधान शासन व राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर, १९८७.

१०. पाटील अमित – भारतीय संविधान आणि भारतीय राजकारण, विवेकानंद प्रकाशन, २०१८ .

११. डॉ. आढा आर. एस. – भारत का संविधान एक परिचय, पिंकसिटी प्रकाशन, जयपुर, २०१८

१२. Khurana K.L. - Modern India 1792-2967, Laxmi Narayan Agrawal, Agra, 2004.

१३. Chanda Ashok - Federalism in the Indian Constitution Londan, George, Allen and Unwind Ltd., 1965.

❍❍❍